धृतराष्ट्राच्या सांगण्यावरून अशी कंडी पिकविली कीं, "हें वारणावत नगर सर्व प्रकारच्या रत्नांनीं व्याप्त असून या ठिकाणीं मनुष्यांचें मन रममाण होऊन जातें. अशा या नगरांत शंकराच्या पूजनार्थ फारच मोठी यात्रा जमली आहे, अशा प्रकारचा रमणीय समाज जगतांत आढळतच नाहीं." अशा प्रकारें बातमी पसरली असतां, त्या रम्य वारणावतास जाण्याविषयीं पांडवांच्या मनांत आलें. पांडवांच्या मनांत वारणावतास जाण्याविषयीं उत्सुकता उत्पन्न झाली आहे, हें धृतराष्ट्राच्या लक्षांत येतांच तो पांडवांकडे येऊन त्यांस म्हणाला, "हें पहा—सर्व जगांत वारणावत नगर अत्यंत रमणीय असल्याबद्दल लोक वारंवार मला सांगतात. तेव्हां त्या ठिकाणीं जाण्याची तुम्हांस उत्सुकता असेल तर कुंती व परिवार यांसहवर्तमान तेथें जाऊन देवांप्रमाणें खुशाल मौज मारा. तेथें ब्राह्मण, गायक वगैरे सर्वांस यथेष्ट द्रव्य द्या. पांडवहो, त्या ठिकाणीं कांहीं काल विहार करून परमानंदाचा अनुभव घ्या; आणि नंतर या हस्तिनापुरास सुखरूप परत या."

वैशंपायन सांगतात:—राजा, आपण येथून जावें अशी धृतराष्ट्राची इच्छा आहे हें जाणून, व आपणांस विदुराचें साहाय्य आहे हें ध्यानीं आणून धर्मराजानें त्यास 'ठीक आहे' म्हणून उत्तर दिलें. नंतर शांतनव भीष्म, महामति विदुर, द्रोण, बाल्हीक, सोमदत्त, कृपाचार्य, अश्वत्थामा, भूरिश्रवा, व दुसरे मान्य पुरुष, अमात्य, तपोनिधि ब्राह्मण, पुरोहित, नागरिकजन, व यशस्वीनी गांधारी या सर्वांस युधिष्ठिर सावकाश व नम्रपणानें म्हणाला:—ज्या ठिकाणीं लोकांची मोठी गर्दी जमली आहे, अशा रमणीय वारणावतास धृतराष्ट्राच्या आज्ञेवरून आम्ही सहपरिवार जात आहों, यास्तव आपण सर्वजण प्रसन्न चित्तानें आम्हांस कल्याणकारक आशीर्वाद द्या. आपले आशीर्वाद मिळविल्यावर विघ्नें आम्हांस स्पर्शही करूं शकणार नाहींत.

जनमेजय राजा युधिष्ठिरानें अशा प्रकारें त्यांची प्रार्थना केली असतां ते सर्वजण प्रसन्नवदन होऊन पांडवांस म्हणाले:—पांडुपुत्रहो, तुमचें मार्गांत सर्वदा कल्याण असो; आणि कोणत्याही प्राण्यापासून तुम्हांस यत्किंचितही अपाय न होवो. अशा प्रकारें आशीर्वाद मिळविल्यानंतर पांडवांनीं राज्यप्राप्तिस्तव स्वस्तिवाचन केलें, आणि सर्व काम आटपून ते वारणावतास गेले.

अध्याय एकशें चवेचाळिसावा.

—:०:—

जतुगृहनिर्माण.

वैशंपायन सांगतात:—जनमेजया, याप्रमाणें धृतराष्ट्रानें पांडवांस सांगितलें असतां, दुष्ट दुर्योधनाचा आनंद गगनांत मावेना. त्यानें तात्काळ आपल्या पुरोचन नामक सचिवास एकांतीं बोलावून आणिलें; व त्याचा उजवा हात धरून तो त्याशीं बोलूं लागला.

दुर्योधन म्हणाला:—पुरोचना, तूं माझा परममित्र असल्यामुळें, ही संपूर्ण संपन्न भूमि जशी माझी आहे, तशीच ती तुझ्याही मालकीची आहे. यास्तव या आपल्या भूमीचें रक्षण करणें तुला योग्य होय. पहा—तुझ्याबरोबर जशी मी सल्लामसलत करतों, तशीच ती दुसऱ्या कोणाबरोबर करावी, तर, बाबा, तुझ्याहून अधिक विश्वासाचा असा साह्यकर्ता मला दुसरा कोणीच नाहीं. यास्तव, मित्रा, मी तुला जी गोष्ट सांगणार आहें, ती अगदीं गुप्त राख; व माझे शत्रु जे पांडव, त्यांस या जगांतून दूर कर. मी जें सांगत आहें, तें हरप्रयत्नानें सिद्धीस ने. पुरोचना, धृतराष्ट्रानें पांडवांस वारणावतास पाठविलें आहे. ते त्याच्या आज्ञाप्रमाणें तेथील उत्सवांत दंग होतीलच. तूं मात्र रथास उत्तम खेंचरें जोडून वायुवेगानें कसें-

ही करून आजच्या आज वारणावतास जाऊन पोहोंचशील असें कर; आणि त्या ठिकाणीं गेल्यावर नगराच्या एका टोंकास, एक कडेकोट बंदोबस्ताचा चौसोपी वाडा तयार कर. त्याला वाटेल तितकें द्रव्य लागलें तरी चिंता नाहीं. राळ, ताग वगैरे जीं जीं लवकर पेटणारीं द्रव्यें आपल्या भांडागारांत असतील, तीं सर्व तूं त्या घरांत घाल. तूप, तेल, चरबी व पुष्कळशी लाख हीं द्रव्यें मातीशीं मिळवून त्यांच्या योगानें तूं भिंतीस गिलावे करीव. सारांश, ताग, तूप, तेल, लाख, लांकूड वगैरे सर्व ज्वालाग्राही पदार्थ त्या घरांत सर्वत्र पसरून दे; व हें कृत्य इतकें बेमालूम व गुप्तपणें कर कीं, पांडव किंवा इतर लोक त्याची कशीही परीक्षा करूं लागले, तरी तें ज्वालाग्राही आहे याचा त्यांस मागमूसही लागूं नये. याप्रमाणें घर तयार झाल्यावर पांडव, कुंती व त्यांचे सर्व सुहृज्जन यांजकडे जाऊन, त्यांस मोठ्या गौरवानें त्या घरांत राहावयास ने. तेथें गेल्यावर उत्तम आसनें, तशींच पालख्या, रथ वगैरे वाहनें, बिछाने इत्यादि सर्व सिद्धता इतक्या उत्तम प्रकारें कर कीं, तें करून आम्ही व आमचा पिता धृतराष्ट्र संतुष्ट व्हावा; व वारणावतांतील लोकांस आपल्या कपटाची वार्ताही लागूं नये. मग योग्य काळ येईपर्यंत याप्रमाणें बरोबर व्यवस्था ठेव; आणि पांडवांचा तुजवर पूर्ण विश्वास बसल्यावर, ते निर्भयपणें झोंपीं गेले आहेत अशी संधि साधून त्या घराच्या दरवाज्यास आग लावून दे. असें केलें असतां सर्व लोकांस वाटेल कीं, पांडवांच्या घरास आग लागल्यामुळें ते त्यांत दग्ध झाले. याप्रमाणें लोकांची समजूत झाल्यावर पांडवांविषयीं आपणांस कोणीही दोष देणार नाहीं.

वैशंपायन सांगतात:—दुर्योधनाचें हें भाषण ऐकून पुरोचनानें उत्तर दिलें, "तुझ्या म्हणण्याप्रमाणें सर्व व्यवस्था करतों." याप्रमाणें दुर्योधनास वचन देऊन त्वरेनें जाणाऱ्या खेचरांच्या रथांत बसून पुरोचनानें तात्काळ प्रयाण केलें; आणि वारणावतास पोहोंचल्यावर त्यानें अगदीं दुर्योधनाच्या सांगण्याप्रमाणें सर्व तजवीज केली.

अध्याय एकशें पंचेचाळिसावा.

—:०:—

वारणावतगमन.

वैशंपायन सांगतात:—राजा जनमेजया, पांडवांनीं वायुवेगानें पळणारे उत्तम उत्तम घोडे जोडून रथ सिद्ध केले, आणि त्यांवर चढतांना त्यांनीं भीष्म, धृतराष्ट्र राजा, द्रोणाचार्य, कृप, विदुर, व दुसरे वृद्ध जन ह्यांच्या पायांवर मस्तक ठेवून मोठ्या खिन्न अंतःकरणानें त्यांचा निरोप घेतला. ह्याप्रमाणें गुरुजनांना अभिवंदन केल्यावर त्या सत्त्वशील पांडुपुत्रांनीं आपल्या समवयस्क आप्तस्वकीयांस गाढ आलिंगन दिलें, आणि नंतर लहान मंडळींचा नमस्कार ग्रहण केला. पुढें ते सर्व मातांस (वृद्ध स्त्रियांस) व मंत्रिमंडळास विचारण्यास गेले, आणि त्यांना प्रदक्षिणा घालून व त्यांचा निरोप घेऊन रथारूढ झाले. राजा, यांचे रथ वारणावताकडे चालू लागले तेव्हां महाबुद्धिमान विदुर, दुसरे कुरुवंशीय थोर थोर पुरुष, व नागरिकजन ह्यांनीं दुःखाकुल होऊन त्यांच्या मागून वाट धरिली!

राजा, त्यांपैकीं कितीएक ब्राह्मण पांडुपुत्रांची ती दीन अवस्था पाहून अत्यंत दुःखित झाले, व दुर्योधनादिकांची भीति न धरितां म्हणाले, "अरेरे! धृतराष्ट्राला कसाहो मोह पडला! त्याच्या ठिकाणीं कांहींच विवेक उरला नाहीं हें काय! कौरवकुलांत जन्मलेल्या राजानें अगदींच धर्माधर्मविचार सोडून द्यावा, हें अतिशय लांच्छनास्पद होय! अरे, पांडवांची योग्यता काय वर्णावी? त्यांपैकीं एकहीजण पापास प्रवृत्त होणार नाहीं! वस्तविकपणें पांडूच्या मागें राज्याचे अधिकारी पांडव; पण धृतराष्ट्राला ती गोष्ट मुळीं-

च्य सहन होत नाहीं. अहो, पांडवांना राज्याधिकार न देणें हा केवळ अधर्म होय; आणि असें असतां तें कृत्य भीष्मानें मान्य केलें, व त्यांस नगरांतून विनाकारण काढून लावण्यास अनुमोदन दिलें, तेव्हां हें घडले तरी कसें ? शांतनूचा पुत्र विचित्रवीर्य राजर्षि व त्याचा पुत्र पांडु राजा हे केवळ आम्हांस पित्याप्रमाणें वाटत. आज पांडु राजा जिवंत असता, तर पांडवांची अशी विपन्नावस्था होती काय? पण पांडूच्या मागें धृतराष्ट्राला हे राजपुत्र अगदीं नकोतसे झाले आहेत! परंतु आम्हांस ही गोष्ट मान्य नाहीं. आमचें हें नगर जरी अगदीं उत्तम आहे, तरी आम्हांस त्याची आतां पर्वा नाहीं; आम्ही आपली घरेंदारें सोडून त्या धर्माबरोबर तो जेथें जाईल, तेथें जाणार!"

राजा जनमेजया, नागरिकजनांचे ते उद्गार श्रवण करून, व त्यांना वाटलेली हळहळ मनांत आणून युधिष्ठिराचा कंठ अगदीं दाटून आला, आणि तो किंचित् विचार करून म्हणाला, "पौरजनहो! आमचा चुलता धृतराष्ट्र राजा हा आम्हांस पित्याप्रमाणें वंदनीय व श्रेष्ठ आहे; ह्यासाठीं, त्यानें जी आज्ञा केली, तिजविषयीं कोणतीही शंका न घेतां आम्हीं ती मान्य करावी, हेंच आमचें व्रत होय. आमच्याविषयीं तुमचें अंतःकरण हळहळत आहे; ह्यास्तव तुम्हीं आम्हांस उजवी घालून व आशीर्वादांनीं आमचें अभिनंदन करून आपल्या घरीं परत जावें. जेव्हां आम्हांस तुमची कांहीं गरज लागेल, तेव्हां तुम्हीं आमच्या उपयोगीं पडून आमचें हित करावें."

राजा जनमेजया, युधिष्ठिराचें असें भाषण ऐकून त्या नागरिकजनांनीं पांडुपुत्रांस प्रदक्षिणा घातली, आणि आशीर्वादांनीं त्याचें अभीष्ट चिंतून ते स्वनगरास परत गेले. पुढें नागरिकजन मागें वळल्यावर महाज्ञानी विदुरानें दुर्योधनाचा कपटव्यूह धर्मराजास कळविला, आणि पुढील घोर अनर्थ टाळण्याची आधींच व्यवस्था करून ठेविली.

विदुरोपदेश.

राजा जनमेजया, विदुरानें दुर्योधनाचें कपट धर्मराजाला सांगितलें, तें अगदीं गुप्त रीतीनें—फक्त धर्मराजालाच समजेल असें—सांगितलें. कारण, विदुर हा महाज्ञानी होता. त्यास अनेक भाषा अवगत होत्या. अतिशय रानटी व वेदविरोधी जे म्लेच्छ लोक, त्यांची भाषाही त्यास उत्तम येत होती. तसाच त्या भाषेंत धर्मराजा वाकबगार आहे हेंही त्यास माहीत होतें. म्हणून त्यानें धर्मराजास दुर्योधनाची ती मसलत गूढ म्लेच्छ भाषेंतच कळविली; आणि त्या योगें, केवळ पौरजनांसच नव्हे, तर धर्माव्यतिरिक्त इतर पांडवांसही तें गुह्य समजूं दिलें नाहीं.

असो. त्या समयीं विदुरानें जें गुप्त रीतीनें सांगितलें, त्यांतील आशय असा: "बा धर्मा, शत्रूनें राज्यनीतीला अनुसरून जर कांहीं मसलत योजिली असेल, तर तिचें रहस्य आधीं जाणावें, आणि मग तदनुसार वर्तन करून भावी आपत्तींतून सुटावें, हें इष्ट आहे. हे पांडुतनया, दुर्योधनानें वारणावतास तुम्हांसाठीं जें गृह सिद्ध केलें आहे, तें केवळ लाख, राळ, सण इत्यादि शीघ्रज्वालाग्राही पदार्थांचें केलें आहे. त्या लाक्षादिकांचें स्वरूप दृश्य नाहीं. त्या गृहाच्या भिंतींमध्यें वगैरे ते सर्व पदार्थ भरलेले आहेत. ह्या गृहांत तुम्ही राहिलां असतां रात्रीच्या वेळीं तुम्हांस दगा होईल. युधिष्ठिरा, ही गोष्ट मनांत वागवून जर तूं वागलास, तर त्या संकटांतून सुटण्याचा मार्गही तुला सांपडेल, आणि मग तुला शत्रूंपासून कांहींच धास्ती नाहीं. धर्मा, त्या लाक्षादिकांच्या गृहांत तुम्हांस जाळून टाकण्याकरितां तुम्हांबरोबर हा पुरोचन सेवक येत आहे. आतां कदाचित् तुम्ही असें म्हणाल कीं ह्या पुरोचनास मारूं किंवा त्या लाक्षागृहांतच आम्ही

प्रवेश करणार नाहीं म्हणजे झालें; पण ह्या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण, प्रबल शत्रूशीं विरोध करण्यास प्रवृत्त होणें म्हणजे उद्यांचें मरण आजच आणणें होय. तेव्हां ह्या संकटांतून मुक्तता होण्यास हाच उपाय आहे कीं, तुम्हीं त्या गृहांतून एक बिळ तयार करावें. म्हणजे त्यांतून तुम्ही सुरक्षित बाहेर पडाल.

"युधिष्ठिरा, आपत्तींतून पार पडण्याचा मार्ग सुचण्यास विवेक हेंच उत्तम साधन होय, आणि आपत्तींतून मुक्त झाल्यावर तरी पुढें काय करावें, हें सांगणारा विवेकच; तसेंच, धैर्याच्या बळावर सर्व ऐश्वर्य मिळतें; आणि धैर्याच्याच योगानें पृथ्वी प्राप्त होते. तेव्हां हा सर्व विचार मनांत वागवून तूं वर्तन कर, म्हणजे तुझें संकट तात्काळ नष्ट होईल. धर्मा, तुम्ही लाक्षागृहांत असतां जें बिळ तयार कराल, त्याचें एक तोंड त्या घरांत व दुसरें तोंड कोठें तरी अन्यत्र, अशी व्यवस्था करा; म्हणजे शत्रूंनीं लाक्षागृहाला अग्नि लावल्यावर त्या बिळांतून तुम्हांस दुसरीकडे बाहेर पडतां येईल.

"युधिष्ठिरा, ह्याप्रमाणे अग्नीपासून तुमची सुटका झाली म्हणजे तुम्ही घाबरून जाऊं नका. मग तुम्ही मृगयेच्या वगैरे निमित्तानें मार्ग शोधूं लागा. पण मार्ग सांपडला तरी हस्तिनापुरास येऊं नका. नक्षत्रांच्या साहाय्यानें तुम्हांस दिशांचा निश्चय करितां येईल. ह्यास्तव तुम्ही शत्रूपासून कोठें तरी लांब निघून जा. आतां गुप्तपणे बिळ तयार कसें करावें ही मोठी अडचण खरी; पण ती अडचण दूर करण्यासाठीं मी आपला जिवलग मित्र त्या कामावर नेमितों. तो तुम्हांस बिळ तयार करून देईल, आणि त्या बिळांतून तुम्ही सुरक्षित बाहेर पडलां, म्हणजे तुम्हांस कितीही क्लेश झाले असले तरी त्यांचें तुम्हांस कांहींएक वाटणार नाहीं."

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, विदुराचें भाषण श्रवण करून त्यास युधिष्ठिरानें 'समजलें' म्हणून सांगितलें; आणि नंतर विदुरानें पांडवांस उजवी घातली, व त्यांस निरोप देऊन तो माघारा आपल्या गृहास आला. ह्याप्रमाणें भीष्म, पौरजन व विदुर हे सर्व परत आल्यानंतर कुंती धर्माजवळ येऊन त्यास म्हणाली, "बा धर्मा, विदुरानें गूढरूपानें (म्लेंच्छ भाषेनें) तुला जें कांहीं सांगितलें, व जें ऐकून घेऊन तूं 'समजलें' असें म्हणालास, तें आम्हांस कांहींच कळलें नाहींरे! जर तो तुझा व विदुराचा संवाद आम्हांस सांगितल्यानें कांहीं विघ्न घडण्यासारखें नसेल, तर तो सर्व ऐकावा अशी माझी इच्छा आहे."

युधिष्ठिर सांगतोः—हे माते, वारणावतांतील गृहापासून आपणांस अग्निभय आहे, असें विदुरानें मला सांगितलें. तसेंच, आणखी तो असें म्हणाला कीं, त्या प्रसंगीं अग्नींतून सुटका होण्याचाही मार्ग तुम्हांस सांपडेल; आणि शिवाय त्या धर्मात्म्यानें हेंही उद्गार काढिले कीं, धैर्यवान पुरुषाला पृथ्वी प्राप्त होते. असो. ह्याप्रमाणें विदुराचें भाषण ऐकून 'समजलें' असें मीं त्यास उत्तर दिलें.

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, फाल्गुन शुद्ध अष्टमीस रोहिणी नक्षत्रावर ते पांडव हस्तिनापुरांतून निघाले, आणि पुढें वारणावतास पोहोंचल्यावर त्यांनीं तेथें नागरिकजनांच्या भेटी घेतल्या.

अध्याय एकशें शेचाळिसावा.

—:०:—

भीमयुधिष्ठिरसंवाद.

वैशंपायन सांगतातः—पांडव आल्याची बातमी वारणावतांत पसरतांच तेथील सर्व लोकांस अत्यानंद झाला; आणि अनेक प्रकारच्या वाहनांत बसून व वाद्यें पताका वगैरे मंगल वस्तु बरोबर घेऊन, हजारों लोक मोठ्या उत्कंठेनें शास्त्रमार्गाप्रमाणें त्या नरश्रेष्ठांस सामोरे गेले;

आणि पांडवांजवळ पोहोंचतांच त्यांचा जयजयकार करून ते त्यांच्या भोंवतीं उभे राहिले. त्या वेळीं, राजेंद्रा, सर्व देव इंद्राच्या भोंवतीं जमले असतां तो ज्याप्रमाणें शोभतो, त्याप्रमाणेंच कांतीनें देवतुल्य असलेल्या त्या युधिष्ठिराच्या भोंवतीं ते सर्व लोक जमले असतां तो शोभूं लागला. जनमेजया, पौरजनांनीं पांडवांचा सत्कार केल्यावर उलट पांडवांनींही त्यांचा गौरव केला. नंतर गुढया, तोरणें वगैरेंनीं अलंकृत केलेल्या, व लोकवस्तीनें गजबजलेल्या त्या वारणावत नगरांत त्यांनीं प्रवेश केला. नगरांत प्रवेश केल्यावर लगेच ते वीर प्रथम स्वकर्मांत तत्पर अशा ब्राह्मणांच्या घरीं गेले. नंतर रथांत बसणाऱ्या त्या नगरांतील अधिकाऱ्यांच्या घरीं, व पुढें वैश्य, शूद्र वगैरे सर्व लोकांच्या घरीं ते भेटीस गेले. हे भरतर्षभा, याप्रमाणें सर्व नागरिकजनांनीं पांडवांचा आदरसत्कार केल्यानंतर, ते पुरोचनासहवर्तमान आपल्या बिऱ्हाडीं गेले. तेथें त्यांस पुरोचनानें भक्ष्य व पेय पदार्थ आणि उत्तम बिछानें व श्रेष्ठ आसनें यांचा पुरवठा केला. याप्रमाणें त्याने केलेला सत्कार स्वीकारून ते तेथें राहिले असतां पौरजनही त्यांच्या भजनीं असत. याप्रमाणें ते त्या ठिकाणीं दहा दिवस राहिल्यावर पुरोचनानें त्यांस नवीन तयार केलेलें घर दाखविलें. तें पांडवांस मारण्याच्या हेतूनेंच केलें असल्यामुळें वास्तविक आशिव असून, त्यास शिव असें नांव ठेविलें होतें! असो; कैलासांत ज्याप्रमाणें गुह्यक जातात, त्याप्रमाणें पुरोचनाच्या सांगण्यावरून पांडवांनींही आपल्या सर्व संपत्तीसह त्या घरांत प्रवेश केला. नंतर, अत्यंत धर्मनिष्ठ जो युधिष्ठिर, तो त्या घराचें निरीक्षण करून, तें ज्वालाग्राही असल्याबद्दल भीमसेनास सांगू लागला.

युधिष्ठिर म्हणालाः—हे शत्रुपंडका भीमसेना, या घराला तूप व लाख यांच्या वासांशीं मिश्रित झालेली चरबीची घाण येत आहे, तीवरून हें घर ज्वालाग्राही पदार्थांचें बनविलें असल्याबद्दल स्पष्ट होत आहे. या घराच्या कामासाठीं ताग, राळ, मोळ, लव्हाळे, बांबू इत्यादि पदार्थ आणून त्यांवर तूप शिंपडलें आहे; आणि तशा प्रकारच्या पदार्थांनीं, घर बांधण्याच्या कामांत हुशार व विश्वासू अशा कारागिरांकडून हें घर तयार करविलें आहे. मी ह्या पुरोचनावर विसंबून राहिलों असतां मला दग्ध करण्याची या पाप्याची इच्छा दिसते. कारण, तो मूर्ख सुयोधनाचा अंकित असून स्वतःही तितका दुष्ट आहे. ही सर्व विपत्ति महाबुद्धिमान विदुरानें तर्कानें जाणिली होती, व म्हणून त्यानें मला हें घर अशिव असल्याबद्दल मागेंच सांगितलें आहे. याप्रमाणें आपलें नित्य कल्याण इच्छिणाऱ्या आपल्या कनिष्ठ चुलत्यानें मोठया कळकळीनें आपणांस वेळेवर जागें केलें, म्हणूनच सुयोधनाच्या आज्ञेंत असणाऱ्या कृष्णकारस्थानी दुष्ट सेवकांनीं बेमालूम बनविलेलें तें घातक घर आम्हांस उमगलें!

भीमसेन म्हणालाः—दादा, जर हें घर ज्वालाग्राही आहे असें आपणांस वाटत असेल, तर कांहीं हरकत नाहीं, आपण पूर्वीं राहत होतों तेथेंच जाऊन राहूं.

युधिष्ठिरानें म्हटलेंः—भीमसेना, शमदमादिकांविषयीं तत्पर अशा ज्ञात्यांनीं, या देहांत आकृतिविशेषाचा अवलंब न करितां मोक्षचिंतन करीत राहावें, त्याचप्रमाणें आपणही आत्मसंयमन करून, मनांतील भाव बाह्य आचरणांत प्रकट न होऊं देतां, येथून सुटण्याच्या चांगल्या मार्गाचा विचार करीत येथेंच सावधगिरीनें राहावें असें मला वाटतें. कारण, जर आपली कांहीं हालचाल पुरोचनास समजली, तर तो विलंब न करतां बलात्कारानेंही आपणांस जाळून टाकील. कारण हा पुरोचन अधर्माला भिणारा नाहीं, किंवा लोकनिंदेलाही भीक घालणारा नाहीं. कांकीं, हा केवळ सुयोधनाच्या मताप्रमाणें

वागत असतो. आतां, अशा प्रकारें आपण दग्ध झाल्यास पितामह भीष्मांस क्रोध येईल, व त्यामुळें कौरवही खवळतील. तेव्हां आपण असलें कृत्य कशास करावें? अथवा, आपण येथें दग्ध झाल्यावर, कोप करणें हाच अशा वेळचा धर्म आहे असें समजून आपले आजोबा भीष्माचार्य व दुसरेही कुरुश्रेष्ठ संतप्त होऊन जातील. तसेंच, आपण अग्नीस भिऊन येथून पळून गेलों, तर राज्यलोभी सुयोधन हेरांच्या द्वारें आपला शोध लावील, व सर्वांस मारून टाकील. कारण, आज तो राज्याधिकारी आहे व आपणांस कसलाच अधिकार नाहीं त्याच्या पक्षास पुष्कळ लोक आहेत व आपण साहाय्यहीन आहों, तसेंच त्याच्याजवळ मोठा खजिना असून आपणांजवळ कांहींच नाहीं. यामुळें, नानाउपाय करून तो आपला घात करील. तेव्हां हा दुष्ट पुरोचन, व पापी सुयोधन यांस पूर्णपणें फसवून, आपणांस कोठें ना कोठें तरी अगदीं गुप्तपणें राहिलें पाहिजे मग मृगया करीत पृथ्वीच्या पाठीवर हिंडत असता आपणांस पळून जाण्याच्या वाटा सहज समजतील. यास्तव, आपण आजच एक उत्तम बेमालूम बिवर जमिनींत तयार करूं, म्हणजे त्या अति गुप्त ठिकाणीं आपणांस अग्नि जाळूं शकणार नाहीं. मात्र आपण त्या ठिकाणीं राहात असल्याबद्दल पुरोचनास किंवा दुसऱ्या कोणासही मागमूस न लागेल असें मोठ्या दक्षतेनें केलें पाहिजे.

अध्याय एकशें सत्तेचाळिसावा.

—:०:—

बिलखनन व जतुगृहवास.

वैशंपायन सांगतातः—राजा, कोणीएक खोदकामांत निपुण असा मनुष्य विदुराचा मित्र होता, तो पांडवांस एकांतीं गांठून म्हणाला, "पांडवहो, तुमचें प्रिय करण्यासाठीं विदुरानें मला पाठविलें आहे. खणण्याच्या कामांत मी कुशल आहें, तेव्हां तुमचें कोणतें कार्य मीं करावें? येथें येऊन गुप्तपणें तुमचें कल्याण करण्याविषयीं विदुरानें मला सांगितलें आहे. तेव्हां तुमचें कोणतें काम मीं करावें? येत्या कृष्णचतुर्दशीचे दिवशीं रात्रीं तुमच्या घराला दरवाज्याशीं पुरोचन आग लावील. कारण, तुम्हांस मातेसह दग्ध करून टाकावयाचें असा दुर्मति दुर्योधनाचा पक्का विचार आहे. पांडुपुत्रा, याविषयीं तुला विदुरानें म्लेच्छ भाषेनें थोडेंसें सुचविलें असून त्यावर तूं ठीक आहे असें उत्तर दिलें आहेस, ही खुणेची गोष्ट ऐकल्यावर तुला मजविषयीं विश्वास पटेल."

त्याचें हें भाषण ऐकून सत्यशील युधिष्ठिर त्यास म्हणालाः—हे सत्त्वस्था, तूं विदुराचा परम मित्र असून सदाचारी, आप्त, प्रेमांतला व त्यावर दृढभक्ति करणारा आहेस हें मी जाणतों. खरोखर त्या सर्वज्ञ विदुरास अमुक एक उपाय म्हणजे अज्ञात आहे असें मुळींच नाहीं. तूं जसा विदुराला तसा आम्हांसही प्रिय आहेस. तुजविषयीं आमच्या मनांत बिलकूल भिन्नभाव नाहीं. आम्ही जसे विदुराला तसेच तुलाही आहों, यास्तव विदुराप्रमाणेंच तूंही आमचें रक्षण कर. आम्हांसाठीं पुरोचनानें जें हें ज्वालाग्राही पदार्थांचें घर तयार केलें आहे, तें त्यानें सुयोधनाच्याच आज्ञेनें तयार केलें आहे, अशी माझी समजूत आहे. त्या दुष्ट सुयोधनाजवळ पुष्कळ खजिना असून त्यास पुष्कळ साह्यकर्तेही आहेत; यामुळें तो पापात्मा आम्हांस नेहमीं छळीत असतो. येथें आमचें संरक्षण करण्यासाठीं विदुरानें तुला पाठविलें आहे, यास्तव या भयंकर अग्नीपासून तूं आम्हांस सोडीव. कारण, हें कार्य तुझ्या हातून न झाल्यास आम्ही येथें दग्ध होऊन जाऊं; आणि सुयोधनाचा मनोरथ पूर्ण होईल. पहा—हें विस्तृत लाक्षागृह म्हणजे त्या दुष्टाचें मूर्तिमंत समृद्ध शस्त्रागारच होय. याच्या सभोंवतीं मजबूत कोट असल्यामुळें येथून बाहेर पडण्यास

काहींच मार्ग राहिला नाहीं. सुयोधनानें योजिलेलें हें दुष्ट कृत्य विदुरानें खरोखर पूर्वीच ओळखिलें असून त्यानें त्याबद्दल आम्हांस सूचनाही केली आहे. विदुरानें पूर्वीच जाणलेलें तें संकट सांप्रत आम्हांस प्राप्त झालें आहे. यास्तव, पुरोचनास न समजूं देतां या लाक्षागृहांतून तूं आमची मुक्तता कर.

वैशंपायन सांगतातः—राजा, नंतर त्या खनकानें त्यांस ठीक आहे म्हणून प्रत्युत्तर दिलें. व तो आपल्या प्रयत्नास लागला. लाक्षागृहाच्या कोटाबाहेर जो मोठा खंदक होता, तो आपण साफ करीत आहों, असें त्यानें पुरोचनास भासविलें; आणि आंत खणून ती माती बाहेर काढून त्यानें एक मोठें विवर तयार केलें. हे भारता, त्या लाक्षागृहाच्या मध्यापासून या विवरापर्यंतही एक मार्ग त्यानें खोदिला, आणि त्याच्या तोंडावर वरून जमिनीप्रमाणें दिसणारा एक दरवाजाही त्यानें तयार केला. दुष्टबुद्धि पुरोचन सदोदीत त्या लाक्षागृहाच्या तोंडाशींच बसत असल्यामुळें, त्यास न समजावें म्हणून भुयाराचें तोंड त्यानें याप्रमाणें बेमालूम झांकून टाकिलें. जनमेजया, त्या लाक्षागृहांत पांडव आपल्या आपल्या आयुधांसह रात्रीची वस्ती करीत, व दिवसास या वनांतून त्या वनांत मृगया करीत हिंडत.

राजा, दुर्योधनाच्या या कपटकृत्यानें अत्यंत विस्मित झालेले ते पांडव पुरोचनास फसविण्यासाठीं, मनांत साशंक असतांही त्यावर आपला विश्वास असल्याचें दाखवीत, व मनांत जळफळत असतांही आपण अगदी संतुष्ट आहों असें भासवीत. हा खरा प्रकार त्या नगरांत राहणाऱ्या लोकांस—फार काय? पण एका विदुरमित्र खनकावांचून दुसऱ्या कोणासही उमजला नाहीं.

अध्याय एकशें अठ्ठेचाळिसावा.

—:०:—

जतुगृहदाह.

वैशंपायन सांगतातः—राजा, याप्रमाणें कालक्रमणा करीत पांडव एक वर्षपर्यंत तेथें आनंदांत राहिलेले पाहून, यांचा आपणावर पूर्ण विश्वास बसला आहे असें पुरोचनास वाटलें, आणि त्याला मोठा आनंद झाला. ती पुरोचनाची वृत्ति धर्मज्ञ युधिष्ठिराच्या ध्यानांत येऊन तो आपल्या भावांशीं बोलूं लागला.

युधिष्ठिर म्हणतोः—बांधवहो, या पापी पुरोचनास असें वाटत आहे कीं, आमचा याच्यावर पूर्ण विश्वास बसला आहे. परंतु तो दुष्ट या संबंधांत अगदींच फसला आहे. तेव्हां मला वाटतें कीं, आपणांस पळून जाण्याची हीच वेळ आहे. या आयुधागारास अग्नि लावून त्यांत पुरोचनासच दग्ध करूं, व या ठिकाणीं कोणी तरी सहा माणसांस ठेवून कोणासही मागमूस न लागूं देतां आपण येथून निघून जाऊं.

वैशंपायन सांगतातः—राजा, याप्रमाणें पांडवांचा विचार ठरल्यानंतर, कांहीं दानधर्म करण्याच्या मिषानें कुंतीनें रात्रीं ब्राह्मणभोजन घातलें. तेव्हां या ठिकाणीं कांहीं सुवासिनीही आल्या होत्या. या जेवणखाण वगैरे आटोपल्यावर थोडा वेळ यथेष्ट करमणूक करून कुंतीचा निरोप घेऊन परत आपआपल्या घरीं गेल्या. ही जेवळावळ चालली असतां कोणीएक भिल्लीण व तिचे पांच मुलगे काळानेंच ओढून आणल्याप्रमाणें अन्नाच्या आशेनें त्या ठिकाणीं प्राप्त झाले. राजा, ती भिल्लीण आपल्या पुत्रांसह मदिरापान करून अगदीं धुंद झाली, व बेशुद्ध होऊन त्याच घरांत मेल्याप्रमाणें गाढ झोपीं गेली! नंतर पुरोचनादि सर्वजणांस झोंप लागल्यावर, मोठा वारा सुटला आहे असें पाहून भीमसेनानें पुरोचन नि-

जळा होता तेथेंच तें घर पेटविलें! याप्रमाणें गृहद्वार पेटविल्यानंतर त्यानें सर्व घरास चोहों बाजूंनीं अग्नि लाविला; आणि सगळ्या घरानें पेट घेतला असें पाहून ते शत्रूंचा उच्छेद करणारे पांडव मातेसह भुयारांत शिरले. इकडे अग्नीचा भयंकर डोंबाळा होऊन मोठमोठे आवाज होऊं लागले, त्या योगानें नागरिकजन जागे झाले, व तें घर पेटलेलें पाहून म्लानवदन होऊन बोलूं लागले.

ते म्हणाले:—अहो, दुर्योधनानें नेमलेल्या या अज्ञानी व पातकी पुरोचनानें आपल्या नाशासाठींच हें घर तयार करविलें, व आज जाळून टाकविलें. अहो, ज्यानें सरळ स्वभावाच्या पांडवांस—प्रत्यक्ष आपल्या भावाच्या मुलांस—शत्रूप्रमाणें दग्ध करविलें, त्या धृतराष्ट्राच्या अविचारीपणास धिःक्कार असो. आपणावर पूर्ण विश्वास ठेवणाऱ्या नरश्रेष्ठ पांडवांचा कांहींएक अपराध नसतां ज्या दुरात्म्यानें त्यांस दग्ध केलें, तो पापी पुरोचन कर्मधर्मसंयोगानें या वेळीं दग्ध झाला हें मात्र ठीक झालें!

वैशंपायन पुढें सांगतात:—राजा, अशा प्रकारें ते वारणवतांतील लोक विलाप करीत रात्रभर त्या जतुगृहासभोंवतीं उभे होते. इकडे कुंतीसह सर्व पांडव खिन्न होऊन त्या विवरमार्गानें बाहेर पडले, व कोणासही न समजतां त्वरेने जाऊं लागले; परंतु रात्रभर झालेलें जागरण व भीति यामुळें त्यांचें व विशेषेंकरून कुंतीचें पाऊल जलद उचलेना. राजा, त्या प्रसंगीं, अद्भुत वेगवान व महापराक्रमी भीमसेनानें त्या सर्वांस उचलून नेलें: त्या वीर्यवंतानें कुंतीस खांद्यावर बसविलें, नकुलसहदेवांस कडेवर घेतलें, आणि धर्मार्जुनांस हातानीं धरून तो महाबलाढ्य तेजस्वी भीमसेन वक्षस्थळानें पुढील वृक्ष मोडून मार्ग मोकळा करीत व पायांनीं पृथ्वी विदारीत सत्वर वायुवेगानें गेला!

अध्याय एकशें एकुणपन्नासावा.

—:०:—

गंगोत्तरण.

वैशंपायन सांगतात:—हे कुरुकुलावतंसा, याच समयास महाज्ञानी विदुरानें पूर्वसंकेताप्रमाणें एक शुचिर्भूत मनुष्य त्या वनांत पाठविला. तो विदुरानें सांगितलेल्या स्थळीं पोहोंचला, तेव्हां तेथें पांडव व यांची माता कुंती ही मंडळी त्याच्या दृष्टीस पडली. या वेळीं पांडव नदीचें पाणी किती खोल आहे याचा अजमास करीत होते. पापी दुर्योधनानें केलेला दुष्ट बेत महाबुद्धिमान विदुरास हेरांकडून कळून त्यानें तेथून हा हुषार मनुष्य पाठविला होता. त्या मनुष्यानें पांडवांस एक नौका दाखविली. ती मन किंवा वायु याप्रमाणें वेगानें चालणारी होती, व सोसाट्याचा वारा सोसण्याजोगी मजबूत असून तिजवर झेंडे, नांगर वगैरे सर्व सिद्धता होती. अशा प्रकारची ती नौका विदुराच्या विश्वासांतील लोकांनी गंगेच्या पवित्र तीरावर सिद्ध करून ठेविली होती. ती धर्मराजास दाखवून तो मनुष्य म्हणाला, "युधिष्ठिरा,

> कक्षघ्नः शिशिरघ्नश्च महाकक्षे बिलौकसः ।
> न हन्तीत्येवमात्मानं यो रक्षति स जीवति ॥

हें वाक्य विदुरानें पूर्वी तुम्हांस सूचनार्थ सांगितलें आहे, याची खूण सांगून त्यानें मला तुम्हांकडे पाठविलें आहे. तेव्हां आतां मजबद्दल तुमची खातरी झालीच असेल. त्या सर्वकार्यज्ञ विदुरानें मजजवळ पुनः असा निरोप सांगितला आहे कीं, युधिष्ठिरा, कर्ण, शकुनि व सर्व भावांसह दुर्योधन यांस तूं निःसंशय रणांत जिंकशील. पाण्यांतून सुलभतेनें गमन करणारी ही उत्तम नौका जलप्रवाहांत तयार आहे, ही तुम्हां सर्वांस खातरीनें येथून

१ मागें पंचेचाळिसाव्या अध्यायांत विदुरानें म्लेच्छ भाषेंत धर्मराजास जें सांगितलें, त्यांतील हा श्लोक. या ठिकाणीं त्यानें सांकेतिक भाषेनें जें सांगितलें आहे, त्याचा स्पष्ट आशय तेथें दिला आहे.

पार पडील." नंतर, राजा, पांडव फार कष्टी झाले आहेत असें पाहून त्या पुरुषानें त्यांस मातेसह नौकेंत बसविलें; व गंगेंतून जाऊं लागल्यावर तो पुनः त्यांस म्हणाला, "शिरश्चुंबनपूर्वक व आलिंगनपूर्वक विदुराचें तुम्हांस वारंवार असें सांगणें आहे कीं, बिकट मार्गांतून सावधतेनें पार पडा."

राजेंद्रा, याप्रमाणें सांगून त्या विदुराकडून आलेल्या मनुष्यानें त्या नरश्रेष्ठ पांडवांस नावेच्या साह्यानें गंगापार केलें. गंगा उतरून सर्व जण सुखरूप परतीरीं पोहोंचल्यानंतर त्यांस जयसूचक आशीर्वाद देऊन तो आल्या वाटेनें परत गेला. नंतर त्याबरोबर विदुरास खुशालीचा निरोप पाठवून ते महात्मे पांडव गंगा उतरून गेल्यावरही कोणास न समजूं देतां गुप्तपणें तेथून त्वरेनें निघून गेले.

अध्याय एकशें पन्नासावा.

—:०:—

पांडवांविषयीं शोक व त्यांचें उत्तरकार्य!

वैशंपायन सांगतातः—राजा, इकडे, रात्र संपल्यावर पांडवांस पाहण्याच्या इच्छेनें वारणावतांतील सर्व लोक मोठ्या लगबगीनें तेथें आले, आणि आग विझवूं लागले. तेव्हां त्या लाक्षागृहाबरोबर अमात्य पुरोचनही दग्ध झाल्याचें त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें. त्या वेळीं ते आक्रोश करून म्हणूं लागले, "हें सर्व कृत्य पांडवांच्या नाशासाठीं त्या पापाचरणी दुर्योधनानेंच निःसंशय केलें; इतकेंच नव्हे, तर प्रत्यक्ष धृतराष्ट्राचेंही त्यांत खातरीनें अंग असावें. तसें नसतें, तर प्रत्यक्ष पांडूच्या पाठीस पाठलावून आलेल्या सत्कुल्य बाबाच्या—मुलांस दुर्योधन जाळीत असतां त्यास धृतराष्ट्रानें प्रतिबंध केला नसता काय? खरोखर या प्रसंगीं प्रत्यक्ष भीष्म, द्रोण, विदुर, कृपाचार्य व इतर सर्व कौरवपक्षीय लोक सद्धर्मानें वागत नाहींत! आतां आम्ही दुष्टबुद्धि धृतराष्ट्राकडे असा निरोप पाठवितों कीं, "पांडवांस दग्ध केलेंस, आतां तुझा सर्व हेतु पूर्ण झाला!"

अशा प्रकारें विलाप करीत ते पांडवांच्या शोधासाठीं अग्नि विझवीत असतां, आपल्या पांच पुत्रांसह व्यर्थ दग्ध झालेली ती निषादी त्यांच्या दृष्टीस पडली. तेव्हां सर्व पांडव दग्ध झाले असें त्यांस वाटलें. या अग्नि विझविणाऱ्या मंडळींत तो विवर तयार करणारा खनकही होता. त्यानें घरांत हुडकीत असतां कोणास न समजूं देतां हळूच त विवरद्वार मातीनें बुजवून टाकलें! नंतर पांडव व अमात्य पुरोचन अग्नीनें दग्ध झाल्याबद्दल नागरिकांनीं धृतराष्ट्रास कळविलें. पांडवांचा नाश झाला ही दारुण गोष्ट श्रवण करून धृतराष्ट्र अत्यंत दुःखित होऊन विलाप करूं लागला, "ते पराक्रमी पांडव व विशेषेंकरून कुंती दग्ध झालेली ऐकून प्रत्यक्ष माझा महायशस्वी भ्राता पांडु राजाच आज मृत झाला असें मला वाटतें. आतां मंडळीनें सत्वर वारणावतास जावें, व उत्तरविधि करून पांडव व कुंती यांचा सत्कार करावा. कुलास उचित अशीं त्यांस कल्याणकारक होणारीं मोठमोठीं उत्तरकृत्यें करावीं. त्या ठिकाणीं, मेलेल्यांचे जे इष्टमित्र असतील त्यांनींही जावें. याप्रमाणें सर्वजण तेथें गेल्यावर, पांडव व कुंती यांस हितकर अशा ज्या ज्या क्रिया मला करतां येणें शक्य आहे, त्या सर्व पुष्कळ द्रव्य खर्च करून तुम्ही करा."

राजा जनमेजया, ह्याप्रमाणें बोलून धृतराष्ट्रानें ज्ञातिबांधवांसह पांडवांच्या नांवानें उदकांजलि दिली. त्या वेळीं सर्व लोक अत्यंत शोकाकुल होऊन रुदन करूं लागले. "हा कुरुकुलभूषणा धर्मराजा! हा भीमसेना! हा अर्जुना! हे नकुलसहदेव-हो!" असें म्हणून सर्व लोक आकांत करूं लागले. त्याचप्रमाणें, कुंतीबद्दलही अत्यंत शोकाकुल होऊन त्यांनीं उदकांजलि दिली. हस्तिनापुरांतील इतर सर्व

लोकही याचप्रमाणें पांडवांविषयीं शोक करूं लागले. विदुरास मात्र खरा प्रकार माहीत होता. तथापि त्यानेंही इतरांबरोबर–वरकांतींच कां होईना–पण शोक केलाच !

पांडववनप्रवेश.

वैशंपायन सांगतातः–राजा, इकडे कुंतीसह पांच पांडव वारणावताहून निघून गंगातीरीं येऊन पोंचल्यावर, नाव ज्यांचें बहुसामर्थ्य, नदीच्या प्रवाहाचा वेग, व अनुकूल वारा यांच्या अनुकूलतेनें थोडक्याच वेळांत पैलतीरास पोंहोंचले. नंतर ती नौका सोडून ते दक्षिण दिशेकडे गेले व त्या रात्रीच्या वेळीं नक्षत्रसमुदायाच्या अनुरोधानें मार्ग काढीत मोठ्या प्रयत्नानें ते घोर अरण्यांत जाऊन पोहोंचले ! ह्या वेळीं ते अगदीं थकून गेले असून तृषेनें व्याकूळ झाले होते, व डोळ्यांवर झांपड येऊन त्यांस कांहीं एक दिसेनासें झालें होतें. अशा प्रसंगीं ते पुनः महासमर्थ भीमसेनास म्हणाले. " बाबा भीमा, आतां पुढें मात्र खरोखर मोठा कठिण प्रसंग आला आहे. कारण, आपण या निबिड अरण्यांत आलों असून आम्हांस दिशसुद्धां ओळखत नाहींत, व चालण्याची तर बिलकूल शक्ति राहिली नाहीं; तो नीच पुरोचन दग्ध झाला किंवा नाहीं हेही खातरीनें समजत नाहीं; तेव्हां आपण गुप्तपणें या संकटांतून कसे मुक्त होणार ? यास्तव, भीमसेना, मागें तूं आम्हांस जसा घेऊन आलास, तसाच या वेळीं घेऊन चल. कारण, थकून वगैरे न जातां सतत चालण्यास समर्थ असा आम्हांमध्यें तूंच एक आहेस." राजा, याप्रमाणे धर्मराजानें सांगितलें असतां तो महाबलवान भीम कुंती व भ्राते यांस घेऊन त्वरेनें चालला.

अध्याय एकशें एकावन्नावा.

—:०:—

भीमाचा उद्वेग.

वैशंपायन सांगतातः–भीमसेन इतक्या झपाट्यानें चालत होता कीं, त्याच्या मांड्यांच्या वेगानें त्या वनांतील सर्व लहानमोठे वृक्ष कंपायमान झाले. त्याच्या पायांच्या गतीनें जो वारा सुटला, तो ज्येष्ठ व आषाढ या महिन्यांतील वाऱ्यासारखा भयंकर होता. त्याच्या योगानें मार्गावरील सर्व लता व वृक्ष उलथून पडले. गंडादि तीन स्थलांतून मदस्राव होत असल्यामुळें जो उन्मत्त झाला आहे, आणि जो साठ वर्षांचा म्हणजे पूर्ण यौवनांत आलेला आहे, अशा चवताळलेल्या गजश्रेष्ठाप्रमाणें तो क्रुद्ध झालेला भीमसेन मार्गाजवळ उगवलेलीं झुडुपें मोडून फलपुष्पयुक्त वनस्पतींचाही नाश करीत चालला. त्याचा वेग प्रत्यक्ष मरुत किंवा गरुड यांच्यासारखा होता. अशा वेगानें तो जात असतां पांडवांस मूर्च्छा आल्यासारखें झालें. त्यांस अनेक वेळां नद्या पोहून जावें लागलें, व दुर्योधनाच्या भीतीनें मार्गांत दडूनही बसावें लागलें. या सर्व अडचणींतून व नदीप्रवाहांतून भीमानें आपल्या सुकुमार मातेस पाठीवर बसवून जपून पार पाडिलें. अशा प्रकारें जातां जातां भीमसेन सायंकाळीं एका अरण्यांत जाऊन पोहोंचला. त्या वनांत फळेंमुळें फारशीं नव्हतीं; इतकेंच नव्हे, तर पाणीही दुर्मिळ होतें. शिवाय क्रूर पक्षी व हिंस्र श्वापदें यांचीही तेथें वस्ती होती. ते वारा सुटण्याचे दिवस नसतांही त्या वेळीं मोठा वारा सुटला होता, व सायंकाळ झाल्यामुळें दिशा प्रकाशरहित झाल्या होत्या. तेथें अल्प विस्ताराचे ठेंगणे वृक्ष क्वचित् होते. बाकी तेथील बहुतक वृक्ष म्हणजे लहान लहान झुडुपेंच होतीं. त्यांचींही पानेंफळें गळून पडलेलीं होतीं; आणि बहुतेक झाडें मोडलेलीं व बाकीचीं लवून जमिनीस मिळालेलीं होतीं.

इकडे पांडव तर आधींच वाटेच्या श्रमानें थकले असून तृषेनें व्याकूळ झाले होते. तशांत त्यांस निद्राही फार येऊं लागली; यामुळें त्यांच्यानें पुढें जाववेना. तेव्हां ते त्या उजाड घोर अरण्यांतच विश्रांतीसाठीं बसले. तेव्हां तहान लागल्यामुळें कुंती अगदीं घाबरी होऊन आपल्या पुत्रांस वारंवार म्हणूं लागली, "पांच पांडवांची मी माता असून माझे सर्व पुत्र माझ्या भोंवतीं बसले आहेत, अशा वेळींही मी तृषेनें व्याकूळ झालें आहें ना?" राजा, भीमसेन मोठा मातृभक्त व सदय असल्या मुळें, कुंतीचें तें भाषण ऐकून त्याचें हृदय दुभंग होऊन गेलें ! तो तात्काळ सर्वांस घेऊन उठला. व त्या घोर निर्जन अफाट अरण्यांत शिरला. तेथें एक दाट छायेचा रमणीय वटवृक्ष त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां त्या ठिकाणीं सर्वांस खालीं उतरून भीमसेन म्हणाला, "तुम्ही या वृक्षाच्या छायेंत विश्रांति घेत बसा, मी आसपास पाण्याचा शोध करितों. जलसंचार करणारे सारस पक्षी मधुर शब्द करीत आहेत, तेव्हां जवळच एखादें मोठें सरोवर असावें असें मला खातरीनें वाटतें."

जनमेजया, नंतर धर्मराजानें त्यास जाण्यास अनुमोदन दिल्यावर, जिकडून सारस पक्ष्यांचा शब्द ऐकूं येत होता तिकडे तो गेला, तों तेथें एक सरोवर असून त्यांत सारस पक्षी जलक्रीडा करीत आहेत असें त्याच्या दृष्टीस पडलें. त्या ठिकाणीं पाणी पिऊन व स्नान करून त्या भ्रातृवत्सलानें आपल्या भावांसाठीं उत्तरीय वस्त्र पाण्यांत भिजवून आणिलें. तो दोन कोसांवरून त्वरित मातेकडे आला, आणि दुःख व श्रम यांनीं मन व्याप्त झाल्यामुळें भुजंगाप्रमाणें सुस्कारे टाकूं लागला. असो; तो तेथें येऊन पाहतो तों आपले भ्राते व माता हीं जमिनीवरच निजलेलीं असून त्यांस गाढ झोंप लागलेली आहे ! हें पाहतांच त्यास अनिवार दुःख झालें, व तो विलाप करूं लागला, "अहो, मी खरोखर अत्यंत दुर्दैवी आहें ! मी आज आपल्या भावांस नुसत्या जमिनीवर निजलेले पहात आहें, याहून अधिक दुःखदायक असें काय पहावयाचें राहिलें बरें ? पूर्वी वारणावतांत असतां ज्यांना उत्तम बिछान्यावरही झोंप येऊं नये, ते आज उघड्या जमिनीवर निजले आहेत जा ! पहा, ही सर्वलक्षणसंपन्न कुंती शत्रुसंघाचें मर्दन करणाऱ्या वसुदेवाची बहीण, कुंतिभोज राजाची कन्या, विचित्रवीर्याची सून, महात्म्या पांडु राजाची भार्या, आणि आम्हां पांच वीरांची माता ! कमलगर्भाप्रमाणें जिची कांति अत्यंत सुकुमार असल्यामुळें जी केवळ मूल्यवान बिछान्यावरच शयन करण्यास योग्य, ती आज येथें नुसत्या जमिनीवर पडली आहे ! यम, इंद्र व वायु यांपासून जिला हे पुत्र झाले, ती राजवाड्यांत शयन करणारी कुंती आज श्रांत होऊन येथें भूमीवर निजते, तेव्हां केवढी खेदाची ही गोष्ट ! या पुरुषश्रेष्ठांस मी आज भूतलावर शयन केलेले पहात आहें, याहून दुःखतर अशी कोणती गोष्ट माझ्या दृष्टीस पडणें शक्य आहे ? अरे, ज्या धर्मनिष्ठ भूपतीस त्रैलोक्याचें राज्य वास्तविक योग्य होय, तो आज श्रांत होऊन सामान्य जनाप्रमाणें भूमीवर शयन करीत आहे काय ? तसाच हा सर्व पुरुषांत वरिष्ठ घनःश्याम अर्जुन यःकश्चित् मनुष्याप्रमाणें जमिनीवर निजतो, याहून दुःखद तें काय ? देवांतील अश्विनीकुमारांसारखी ज्यांची रूपसंपत्ति ते हे नकुलसहदेव भिकाऱ्यांसारखे उघड्या जमिनीवर झोंपीं गेले आहेत ! कुलाला कलंक लावणारे भाऊबंद ज्यांना नसतात, त्यांचा आयुष्यक्रम खरोखर सुखमय होत असेल ! पहा, गांवांत चांगला पर्णपुष्पांनीं डवरलेला असा एकच वृक्ष असला, म्हणजे तो प्रसिद्ध असतो; इतकेंच नव्हे, तर लोक त्याचें पूजनही करतात. अन्य पक्षीं, ज्यांस शूर व धर्मनिष्ठ असे पुष्कळ ज्ञातिबांधव असतील, तेही जगांत नि-

ष्कटक होऊन आनंदांत राहतात; कारण, जे मित्र व बांधव एकमेकांस मदत करितात, ते समर्थ व संपत्तिमान असतात, आणि अरण्यांतील वृक्षांप्रमाणें एकमेकांच्या आश्रयानें सुखांत राहतात. परंतु धृतराष्ट्र व त्याचे पुत्र या दुष्टांनीं आम्हांस हाकून दिलें, व जाळण्याचा प्रयत्न केला; तथापि दैवयोगानें आम्ही दग्ध न होतां कसे तरी बचावलों, व त्या अग्नीपासून मुक्त होऊन या वृक्षाखालीं येऊन बसलों आहों असे पराकाष्ठेचे क्लेश झाल्यामुळें, पुढें कोणता मार्ग पतकरावयाचा तेंही कांहीं सुचत नाहीं. दुष्टा धृतराष्ट्रा, आतां तरी तुझे मनोरथ पूर्ण झाले ना? अरे, तुजवर खरोखर देवच प्रसन्न आहेत, म्हणून तुला मारण्यास धर्मराज मला आज्ञा देत नाहीं, आणि म्हणूनच, दुष्टा, तूं अजून वांचला आहेस. या वेळीं मला असा संताप आला आहे कीं, आतांच्या आतां हस्तिनापुरांत येऊन तुला–तुझे पुत्र, अमात्य, कर्ण व शकुनि यांसहवर्तमान–यमसदनीं पाठवून देईन; परंतु पातक्या, या धर्ममूर्ति पांडवश्रेष्ठ युधिष्ठिरास तुझा राग येत नाहीं, याला काय करावें?"

राजा जनमेजया, ज्याचें अंतःकरण क्रोधानें संतप्त झालें आहे असा तो भीमसेन याप्रमाणें विलाप करीत हात चोळीत चोळीत सुस्कारे टाकूं लागला. नंतर, अग्नीच्या ज्वाला जशा कांहीं वेळानें कमी कमी होत जातात, तसाच भीमाचा रागही कमी कमी होत जाऊन कांहीं वेळानें त्याचें अंतःकरण शांत झालें; आणि पुनः त्याची दृष्टि निराश्रित मनुष्यांप्रमाणें खुशाल जमिनीवर घोरत पडलेल्या आपल्या भावांकडे गेली. तेव्हां तो आपल्याशींच विचार करूं लागला कीं, 'येथून नगर फार दूर नसावें; तेव्हां तेथें न जातां या ठिकाणीं निजणें योग्य नव्हे; पण हे तर सर्वजण झोंपीं गेले आहेत, तेव्हां आपण एकटेंच जागत बसावें. यांचे श्रम परिहार होऊन हे जागे झाले म्हणजे मगच पाणी पितील.' असा विचार करून भीमसेन जागत बसला.



हिडिंबवधपर्व.

अध्याय एकशें बावन्नावा.

—:०:—

हिडिंबाभीमसंवाद.

वैशंपायन सांगतातः—जनमेजया, पांडव वनांत जेथें निजले होते, त्या ठिकाणापासून जवळच एका ताल वृक्षाच्या आश्रयानें हिडिंब नांवाचा एक राक्षस राहात होता. तो क्रूर, मनुष्यमांसभक्षक, मोठा शक्तिमान व शूर असून, त्याचा वर्ण पावसाळ्यांतील मेघाप्रमाणें काळाकुट्ट होता. त्याचे डोळे पिंगट होते, व त्याचें एकंदर स्वरूपच मोठें भयंकर होतें. दाढा बाहेर वाढलेल्या असल्यामुळें तोंड अक्राळविक्राळ झालें होतें. त्याचे पोट व कमर लांबट असून दाढीमिशा व डोक्याचे केंस तांबडे होते. त्याची पाठ, मान व खांदे फारच प्रचंड असून, कान शंकाकृति होते, आणि तो क्षुधित झाला असून मांसाची इच्छा करीत होता. अशा वेळीं त्या भयंकर राक्षसाची दृष्टि सहजगत्या महारथी पांडवांकडे गेली. राजा, ज्याचा आकार कुरूप, मुद्रा उग्र, व डोळे पिंगट आहेत आणि जो क्षुधार्त होऊन मांसाची इच्छा करीत आहे, अशा त्या प्रचंडदेही राक्षसाला साहजिकपणें पांडव दिसतांच, तो बोटें वर करून डोकें खाजवीत खाजवीत आपले रुक्ष केश पिंजारूं लागला, व आपल्या विशाल मुखानें जांभया देत वारंवार पांडवांकडे पाहूं लागला. मनुष्याचें मांस मिळणार म्हणून त्या महाबलाढ्य धिप्पाड राक्षसास फार आनंद झाला. मेघसमुदायासारखा प्रचंड, आणि तीक्ष्ण दाढा व तेजस्वी मुख यांनी युक्त असा तो राक्षस मनुष्याचा वास येतांच आपल्या भगिनीस म्हणाला, "माझें अत्यंत आवडतें खाद्य जें नरमांस, तें आज फार दिवसांनीं मिळालें आहे. तेणेंकरून माझ्या जिभेस पाणी सुटून ती वळवळत आहे. अग्रें अत्यंत तीक्ष्ण असल्यामुळें ज्यांचा नुसता स्पर्श झाला असतांही फार दिवस दुःसह पीडा होते, अशा या माझ्या आठही दाढा आतां मी या मानवांच्या स्निग्ध व मांसल देहांत खुपसीन; त्यांची मानगुटें धरून तेथली धमनी तोडीन; आणि त्यांचें ऊनऊन, फेंसाळ व ताजें रक्त यथेच्छ प्राशन करीन ! यास्तव, भगिनी, तूं जा आणि ह्या वनांत हे कोण निजले आहेत, त्याचा तपास काढ. मनुष्यांचा उत्कृष्ट वास येत आहे, त्यानें माझें घ्राणेंद्रिय कसें अगदीं तृप्त होत आहे. तेव्हां या सर्व मनुष्यांस मारून माझ्याजवळ घेऊन ये. आपल्या हद्दींत हे निजले असल्यामुळें यांपासून तुला कांहींएक भीति नाहीं. यांचीं शरीरें सोलून, आपण एकत्र बसून यथेष्ट मांसभोजन करूं. यास्तव, माझ्या म्हणण्याप्रमाणें लवकर तजवीज कर. मनुष्यमांसाचें मनसोक्त भक्षण केल्यावर आपण दोघेंजण ताल धरून अनेक प्रकारें नृत्य करूं !"

हे नरश्रेष्ठा, याप्रमाणें त्या हिडिंब राक्षसानें आपल्या हिडिंबा नामक बहिणीस सांगतांच, त्याची ती आज्ञा मान्य करून, पांडव निजले होते त्या ठिकाणीं ती लगबगीनें आली, तों कुंती व पांडव तेथें निजले आहेत, आणि ज्यास पराभव म्हणजे काय तें कधीं ठाऊकच नाहीं असा तो भीमसेन जवळच जागत बसला आहे, असें तिच्या दृष्टीस पडलें. जमिनींतून वर आलेला शाल वृक्षाचा अंकुरच कीं काय, असा तो सर्व जगांत रूपानें अप्रतिम असा भीमसेन दृष्टीस पडतांच तिचें मन त्यावर बसलें; आणि ती आपल्याशींच म्हणते, "या श्यामसुंदराचे बाहु दीर्घ, खांदे सिंहासारखे, कंठ शंखासारखा व नेत्र कमलांसारखे असून याचें तेजही विलक्षण आहे. खरोखर मला हाच योग्य भर्ता शोभेल. माझ्या भावानें सांगितलेलें तें क्रूर कर्म मी कदापि करणार नाहीं. कारण, पतिप्रेम हें फारच

बळवान असतें; भावावरील ममता तितकी नसते. यांस मारल्यानें माझा भाऊ व मी यांस क्षणभर समाधान होईल हें खरें; परंतु यांस न मारल्यास मला चिरकालपर्यंत आनंदांत राहतां येईल!"

जनमेजया, हिडिंबेनें याप्रमाणें विचार केल्यावर, पाहिजे तें रूप घेण्याचें तीस सामर्थ्य असल्यामुळें ती अप्रतिम सुंदर स्त्री बनली. तिनें दिव्य अलंकार धारण केले होते, त्यांनीं तिचें रूप अधिकच खुलून गेलें होतें. नंतर ती सौम्यपणें भीमसेनाजवळ येऊन उभी राहिली; व गालांतल्या गालांत हसून लाजत लाजत त्यास म्हणाली, "हे पुरुषर्षभा, आपण कोण व येथें कोठून आलां? तसेंच, हे दिव्यदेही पुरुष येथें निजले आहेत हे कोण? हे पुण्यवंता, ही श्यामवर्ण व सुकुमार वृद्ध स्त्री तुझी कोण? या अरण्यांतही ही स्वगृहाप्रमाणें निःशंकपणें झोंपीं गेली आहे. यावरून या गहन अरण्यांत राक्षस राहतो हें हिला माहीत नाहींसें दिसतें. या ठिकाणीं हिडिंब नामक एक दुष्ट राक्षस राहतो. त्याची मी बहीण आहें. देवतुल्यहो, तुमचें मांस भक्षण करण्याची दुष्ट वासना मनांत धरून, माझ्या भावानें मला तुम्हांकडे पाठविलें आहे; परंतु या ठिकाणीं आल्यावर, देवपुत्रांप्रमाणें तेजस्वी अशा आपणांस पाहतांच माझ्या मनाचा असा पक्का निश्चय ठरला कीं, आपणावांचून अन्य पति वरावयाचाच नाहीं. हें आपणांस सत्य सांगतें. हे धर्मज्ञा, मीं सांगितलेली सर्व हकीकत ध्यानीं आणून, आपणांस योग्य दिसेल तसें मजशीं वर्तन करा. माझें मन व शरीर मदनानें जर्जर झालें असून मी आपल्या चरणसेवेस सादर झालें आहें. यास्तव माझा अंगीकार करा. हे महाबाहो, त्या मनुष्यभक्षक राक्षसापासून मी तुमचें संरक्षण करीन, व आपण उभयतां पर्वतावरील एखाद्या अवघड ठिकाणीं खुशाल राहूं. मात्र, हे निष्पापा, आपण माझा अंगीकार करा. पहा—मला आकाशांतून गमन करितां येत असल्यामुळें वाटेल तिकडे जातां येतें, यास्तव ठिकठिकाणीं आपण मजसमागमें अनुपम सुखाचा अनुभव घ्या."

भीमसेन म्हणालाः—हे राक्षसी, माझी माता, वडील भाऊ व कनिष्ठ भ्राते येथें स्वस्थ निजले आहेत; शिवाय तूं म्हणतेस कीं, येथें राक्षस राहतो, व त्याची यांस मारण्याची इच्छा आहे; तर अशा प्रसंगीं यांचें रक्षण करण्याचें सामर्थ्य अंगीं असतांही येथें यांस असेच सोडून कोण बरें निघून जाईल? अग, आपल्या निजलेल्या भावांस व मातेस राक्षसाच्या तोंडीं देऊन माझ्यासारखा कोणता वीर विषयलंपट मनुष्याप्रमाणें निघून जाईल बरें?

राक्षसी म्हणतेः—महाराज, आपणांस जें प्रिय असेल तें करण्यास मी तयार आहें. या सर्वांस जागें करा, मी मोठ्या आनंदानें त्या मनुष्यभक्षक राक्षसापासून यांचीही मुक्तता करीन.

भीम म्हणालाः—राक्षसी, माझे भाऊ व माताही या अरण्यांत सुखानें निजलीं आहेत. यास्तव तुझ्या त्या यःकश्चित् दुष्ट भावाच्या भयानें मी यांची कधींही झोंपमोड करणार नाहीं. अग भित्रे, मजबरोबर युद्ध करण्यास राक्षस तर समर्थ नाहींतच, परंतु मनुष्य, यक्ष किंवा गंधर्व हे देखील माझा पराक्रम सहन करण्यास समर्थ नाहींत. तूं जा, रहा, काय पाहिजे तें कर; किंवा त्या तुझ्या नरभक्षक भावालाही पाहिजे तर इकडे पाठवून दे!

अध्याय एकशें त्रेपन्नावा.

—:०:—

हिडिंबभीमसंवाद.

वैशंपायन सांगतातः—राजा, इकडे, हिडिंबेला जाऊन बराच वेळ झाला तरी ती अजून परत येत नाहीं असें पाहून राक्षसाधिपति हिडिंब वृक्षावरून खालीं उतरला; आणि लागलीच पांड-

वाकडे आला. त्याचे नेत्र रक्तासारखे लाल असून बाहु फार पुष्ट होते; केंस ताठ असून मुख भयंकर होतें; दाढा अतिशय तीक्ष्ण होत्या; आणि शरीर एकवटलेल्या मेघांप्रमाणें काळेंकुट्ट असल्यामुळें तो फारच भयंकर दिसत होता. तो आपल्याकडेच धावून येत आहे असें पाहून हिडिंबा घाबऱ्या घाबऱ्या भीमसेनास म्हणाली, "हा पहा तो दुष्ट नरभक्षक अत्यंत क्रोधाविष्ट होऊन इकडेच येत आहे! तेव्हां आतां आपण व आपल्या बंधूंनीं मी सांगतें तसें करावें! हे वीर, माझ्या अंगीं राक्षसाचें बल असून मी इच्छागमनी आहें. माझ्या कडेवर आपण सर्व बसा म्हणजे मी तुम्हां सर्वांस आकाशमार्गानें घेऊन जाईन. हे शत्रुमर्दना, आतां आपण झोंपीं गेलेल्या या आपल्या बंधूंना आणि मातेला लवकर उठवा."

भीमसेन म्हणाला:—हे सुंदरी! तूं मुळींच भिऊं नको; मी जर येथें आहें, तर या राक्षसाच्या हातून आमचें कांहीं होणार नाहीं. हे सुमध्यमे! मी आतांच तुझ्या देखत याला ठार मारून टाकतों. हे भीरु! हा नीच एकटाच सा काय, पण सर्व राक्षस जरी एकत्र जमून माझ्या अंगावर आले, तरी त्यांच्यानें माझ्याशीं टिकाव धरवणार नाहीं. हे पहा माझे बाहु कसे अगदी गजशुंडेप्रमाण असून मोठ्या परिघाप्रमाणें आहेत; आणि छाती तरी किती रुंद आहे! हे कल्याणी, माझा पराक्रम केवळ इंद्रतुल्य आहे हें तुझ्या आतांच दृष्टीस पडेल. मी मनुष्य आहे असें समजून तूं मला यःकश्चित् समजूं नको.

हिडिंबा म्हणते:—नरश्रेष्ठा, आपण देवरूप आहां, तेव्हां मी आपणास कमी समजत नाहीं. पण या हिडिंब राक्षसापुढें मनुष्याची काय दुर्दशा होऊन जाते हें मा प्रत्यक्ष पाहिलें असल्यामुळें, माझें जें आपणावर प्रेम बसलें आहे, त्या आंधळ्या प्रेमानें मजकडून तसें वदविलें!

वैशंपायन सांगतात:—जनमेजया, याप्रमाणें हीं उभयतां बोलत आहेत इतक्यांत तो नरमांसभक्षक राक्षस जवळ येऊन ठेपला, तों भीमाचे हे शब्द त्याच्या कानीं पडले. तेव्हां तो क्रुद्ध झाला, आणि त्यानें हिडिंबेकडे पाहिलें, तों तिनें धारण केलेलें सुंदर रूप त्याच्या दृष्टीस पडलें! तिचें मुख चंद्राप्रमाणें असून भिवया कमानदार होत्या; नासिका सरळ असून नेत्र हरिणाप्रमाणें होते; तिचा केशप्रांतही मनोहर असून तिनें आपल्या बुचड्यांत पुष्पकलिकांची गुंफलेली वेणी घातली होती; तिचें शरीर अत्यंत सुकुमार असून नखें आरक्त दिसत होतीं; आणि तिनें परिधान केलेलें वस्त्र फार तलम व आकाशाप्रमाणें निर्मल असून, तिनें मूल्यवान अलंकार धारण केलले होते! राजा जनमेजया, आधींच तो राक्षस रागावलेला, तशांत बहिणीचें हें स्वरूप त्याच्या दृष्टीस पडलें! तेव्हां त्याच्या मनांत अशी शंका आली कीं, ही पुरुषाची इच्छा करीत असावी. तेव्हां तर त्याला फारच क्रोध आला, आणि अगदी लाल होऊन तो तिला म्हणाला, "हे दुष्टे, तूं हें मनुष्याचें मनोहर रूप धारण करून काय आरंभिलें आहेस? अग, मी यांना खाण्याची इच्छा करीत असतां तूं मला विघ्न करीत आहेस काय? हिडिंबे! तूं अगदीं मोहित कशी होऊन गेलीस? तुला माझ्या क्रोधाची कांहींच का भीति नाहीं वाटत? चांडाळणी! पुरुषाच्या इच्छेनें तं माझें अनिष्ट करीत आहेस इतकेंच नव्हे, तर तूं ह्या कृतीनें सर्व राक्षसकुलाला कलंक लावीत आहेस! हे व्यभिचारिणी! धिक्कार असो तुला! अग! ज्या अर्थीं ह्या लोकांशीं सख्य करून माझें अनिष्ट करण्याची तूं इच्छा करीत आहेस, त्या अर्थीं ह्या सर्वांना आणि त्यांच्याबरोबर तुलाही आतां ठार मारून टाकतो!"

वैशंपायन सांगतात:—राजा जनमेजया, ह्याप्रमाणें हिडिंबेला बोलून तो क्रोधानें

संतप्त झालेला हिडिंब त्या पांडवांवर धावला. राक्षस अंगावर धावून येत आहे असें पाहून महापराक्रमी भीमसेनानें त्याची निर्भर्त्सना केली; आणि त्यास तो "थांब, थांब," असें म्हणाला.

हे नरश्रेष्ठा, तो राक्षस आपल्या भगिनीवर अतिशय रागावला असून आपल्या निजलेल्या बंधूंकडे धावत चालला आहे असें पाहून भीमसेनास हसूं आलें; आणि तो त्यास म्हणाला, "हे माझे भाऊ सुखानें निजले आहेत, त्यांना उठवून तुला काय करावयाचें आहे? तूं माझ्याकडेच ये; आणि मला धरून माझ्यावरच तुला काय प्रहार करावयाचा असेल तो कर अरे, निजलेल्यांवर चाल करून जाणें व बायकांचा प्राण घेणें हें तुझ्यासारख्या शूराला योग्य नाहीं; आणि त्यांतून ह्या तुझ्या बहिणीनें तर तुझा कांहींच अपराध केला नाहीं. ही सुंदरी माझी इच्छा करीत आहे हा कांहीं तिचा दोष नव्हे; तर तिच्या शरिरांत संचार करणारा जो मदन, त्या मदनाचा हा दोष होय. त्यानेंच हिची इतकी इकडे प्रवृत्ति केली! शिवाय, राक्षसा, ही तुझी बहीण तुझ्याच आज्ञेवरून आमच्याकडे आली; आणि माझें स्वरूप पाहताच हिला माझ्याविषयीं इच्छा झाली ह्यांत तिचा काय अपराध आहे? खरोखर विचार केला तर मदनानें तुझा अपराध केला आहे; तेव्हां तूं हिची व्यर्थ निंदा करूं नको. शिवाय मी येथें उभा असतां माझ्याशीं युद्ध करण्याचें सोडून देऊन माझ्यासमक्ष तूं ह्या स्त्रीचा वध करण्यास तयार व्हावेंस हेंही तुला योग्य नाहीं. म्हणून तूं प्रथम माझ्याशींच युद्ध कर, म्हणजे मीच तुला आतां यमसदनास पोहोंचवितों. अरे! मत्त हत्ती ज्याप्रमाणें एखादा कठिण पदार्थ आपल्या पायाखालीं दडपून त्याचें चूर्ण करतो, त्याप्रमाणें मी आपल्या सामर्थ्यानें तुझें मस्तक चिरडून तुला ठार मारून टाकतों; म्हणजे कंक, ससाणे आणि कोल्हीं ह्यांना आज तुझ्या प्रेताची यथास्थित मेजवानी मिळेल! मनुष्यें भक्षण करून तूं दूषित केलेलें हें अरण्य मी आज एका क्षणांत राक्षसशून्य करून सोडणार! अरे! सिंह ज्याप्रमाणें पर्वतासारख्या मोठ्या हत्तीला सहज ओढून ठार मारतो, त्याप्रमाणें तुला मी सहज ओढून मारून टाकतों; आणि हें सर्व तुझ्या ह्या बहिणीच्या दृष्टीस पडेल. अरे अधमा, तुला मारलें म्हणजे वनचरांना हें अरण्य उपद्रवरहित होऊन ते येथें सुखानें संचार तरी करतील!"

हिडिंब राक्षस म्हणतां:—अरे मानवा, उगीच बडबड किती करतोस? तुझा काय पराक्रम आहे तो दाखव. चल आटप, उशीर लावूं नको. तुला तुझ्या बलाचा आणि पराक्रमाचा मोठा गर्व आहे, पण माझ्याशीं गांठ पडली म्हणजे तुझा तो गर्व पार नाहीसा होईल. हे दुर्बुद्धे, मी प्रथम तुलाच ठार करून तुझें रक्त प्राशन केल्यावर मग ह्या निजलेल्या लोकांना मारीन; व नंतर ह्या दुष्ट स्त्रीचा प्राण घेईन.

वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें भाषण करून तो अत्यंत क्रुद्ध झालेला नरभक्षक राक्षस भीमसेनाच्या अंगावर धावून आला; आणि त्याला धरण्याकरितां त्यानें आपला हात पुढें केला. तेव्हां महापराक्रमी भीमसेनानें हसल्यासारखें करून याचा तो पुढें आलेला हात तसाच धरला आणि जोरानें दाबला. तेव्हां तो बलाढ्य राक्षस हात सोडण्याकरतां खूप धडपड करूं लागला; परंतु त्याचें कांहींएक चालूं न देतां, सिंह जसा एखाद्या क्षुद्र पशूला सहज ओढून नेतो, त्याप्रमाणें भीमसेनानें त्या दुष्ट राक्षसास एका सपाट्यासरसें त्याच्या जागेपासून बत्तीस हात दूर नेलें. तेव्हां राक्षसानें रागारागानें भीमसेनाला मिठी मारली, आणि तो मोठमोठ्यानें आरोळ्या मारूं लागला. तेव्हां, सुखानें निजलेले आपले बंधु ह्याच्या गर्जनेनें कदाचित् जागे होतील म्हणून त्या महाबलवान भीमसेनानें पुनः त्याला जोरानें ओढून आणखी

दूर नेलें. ह्याप्रमाणें हिडिंब आणि भीम ह्या उभयतांमध्यें झटापट लागून राहिली. ह्या त्यांच्या लठ्ठालठ्ठींत त्या वनांतील कित्येक मोठमोठाले वृक्ष मोडून पडले, व लतांचा नाश झाला. शेवटीं ह्या धुमाकुळानें ते पुरुषश्रेष्ठ पांडव आणि त्यांची माता कुंती हीं जागीं झालीं, तों पुढें उभी असलेली हिडिंबा त्यांच्या दृष्टीस पडली !

अध्याय एकशें चौपन्नावा.

—:०:—

कुंती व हिडिंबा यांचा संवाद.

वैशंपायन सांगतातः—हिडिंबा दृष्टीस पडतांच तिच्या स्वरूपाकडे पाहून अर्जुनादिक पांडवांना मोठा विस्मय वाटला; आणि कुंतीही थक्क झाली. ती तिला म्हणते, "बाइ, तुझा वर्ण उत्तम असून कांति कशी देवकन्येप्रमाणें आहे. तेव्हां तूं आहेस तरी कोण? कोणाची? आलीस कोठून? व येथें तुझें काय काम आहे? तूं या वनाची देवता आहेस का कोणी अप्सरा आहेस? तूं येथें कां उभी राहिली आहेस?"

हिडिंबेनें उत्तर दिलें, "बाई, मी राक्षसकन्या असून हिडिंब नामक राक्षसाची बहीण आहें. आपणांस जे हें मेघाप्रमाणें काळेंभोर अरण्य दिसत आहे, त्यांत आम्ही राहतों. आपण व आपले मुलगे यांना ठार मारण्याकरितां मला माझ्या भावानें इकडे पाठविलें, म्हणून मी येथें आलें, तों आपला पुत्र माझ्या दृष्टीस पडला. तेव्हां त्याची ती अप्रतिम शरीरसंपत्ति आणि तप्त सुवर्णाप्रमाणें कांति पाहून माझ्या अंगांत मदनसंचार झाला, आणि त्या मदनानें मला तुमच्या पुत्राच्या अधीन करून टाकिलें; तेव्हां मी त्या तुमच्या महाबलवान पुत्रास मनानें पति म्हणून वरिलें. पुढें त्यास येथून नेण्याचा मी प्रयत्न करूं लागलें; पण माझा कांहीं उपाय चालेना. इकडे, पुष्कळ वेळ झाला तरी मी परत आलें नाहीं असें पाहून तुम्हां सर्वांचा प्राण घेण्याकरितां माझा नरभक्षक बंधु येथें आला. तेव्हां मीं मनानें वरिलेला माझा पति जो आपला पुत्र, त्यानें आपल्या सामर्थ्यानें त्याला जर्जर करून येथून दूर ओढून नेलें. ते पहा ते दोघे मोठ्या त्वेषानें एकमेकांशीं झगडत असून भयंकर गर्जना करीत आहेत!"

भीमहिडिंबयुद्ध.

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, ह्याप्रमाणें तिचें तें भाषण ऐकून व तिनें दाखविलेला तो प्रकार पाहून धर्मराज, अर्जुन, नकुल आणि सहदेव हे तात्काळ तिकडे गेले. तेव्हां ते दोघे वीर मोठ्या ईर्षेनें एकमेकांशीं लढत आहेत असें त्यांच्या दृष्टीस पडलें. तेथें, दावाग्नीच्या धुरानें ज्याप्रमाणें आकाश भरून जातें, त्याप्रमाणें त्यांच्या युद्धामुळें धुळीनें आकाश व्याप्त झालें होतें. त्या धुळीनें त्या उभय वीरांचीं पर्वतप्राय शरीरेंही भरून गेलीं होतीं. ह्यामुळें, धुक्यानें व्याप्त झालेल्या पर्वतांप्रमाणें ते दिसत होते; असो.

राजश्रेष्ठा, ही स्थिति पाहून व त्या बलाढ्य राक्षसाशीं झगडण्यानें भीम कदाचित् थकला असेल असें समजून अर्जुन म्हणाला, "भीमसेना, भीऊं नको. जरी या भयंकर राक्षसाची व तुझी गांठ पडली आहे, तरी त्याचें तुला कांहींच वाटत नाहीं असें मला दिसतें. परंतु आतां तुझ्या साहाय्याकरितां मी येथें आलों आहें, तर तूं त्याला सोड. मी आतां त्याशीं युद्ध करून त्याला यमसदनास पोहोंचवितों. मी युद्धांत गुंतलों असतां मातेचें संरक्षण कसें होईल याची तूं काळजी करूं नको. कारण, नकुल आणि सहदेव हे तिचें रक्षण करतील."

भीम म्हणालाः—अर्जुना, तूं स्वस्थ ऐस. एकदा का हा माझ्या बाहुपंजरांत सांपडला, म्हणजे जिवंत राहण्याची याला आशाच नको !

अर्जुन म्हणालाः—बा शत्रुमर्दना भीमा,

आतां आकाश आरक्तवर्ण दिसूं लागलें असून सूर्योदय होण्याची वेळ जवळ आलेली आहे, व आपणांस पुढें गेलें पाहिजे; शिवाय हा संधिकाल असल्यामुळें या रौद्रमुहूर्ताचे वेळीं राक्षस प्रबल होत असतात; याकरितां, आतां ह्याच्याशीं व्यर्थ खेळत बसूं नको. याला लवकर मारून टाक. पहा, पहा—हा मायावी स्वरूप धारण करूं लागला! आतां याला लवकर आपल्या बाहुपंजरांत धरून चुरडून टाक.

भीमसेन म्हणालाः—अरे राक्षसा, तुला येथें मांस फुकट मिळत असे, व त्यामुळें तुझें पोषण फुकट होत असून तूं वाढलासही फुकट; अर्थात् तुझी बुद्धिही फुकट असणार! तेव्हां तुला फुकट मरण येणें हेंच योग्य होय. परंतु एवढें पक्कें लक्षांत ठेव कीं, मी म्हणतों हें मात्र फुकट जावयाचें नाहीं! राक्षसा, आतां मी हें अरण्य निष्कंटक आणि प्रशांत करून टाकतों. यापुढें मनुष्यभक्षणाचें तुझें काम संपलें!

अर्जुन म्हणालाः—भीमा, बराच वेळ याच्याशीं लढल्यामुळें तुला श्रम झाले असतील, किंवा हा राक्षस फार बलवान आहे असें तुला वाटत असेल, तर मी तुझ्या साहाय्याकरितां येतों व आपण याला मारून टाकूं. किंवा तूं याला मुळींच सोडून देऊन विश्रांति घे. मीच याच्याशीं युद्ध करून याला धुळीस मिळवितों.

हिडिंबवध.

हें अर्जुनाचें भाषण ऐकतांच भीमास अत्यंत क्रोध आला, आणि यज्ञीय पशूस ज्याप्रमाणें बुकलून बुकलून मारितात, त्याप्रमाणें त्यानें त्या राक्षसास जमिनीवर आपटून बुकलून बुकलून मारिलें. भीम मारीत असतां राक्षस मोठमोठ्यानें किंकाळ्या फोडूं लागला, त्या योगानें तें सर्व अरण्य दणाणून गेलें. भीमानें आपल्या बाहूंचा विळखा देऊन त्याच्या त्या प्रचंड शरिराचा चुराडा करून टाकला, हें पाहून सर्व पांडवांना आनंद झाला व त्यांनीं भीमसेनाचा मोठा गौरव केला!

राजा, ह्याप्रमाणें हिडिंब राक्षसाचा वध केल्यानंतर अर्जुन म्हणाला, "ह्या अरण्याच्या जवळच एखादें नगर असेल तेथें आपण आतां लवकर जाऊं. ईश्वर आमचें संरक्षण करो, आणि आम्ही येथें आहों हें दुर्योधनास न कळो."

याप्रमाणें सर्वांनीं विचार करून कुंतीसह ते मार्गस्थ झाले; आणि हिडिंबाही त्यांच्याबरोबर गेली!

अध्याय एकशें पचावन्नावा.

—:०:—

हिडिंबेचें भाषण.

वैशंपायन सांगतातः—जनमेजया, याप्रमाणें ते पांडव, कुंती आणि हिडिंबा मार्गक्रमण करीत असतां वाटेनें भीमसेन हिडिंबेस म्हणाला, "हिडिंबे! तूं मोठें मोहक रूप धारण करून आमच्याबरोबर येत आहेस; पण तुलाही आपल्या भावाचीच वाट धरावी लागेल! तूं जरी सुंदर रूप घेतलें आहेस, तरी त्यामुळें तूं वांचशील असें मात्र समजूं नको. अग, राक्षसांचा धर्मच असा आहे कीं, नानाप्रकारचीं मायावी रूपें घ्यावीं आणि वैर साधावें!"

राजा, भीमसेनाचें हें भाषण ऐकून धर्मराज म्हणाला, "भीमसेना, तुला जरी राग आला असला, तरी तूं ह्या स्त्रीचा वध करूं नको. कारण, स्त्रीवध करणें हा अधर्म होय. भीमा, शरीरसंरक्षणापेक्षां धर्मरक्षण हें श्रेष्ठ होय. तुला मारण्याच्या हेतूनें जो तुजवर चालून आला होता, त्याचा तूं वध केलाच आहेस. आतां त्याची ही प्रत्यक्ष बहीणच असल्यामुळें हिला तें सहन झालें नसेल; पण तसें असलें तरी हिच्यानें आपलें काय होणार आहे?"

असो; राजा, भीमसेनाचें तें भाषण ऐकून हिडिंबेला वाईट वाटलें. ती धर्मराज आणि कुंती

यांच्या पायां पडली, आणि हात जोडून कुंतीशी बोलूं लागली.

हिडिंबा म्हणते:—हे साध्वी! हें पहा—कामवासनेचें दुःख स्त्रियांस कसें असतें, हें मी आपणांस सांगितलें पाहिजे असें नाहीं. तें असह्य दुःख ह्या भीमसेनामुळें मजवर ओढवलें असून आतांपर्यंत मीं कालाची मार्गप्रतीक्षा करीत कसें तरी तें सहन केलें. हे कल्याणी! आतां तो काल प्राप्त झाला आहे, आणि माझ्या सुखाचा उदय आतां लवकरच होणार अशी मला आशा वाटूं लागली आहे. हे यशस्विनी! तुमच्या ह्या पुत्राला मीं मनानें वरिलें असून त्याच्याकरितां आपले इष्ट, मित्र जात आणि धर्म ही सर्व सोडून दिलीं आहेत अशा स्थितींतही जर या वीरानें आणि आपण मला झिडकारलें, तर खरोखर माझे प्राण निघून जातील. तेव्हां या वेळीं आपण मजवर दया करावी हेंच योग्य आहे. मला आपण मूर्ख म्हणा, किंवा माझी आपल्या पुत्रावर भक्ति आहे म्हणून म्हणा, अथवा मला आपली दासी समजा, पण माझ्या पतीचें व माझें सख्य करून द्या; म्हणजे मला इष्ट वाटेल तेथें मी त्या प्रियतमाला घेऊन जाईन; आणि त्याला पुनः आपल्या येथें आणून पोहोंचतें करीन. मजवर आपला पूर्ण विश्वास असूं द्या, आणि ह्याचा व आपला वियोग होईल ही भीति मनांत बाळगूं नका. आपण मनांत आणिलें कीं मी येथें प्राप्त होऊन आपणांस तिकडे घेऊन जाईन. आपणांवर एखादें संकट आलें असतां तें कितीही दुस्तर असलें तरी त्यांतून पार पाडून आपणांस मी दुःखमुक्त करीन. प्रसंगविशेषीं आपणांस कोठें शीघ्र गमन करण्याची इच्छा झाली, तरी मी आपल्या पाठीवर तुम्हांस वाहून नेईन. तर माझ्यावर दया करा, आणि भीमसेन माझा अंगीकार करील असें करा. बाई! विपत्तींतून पार पडावयाचें असल्यास सुचेल तो उपाय करून प्राणरक्षण करावें हें खरें; परंतु अशाही प्रसंगीं जे करणें तें धर्माला अनुसरूनच केलें पाहिजे; आणि जो याप्रमाणें वागतो, तोच खरा धर्मज्ञ होय. अशा रीतीनें वागणाऱ्या धार्मिक लोकांस आपत्ति येणें म्हणजे ती धर्माची मूर्तिमंत हानिच होय. सारांश, कोणत्याही प्रसंगीं धर्माचा त्याग करतां कामा नये. धर्माच्याच योगानें पुण्य घडतें, व पुण्य हें प्राणरक्षण करणारें आहे; इतकेंच नव्हे, तर गेलेल्या प्राणाचाही पुण्याच्या योगानें पुनः लाभ होतो. धर्माचा उपाय अमुक एकच आहे असें नाहीं. धर्माचरणासाठीं ज्या मार्गाचें अवलंबन करावें, तो मार्ग निर्दोषच होय. असें जर आहे, तर मजमारख्या अनुरक्त झालेल्या स्त्रीचा त्याग करून अधर्म जोडण्यापेक्षां तिचा स्वीकार करून धर्म संपादन करणें हें श्रेयस्कर नाहीं का होणार?

हिडिंबास्वीकार.

धर्मराज म्हणतात—हिडिंबे, तूं जें म्हणतेस तें अगदीं बरोबर आहे. पण तुझ्या म्हणण्याप्रमाणें गोष्ट घडून येण्यास सुंदरी, मी सांगेन त्याप्रमाणें शपथ घेऊन तुला वागलें पाहिजे; म्हणजे, हे कल्याणी, भीमसेनानें स्नानसंध्यादिक नित्य कर्में केल्यानंतर तूं त्याला तुझ्या इच्छेस वाटेल तिकडे घेऊन जावें आणि त्याचा अंगीकार करून सूर्यास्त होईपर्यंत त्याच्याशीं यथेच्छ विहार करावा; आणि रात्र होण्यापूर्वी त्याला नित्य येथें आणून पोहोंचतें करावें.

वैशंपायन सांगतात:—जनमेजया, हिडिंबेला धर्मराजानें जें हें सांगितलें, तें धर्माज्ञा पाळणाऱ्या भीमसेनानेंही मान्य केलें. परंतु त्यानें त्या राक्षसीस सांगितलें कीं, "हे सुंदरी, धर्मराजा सांगेल तें मला शिरसा वंद्य आहे. पण मी सत्याला स्मरून तुला सांगतो कीं, जोंवर तुझ्या ठिकाणीं पुत्रोत्पत्ति झाली नाहीं, तोंवरच मी

तुझ्याशीं समागम करीन. ही माझी अट आहे; पसंत असेल तर तूं हें कबूल कर.''

हें भीमसेनाचें भाषण ऐकून, हिडिंबेनें ती त्याची अट कबूल केली, व भीमसेनास घेऊन ती आकाशमार्गानें इच्छित स्थलीं गेली. तें स्थल फारच रमणीय होतें. त्याच्या सभोंवतीं मोठमोठ्या पर्वतांचीं गगनचुंबित शिखरें असून तेथें मनाला आल्हाद देणारीं अनेक देवमंदिरें होतीं. तेथें असलेल्या वृक्षांवर अनेक जातींच्या पक्ष्यांचे समुदाय असून, त्यांच्या मंजुल शब्दांनीं तें स्थल नादमय झालेलें असे. तेथें ती हिडिंबा उत्तम प्रकारचें स्वरूप धारण करी, आणि बहुमोल वस्त्रालंकारांनीं विभूषित होऊन मधुर भाषणानें पांडुपुत्र भीमसेनाच्या मनास रममाण करी. ती कधीं त्या अरण्यांतील दुर्गप्रदेश, कधीं प्रफुल्लित वृक्षांनीं विराजमान झालेलीं पर्वतांचीं शिखरें, कधीं सूर्यविकासी कमलांनीं युक्त अशीं रमणीय सरोवरें, कधीं तीरावर रमणीय झाडी असून वैदूर्य नामक रत्नमय वालुकाप्रदेश व उत्तम प्रकारचे घाट बांधिलेले आहेत अशा नद्या आणि द्वीपें ह्यांचे प्रदेश, कधीं नानाप्रकारच्या चित्रविचित्र पुष्पांनीं प्रफुल्लित झालेले वृक्ष आणि वेली ह्यांच्या योगानें रमणीय दिसणारीं अरण्यें, कधीं हिमालय पर्वतावरील लताच्छादित प्रदेश, कधीं अनेक प्रकारच्या प्रेक्षणीय गुहा, कधीं रत्न आणि सुवर्ण ह्यांनीं व्याप्त असे समुद्रप्रदेश, कधीं रमणीय नगरें, कधीं मोठमोठे वृक्ष असणारीं पवित्र देवतांचीं अरण्यें, कधीं पर्वतांचे कडे, कधीं गुह्यक नामक देवतांचीं वसतिस्थानें, आणि कधीं कधीं, ज्यांत सर्व ऋतूंतील फळें व पुष्पें सदोदीत येतात असे तपस्व्यांचे आश्रम अशा अनेक ठिकाणीं आपल्या प्रियपतीसह जाऊन नानाप्रकारचे विहार करी.

घटोत्कचजन्म.

राजा, ह्याप्रमाणें ती भीमसेनास रमवीत असतां त्याजपासून तिला एक पुत्र झाला. तो महाबलवान होता. त्याचे नेत्र विद्रूप असून कान शंकूच्या आकाराचे होते. तोंड मोठें असून ओष्ठप्रांत अत्यंत आरक्तवर्ण आणि दाढा अतिशय तीक्ष्ण होत्या. त्याची नासिका लांबट असून वक्षस्थल विशाल होतें. पोटऱ्या वाकड्यातिकड्या व जाड होत्या. अशी त्याची एकंदर आकृति अक्राळविक्राळ असून आवाज तर फारच भयजनक होता. तो मनुष्यापासून उत्पन्न झाला होता, तरी अमानुष होता. तो सत्त्वसंपन्न, वेगवान व बलिष्ठ भीमपुत्र लहानपणीं देखील इतर मोठमोठे राक्षस व पिशाचें ह्यांना आवरत नसे. बाल्यदशेंतही तो लहान दिसत नव्हता; आणि तो उपजतच अस्त्रविद्येमध्यें प्रवीण होता.

राजा जनमेजया, राक्षसींचें गर्भधारण व प्रसूति हीं तात्काळ होतात. या नियमाप्रमाणें गर्भधारण होतांच हिडिंबेला हा पुत्र झाला. त्याचप्रमाणें, ह्या राक्षसांना इच्छेस वाटेल तेव्हां वाटेल तसलें रूप घेतां येतें, हें तुला पूर्वीं सांगितलेंच आहे.

असो; अशा प्रकारें त्या मुलाचा जन्म होतांच त्यानें आपल्या मातापितरांचे पाय धरले. तेव्हां ह्याचा घट (मस्तक) उत्कच (केशविरहित) आहे असें त्याची माता म्हणाली. त्यावरून त्याचें नांव घटोत्कच असेंच ठेविलें. जनमेजया, ह्या घटोत्कचाचें पांडवांवर फार प्रेम होतें, व तेही त्या स्वेच्छाचारी घटोत्कचावर अतिशय प्रेम करीत. करारप्रमाणें भीमसेनाचा व हिडिंबेचा सहवाससंबंध संपला, तेव्हां तिनेंही त्याच्याशीं पुनः कांहीं ठराव करून आपल्या पूर्वस्थितीचा स्वीकार केला. घटोत्कच आपल्या चुलत्यांच्या व आजीच्या दर्शनाला गेला, आणि त्यांना नमस्कार करून म्हणाला, "हे श्रेष्ठ जनहो, मी सर्वस्वीं तुमचा आहे. ह्याकरितां मी

तुमचें कोणतें कार्य करूं, ह्याविषयीं मनांत कांहीं-एक शंका न धरितां मला आज्ञा करा."

त्या भीमपुत्राचें हें भाषण ऐकून कुंती त्यास म्हणाली, " बाळा, तूं कुरुकुलांत उत्पन्न झाला आहेस, व प्रत्यक्ष भीमासारखा आहेस. तेव्हां तूं ह्या पांचहीजणांचा वडील मुलगाच आहेस. ह्याकरितां तूं ह्यांना नेहमीं साह्य करीत जा."

वैशंपायन सांगतातः–हें कुंतीचें भाषण ऐकून घटोत्कचानें तिला पुनः नमस्कार केला, आणि तो म्हणाला, " आजी, ज्याप्रमाणें ह्या लोकामध्यें रावण अथवा इंद्रजित सामर्थ्यानें आणि पराक्रमानें सर्वांमध्यें श्रेष्ठ होते, त्याप्रमाणेंच मी आहें. माझी शरीरसंपत्ति आणि कर्तृत्व हीं अगदीं त्यांच्या बरोबरीचीं असल्यामुळें तुम्हांस कोणत्याही प्रकारचें साहाय्य करणें मला मुळींच अशक्य नाहीं. माझी गरज लागेल तेव्हां माझें तुम्हीं स्मरण केलें कीं मी तुमच्यापाशीं आहेच ! "

राजा, ह्याप्रमाणें बोलून राक्षसश्रेष्ठ घटोत्कचानें त्यांचा निरोप घेतला, आणि तो उत्तर दिशेकडे निघून गेला. जनमेजया, अप्रतिम वीर्यशाली अशा कर्णाची वासवदत्ता नामक शक्ति सहन करणारा पांडवांना कोणी तरी पाहिजे होता, म्हणून महात्म्या इंद्रानें, कर्णाचा प्रतिपक्षी असा हा महारथी घटोत्कच निर्माण केला.

अध्याय एकशें छपन्नावा.

—:०:—

व्यासदर्शन.

वैशंपायन सांगतातः—राजा, पुढें ते महारथी अनेक पशूंचा वध करीत करीत आणि मत्स्य, त्रिगर्त, पांचाल, कीचक इत्यादि प्रदेशांतील रमणीय वनप्रदेश पहात पहात एका अरण्यांतून दुसऱ्या अरण्यांत अशा रीतीनें मार्गक्रमण करूं लागले. ह्या वेळीं त्या महात्म्यांनीं तपस्व्यांचा वेष घेतला असून सर्वांनीं जटा धारण केलेल्या होत्या; व वल्कलें आणि कृष्णाजिनें त्यांनीं परिधान केलीं होतीं. कुंतीही त्यांच्या बरोबरच होती. ते कधीं कधीं सावकाश व कधीं कधीं घाईनें चालत असत. जेव्हां त्यांना घाईनें चालण्याचा प्रसंग येई, तेव्हां ते आपल्या मातेस खांद्यावर घेत. वाटेनें वेद, वेदांगें आणि नीतिशास्त्र ह्यांचें ते अध्ययन करीत असत.

राजा, ह्याप्रमाणें त्यांचा नित्यक्रम चालू असतां एके ठिकाणीं त्यांची व त्यांचे पितामह व्यास यांची गांठ पडली. तेव्हां त्या सर्वांनीं त्या महात्म्या कृष्णद्वैपायनांस साष्टांग प्रणिपात केला, आणि ते शत्रुविध्वंसक पांडव कुंतीसह हात जोडून त्यांच्या पुढें उभे राहिले. तेव्हां भगवान व्यास महर्षींनीं बोलण्यास प्रारंभ केला.

व्यास म्हणाले:—धृतराष्ट्रपुत्रांनीं तुम्हांला अन्यायानें देशांतून बाहेर घालवून दिलें, हें तुमच्यावर आलेलें संकट मला समजतांच, तुमचें हित करावें म्हणून मी ह्या ठिकाणीं आलों आहें. पांडवहो, तुमच्यावर हें संकट आलें आहे म्हणून तुम्ही दुःख मानूं नका. ज्या कांहीं गोष्टी घडत आहेत, त्या सर्व तुमच्या हिताकरितांच आहेत. मला ते आणि तुम्ही सारखेच आहां. परंतु, मनुष्यें हीं नेहमीं दीन आणि बाळ ह्यांच्यावरच ममता करीत असतात; आणि त्याप्रमाणें सांप्रत तुमची स्थिति असल्यामुळें, तुमच्यावर माझें अधिक प्रेम आहे. ह्याकरितां मी तुम्हांस तुमच्या हिताची एक गोष्ट सांगतों. ती ही कीं, येथून जवळच जें हें नगर दिसत आहे, तेथें जाऊन तुम्ही गुप्तपणें रहा; आणि माझ्या येण्याची वाट पहा. तें नगर रम्य आणि निरामय असें आहे.

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, ह्याप्रमाणें भगवान व्यासांनीं पांडवांस सांगितलें; आणि नंतर त्यांनीं कुंतीसही धीर दिला.

ते म्हणाले:–हे जीवत्पुत्रि, हा तुझा धर्मनिष्ठ पुत्र युधिष्ठिर भीम आणि अर्जुन ह्यांच्या बळावर

समुद्रवलयांकित पृथ्वी न्यायानें आपलीशी करून घेईल; आणि तिजवरील सर्व राजांवर आपला अधिकार चालवून प्रजेचें उत्तम प्रकारें पालन करील. तुझे आणि माद्रीचे पुत्र हे सर्व महारथी असूनही ते मोकळ्या मनानें एकमेकांशीं आनंदानें रहातील. पृथ्वी जिंकून घेतल्यानंतर, ज्यांत विपुल दक्षिणा द्यावी लागते असे राजसूय, अश्वमेध इत्यादिक मोठमोठे यज्ञ ते करितील; आणि हितचिंतक वर्गावर अनुग्रह करून, आपणांस प्राप्त झालेले भोग, ऐश्वर्य आणि सुख यांचा त्यांनाही ते लाभ देतील; व पितृपितामहादिकांच्या ह्या राज्याचा चांगल्या प्रकारें उपभोग घेतील.

वैशंपायन सांगतात:—राजा, याप्रमाणें कुंतीला सांगितल्यावर कृष्णद्वैपायन मुनींनीं त्या सर्वांना त्या नगरींत एका ब्राह्मणाच्या घरीं ठेविलें. नंतर ते धर्मराजास म्हणाले, "तुम्ही एक महिनापर्यंत येथें माझी वाट पहात राहा आणि मी पुनः येथें येईपर्यंत देशकालांकडे दृष्टि देऊन प्राप्त स्थितींत आनंद मानून स्वस्थ असा.'' ह्याप्रमाणें त्यांनीं भाषण केल्यानंतर त्या सर्वांनीं त्यांस हात जोडून "ठीक आहे" असें म्हटलें. नंतर ते प्रभु व्यास मुनि तेथून निघून गेले.



बकवधपर्व.

अध्याय एकशें सत्तावन्नावा.

—:०:—

ब्राह्मणाची चिंता.

जनमेजय विचारतो:—हे द्विजश्रेष्ठ, एकचक्रा नगरींत गेल्यावर महारथी कुंतीपुत्र पांडवांनीं पुढें काय केलें ?

वैशंपायन सांगतात:—राजा, तेथें गेल्यावर ते रमणीय अरण्यें, भूप्रदेश, नद्या आणि सरोवरें पहावयास जात असत. त्यांचें राहणें घरांत फारसें होत नसे. निर्वाहाकरितां ते भिक्षा मागत. ते सर्व गुणवान असल्यामुळें त्यांना पाहिलें असतां लोकांना संतोष होत असे. मिळालेली भिक्षा रोज रात्रीं ते कुंतीजवळ आणून देत; व तिनें ती वांटून दिली म्हणजे खात. वांटणी करण्याची तिची पद्धत अशी असे कीं, एकंदर भिक्षेपैकीं अर्धा भाग ती एकट्या भीमसेनाला देई; व अवशिष्ट अर्धभागाचे पांच सारखे वांटे करून धर्मराज, अर्जुन, नकुल, सहदेव व आपण स्वतः यांमध्यें वांटून घेई. ह्याप्रमाणें ते तेथें रहात असतां बरेच दिवस गेले. पुढें एके दिवशीं नेहमींप्रमाणें ते सर्व भिक्षेस निघून गेले, व भीमसेन सहजच्या घरींच कुंतीपाशीं राहिला. तों एकाएकीं त्या ब्राह्मणाच्या घरांत मोठा हाहाकार उडून कल्होळ झालेला कुंतीच्या कानीं पडला. तेव्हां हा कल्होळ कशाचा असावा, हें समजून घेण्याच्या उद्देशानें ती कान देऊन ऐकूं लागली, तों तिला कळून आलें कीं, ब्राह्मणाच्या घरांतील सर्व मुलेंमाणसें एकमेकांच्या गळीं पडून ओक्साबोक्शीं रडत आहेत ! राजा, कुंतीचें अंतःकरण फारच कोमळ होतें; आणि त्या ब्राह्मणाच्या घरांत झालेला कल्होळही, ऐकणाराच्या नेत्राला पाणी आल्यावांचून रहाणारच नाहीं अशाच प्रकारचा होता. तेव्हां तो ऐकून कुंतीच्या पोटांत तडतडां तोडूं लागलें, आणि ती मोठ्या करुणस्वरानें भीमसेनास म्हणाली, " बाळा ! ह्या ब्राह्मणाच्या कुटुंबावर कांहीं तरी भयंकर प्रसंग ओढवला असावा असें मला वाटतें. आपण ह्याच्या घरांत कसे सुखानें रहात आहों ! येथें असल्यामुळें कौरवांसही आपला शोध लागला नाहीं. त्याचप्रमाणें, येथें आपलें सर्व प्रकारें चांगलें चाललें असून आपल्यावर आलेल्या दुःखाचाही आपणांस थोडथोडा विसर पडत चालला आहे. ह्यामुळें माझ्या मनांत असें घोळत असतें कीं, ज्याच्या घरांत राहिल्यामुळें आपलें सर्व प्रकारें चांगलें झालें आहे, त्याला बरें वाटेल असें कांहीं तरी आपण करावें; व अशा प्रकारचें आपणांस काय करतां येईल त्याचा मी नेहमीं विचार करीत असतें. बाबा, मनुष्याचें मनुष्यपण तें एवढेंच कीं, त्याच्यावर कोणीं उपकार केला असता उपकारकर्त्याचें त्यानें स्मरण ठेवावें, आणि त्याच्या उपकाराची फेड चांगल्या प्रकारें करावी. भीमा ! प्रस्तुत ह्या ब्राह्मणावर जें दुःख कोसळलें आहे, तें निवारण करण्याचे कामीं जर आपल्याला कांहीं करितां येईल तर करावें, म्हणजे त्याच्या उपकाराची फेड केल्यासारखी होईल असें मला वाटतें."

भीमसेन म्हणाला:–आई, ह्या ब्राह्मणावर काय संकट आलें आहे त्याचा तूं शोध करून ये, म्हणजे तें निवारण होण्यासारखें असेल तर मी मोठ्या आनंदानें करीन. मग तें कितीही कठिण असलें तरी चालेल.

वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें भीमसेन व कुंती ह्या उभयतांमध्यें भाषण चाललें आहे, तों ब्राह्मण आणि त्याची स्त्री ह्यांचे दुःखोद्गार त्यांच्या पुनः कानीं पडले. तेव्हां, रानांतून चरून आलेली गाय अशी गोठ्यापाशीं आल्यावर धावून आपल्या बांधलेल्या वांसराकडे जाते, तशी कुंती

त्या महात्म्या ब्राह्मणाच्याकडे धावत गेली; तों ब्राह्मण, त्याची स्त्री, मुलगा आणि मुलगी हीं गुढघ्यांत मान घालून रडत बसलीं आहेत, असें तिच्या दृष्टीस पडलें. त्या वेळीं तो ब्राह्मण म्हणाला, "धिक्कार असो ह्या आमच्या जीविताला, कीं जें निस्सार व निरर्थक असून पराधीन व दुःखाचें केवळ मूळच होय! याला भयंकर संकटें तरी किती सहन करावीं लागतात! देहांत प्राण आहे तोंपर्यंत दुःख व संताप हा त्याच्यामागें लागलेलाच आहे; आणि जों जों त्याला सुख प्राप्त व्हावें म्हणून इच्छा व प्रयत्न करावा, तों तों त्यास जास्तच दुःख प्राप्त होतें. धर्म, अर्थ आणि काम ह्यांचा उपभोग आत्मा हा एकटाच घेत असतो. पण त्याचा वियोग मात्र अत्यंत दुःख देणारा होतो. मोक्ष उत्तम आहे असें म्हणतात; पण तो आहे हेंच अगोदर कोणत्याही प्रकारें सिद्ध होत नाहीं. अर्थ संपादन करण्याच्या वेळीं मात्र सर्व प्रकारच्या नरकाची उपपत्ति बरोबर जुळते. अर्थ मिळविण्याची नुसती इच्छा केली तरी आधींच दुःखाची प्राप्ति होते, आणि कदाचित् तो संपादन झाला तर तें अधिकच वाढतें. बरें! त्याचा वियोग झाला तर त्या दुःखाला पारावारच नाहींसा होतो. असो, प्रस्तुत जें मजवर संकट आलें आहे, त्याचें निवारण कशा तऱ्हेनें करावें? मला तर असा एकही उपाय दिसत नाहीं कीं, ज्या योगानें मी ह्यांतून पार पडेन. मी आपलीं हीं मुलेंबाळें आणि स्त्री ह्यांना घेऊन कोठें तरी नित्रस्त ठिकाणीं राहिलों असतों तरी बरें झालें असतें! पण आतां त्याचा काय उपयोग?"

राजा जनमेजया, ह्याप्रमाणें तो ब्राह्मण प्रथम आपणाशींच बोलला, व नंतर तो आपल्या स्त्रीकडे वळून तिला म्हणाला, "अग, मी पूर्वी तुला कित्येक वेळां म्हणालों कीं आपण येथून कोठें तरी दुसरे ठिकाणीं निघून जाऊं; पण तूं माझें मुळींच ऐकिलें नाहींस! दुष्टे! मी अनेक वेळां ह्यासंबंधानें तुझी विनवणी केली, पण तूं म्हणालीस कीं माझा जन्म येथेंच झाला आहे, मी वाढलेंही येथेंच, इतकेंच नव्हे, तर माझ्या बापाचाही जन्म येथेंच झाला असून तोही येथेंच वाढला; तेव्हां येथून जाणें मला बरें वाटत नाहीं. पण, येथें राहिल्यामुळेंच तुझा वृद्ध पिता स्वर्गास गेला; माता परलोकवासी झाली; सर्व बंधुजनही नष्ट होऊन गेले; आणि आतां आपल्यावरही तोच प्रसंग आला आहे! असो! ईश्वरेच्छा!" राजा जनमेजया, याप्रमाणें आपल्या पत्नीशीं बोलून पुनः तो आपल्याशींच म्हणतो, "ह्या प्रसंगीं माझा नाश होणें हेंच योग्य आहे; एखाद्या घातकी मनुष्याप्रमाणें आपल्या बांधवांना बळी देऊन आपला जीव वांचवावा असें माझ्या हातून कधींही होणार नाहीं. माझ्या धर्माचरणास साहाय्यभूत, सहनशील मातेप्रमाणें माझें संगोपन करणारी, देवानें करून दिलेला माझा मित्र, माझा नेहमींचा संसारसुखाचा मार्ग, मातापितरांनीं करून दिलेली माझ्या गृहस्थाश्रमाची वांटेकरीण, आणि जिच्याशीं मंत्रपूर्वक विवाह करून जिचा मीं अंगीकार केला, अशी जी माझी कुलीन, तरुण, नम्र आणि पतिव्रता स्त्री, तिचा मी आपल्या जिवाकरितां नाश करण्यास कधींही तयार होणार नाहीं. त्याचप्रमाणें, पुत्राचा त्याग करण्याचेंही माझ्यानें होणार नाहीं. आतां मुलगी राहिली, ती तर केवळ बाल आहे. शिवाय, तिच्यावर माझा हक्कही नाहीं. ब्रह्मदेवानें तिच्या पतीची ठेव म्हणून ती मजपाशीं ठेविली आहे; आणि तिच्या योगानें दौहित्रापासून मिळणाऱ्या लोकांची प्राप्ति होण्याची मला आणि माझ्या पितरांनाही आशा आहे. तेव्हां अशा ह्या आपल्या मुलीचा त्याग करणें मला कसें बरें वाटेल? पित्याचें प्रेम पुत्रावर अधिक असतें असें कित्येक लोक म्हणतात; आणि कन्येवर अधिक असतें असें कित्येक म्हणतात; पण मला मात्र तीं

दोन्ही सारखींच वाटतात. जिच्यावर तिच्या पतीच्या वंश, परलोक आणि सुख हीं अवलंबून आहेत, तिचा मी त्याग कसा करूं ? बरें, मींच आपल्या देहाचा त्याग करावा, तर तेंही कठिण! कारण, माझ्या मागें ही मुळींच वांचणार नाहींत. आतां ह्यांच्यापैकीं कोणा तरी एकाचा त्याग करावा, तर तेंही निर्दयपणाचें होईल; असें करणें सुज्ञ लोकांच्या निंदेस पात्र आहे. सारांश, मजवर आलेलें हें संकट फारच दुःखदायक असून त्यांतून पार पडण्यास मी असमर्थ आहें. हाय ! हाय ! धिक्कार असो मला ! माझ्या कुटुंबाची आणि माझी काय गति होणार कोण जाणे! आतां सर्वांनीं एकदम मरावें हेंच उत्तम!"

अध्याय एकशें अठावन्नावा.

—:०:—

ब्राह्मणस्त्रीचें भाषण.

ब्राह्मणाची स्त्री म्हणाली:—महाराज ! एखाद्या अज्ञान मनुष्याप्रमाणें आपण असा संताप काय करून घेत आहां ? ही वेळ संतापण्याची नव्हे. बोलून चालून ही मृत्युलोकची वस्ती ! यांत प्रत्येकाला मरण हें केव्हां तरी येणारच. तेव्हां त्याविषयीं संताप करून काय उपयोग? स्त्री असो, पुत्र असो, किंवा कन्या असो, त्यांची इच्छा केवळ आपल्या जिवासाठींच करावयाची. असा विचार करून, आपण त्यांच्याविषयीं दुःख करण्याचें सोडून द्यावें, मीच आपल्या देहाचा बळी देतें. पतीच्या हिताकरितां आपल्या प्राणाचाही त्याग करावा हेंच पतिव्रता स्त्रीचें श्रेष्ठ कर्तव्य होय. मी गेलें असतां आपल्याला सुख होईल आणि मला अक्षय स्वर्गलोकाची प्राप्ति होऊन इहलोकीं माझी कीर्ति होईल. मी हें जें आपणांस सांगत आहें, तो धर्मच होय. शिवाय, असें केलें असतां धर्म आणि अर्थ या दोहोंची आपणांस प्राप्ति होईल. ज्याकरितां स्त्रीची इच्छा करावयाची, तो कन्यापुत्ररूपी अर्थ आपणांस मजपासून मिळाला असून त्यामुळें आपण मलाही ऋणमुक्त केलें आहे. तसेंच, मी नसलें तरी आपण जसे या मुलांचें पालनपोषण करण्यास समर्थ आहां, तसें आपल्या मागें माझ्याच्यानें कसें होईल? माझ्या सर्व प्राणधनाचे आपण ईश्वर आहां. आपला वियोग झाल्यावर मला वैधव्याचें दुःख सहन करवणार नाहीं, आणि माझ्याच्यानें या अर्भकांचें पोषणही होणार नाहीं. आपणास देवानें ही जी मुलगी दिली आहे, तिला कुलशीलसंपन्न असें घर मिळालें पाहिजे. मी अनाथ झालें असतां, आपल्याशीं शरीरसंबंध करण्यास अयोग्य असे अहंकारानें ताठून गेलेले लोक तिला मागणी करतील. मग तेथें मीं काय करावें ? शिवाय दुसरेंही असें आहे कीं, ह्या जगांत दुर्बुद्धीचे लोक फार असतात. भूमीवर टाकून दिलेल्या मांसावर पक्षी जसे झडप घालण्यासाठीं टपलेले असतात, तशी पतिहीन झालेल्या स्त्रीवर दुष्ट लोकांची नजर असते. ते आपला हेतु साधण्याकरितां अनेक प्रकारचे उपाय करितात: द्रव्याची आशा दाखवून फसवितात, प्रार्थना करितात, व भयही दाखवितात; आणि तशा प्रसंगीं त्या दुष्टांच्या तडाक्यांत सांपडल्यामुळें कुळाला कलंक लावण्यासारखें वर्तनही कित्येकांच्या हातून होतें; पण मी सन्मार्गानेंच वर्तन करावें अशी इच्छा करणारी असल्यामुळें, तसा प्रसंग मजवर आला तर त्या वेळीं देहत्याग करण्याखेरीज मला दुसरा उपायच राहणार नाहीं ! तसेंच, आपल्या कुलशीलाप्रमाणें व तुमच्या लौकिकाला साजेल असें शिक्षण ह्या मुलांना माझ्याच्यानें कसें देववेल ? शूद्र लोक ज्याप्रमाणें वेदश्रवणाची इच्छा करितात, त्याप्रमाणें अयोग्य लोक या अनाथ बाळेची मागणी करतील; आणि योग्य कारण दाखवून जरी मी त्यांना देत नाहीं म्हटलें, तरी कावळे जसे होमद्रव्यें पळवून नेतात, तसे

ते हिला बलात्कारानें धेऊन जातील. एकंदरींत, योग्य शिक्षण न मिळाल्यामुळें पुत्र गुणहीन होईल, व अयोग्य ठिकाणीं पडल्यामुळें कन्या आपल्या कुळाला दूषणभूत होईल; आणि मग उन्मत्त लोक माझा चार लोकांत अपमान करतील, व तें दुःख सहन न होऊन मला निःसंशय मृत्यु प्राप्त होईल! मग ह्या मुलांची स्थिति जलविहीन मत्स्याप्रमाणें होईल. सारांश, आपला वियोग झाला असतां आम्हां तिघांचाही नाश होणार! तेव्हां आपण माझा एकटीचाच त्याग करावा हें उत्तम आहे. हे ब्रह्मनिष्ठ, मुलेंबाळें झालीं असून पतीच्या पूर्वी मरण येणें हें सर्वोत्कृष्ट होय. अशा स्त्रियांना उत्तम गति मिळते असें धर्मज्ञ लोक म्हणतात; व लौकिकांतही त्यांना भाग्यवान समजतात. पुत्र, कन्या आणि बांधव ह्या सर्वांचा मीं पूर्वींच त्याग केलेला आहे. कारण, हें माझें जीवित त्यांच्याकरितां नसून केवळ आपल्यासाठींच आहे. स्त्रीनें आपल्या पतीस प्रिय आणि हितकारक अशींच कृत्यें केलीं म्हणजे नानाप्रकारचे यज्ञ, तपें, दानें आणि नियम ह्यांपासून प्राप्त होणाऱ्या फलांपेक्षांही अधिक फल तिला प्राप्त होत असतें. तेव्हां मी जें हें अत्यंत संमत असें धर्माचरण करण्याची इच्छा करीत आहें, तें आपणांस व आपल्या उभय कुलांसही इष्ट आणि हितकारक असेंच आहे. संतति, द्रव्य, प्रियमित्र आणि पत्नी ह्यांची इच्छा करावयाची ती केवळ आपत्ति, धर्म, आणि मोक्ष यांकरितांच होय, असें सज्जन म्हणतात. आपत्तींत उपयोग करण्याकरितां द्रव्याचें संरक्षण करावें, द्रव्याच्या योगानें स्त्रीचें रक्षण करावें, व स्त्री आणि द्रव्य या दोहोंच्या योगानें स्वतांचें रक्षण करावें. इहलोक आणि परलोक ह्या दोन्ही लोकांची प्राप्ति व्हावी म्हणूनच स्त्री, पुत्र, द्रव्य आणि गृह हीं सर्व संपादन करावयाचीं, असा सुज्ञ लोकांचा सिद्धांत आहे. तसेंच सर्व कुल एके बाजूस आणि आपलें शरीर दुसरे बाजूस घातलें, तरी त्या दोहोंची मुळींच बरोबरी होणार नाहीं असें पंडित म्हणतात. तेव्हां आतां माझ्याच योगानें आपण आपलें कार्य करून घ्या, आणि या संकटांतून पार पडा. महाराज! मला आतां आज्ञा द्या. ह्या बाळांचें आपण संगोपन करा. शिवाय, धर्माधर्मांचा निर्णय करतांना, "स्त्रियांचा प्राण घेणें योग्य नाहीं." असें धर्मज्ञ लोकांचें म्हणणें पडतें; आणि राक्षस हे धर्मज्ञ असतात असा त्यांचा लौकिक आहे; तेव्हां मी गेलें तर तो कदाचित् मला मारणारही नाहीं. सारांश, पुरुषाचा वध होणें हें निश्चित असून, स्त्रियांचा अनिश्चित आहे. तेव्हां, हे धर्मज्ञ कोणत्याही दृष्टीनें पाहिलें तरी आपण मलाच पाठविणें योग्य होय. त्यांतून, माझें आतां कांहीं राहिलेंही नाहीं. माझें सर्व कांहीं झालें आहे: मीं भोग भोगिले आहेत, मला प्रिय गोष्टींची प्राप्ति झाली आहे, माझ्या हातून धर्माचरणही पुष्कळ घडलें आहे, आणि मला संततिही झाली आहे. आतां आपणांस प्रिय असेल तेवढेंच करावें ही काय ती इच्छा मी सदोदीत करीत असतें. आतां, मी जी तिकडे जाण्यास तयार झालें आहें, त्यांत तरी आपलें प्रिय करावें हाच हेतु आहे. महाराज! आपण जरी माझा त्याग केला, तरी आपणांस दुसरी स्त्री मिळेल, व त्यामुळें आपला धर्म स्थैर्यसंपन्न होईल. पुरुषांनीं अनेक स्त्रिया केल्या तरी अधर्म होत नाहीं; पण स्त्रियांचें मात्र तसें नाहीं. ह्या सर्व गोष्टींचा चांगला विचार करून, आणि आत्मघात करणें हें निंद्य आहे इकडेही लक्ष देऊन आपण स्वतांस, आपल्या कुलास आणि या दोन बालकांसही आज या संकटांतून मुक्त करा.

वैशंपायन सांगतातः—हे भरतवंशजश्रेष्ठा, हें तिचें भाषण ऐकून तिच्या पतीनें तिला घट्ट आ-

लिंगन दिलें; आणि अत्यंत कष्टी होऊन तीं दोघेंही एकसारखीं अश्रु ढाळूं लागलीं.

अध्याय एकशें एकुणसाठावा.

—:०:—

ब्राह्मणांच्या मुलांचें भाषण.

वैशंपायन सांगतात:—राजा, याप्रमाणें ब्राह्मण व त्याची स्त्री या उभतांमध्यें झालेलें भाषण ऐकून त्यांच्या कन्येचें अंतःकरण दुःखानें व्याप्त होऊन गेलें, आणि ती त्यांना म्हणाली:—तुम्ही अशीं चिंताग्रस्त होऊन रडत कां बसलां? मी तुम्हांस कांहीं सांगतें तें ऐका, आणि मग योग्य दिसेल तें करा. धर्माच्या दृष्टीनें पाहिलें असतां केव्हां तरी तुम्हांस माझा त्याग केलाच पाहिजे. तेव्हां ह्याच प्रसंगीं माझा त्याग करून तुम्ही आपलें सर्वांचें संरक्षण करा. संततीची इच्छा करावयाची ती कशाकरितां? ती आपणास संकटांतून पार पाडील म्हणूनचना? तेव्हां भोंपळ्याच्या योगानें जसे लोक नदीपार होऊन जातात, तसे माझ्या योगानें तुम्ही या संकटांतून पार पडून जा. बाबा, पुत्र हा इहलोकीं आणि परलोकीं पितरांचा संकटांतून उद्धार करितो म्हणूनच त्याला सुज्ञ लोक 'पुत्र' असें म्हणतात. तेव्हा पुत्र जसा आपल्या उपयोगीं पडेल, तशी मी पडणार नाहीं. आतां माझ्या ठिकाणीं दौहित्रांची उत्पत्ति व्हावी अशी पितामहादिक पितरांना इच्छा असेल, पण मला मुलें होऊन त्यांनीं त्यांचा उद्धार करण्यापेक्षां, मी स्वतांच आपल्या पित्याच्या जिवाचें रक्षण करून उद्धार करतें. बाबा! शिवाय हा माझा भाऊ अगदीं लहान आहे, आणि अशा स्थितींत जर आपण परलोकवासी झालां, तर थोडक्याच वेळांत हाही नाश पावेल. तसेंच, तुम्ही स्वर्गाला गेलां व माझा धाकटा भाऊही नाश पावला, म्हणजे पितरांच्या पिंडाचा उच्छेद होईल, व तसें होणें अत्यंत अनिष्ट होय. ह्याप्रमाणें पति व पुत्र या दोघांचाही वियोग झाला असतां माझी माताही जिवंत राहणार नाहीं, व मग अशा प्रकारें तिघांनींही मला सोडिलें म्हणजे तें दुःख मला सहन न होऊन मीही मरून जाईन. तेव्हां तसें मरण्यापेक्षां आतांच मरणें सर्वथैव उत्तम. सारांश, माझा त्याग करून आपण आपल्या शरिरास इजा न होतां या संकटांतून सुटलां म्हणजे माझी आई व माझा धाकटा भाऊ, तसेंच आपला वंश व पिंड हीं सर्व कायम राहतील. शिवाय, बाबा, मुलगा हा तर आपला आत्माच होय; स्त्री ही मित्र आहे, आणि कन्या म्हणजे खरोखरी संकट आहे. तेव्हां आतां आपण या कामीं माझीच योजना करावी. बाबा! मी आधींच लहान, तेव्हां आपल्या मागें मी अनाथ व दीन होऊन कोठें तरी जाऊन पडेन, आणि कायमची दीन होऊन बसेन; तेव्हां आतां जर मीं हें दुष्कर कर्म केलें, तर आपल्या या कुळाला संकटांतून सोडविल्यासारखें होऊन माझें मरणही सफळ होईल. तेव्हां, हे साधुश्रेष्ठा! माझ्यासाठीं, धर्मासाठीं आणि आपल्या वंशासाठीं तुम्ही स्वतांचें संरक्षण करा; आणि जिचा केव्हां तरी त्याग करणें अवश्य आहे, त्या मला आजच सोडून द्या. असें जर आपण न केलें, तर तुमच्या मागें आम्हांला पोटासाठीं कुत्र्याप्रमाणें अन्न अन्न करीत दारोदार हिंडावें लागेल! यापेक्षां आणखी अधिक दुःख तें कसलें असावयाचें? आणि आपण व बंधु हे जर या क्लेशांतून सुटलां, तर ह्या लोकांत मी कांहीं मेल्यासारखी होणार नाहीं; कारण माझी कीर्ति मागें राहील; आणि त्यापासून मला सुख होईल. बाबा, आणखी असें पहा कीं, आपण जर गेलां, तर देवाच्या आणि पितरांच्या उपजीविकेकरितां इतं:प्रदान[१] कोण बरें करील? आणि मग ते

१ देवादिकांच्या उपजीविकेकरितां जीं करावयाचीं तीं कर्में,—श्राद्धादिकांसारखीं.

आपलें कसें बरें कल्याण करतील? कारण, देव आणि पितर हे इतःप्रदानावर अवलंबून असतात असें आम्हीं ऐकिलें आहे. तेव्हां, मी म्हणतें, मला जाऊं द्या, आणि आपण रहा; म्हणजे आपण दिलेल्या उदकाच्या योगानें ते देवपितर संतुष्ट होऊन आपल्या कल्याणास कारणीभूत होतील!

वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें त्या मुलीचें तें विचारयुक्त व कळवळ्याचें भाषण ऐकून त्या मातापितरांच्या पोटांत भडभडून आलें, व तीं रडूं लागलीं. तेव्हां ती मुलगीही त्यांकडे पाहून ओक्साबोक्शीं रडूं लागली. याप्रमाणें हीं तिघेंही रडत आहेत असें पाहून, जवळच बसलेल्या त्या धाकट्या मुलानें हातांत एक गवताची काडी घेतली, आणि तो त्या प्रत्येकाकडे रांगत रांगत जाऊन, आपल्या बोबड्या व मधुर शब्दांनीं त्यांना हांक मारून हसत हसत बोलूं लागला, "बाबा, ए आई, अग ताई, तुमी लडूं नका! मी किनई, या काडीनं त्या मानसं खानाल्या लक्क्शसाला थाल मालून ताकतों!"

वैशंपायन सांगतातः—राजा, तीं माणसें जरी दुःखानें अगदीं व्याप्त झालीं होतीं, तरी त्या मुलाचे ते बोबडे बोल ऐकून त्यांस मोठा आनंद झाला. तेव्हां आतां ह्यांच्यापुढें जाण्यास हीच वेळ बरी आहे असें समजून कुंती त्यांच्याजवळ गेली; आणि गतप्राण झालेल्या लोकांस जणू अमृतच पाजून जिवंत करीत आहे, अशा प्रकारचें भाषण तिनें त्यांच्याशी केलें.

अध्याय एकशें साठावा.

—:०:—

बकभयकथन.

कुंती म्हणाली:—महाराज, आपल्या ह्या दुःखाचें मूळ कोणत्या गोष्टींत आहे, तें नीट समजून घ्यावें अशी माझी इच्छा आहे. तें समजलें म्हणजे शक्य असेल तर मी तें नाहींसें करीन.

ब्राह्मण सांगतो:—अहो तपस्विनी बाई, सज्जनांना योग्य तेंच आपण म्हणतां, पण आमचें हें दुःख मनुष्याच्या हातून निवारण होण्यासारखें नाहीं. कारण, जो कोणी आमचें हें दुःख निवारण करण्याचें मनांत आणील, त्यानें प्रथम आपल्या जिवाची आशा सोडिली पाहिजे! अहो, ह्या नगराच्या जवळ बक नांवाचा एक राक्षस राहतो, तो मोठा बलवान असून ह्या देशाचा—अर्थात् या नगराचाही—अधिपति आहे. त्याच्याजवळ राक्षसांचें सैन्यही पुष्कळ असून त्याच्या योगानें तो ह्या देशाचें चांगलें संरक्षण करितो. तो असल्यामुळें येथें परचक्राची तर कधींच भीति नाहीं, पण पंचमहाभूतांपासूनही कधीं अपाय होत नाहीं. परंतु त्या राक्षसास नरमांस भक्षण करण्याची आवड आहे; व त्याचा आहार मोठा असल्यामुळें इतर अन्नही त्यास पुष्कळच लागतें. म्हणून त्या व्यवस्थेकरितां, प्रतिदिवशीं तीस मण तांदुळांचा भात, दोन रेडे, आणि एक मनुष्य इतकें त्यास द्यावें लागतें. तेव्हां याजबद्दल एकेका घरच्या मालकानें एकेक दिवस हें सर्व द्यावें असें त्यानें ठरविलें आहे. ही पाळी प्रत्येक घरावर फार वर्षांनीं येते. परंतु ज्या वेळीं ती येईल, तो दिवस म्हणजे त्या घरधन्यास फारच भयंकर जातो. ही पाळी चुकविण्याचा कोणी प्रयत्न करितात. परंतु तसें करणाराचीं सर्व मुलेंमाणसें तो दुष्ट राक्षस एकदमच खाऊन टाकतो. येथला एक राजा आहे, तो वेत्रकीय नांवाच्या वाड्यांत राहतो. पण तो न्यायानें वागत नसून निर्बल व बुद्धिहीन आहे. यामुळें लोकांवरची ही पीडा कायमची टाकण्याचा त्याच्या हातून कांहींच प्रयत्न होत नाहीं. असल्या दुष्ट व शक्तिहीन राजाच्या देशांतच ज्या अर्थी आम्ही राहिलों आहों, त्या अर्थी आम्हांवर अशीं संकटें येणें हें खरोखर योग्यच होय. आतां वास्तविक पाहिलें तर आम्हां ब्राह्म-

णांना शेत ना वाडी ! तेव्हां आम्ही अशा राज्यांत राहिलेंच पाहिजे असा कांहीं आमच्यावर कोणी जुलूम करणार नाहीं. आम्ही स्वतंत्र असल्यामुळें, जेथें कांहीं गुण असेल तेथेंच आमच्यासारख्यांनीं राहिलें तरी चालेल. आम्हां ब्राह्मणांची स्थिति म्हणजे केवळ पक्ष्यांप्रमाणें आहे. पक्षी जसे ज्यांना सुख होईल तिकडे जातात, त्याचप्रमाणें, आम्हांस सुख होईल तिकडेच आम्हीं जावें. बाई! प्रथम राजा जोडावा; नंतर स्त्री, आणि त्याच्याही मागून द्रव्य. ह्या तीन्ही गोष्टींचा संग्रह केल्यानंतर त्या योगानें आपले बांधव आणि पुत्र ह्यांचें संरक्षण करावें. असें असतां, मीं हें सर्व विपरीत केलें आहे, ह्यामुळें आम्ही अत्यंत ताप भोगीत आहों. बाई! कुळाचा विध्वंस करणारी ती पाळी आतां माझ्या घरावर आलेली असून, मला तें भोजन आणि एक मनुष्य त्या राक्षसास उद्यां दिलें पाहिजे. बरें, ह्यासाठीं मनुष्य विकत घेईन म्हणावें, तर माझ्याजवळ द्रव्य नाहीं! एखादा आप्तइष्ट देईन म्हणावें, तर तसें माझ्या हातून केव्हांही घडणार नाहीं. ह्यामुळें त्या राक्षसापासून सुटण्याचा मला कांहींच उपाय दिसत नाहीं. तेव्हां मीं असा विचार केला आहे कीं, कुटुंबांतील सर्व मनुष्यांसह आपणच त्या राक्षसाकडे जावें; म्हणजे तो आम्हां सर्वांनाच भक्षण करून टाकील; आणि त्यामुळें माझ्या सर्व दुःखाचा शेवट होईल.

अध्याय एकशें एकसष्ठावा.

—:०:—

भीमबकवधाङ्गीकार.

कुंती म्हणाली:—ब्रह्मन्, आपण अगदीं खेद करूं नका. त्या राक्षसाच्या तडाख्यांतून तुमची सुटका करण्याचा मीं एक उपाय शोधून काढला आहे. हें पहा—मला पांच मुलगे आहेत, त्यांपैकीं एक मुलगा मी ह्या कामाकरितां देतें. तो राक्षसाचें भोजन घेऊन त्याजकडे जाईल. आतां, असें करण्यांत विशेष काय आहे असें तुम्ही म्हणाल, तर माझा एक मुलगा गेला तरी मला चार राहतीलच; तशी तुमची स्थिति नाहीं. तुम्हांस एकच मुलगा असून तोही अगदीं लहान आहे. तशीच ही बिचारी मुलगीही तुमची एकुलती-एक असून तीही लहानच आहे. तेव्हां, त्यांपैकीं कोणींही जाणें बरोबर नाहीं. कारण, असें पहा—त्यांच्या आईला घाल, तर मुलें लहान असल्यामुळें तेंही करणें बरोबर नाहीं; आणि तुम्ही स्वतः गेल्यास सर्वच कुटुंबाचा घात होणार! म्हणून तेंही मला बरें वाटत नाहीं.

ब्राह्मण म्हणाला:—बाई, आपल्या जिवाच्या आशेस्तव व स्वार्थाकडे नजर देऊन अतिथीचा आणि त्यांतूनही ब्राह्मणाचा प्राण घेणें हें केव्हांही योग्य नाहीं; म्हणून तें मी करणार नाहीं. कुलहीन आणि अधर्मी लोकही असलें नीच कर्म करीत नाहींत. वास्तविक पाहिलें तर, ब्राह्मणासाठींच आपणा स्वतांचा किंवा आपल्या पोटच्या पोराचा सुद्धां प्राण खर्चीं घालावा, हें श्रेयस्कर आहे असें मला वाटतें. ब्रह्महत्या किंवा आत्महत्या ह्या दोहोंचा प्रसंग आल्यास, माझ्या मतें आत्महत्याच करणें उचित होय. कारण, ब्रह्महत्येचें पातक फार मोठें आहे. तें नकळत घडलें तरी देखील त्याच्यावर प्रायश्चित्त नाहीं. आतां, आत्महत्येंतही पातक आहे हें खरें; पण माझा वध व्हावा म्हणून मीं कांहीं प्रयत्न केलेला नाहीं. माझी इच्छा नसतां परक्यानें जर माझा वध केला, तर त्यांत माझ्याकडे काय दोष? परंतु माझ्याबद्दल तुमच्या मुलाला जर त्या राक्षसाकडे मीं पाठविलें, तर मात्र मी बुद्धिपुरःसर ब्राह्मणाचा वध केला असें होईल. आपल्यां घरीं आलेला, आश्रय मागणारा, आणि याचना करणारा, ह्यांचा वध करणें हें घातकीपणाचें लक्षण होय. सुज्ञ लोक तें अत्यंत निंद्य

समजतात. म्हणून कोणत्याही कारणांनीं असलें कर्म करूं नये, असें आपद्धर्म जाणणाऱ्या महात्म्यांचें मत आहे. सारांश, स्त्रीसहवर्तमान माझा जरी नाश झाला, तरी हरकत नाहीं पण ब्राह्मणांच्या वधाला मी केव्हांही अनुमति देणार नाहीं.

कुंती म्हणाली:–हे ब्रह्मनिष्ठ ! ब्राह्मणांचें संरक्षण करावें असें माझेंही मत आहे, व म्हणूनच मी हें कृत्य करण्याची इच्छा करतें. नाहीं तर मला मुलें नकोतशीं का आहेत ? मला जरी शंभर पुत्र असते, तरी सुद्धां मला ते जास्ती वाटले नसते. परंतु वास्तविक गोष्ट अशी आहे कीं, मी जो आपला मुलगा तिकडे पाठविण्यास तयार झालें आहें, त्या माझ्या पुत्राचा नाश होईल अशी मला मुळींच भीति वाटत नाहीं. कारण, तो माझा मुलगा मोठा पराक्रमी असून त्याला मंत्रसिद्धिही झालेली आहे. त्यानें पूर्वी अनेक बलाढ्य व धिप्पाड राक्षस पाहिलेले आहेत, आणि ते अंगावर चालून आले असतां त्यानें त्यांस ठार केलेलें आहे. तेव्हां तो माझा मुलगा त्या राक्षसाकडे गेला असतां त्यापासून आपली मुक्तता करून घेऊन सुरक्षित परत येईल. तेव्हां आपण ह्याविषयीं मुळींच काळजी करूं नये. मात्र ही गोष्ट कोठें बोलूं नका हो ! नाहीं तर ती विद्या शिकण्याची इच्छा धरून लोक उगीच माझ्या मुलाला त्रास देत बसतील; आणि जरी त्यानें तो त्रास सोसला, तरी त्यांना कांहीं उपयोग होणार नाहींच; पण माझ्या मुलाचें मात्र फुकट नुकसान होईल ! कारण, मंत्रविद्या जर गुरूच्या आज्ञेशिवाय कोणास सांगितली, तर ती दोघांच्याही उपयोगीं पडेनाशी होते, असें मंत्रवेत्ते म्हणतात.

वैशंपायन सांगतात:–राजा, हें कुंतीचें भाषण ऐकून ब्राह्मण व त्याची स्त्री ह्या उभयतांस अतिशय आनंद झाला; आणि तिच्या त्या अमृततुल्य भाषणाची त्यांनीं फार स्तुति केली. असो; पुढें कुंती आणि तो ब्राह्मण ह्या उभयतांनीं भीमसेनास तें कृत्य करावयास सांगितलें; व त्यानेंही "ठीक आहे, मी तें काम करीन !" असें म्हटलें !

अध्याय एकशें बासष्टावा.

—:०:—

कुंतीयुधिष्ठिरसंवाद.

वैशंपायन सांगतात:–जनमेजया, 'ठीक आहे, मी हें काम करीन' असे शब्द भीमसेनाच्या तोंडून निघताहेत तों त्याचे धर्मराजादिक चौघे बंधु भिक्षेहून परत आले; आणि भीमसेनाचें तें आवेशयुक्त भाषण ऐकून, ह्यानें कांहीं तरी अघोर कृत्य करण्याचें मनांत आणिलें असावें असा त्यांनीं तर्क केला. तेव्हां धर्मानें तात्काळ कुंतीपाशीं या गोष्टीची विचारपूस केली.

धर्मराज म्हणाला:–आई, हा भयंकर पराक्रमी भीम 'ठीक आहे, मी हें काम करीन' असें जें मोठ्या आवेशानें म्हणाला, तें काय आहे ? व त्या कृत्याला तुझी संमति आहे का तो आपल्या स्वतांच्या इच्छेनेंच हें कांहीं तरी करीत आहे ?

राजा, ह्याप्रमाणें धर्मराजानें विचारिलें असतां कुंतीनें झालेली सर्व हकीकत त्याला सांगितली; व माझ्याच सांगण्यावरून ह्या नगराच्या मुक्ततेसाठीं आणि ह्या ब्राह्मणाच्या दुःखनिवारणाकरितां हा शत्रुमर्दक भीम या कृत्यास प्रवृत्त झाला आहे, असेंही तिनें त्याला सांगितलें. पण धर्मराजाला कुंतीचें तें करणें प्रशस्त वाटलें नाहीं; आणि तो तिला म्हणाला, "आई, हें काय तूं दुष्कर आणि भयंकर धाडस आरंभिलें आहेस? आपल्या पुत्रांचा त्याग करणें ह्याला कांहीं सज्जन चांगलें म्हणत नाहींत. परक्यासाठीं आपल्या पुत्राचा त्याग करावा असें तुला वाटलें तरी कसें ? हें तुझें कृत्य खरोखर लौकिकाच्या आणि धर्माच्या विरुद्ध आहे. आई ! ज्याच्या बाहुबलाच्या आधा-

रावर आम्ही सुखानें निद्रा घेत असून शत्रूंनीं हिरावून घेतलेलें आमचें राज्य परत घेण्याची उमेद धरीत आहों; तसेंच, ज्याच्या सामर्थ्याची कल्पना मनांत येऊन दुर्योधन आणि शकुनि ह्यांस अहोरात्र झोंप देखील येत नाहीं; ज्या वीराच्या शूरत्वामुळेंच लाक्षागृह आणि इतर महान संकटांतून आम्ही मुक्त झालों; आणि ज्यानें पुरोचनासारख्याचा वध केला, त्या भीमाचा त्याग करण्याचें तूं मनांत तरी कसें आणिलेंस? दुःखामुळें तुझी विचारशक्ति अगदींच नाहींशी झाली कीं काय? त्या महापराक्रमी भीमसेनाचा आम्हांस पाठिंबा असल्यामुळें, धृतराष्ट्रपुत्रांचा वध करून ही सर्वसंपत्तियुक्त पृथ्वी आम्हीं मिळविलीच आहे असें समजत आहों.

कुंती म्हणाली:—युधिष्ठिरा, तूं उगीच संतापूं नको. मी कांहीं हें कृत्य अविचारानें करीत नाहीं. बाळा! आपण ह्या ब्राह्मणाच्या घरीं, धृतराष्ट्रपुत्रांस कळल्यावांचून, कसे बरें सुखानें राहिलों आहों! शिवाय, येथें आपला सत्कारही चांगला होत आहे. तेव्हां, धर्मा, या उपकाराची कांहीं तरी फेड करावी, म्हणून हा उपाय मी योजिला आहे. मनुष्यावर केलेले उपकार त्यानें स्मरले तरच त्याला मनुष्य म्हणणें योग्य आहे. दुसरा मनुष्य आपणावर जितका उपकार करील, त्याच्या अनेकपटीनें आपण त्यावर प्रत्युपकार केले पाहिजेत. शिवाय, भीमाचा लाक्षागृहांतील मोठा पराक्रम आणि हिडिंबाचा वध, हे मी प्रत्यक्ष पाहिले असल्यामुळें, त्याच्या सामर्थ्याविषयीं मला खातरी आहे. भीमाचें बाहुबल दहा हजार हत्तींच्या बळाइतकें असून युद्धामध्यें प्रत्यक्ष विष्णूसही तो मागें हटवील, असा त्याचा पराक्रम आहे. लहानपणीं हा एकदा माझ्या मांडीवर निजला असतां एकदम खालीं शिळेवर पडला, तों त्याच्या आघातानें ती शिळा चूर्ण होऊन गेली! धर्मा, ह्या सर्व गोष्टींवरून भीमाची शक्ति मी पूर्णपणें ओळखिलेली आहे; आणि म्हणूनच ह्या ब्राह्मणावर प्रत्युपकार करण्याचें मीं मनांत आणिलें आहे. लोभामुळें, अज्ञानामुळें किंवा बुद्धीस भ्रंश झाल्यामुळें हें कृत्य करण्याचें मी योजिलें नाहीं; तर समजून उमजूनच ठरविलें आहे. धर्मा, ह्या कृत्यामुळें दोन गोष्टी केल्यासारख्या होतील: एक—आपणांवर त्या ब्राह्मणानें जो उपकार केला आहे त्याची फेड होईल; आणि दुसरी—मोठें धर्माचरण केल्यासारखें होईल! ब्राह्मणास साहाय्य करणाऱ्या क्षत्रियास उत्तम लोकांची प्राप्ति होते; क्षत्रियानें क्षत्रियाचाच जीव वांचविला, तर इहपरलोकीं त्याची विपुल कीर्ति होते; क्षत्रियानें वैश्यास साहाय्य केलें, तर तो ह्या लोकचा आणि परलोकचा लोकमान्य राजा होतो; आणि शरण आलेल्या शूद्रास जर क्षत्रियानें संकटांतून मुक्त केलें, तर त्याचा पुढें धनसंपन्न व राजाला पूज्य अशा कुळांत जन्म होतो. हे कुरुकुलनंदना, अशा ह्या गोष्टी पूर्वी ज्ञानसंपन्न भगवान व्यासांनीं मला सांगितल्या आहेत, म्हणून मी हा विचार मनांत आणिला आहे.

अध्याय एकशें त्रेसष्टावा.

—:o:—

भीमबकयुद्ध.

धर्मराज म्हणाला:—ब्राह्मणाची दया येऊन बुद्धिपुरःसर जें हें कृत्य तूं करण्याचें योजिलें आहेस, तें योग्य आहे; आणि भीमसेनही त्या नरभक्षक राक्षसाचा वध करील यांत शंका नाहीं. पण या गोष्टीचा गांवांत बोभाटा होऊं नये अशाबद्दल खबरदारी घेण्याविषयीं त्या ब्राह्मणास नीट समजावून सांग, आणि मग काय करावयाचें तें कर.

वैशंपायन सांगतात:—जनमेजया, नंतर कुंतीनें त्याप्रमाणें ब्राह्मणास सांगितलें, व त्यानेंही तें कबूल

केलें. पुढें दुसरे दिवशीं उजाडल्याबरोबर अन्न घेऊन भीमसेन त्या नरभक्षक राक्षसाकडे गेला; आणि 'ए बकासुरा ! हें अन्न घे ' असें त्यानें त्यास हांक मारून सांगून आपणच तें अन्न खाऊं लागला. राजा, राक्षसाला भीमाचें हें उद्धट वर्तन अर्थातच खपलें नाहीं ! तो अतिशय क्रुद्ध झाला, आणि जेथें भीम उभा राहिला होता तेथे आला. त्या राक्षसाचें शरीर धिप्पाड असून त्याचा वेगही फार मोठा होता; त्यामुळें, तो चालूं लागला म्हणजे पृथ्वी दुभंगून जात आहे कीं काय असें वाटे ! त्याचे दांत बाहेर आलेले असून नेत्र आरक्त होते. त्याच्या मिशा आणि मस्तकावरील केश रक्तानें लडबडलेले असल्यामुळे लाल दिसत होते. त्याचें तोंड फारच मोठें असून कान शंकूच्या आकाराचे होते; आणि दिसण्यांत तर तो फारच अक्राळविक्राळ होता.

असो; राजा, आपल्याकरितां आणलेलें अन्न भमिसेन खात आहे हें पाहून तो अतिशयच चिडला. त्यानें दांतओठ चावून व भिंवया चढवून त्याच्यावर डोळे वटारले आणि तो म्हणाला, " अरे ! तूं प्रत्यक्ष यमाच्या घरीं जाण्याकरितां आलेला असून माझ्यासाठीं आणलेलें हें अन्न खात आहेस काय ? " हे भरतवंशजा जनमेजया, त्या राक्षसाचें हें भाषण ऐकून भीमसेनानें हसल्यासारखें करून आपलें तोंड फिरविलें, आणि राक्षसास न जुमानतां त्यानें अन्नभक्षण करण्याचें काम पुन: चालू केलें. त्यामुळें तर तो राक्षस फारच संतापला, आणि भयंकर गर्जना करून व हात उगारून तो भीमसेनाच्या अंगावर धावून आला. पण शत्रुविध्वंसक पांडुपुत्र भीमसेनाच्या मनावर त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं ! तो राक्षसाकडे उघडपणें पहात पहातच निर्धास्तपणें अन्न खाऊं लागला. तेव्हां त्या राक्षसानें मोठ्या त्वेषानें भीमसेनाच्या पाठीवर हस्तप्रहार करण्यास सुरवात केली. मग तर भीमानें त्याच्याकडे ढुंकूनही न पाहतां अन्न खाण्याचा सपाटा जास्तच चालविला ! तेव्हां तर त्या राक्षसाचा क्रोध गगनांत माईना. त्यानें तेथील एक वृक्ष उपटला, आणि भीमसेनास मारण्याकरितां तो घेऊन त्याच्या अंगावर तो धावून आला. इतक्या अवधींत तें सर्व अन्न खाऊन टाकून हात वगैरे धुऊन भीमसेन युद्ध करण्यास तयार झालेलाच होता! नंतर, राजा, त्या क्रुद्ध झालेल्या राक्षसानें उपटून आणलेला तो प्रचंड वृक्ष भीमसेनाच्या अंगावर फेकला; पण त्या महापराक्रमी भीमसेनानें सहज हसत हसतच तो डाव्या हातांत धरून तोच उलट त्या राक्षसाच्या अंगावर भिरकावून दिला ! याप्रमाणें आरंभ झाल्यावर ते दोघे वीर वृक्षांनींच एकमेकांस झोडूं लागले. यामुळें तेथील बहुतेक वृक्षांचा नाश झाला. अशा प्रकारचें तें मनुष्य आणि राक्षस यांमधील युद्ध फार भयंकर झालें. पुढें त्या महाराक्षसानें वृक्षयुद्ध सोडून देऊन आपल्या विशाल बाहूंनीं भीमसेनास मिठी घातली, त्याबरोबर भीमसेनानेंही त्यास उलट मिठी घालून करकचून आवळून धरिलें. तेव्हां तो तडफड करूं लागला. याप्रमाणें त्या दोघां बलाढ्य वीरांचें मल्लयुद्ध बराच वेळ चाललें असतां त्या झटापटींत कित्येक मोठमोठ्या वृक्षांचाही चुराडा झाला ! शेवटीं राक्षस अगदीं थकून गेला असें पाहतांच भीमसेनानें त्याला पालथा घातला, आणि त्याजवर भयंकर प्रहार करण्यास आरंभ केला. नंतर त्यानें आपला गुडघा त्याच्या पाठीवर जोरानें ठेवून उजव्या हातानें त्याची मान दाबून धरली, व डाव्या हातानें त्याच्या कमरेचें वस्त्र धरून त्याच्या जगड्व्याळ शरिराची त्याच्या पाठीकडून घडी केली ! तेव्हां तो राक्षस फारच ओरडूं लागला; आणि याप्रमाणें भीमसेन त्याचें शरीर भग्न करूं लागला असतां त्याच्या तोंडांतून रक्ताच्या गुळण्या येऊं लागल्या !

अध्याय एकशें चौसष्टावा.

—:०:—

बकवध आणि तन्निमित्त ब्रह्मोत्सव.

वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें महापराक्रमी भीमानें त्या भयकर नरभक्षक बकासुराची उलटी घडी केली असतां त्याचें शरीर मोडून गेलें; व त्यानें एकवेळ शेवटची भयंकर आरोळी ठोकली आणि तो गतप्राण झाला! ही त्याची शेवटची आरोळी इतकी मोठी होती कीं, तिचा ध्वनि तेथून बऱ्याच अंतरावर असलेल्या त्याच्या कुटुंबांतील माणसांच्या कानावर गेला. तो ऐकतांच त्याच्या घरांतील सर्व राक्षसमंडळी भयभीत झाली व त्यांचें देहभान नाहींसें झालें. ते सर्व बेफाम होऊन युद्धभूमीपाशीं आले, आणि बकासुर गतप्राण झालेला पाहून मोठमोठ्यानें आक्रोश करूं लागले. तेव्हां भीमसेनानें त्यांचें सांत्वन केलें, आणि 'यापुढें तुम्हीं कधीं मनुष्यांचा वध करूं नये' अशी त्यांना ताकीद दिली; व 'जर कराल तर ह्या तुमच्या बक राक्षसाप्रमाणेंच तुमचीही स्थिति होईल' अशी त्यांस जरब दिली. जनमेजया, त्या महाबलाढ्य बक राक्षसाची ही अशी स्थिति झालेली पाहून ते सर्व राक्षस निमूटपणें भीमसेनाच्या म्हणण्यास कबूल झाले; व 'यापुढें जर आम्हीं मनुष्यांचा वध केला, तर आम्हांला तूं असेंच शासन कर,' असें ते म्हणाले. राजा, तेव्हांपासून ते सर्व राक्षस एकचक्रा नगरींतील लोकांसही अगदीं दीनांप्रमाणें दिसूं लागले.

असो. पुढें भीमसेनानें बकासुराचें प्रेत ओढून आणून त्या नगराच्या वेशींत टाकून दिलें; आणि मुकाट्यानें घरीं येऊन झालेली सर्व हकीकत धर्मराजास सांगितली. इकडे भीमसेनाच्या पराक्रमानें दराडून गेलेले इतर राक्षसही आपलें स्थळ सोडून देऊन वाटेल तिकडे निघून गेले!

दुसरे दिवशीं सकाळीं त्या नगरांतील लोक कामधामाकरितां गांवाबाहेर जाऊं लागले व बाहेरचे आंत येऊं लागले, तेव्हां पर्वताप्रमाणें दिसणारा तो भयंकर बक राक्षस वेशींत मरून पडलेला आहे असें त्यांच्या दृष्टीस पडलें. त्याचें सर्व शरीर रक्तबंबाळ झालेलें असल्यामुळें तें पाहून त्यांच्या अंगावर थरारून कांटा आला. नंतर नगरांत येऊन त्यांनीं तें वर्तमान लोकांस सांगितलें. तें ऐकतांच हजारों नगरवासी जन बायकांमुलांसह, त्या मरून पडलेल्या बकासुरास पहाण्याकरितां आले. तो अलौकिक प्रकार पाहून सर्वांना परमावधीचें आश्चर्य वाटलें, आणि त्यांना आनंदाचें भरतें आलें. हें सर्वांवरचें अरिष्ट कायमचें टळलें म्हणून त्या नगरांतील आबालवृद्धांनीं अनन्यभावें परमेश्वराची प्रार्थना केली; व नगरदेवतांचें पूजन करून उत्सव केला. नंतर, आज कोणाची पाळी होती याची त्यांनीं चौकशी केली, व ती अमुक ब्राह्मणाची होती असें समजल्यावर पुष्कळजण त्याच्या घरीं गेले; आणि त्यांनीं त्यास त्या राक्षसाच्या मृत्यूविषयींची हकीकत विचारिली. परंतु या गोष्टीची खरी हकीकत बाहेर कोठेंही फोडणार नाहीं असें कुंतीपाशीं त्या ब्राह्मणानें कबूल केलें असल्यामुळें त्याला खरा प्रकार सांगतां येईना. तेव्हां लोकांचें कांहीं तरी समाधान केलें पाहिजे म्हणून त्यानें कांहीं मनःकल्पित रचना करून त्यांस सांगितलें कीं, 'बक राक्षसाकडे भोजन नेण्याविषयीं मला आज्ञा होतांच मी आणि माझ्या घरांतील सर्व मंडळी रडूं लागली, तें एका मंत्रसिद्धि असणाऱ्या उदार मनाच्या ब्राह्मणानें पाहिलें. तेव्हां तो आमच्याकडे आला, व त्यानें रडण्याचें कारण आम्हांस विचारिलें. त्यावरून आम्हीं सर्व वृत्तांत त्यास निवेदन केला. तेव्हां त्याला आमची व या नगरांतील सर्व लोकांची दया येऊन तो हसत हसतच मला म्हणाला, "कांहीं चिंता नाहीं, उद्यां त्या दुष्टाकडे मीच अन्न घेऊन जातों. माझ्यासंबंधानें तुम्ही मुळींच



बकवध

भीति धरूं नका, व काळजीही करूं नका." नंतर तो अन्न घेऊन बकवनाकडे गेला. मला वाटतें, त्यानेंच हें कृत्य करून सर्व लोकांवर हा उपकार केला असावा !

जनमेजया, ब्राह्मणाचें हें भाषण ऐकून तेथें जमलेल्या सर्व लोकांस अत्यंत आश्चर्य वाटलें, व ते आपल्या घरोघर निघून गेले. पुढें त्या नगरींतील सर्व लोकांनीं एक मोठा ब्रह्मोत्सव[1] केला. तो उत्सव पहाण्यासाठीं त्या देशांतील असंख्य लोक आले होते, आणि पांडवही त्या वेळीं तेथेंच होते !

---

१ ब्राह्मणानें राक्षसाचा वध केला असतां ब्राह्मणांच्या संतोषार्थ उत्सव करीत असतात, त्यास ब्रह्मोत्सव असें म्हणतात.

चैत्ररथपर्व

अध्याय एकशें पासष्टावा.

—:०:—

धृष्टद्युम्न व द्रौपदी यांच्या वृत्तांताचा उपक्रम.

जनमेजय विचारतोः—हे ब्रह्मनिष्ठ, बकासुराचा वध केल्यानंतर त्या पुरुषश्रेष्ठ पांडवांनीं पुढें काय केलें?

वैशंपायन सांगतातः—हे कुरुकुलावतंसा, त्या दुष्ट बकासुरास मारल्यानंतर, सर्व पांडव उपनिषदांचें अध्ययन करीत त्या ब्राह्मणाच्याच घरीं राहिले. ते तेथेंच असतांना एके दिवशीं एक नियमनिष्ठ व विद्वान ब्राह्मण वस्तीला जागा मागण्यासाठीं त्या ब्राह्मणाच्या घरीं आला. अतिथींचा सत्कार करण्याविषयीं तो ब्राह्मण नेहमींच तत्पर असे. त्यानें त्याचें उत्तम प्रकारें स्वागत करून त्याला रहावयास जागा दिली. तो ब्राह्मण गोष्टी फार चांगल्या सांगत असे. त्यानें रात्रीं गोष्ट सांगण्यास प्रारंभ केला असतां सर्व पांडव आणि कुंती त्याच्या जवळ जाऊन बसली. त्या ब्राह्मणानें अनेक देश, तीर्थें, नद्या, राजे, अद्भुत असणारे प्रदेश व नगरें यांसंबंधाची माहिती सांगितली;व शेवटीं, पांचाल देशांत द्रौपदीचें स्वयंवर होणार असून त्याचें स्वरूप आश्चर्यकारक आहे असें सांगितलें. त्याचप्रमाणें, धृष्टद्युम्न आणि शिखंडी यांच्या उत्पत्तीचा वृत्तांत सांगून द्रुपद राजानें केलेल्या महायज्ञांत द्रौपदीची अयोनिज उत्पत्ति झाली असेंही त्यानें सांगितलें. तेव्हां ह्या लोकांत अशी आश्चर्यकारक गोष्ट झाल्याचें ऐकून पांडवांनीं त्या ब्राह्मणास प्रश्न केला.

पांडव म्हणालेः—महाराज, द्रुपदपुत्र धृष्टद्युम्न याची अग्नीपासून व द्रौपदीची यज्ञवेदींतून उत्पत्ति कशी झाली? त्याचप्रमाणें, महाधनुर्धर द्रोणाचार्य यांजकडून तो धृष्टद्युम्न अस्त्रविद्या कशी शिकला? आणि द्रुपद व द्रोणाचार्य हे उभयतां मित्र असतां त्यांच्यामध्यें वितुष्ट कसें व कोणत्या कारणानें आलें? ब्रह्मन्, आपण हें सर्व वृत्त कृपा करून आम्हांस सांगा, आम्हांला तें ऐकण्याची फार इच्छा आहे.

वैशंपायन सांगतातः—राजा, ह्याप्रमाणें पांडवांनीं विचारल्यावर ब्राह्मणानें त्यांस तो सर्व वृत्तांत आणि द्रौपदीची उत्पत्ति हीं निवेदन केलीं.

अध्याय एकशें सहासष्टावा.

—:०:—

द्रोणद्रुपदोत्पत्तिकथन.

ब्राह्मण म्हणालाः—पूर्वी गंगाद्वारीं भरद्वाज नांवाचा एक महातपस्वी ऋषि होता. तो मोठा ज्ञानी असून त्याचे नियम फार प्रशंसनीय असत. एके वेळीं तो गंगेवर स्नानाकरितां जात असतां, पूर्वींच येऊन स्नान केलेली घृताची नामक अप्सरा त्याच्या दृष्टीस पडली. त्या वेळीं त्या नदीतीरावर वारा अतिशय सुटला असल्यामुळें तिचें वाळत घातलेलें वस्त्र वाऱ्यानें उडवून दिलें होतें. ह्याप्रमाणें वायूनें वस्त्र हरण केलेल्या त्या अप्सरेस अवलोकन करतांच त्या ऋषीच्या अंतःकरणांत तिच्याविषयीं इच्छा उत्पन्न झाली. यामुळें त्या बालब्रह्मचारी ऋषीचें रेतस्खलन झालें. तें रेत त्यानें द्रोणकलश नामक यज्ञपात्रांत ठेविलें. त्याजपासून त्या ज्ञानसंपन्न मुनीला द्रोण नामक पुत्र झाला. पुढें त्या पुत्रानें सर्व वेद व वेदांगें यांचें अध्ययन केलें.

इकडे भरद्वाज मुनीचा पृषत् नांवाचा एक क्षत्रिय मित्र होता. त्यालाही ह्याच वेळीं द्रुपद नांवाचा एक पुत्र झाला. तो भावी क्षत्रियश्रेष्ठ पृषत्पुत्र द्रुपद हा नेहमीं भरद्वाज मुनीच्या आश्रमांत

जाऊन द्रोणाबरोबर खेळत असे, व अध्ययनही करीत असे. पुढें पृषत परलोकवासी झाल्यानंतर तो द्रुपद राजा झाला.

द्रोणांस अस्त्रप्राप्ति.

असो; नंतर एकदा, परशुराम आपलें सर्वस्व ब्राह्मणांस दान देत आहे, असें द्रोणानें ऐकिलें. तेव्हां तो वनांत चाललेल्या परशुरामाकडे गेला, आणि त्याला म्हणाला कीं, "हे द्विजश्रेष्ठ, मी द्रोण आपणाकडे आलों असून मला द्रव्याची इच्छा आहे."

परशुराम म्हणाला:—ब्राह्मणा! आतां फक्त माझें शरीर मात्र अवशिष्ट राहिलें आहे. तेव्हां तें अथवा अस्त्रें ह्या दोहोंपैकीं तुला जें हवें तें मागून घे.

द्रोण म्हणाला:—महाराज, तर मग आपण मला अस्त्रें द्या; आणि त्यांचे प्रयोग, संहार वगैरे सर्व माहिती सांगा.

गोष्टी सांगणारा ब्राह्मण म्हणाला:—असें ह्याचें भाषण ऐकून परशुरामानें, "ठीक आहे" असें म्हटलें, व त्यास अस्त्रविद्या अर्पण केली. तेव्हां द्रोणानें तिचा अंगीकार करून तो कृतकृत्य झाला. ह्याप्रमाणें परशुरामापासून ब्रह्मास्त्र प्राप्त झाल्यामुळें द्रोणाच्या अंतःकरणास अत्यानंद झाला, व ह्याच अस्त्रविद्येमुळें पुढें तो सर्व मनुष्यांमध्यें श्रेष्ठ झाला. नंतर तो पुरुषश्रेष्ठ पराक्रमी भरद्वाजपुत्र द्रोण द्रुपदाकडे आला, व "मी तुझा मित्र द्रोण आलों आहें." असें त्यानें त्याला कळविलें.

द्रोणांचा अपमान.

द्रुपद म्हणाला:—जो वेदज्ञ नसेल तो वेदज्ञाचा, सारथि नसेल तो सारथ्याचा, आणि राजा नसेल तो राजाचा मित्र होत नसतो. आतां कदाचित् तूं माझ्या बाळपणचा मित्र असशील; पण प्रस्तुत मी राजा झालों आहें, तेव्हां त्या कृ- ज्ञानपणच्या मित्रत्वाचा आतां कांहीं उपयोग नाहीं.

द्रुपदाचा सूड घेण्याची तयारी.

ब्राह्मण पुढें म्हणाला:—ह्याप्रमाणें द्रुपदाचें भाषण ऐकून द्रोणास अतिशय राग आला. तेव्हां त्या त्याच्या भाषणाबद्दल. त्यानें त्याचा सूड घेण्याविषयीं निश्चय केला; आणि तेथून निघून तो कौरवांकडे हस्तिनापुरास गेला. तेथें ही बातमी गंगापुत्र भीष्मांस कळली, तेव्हां त्यांनी द्रोणाचा उत्तम प्रकारें सत्कार करून त्यास विपुल द्रव्य दिलें, आणि आपले नातू शिष्य म्हणून त्याच्या हवालीं केले. द्रोणाच्या मनांत द्रुपदाचा सूड घेण्याविषयींची गोष्ट होतीच; ह्यामुळें त्यानें- ही ती गोष्ट कबूल केली. पुढें एके वेळीं द्रोणांनीं आपल्या दुर्योधनादि सर्व शिष्यांस पुढें बोलाविलें, आणि त्यांपैकीं पांडवांस उद्देशून तो त्यांना म्हणाला, "हे निष्पापहो! तुम्ही कृतार्थ झाल्यावर मी तुमच्यापाशीं जी गुरुदक्षिणा मागेन, ती तुम्हांस दिली पाहिजे. हें तुम्हांस कबूल आहे का?" तेव्हां अर्जुनादि पांडवांनी त्यास 'ठीक आहे' असें उत्तर दिलें.

पांडवहस्तें द्रुपदाचा पराजय.

ह्याप्रमाणें पांडवांनीं उत्तर दिल्यावर, पुढें जेव्हां ते अस्त्रविद्येंत निपुण झाले, तेव्हां गुरुदक्षिणेबद्दल द्रोणानें पांडवांपाशीं गोष्ट काढिली तो म्हणाला: "पांडवहो, पृषत्पुत्र द्रुपद हा छत्रवती नगरींत राज्य करीत आहे. तें त्याचें राज्य त्याजकडून घेऊन तें गुरुदक्षिणा म्हणून मला अर्पण करा." ह्याप्रमाणें द्रोणानें सांगितलें असतां त्या महापराक्रमी पांडवांनीं तात्काळ युद्धांत द्रुपदाचा पराजय केला; आणि त्याला व त्याच्या सचिवांनाही बांधून आणून द्रोणापुढें उभें केलें.

द्रोणाचार्य म्हणाले:—हे नृपनाथा द्रुपदा, पुनः सुद्धां मी तुझ्याशीं सख्य करण्याचीच इच्छा करीत आहें. पण, जो राजा नसतो तो राजाचा मित्र होण्यास योग्य नसतो; म्हणूनच मी तुझ्याबरोबर युद्ध करून राज्य घेण्याचा प्रयत्न केला.

आतां तूं भागीरथीच्या दक्षिणतीरावरील देशाचा राजा, आणि मी तिच्या उत्तरतीरावरील देशाचा राजा आहें. तेव्हां आतां आपली मैत्री होण्यास कांहीं हरकत नाहीं.

गोष्टी सांगणारा ब्राह्मण म्हणालाः—ह्याप्रमाणें त्या ज्ञानसंपन्न द्रोणाचें भाषण ऐकून द्रुपद त्यास म्हणाला, "हे महाज्ञानी भरद्वाजपुत्र! आपल्या इच्छेप्रमाणेंच आपलें व माझें सख्य निरंतर होऊं द्या. आपलें कल्याण असो." ह्याप्रमाणें भाषण व सख्य करून ते दोघेही निघून गेले. परंतु तेथें जो द्रुपद राजाचा अपमान झाला, तो त्याच्या अंतःकरणांतून क्षणभर सुद्धां नाहींसा होईना. त्या दुःखानें तो एकसारखा कृश होत चालला!

अध्याय एकशें सदुसष्टावा.

—:०:—

द्रोणाचा सूड घेण्याची तयारी.

गोष्टी सांगणारा ब्राह्मण म्हणालाः—द्रुपद राजा मोठा खुनशी स्वभावाचा होता. द्रोणाचा सूड घेण्यासारखा आपणास एखादा पुत्र व्हावा असें त्याला वाटलें. म्हणून, कर्मसिद्धि असणारा एखादा ब्राह्मण गांठावा या उद्देशानें तो पुष्कळ ब्राह्मणांचीं घरें फिरला. आपल्या पुत्रांपैकीं एकही पुत्र द्रोणाचा सूड घेण्याच्या योग्यतेचा नाहीं म्हणून तो निरंतर दुःख करीत असे. पूर्वी झालेल्या पुत्रांना उद्देशून "धिक्कार असो या सर्व बंधूंना" असें तो नेहमीं म्हणे; व द्रोणाचा प्रतिकार करण्याची इच्छा असून ती पूर्ण न झाल्यामुळें तो वारंवार दुःखाचे सुस्कारे टाकी. द्रोणाचा प्रभाव, विनय आणि शिक्षण ह्यांची बरोबरी करणारा असा क्षत्रियांमध्यें एकही नाहीं हें त्याला पूर्णपणें कळून चुकलें होतें. राजा जनमेजया, तो नृपश्रेष्ठ द्रुपद कर्मसिद्धि असणाऱ्या ब्राह्मणाचा शोध करीत करीत, ज्या ठिकाणीं यमुनेच्या अगदीं जवळ भागीरथीचें तट आहे, तेथें असलेल्या एका ब्राह्मणांच्या वसतींत आला. त्या स्थळीं, समावर्तन न झालेला अथवा ज्याला ब्रह्मचर्यादि कोणतेंही व्रत नाहीं असा कोणीही ब्राह्मण नव्हता. सारांश, अनाश्रमी असा पुरुष तेथें कोणीही नव्हता. त्या ठिकाणीं शांतीचें अवलंबन करून प्रखर तपश्चर्या करणारे असे दोन ब्रह्मनिष्ठ ब्रह्मर्षि त्याच्या दृष्टीस पडले. त्यांचीं याज व उपयाज अशीं नांवें होतीं. ते संहितेच्या अध्ययनांत गढून गेलेले होते. ते ऋषिश्रेष्ठ मोठे सूर्यभक्त असून ब्रह्मवेत्ते होते. त्यांचें गोत्र काश्यप होतें. द्रुपद राजानें त्या दोघां ब्राह्मणांच्या सामर्थ्याविषयीं तेथें शोध केला; व तें कळून आल्यानंतर, त्यांस सर्व प्रकारच्या अभीष्ट वस्तु देण्याचा हेतु दर्शवून राजानें त्यांना बोलावून आणिलें; व त्यांपैकीं व्रत धारण करणारा जो धाकटा उपयाज, त्याचें पादसेवन व पूजन करून त्याला एकांतांत तो शरण गेला. राजा त्यास म्हणालाः—मुनिवर्य, आपले सर्व मनोरथ मी पूर्ण करीन; परंतु ज्या योगानें द्रोणाच्या मरणास कारणीभूत असा पुत्र मला होईल, असें अनुष्ठान आपण करा. याबद्दल मी आपणांस दहा कोट गाई अथवा जें काय आपल्या इच्छेस येईल तें देईन!

ह्याप्रमाणें द्रुपद राजानें अनेक प्रकारें सांगितलें, तरी याज मुनीनें त्याला साफ सांगितलें कीं, तूं म्हणतोस तसें मी कांहींएक करणार नाहीं. तेव्हां द्रुपद राजा त्याची सेवा करीत तसाच तेथें राहिला. यास एक वर्ष लोटून गेल्यावर एके वेळीं ब्राह्मणश्रेष्ठ उपयाज मुनि द्रुपदाला म्हणाले, "राजा, माझा वडील बंधु वनांत फिरत असतां त्यानें एके ठिकाणीं भूमीवर पडलेलें एक फळ घेतलें; परंतु तें घेतेवेळीं, ती जमीन शुद्ध आहे किंवा नाहीं ह्याचा त्यानें मुळींच विचार केला नाहीं. त्या वेळीं मी बंधूच्या मागूनच चाललों असल्यामुळें

तें त्याचें अयोग्य कृत्य माझ्या नजरेस पडलें. त्यावरून माझ्या मनाची खातरी झाली कीं, हा एखादी दोषयुक्त वस्तु हातीं आली असतां ती घेण्यासही कदाचित् मागेंपुढें पाहणार नाहीं. कारण, फळ दृष्टीस पडल्याबरोबर त्यानें तें लागलेंच उचलिलें. जो अशा क्षुल्लक प्राप्तीकरितांही पवित्रापवित्रतेचा विचार करीत नाहीं, तो दुसऱ्या गोष्टींत कशाचा करणार? गुरुगृहीं असतांना सुद्धां तो दुसऱ्याची उष्टी राहिलेली भिक्षा निर्लज्जपणें गोड गोड म्हणून नेहमीं खात असे. तेव्हां यावरून त्याला प्राप्तीची इच्छा असेल असें मला वाटतें. तर, राजा, तूं त्याच्याकडे जा, म्हणजे तो तुजकडून यज्ञ करवील."

ह्याप्रमाणें उपयाजाचें भाषण ऐकून, याज ऋषीच्या आचरणाविषयीं द्रुपदाच्या मनांत किल्मिष उत्पन्न झालें. परंतु कार्याकडे दृष्टि देऊन त्यानें त्या गोष्टीचा विचार केला नाहीं. तो याज ऋषीकडे गेला, आणि त्याची पूजा वगैरे करून, आपली इच्छा त्यानें त्यास कळविली.

द्रुपद म्हणाला:—हे प्रभो! माझी एक आपणांस प्रार्थना आहे, ती आपण मान्य करावी. महाराज! द्रोण या नांवाचा एक ब्राह्मण उत्तम वेदज्ञ असून अस्त्रविद्येमध्येंही निपुण आहे. शिवाय, सर्व अस्त्रांमध्यें जें श्रेष्ठ असें ब्रह्मास्त्र, त्याचेंही त्याला उत्तम ज्ञान आहे. त्याच्या तोडीचा योद्धा ह्या पृथ्वीवरील राजांमध्यें एकही नाहीं. त्यानें माझें मित्रत्व संपादण्याच्या हेतूनें आपल्या शिष्याकडून मजपाशीं युद्ध करविलें; आणि त्यांत माझा पराजय करून माझा अपमान केला. त्यामुळें मला अतिशय दुःख झालेलें आहे. तो कौरवांच्या गुरूंमध्यें श्रेष्ठ असून त्याच्या बाणांच्या तडाख्यापुढें कोणाचाही प्राण वांचण्याची आशा नाहीं. त्याचें धनुष्य जरी सहाच हात लांबीचें आहे, तरी त्याच्या पराक्रमामुळें तें फार मोठें दिसतें. तो महात्मा धनुर्धर द्रोण वेषानें जरी ब्राह्मण आहे, तरी मोठमोठ्या पराक्रमी क्षत्रियांचीही रग जिरविण्याचें त्याच्या अंगांत सामर्थ्य आहे. क्षत्रियांचा उच्छेद करण्याविषयीं उद्युक्त असणारा हा दुसरा परशुरामच परमेश्वरानें उत्पन्न केला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण, ह्याच्या अस्त्रांचें भयंकर सामर्थ्य कुंठित करणारा असा एकही मनुष्य ह्या पृथ्वीवर नाहीं. त्याच्या अंगीं ब्रह्मतेज असल्यामुळें, तो समरांगणांत आला असतां, आहुति घेणाऱ्या अग्नीप्रमाणें जाज्वल्य दिसतो; आणि त्या वेळीं त्याचा क्षत्रियधर्म पुढें सरसावतो. यामुळें तो शत्रूंस जाळून भस्म करून टाकतो. याज मुने! ब्राह्म आणि क्षात्र हीं दोन्ही तेजें जरी आहेत, तरी त्यांत ब्राह्मतेजाचा प्रभाव कांहीं विशेष आहे. माझ्या अंगीं नुसतें क्षात्रबलच असल्यामुळें द्रोणापेक्षां मी कमी योग्यतेचा आहें. म्हणून मी आज ह्या पायांच्या मूर्तिमंत ब्रह्मतेजास शरण आलों आहें. आपण द्रोणाहूनही श्रेष्ठ ब्रह्मज्ञानी असून मला आपला लाभ झाला आहे; ह्यासाठीं, द्रोणानें माझा जो अपमान केला आहे, त्याचा सूड उगविण्याकरितां, त्याचा वध करणारा पुत्र मला होईल असा यज्ञ मजकडून करवा. आपण हें कार्य करून माझ्या मनाला आनंद देण्यास खरोखर योग्य आहां. ह्याकरितां मी प्रथमच भेट म्हणून ऐशीं हजार गाई आपणांस देतों; आणि पुढें दहा कोटि गाई देईन!

गोष्टी सांगणारा ब्राह्मण म्हणाला:—हें राजाचें भाषण ऐकून याज मुनीनें त्यास बरें आहे म्हणून सांगितलें; आणि याचे मनोरथ पूर्ण होण्यासारखा कोणता याग आहे याविषयीं तो विचार करूं लागला. तेव्हां त्याच्या असें लक्षांत आलें कीं, तो प्रयोग फारच मोठा आहे, व या कामीं दुसऱ्याचें साहाय्य पाहिजे. म्हणून त्यानें, लाभाची आशा मुळींच न करणाऱ्या आपल्या बंधूचीच त्या कामीं योजना केली.

सारांश, ह्याप्रमाणें, द्रोणाचा नाश करण्यास कारणीभूत होणारा पुत्र व्हावा अशा प्रकारचा यज्ञ करण्याचें याजानें द्रुपदाजवळ कबूल केलें. नंतर महातपस्वी उपयाज मुनीनें तें यज्ञकर्म कसें करावयाचें तें द्रुपदास सांगितलें; व तो त्यास म्हणाला, "ह्या यज्ञाच्या योगानें तुझ्या इच्छेनुरूप महाशूर, महापराक्रमी आणि महाबलवान असा तुला पुत्र होईल." नंतर, कर्माच्या फलाची सिद्धि व्हावी म्हणून उपयाज मुनीनें सांगितल्याप्रमाणें द्रुपद राजानें यथासांग यज्ञकर्म केलें. हवनाच्या शेवटीं याजानें राणीस हांक मारून म्हटलें, "हे पृषत्स्नुषे! लवकर इकडे ये. तुजकरितां एक स्त्रीपुरुषांची जोडी प्राप्त झाली आहे."

राणी म्हणाली:—ब्रह्मनिष्ठ मुने, मी अजून पारोशी आहे. मीं तोंडही धुतलें नसून माझ्या अंगावरील दिव्य अनुलेपनेंही तशींच आहेत. यामुळें सान्निध येण्यास मी योग्य नाहीं. तेव्हां थोडा दम धरा.

याज म्हणाला:—हे राजस्त्रिये, हें होमद्रव्य मीं स्वतः शिजवून तयार केलेलें असून उपयाजानें अभिमंत्रण केलेलें आहे. तर तूं आलीस किंवा न आलीस तरी तें इष्ट कार्य तडीस नेल्यावांचून कधींही राहणार नाहीं.

धृष्टद्युम्न व द्रौपदी ह्यांची उत्पत्ति.

गोष्ट सांगणारा ब्राह्मण म्हणाला:— ह्याप्रमाणें तिच्याशीं बोलून याजानें तें संस्कार केलेलें होमद्रव्य अग्नीस अर्पण केलें. तेव्हां तात्काळ एक देवतुल्य पुत्र वर आला. त्याचा वर्ण अग्नीच्या ज्वालेप्रमाणे असून स्वरूप भयंकर होतें. त्यानें किरीट व उत्कृष्ट प्रकारचें कवच धारण केलेलें असून त्याजपाशीं खड्ग व उत्तम धनुष्य होतें. तो वर आल्याबरोबर गर्जना करीत करीत रथांत बसला व लागलीच जाऊं लागला. तेव्हां पांचाल देशांतील लोक 'वाहवा वाहवा' म्हणून आनंदघोष करूं लागले. त्या त्यांच्या गर्जनेनें पृथ्वी अगदीं दणाणून गेली. त्या वेळीं, "हा राजपुत्र पांचालांच्या भीतीचा नाश करणारा असून कीर्तिमान होईल; व हा द्रोणवधासाठीं जन्मास आला असल्यामुळें तो द्रुपद राजाचा शोक नाहींसा करील!" अशी आकाशवाणी झाली.

ह्याच वेळीं यज्ञवेदीच्या मध्यभागातून कुमारी द्रौपदी ही वर आली. ही अत्यंत सुंदर असून हिचा प्रत्येक अवयव प्रेक्षणीय होता. तिचे नेत्र कमलपत्राप्रमाणें असून विशाल व कृष्णवर्ण होते. तिच्या शरिराचा वर्ण सांवळा होता. तिचे केश नीलवर्ण असून कुरळ, नखें उन्नत असून आरक्त, भिवया सुरेख आणि स्तन मोठे असून मनोहर होते. ही साक्षात् देवकुमारिकाच मनुष्याचा वेष घेऊन आली होती असें म्हटलें तरी चालेल. हिच्या अंगास नीलकमलांप्रमाणें सुवास येत असून त्याचा घमघमाट एक कोसपर्यंत सुटत होता. जिच्या स्वरूपास पृथ्वीवर दुसरी उपमाच नाहीं, अशी ही देव, दैत्य, यक्ष इत्यादिकांस इष्ट असलेली कुमारिका निर्माण होतांच आकाशवाणी झाली कीं, "ही वरारोहा कृष्णा सर्व स्त्रियांमध्यें श्रेष्ठ असून क्षत्रियांचा संहार करण्याच्या इच्छेनें अवतीर्ण झाली आहे. ही योग्य वेळीं देवांचें कार्य करील व हिच्याचमुळें कौरवांस मोठी भीति उत्पन्न होईल!" हें ऐकून सर्व पांचालदेशीय लोकांनीं सिंहसमूहाप्रमाणें मोठी गर्जना केली. त्या वेळीं त्यांचा तो आनंद त्रिभुवनांतही माईना. असो; त्या कुमारास व कुमारिकेस पाहतांच पुत्राची इच्छा असणारी द्रुपदाचा राणी याजास शरण गेली, व ह्या उभयतांस मजवांचून दुसरी माता माहीत नसावी असें ती त्याला म्हणाली. तेव्हां राजाचें इष्ट कार्य करण्यासाठीं याजानेंही तिला 'ठीक आहे' असें उत्तर दिलें. नंतर मनोरथ पूर्ण झालेल्या ब्राह्मणांनीं त्या उभयतांचीं नावें ठेविलीं: ते म्हणाले, "अग्नीपासून उत्पन्न झालेला हा द्रुपदाचा कुमार धृष्ट म्हणजे धीट

असून शत्रूंचा उत्कर्ष सहन न करणारा असा आहे; व द्युम्न म्हणजे कवचकुंडलादिरूप संपत्तीनें युक्त आहे, म्हणून याचें नाव धृष्टद्युम्न असो.'' पुढें ते त्या मुलीस 'कृष्णा' असें म्हणाले. कारण, ती कृष्णवर्ण होती. अशा प्रकारें द्रुपदाच्या महायज्ञामध्यें ती स्त्रीपुरुषांची जोडी निर्माण झाली.

पुढें पराक्रमशाली द्रोणाचार्यांनीं द्रुपदपुत्र धृष्टद्युम्न यास आपल्या घरीं आणिलें, व त्यास अस्त्रविद्या शिकविली. हा धृष्टद्युम्न आपला वध करणार हें द्रोणाचार्यांस माहीत नव्हतें असें नाहीं; पण दैवयोगानें जें कांहीं पुढें व्हावयाचें असेल, त्यांतून सुटतां यावयाचें नाहीं असा विचार करून त्या महाज्ञानी द्रोणांनीं आपल्या कीर्तीच्या संरक्षणार्थ त्या मुलावर अशा प्रकारें उपकारच केले !

अध्याय एकशें अडुसष्टावा.

—:०:—

द्रुपदपुरगमनोपक्रम.

वैशंपायन सांगतातः—राजा, त्या ब्राह्मणाचे हे शब्द त्या बलशाली पांडवांच्या हृदयांत तीक्ष्ण शल्याप्रमाणें खोंचले, आणि त्यांच्या अंतःकरणांत अस्वस्थता उत्पन्न झाली. नंतर, त्या सर्वांचें लक्ष द्रौपदीच्या स्वयंवराकडेच लागलें आहे असें पाहून सत्यवादिनी कुंती युधिष्ठिराशीं बोलूं लागली.

कुंती म्हणाली:—धर्मा, आपल्याला आजपर्यंत ह्या नगरांत भिक्षा चांगली मिळत असल्यामुळें आपलें मन येथें रमून आपण ह्या ब्राह्मणाच्या घरीं फार दिवस राहिलों. इतक्या दिवसांत आपण येथील रम्य अरण्यें आणि उपवनेंही पाहिलीं. तेव्हां मला असें वाटतें कीं, आपण आतां पांचाल देशाला जावें. कारण, पूर्वीप्रमाणें आतां येथें भिक्षाही चांगली मिळत नाहीं; आणि ह्या प्रदेशांतील सर्व कांहीं अनेक वेळां पाहिलें असल्यामुळें तेंच तेंच वारंवार पाहण्यानें मनास तितका आनंदही होत नाहीं. माझ्या ऐकण्यांत असें आहे कीं, पांचाल देशांत भिक्षा चांगली मिळत असून त्या देशाचा राजा द्रुपद हा ब्राह्मणांचा मोठा हितकर्ता आहे. तसेंच, तिकडे गेल्यानें नवे नवे प्रदेश पहावयास सांपडतील, आणि त्या योगानें मनास करमणूकही चांगली होईल. शिवाय, फार दिवस एके ठिकाणीं रहाणें हेंही कांहीं आपणास बरें नाहीं. तर तुझ्या विचारास येत असल्यास आपण तिकडे जाऊं.

धर्मराज म्हणाला:—आई, तुझ्या मनांत आलेली गोष्ट आमच्या हिताचीच असून त्या गोष्टीस माझें पूर्ण अनुमोदन आहे. परंतु सर्वांच्या मनास कसें काय येतें तें तूं पहा.

वैशंपायन सांगतातः—राजा, नंतर कुंतीनें ही गोष्ट भीमसेन, अर्जुन, नकुल आणि सहदेव यांजपाशीं काढिली. तेव्हां त्यांनाही तें योग्य वाटून तिच्या विचारास त्यांनीं अनुमोदन दिलें. नंतर राजा, आपल्या पुत्रांसह त्या ब्राह्मणाचा निरोप घेऊन कुंतीनें महात्म्या द्रुपद राजाच्या पांचाल नगरीकडे जाण्याचा बेत केला.

अध्याय एकशें एकुणसत्तरावा.

—:०:—

व्यासकथित द्रौपदीपूर्ववृत्तांत.

वैशंपायन सांगतातः—जनमेजया, ते महात्मे पांडव गुप्त रीतीनें त्या एकचक्रा नगरींत असतां सत्यवतीपुत्र भगवान व्यास त्यांना भेटण्यासाठीं आले. व्यास आले असें पाहतांच ते शत्रुमर्दक पांडव त्यास सामोरे गेले, आणि साष्टांग नमस्कार घालून व हात जोडून त्यांच्यापुढें उभे राहिले. नंतर, आपणांस कोणीही ओळखणार नाहीं अशा प्रकारें त्यांनीं श्रीव्यासांचें पूजन केलें असतां, त्यांस बसावयास सांगून भगवान व्यास प्रेमपूर्वक म्हणाले, "मुलांनो ! तुम्ही धर्म आणि शास्त्र यांस अनुसरून वागत आहांना ? पूज्य अशा

ब्राह्मणांविषयीं तुमच्या ठिकाणची आदरबुद्धि कमी झाली नाहींना ?" राजा, याप्रमाणें प्रश्न केल्यानंतर त्या महात्म्यांनीं धर्म व अर्थ यांनीं युक्त असें भाषण केलें; आणि त्यांस अनेक प्रकारच्या आश्चर्योत्पादक अशा सांगून ते पुन: एक कथा सांगू लागले.

व्यास म्हणाले:—पूर्वी एका तपोवनांत एका महात्म्या ऋषीची एक कन्या होती. तिचें उदर कृश, भृकुटी कमानदार आणि कमर बारीक असून ती सर्व गुणांनीं संपन्न होती. तथापि आपल्या पूर्वकर्मानें ती भाग्यहीन निपजली. ती इतकी रूपसंपन्न होती, तरी तिला पति मिळाला नाहीं. यामुळें तिला अत्यंत दुःख होऊन तिनें पतीसाठीं तप करण्यास आरंभ केला. पुढें तिच्या उग्र तपाच्या योगानें भगवान श्रीशंकर संतुष्ट झाले, आणि तिला म्हणाले, " हे कल्याणी, मी तुला प्रसन्न आहें; काय पाहिजे तो वर मागून घे."

भगवान शंकराचें हें भाषण ऐकून " मला सर्वगुणसंपन्न पति मिळावा " असें ती अनेक वेळां म्हणाली. नंतर, वक्त्यांमध्यें श्रेष्ठ असे श्रीशंकर त्या स्त्रीचें तें बोलणें ऐकून तिला म्हणाले, "हे भद्रे, तुझ्या मागण्याप्रमाणें, भरतवंशोत्पन्न पांच पुरुष तुझे पति होतील !" यावर ती कन्या श्रीशंकरांस म्हणाली, "हे भगवन्, हे प्रभो ! मला आपल्या प्रसादानें एकच पति मिळावा अशी माझी इच्छा आहे." परंतु शंकरांनीं तिला सांगितलें, " तूं 'पति दे' असें पांच वेळां म्हणालीस, त्यावरून, तुझी इच्छा पांच पति मिळावे अशी आहे असें मी समजलों; व त्याप्रमाणें मीं ते तुला दिले. तेव्हां आतां मीं सांगितल्याप्रमाणें तुला जन्मांतरीं पांच पति प्राप्त होतील !

मुलांनो ! ती देवस्वरूपी कन्या आतां द्रुपदाच्या कुलांत उत्पन्न झाली असून ती तुमची पत्नी होणार असा ईश्वरी संकेत आहे. ह्याकरितां तुम्ही आतां द्रुपदाच्या नगरांत जाऊन रहा, म्हणजे ती तुम्हांला प्राप्त होऊन तुम्ही सुखी व्हाल, ह्याविषयीं मुळींच संशय नको.

राजा जनमेजया, ह्याप्रमाणें पांडवांस सांगून ते महाभाग तपोनिष्ठ पितामह व्यास त्यांचा व कुंतीचा निरोप घेऊन निघून गेले.

अध्याय एकशें सत्तरावा.

—:०:—

चित्ररथार्जुनयुद्ध.

वैशंपायन सांगतात:—राजा जनमेजया, भगवान व्यास निघून गेल्यावर, ते संतुष्ट झालेले पांडव आपल्या मातेला पुढें करून, ज्याच्या घरीं राहिले होते त्या ब्राह्मणाकडे गेले, आणि त्याला नमस्कार करून त्याचा निरोप घेतल्यावर आपल्या संकेताप्रमाणें ते उत्तर दिशेकडे निघाले. वाटेनें प्रकाशाकरितां हातांत चूड घेऊन अर्जुन हा सर्वांच्या पुढें चालला होता. याप्रमाणें मार्गक्रमण करीत असतां ते एका अहोरात्रांत गंगातटाकीं असलेल्या सोमाश्रयायण नामक तीर्थावर येऊन पोहोंचले. तेथें एकांतस्थळीं एक गंधर्वराज आपल्या स्त्रियांसह गंगेमध्यें जलक्रीडा करीत होता. तो अतिशय परोत्कर्षासहिष्णु असल्यामुळें पांडवांची चाहूल लागतांच त्याला फार क्रोध आला; आणि ते शत्रुतापन पांडव व त्यांची माता यांस अवलोकन करतांच धनुष्याचा भयंकर टणत्कार करीत करीत तो त्यांना उद्देशून बोलूं लागला.

गंधर्व म्हणाला:—अरे ! रात्रीचा पूर्वार्ध सुरू होण्याच्या वेळीं पश्चिम दिशेस आरक्तवर्ण करून सोडणारा जो संध्याकाळ असतो, त्यांतील ऐशी लव निघून गेले म्हणजे एक प्रस्थानाचा मुहूर्त असतो, तो स्वेच्छाचारी यक्ष, गंधर्व आणि राक्षस ह्यांसच प्रयाण करण्यास विहित आहे. अर्थात् त्या वेळीं यक्ष, गंधर्व आणि राक्षस हे बाहेर पडून रात्रभर स्वैरपणें संचार करीत असतात.

तेव्हां ह्याव चून इतर जो दिवसरूपी काळ, तोच मनुष्यांस कर्में करण्यास वि.हित आहे. असें असतां त्या आमच्या वेळांत जे लोक संचार करतील, त्या मूर्खांस आम्ही आणि राक्षस हे मिळून शिक्षा करितों. म्हणूनच रात्रीं पाण्यावर जाणाऱ्या सर्व लोकांस व बलाढ्य राजांसही वेदवेत्ते लोक दोष देतात. असो. तुम्ही दूर उभे रहा. माझ्या जवळ येऊं नका. अरे ! मी ह्या भागीरथीच्या जलांत आलों आहें हें तुम्हांला कसें समजत नाहीं ? अरे ! स्वतांच्या सामर्थ्याचा अवलंब करून असणारा मी अंगारपर्ण नावाचा गंधर्व आहें. समजलां ? मी मानी, दुसऱ्याचा उत्कर्ष सहन न करणारा आणि कुबेराचा प्रिय मित्र आहें. हें गंगेच्या तटाकावरील सर्व वन माझेंच असून तें अंगारपर्ण ह्याच नांवानें प्रसिद्ध आहे. ह्यामध्यें मी स्वतांच्या इच्छेनें वागून विलक्षण प्रकारें विहार करीत असतों. ह्यामुळें राक्षस, पशु, देव अथवा मनुष्य ह्यांपैकीं कोणीही ह्याच्या जवळ देखील येत नाहींत. मग तुम्ही काय म्हणून त्यांत शिरतां ?

गंधर्वाचें हें भाषण ऐकून अर्जुनानें उत्तर दिलें:--अरे दुर्बुद्धे ! समुद्र, हिमालयाचा पायथा आणि ही भागीरथी नदी ह्यांवर रात्रीं, दिवसा अथवा संध्याकाळीं कोणाचारे हक्क राखून ठेविलेला आहे ? अरे खेचरा ! भोजन झाल्यानंतर अथवा तें होण्यापूर्वी, रात्रीं अथवा दिवसा, वाटेल त्या वेळीं ह्या नदीवर येण्यास प्रत्यवाय नाहीं. कारण ही भागीरथी सर्व नद्यांमध्यें श्रेष्ठ असून तिजवर येण्याचा काल कांहीं नियमित ठरलेला नाहीं. तशांतून आम्ही तर सामर्थ्यवान आहों, आणि म्हणूनच तुला न जुमानतां येथें अवेळीं आलों आहों. अरे क्रूरा, जीं मनुष्यें निर्बल असतात, तींच तुमचा बहुमान ठेवतात. शिवाय, ह्या नदीवर कांहीं तुझा एकट्याचाच हक्क आहे असें नाहीं; कारण, ही भागीरथी नदी हिमालयाच्या सुवर्णमय शृंगापासून निर्माण झाली व नंतर वस्वौकसारा, नलिनी, पावनी, सीता, चक्षु, सिन्धु आणि अलकनंदा ह्या सात रूपांनीं ती समुद्रजलास जाऊन पूर्वीच मिळालेली आहे. ही कोणीं नवीन उत्पन्न केली नसल्यामुळें तिजवर कोणाचाही हक्क असण्याचें कारण नाहीं. तसेंच, इतर नद्यांसारखा अस्पर्शदोषही इच्यांत उत्पन्न होत नाहीं. बरें, कांहीं अपवित्रता वगैरे असेल तर हिजवर येऊं नये असें म्हणावें, तर तसेंही नाहीं. कारण गंगा, यमुना, प्लक्षद्वीपांत उत्पन्न झालेली सरस्वती, रथस्था, सरयू, गोमती आणि गंडकी ह्या सात नद्यांचें जलपान जे लोक करितात, त्यांचें पातक अवशिष्ट राहत नाहीं. शिवाय, ही गंगा कांहीं भूमंडलावरच आहे असें नाहीं. तर ही पवित्र गंगा नदी एकच तीरानें युक्त होऊन आकाशांतून जात असून ती देवलोकांत अलकनंदा हें नांव पावली आहे; तसेंच पितृलोकांत जाऊन ही गंगा पापी लोकांनीं तरून जाण्यास अशक्य अशी वैतरणी नामक नदी झालेली आहे; असें श्रीव्यासांनीं सांगितलें आहे. सारांश, केवळ ह्याच लोकास नव्हे, तर मृत्यूनंतर स्वर्गलोकास अथवा पितृलोकास गेलें तरी तेथेंही पाहिजे त्या वेळीं ह्या नदीवर जातां येईल. एकंदरींत, स्वर्गप्राप्ति करून देणाऱ्या आणि शुभकारक अशा ह्या भागीरथीस कोणत्यांही प्रकारचा प्रतिबंध नाहीं. मग तूंच कसा तिला प्रतिबंध करूं इच्छीत आहेस ? तुझा हा न्याय कांहीं निरंतर टिकणारा नाहीं. ज्यास कोणालाही प्रतिबंध करतां यावयाचा नाहीं, आणि ज्यावर जाण्यास नैमित्तिक असाही कांहीं प्रतिबंध नाहीं, त्या ह्या पवित्र भागीरथीजलास आम्ही तुझ्या सांगण्यावरून काय म्हणून स्पर्श केल्यावांचून राहूं ?

वैशंपायन सांगतातः—अर्जुनाचें हें भाषण ऐकून अंगारपर्णाला फार क्रोध आला; आणि धनुष्याला प्रत्यंचा चढवून तो भयंकर बाण

सोडूं लागला. राजा, ते त्याचे बाण म्हणजे विषारी दाढांचे भयंकर सर्पच की काय, असे होते. पण अर्जुनाच्या हातांत पेटलेली चूड होती तिनें आणि ढालीनें त्या सर्व बाणांचा निरास करून तो म्हणाला, "अरे गंधर्वा, ज्यांना अस्त्रांचें ज्ञान आहे, त्यांजवर हा बुजगावणीचा प्रयोग करणें बरें नव्हे. कारण तो फेसाप्रमाणें नामशेष होऊन जातो. हे गंधर्वा! गंधर्व हे मनुष्यांपेक्षां थोर आहेत असें माझ्या दृष्टीनें वाटतें, तेव्हां मी तुझ्याशीं मायावीपणानें न लढतां दिव्य अशा अस्त्रांनींच युद्ध करितों. तुजवर मी सोडीत आहें हें आग्नेय अस्त्र! हें इंद्राचा सन्माननीय गुरु जो बृहस्पति त्यानें भरद्वाजास दिलें. पुढें तें भरद्वाजापासून अग्निवेशानें व अग्निवेशापासून माझे गुरु द्रोणाचार्य यांनीं संपादन केलें, व पुढें त्या ब्राह्मणश्रेष्ठ द्रोणाचार्यांनीं तें मला दिलें आहे.

वैशंपायन म्हणाले:—याप्रमाणें बोलून क्रुद्ध झालेल्या त्या अर्जुनानें प्रदीप्त असें अग्न्यस्त्र त्या गंधर्वावर सोडलें. त्या अस्त्रानें त्या गंधर्वाचा रथ दग्ध झाला; आणि अस्त्राच्या तेजामुळें तो मूर्छित होऊन तोंडघशीं पडतां पडतां अर्जुनानें त्याचे पुष्पमालायुक्त असलेले केश धरले; व अस्त्रप्रहार झाल्यामुळें निश्चेष्ट झालेल्या त्या गंधर्वास त्यानें आपल्या बंधूंपाशीं ओढून आणिलें. तेव्हां आपल्या पतीचें संरक्षण करूं इच्छिणारी त्या गंधर्वाची कुंभीनसी नांवाची एक स्त्री धर्मराजास शरण आली; आणि त्याची विनवणी करूं लागली.

गंधर्वस्त्री म्हणाली:—हे महाभाग, आपण माझें संरक्षण करा, व ह्या माझ्या पतीस सोडून द्या. प्रभो! मी ह्याची स्त्री असून माझें नांव कुंभीनसी आहे. मी आपणांस शरण आलें आहें.

धर्मराज म्हणाले:—बा अर्जुना, आतां हा युद्धांत पराजित झाला असून कीर्तिशून्य झाला आहे; आणि स्त्रीनेंच ह्याचें रक्षण करावें, असा याजवर प्रसंग आला आहे. तेव्हां आतां याला सोडून दे.

अर्जुन म्हणाला:—हे गंधर्वा, हा कुरुराज युधिष्ठिर तुला अभय देत आहे. तेव्हां आतां तुला जीविताविषयीं संशय नको.

गंधर्व म्हणाला:—ठीक आहे. माझा आपण पराजय केला असल्यामुळें, मी आतां आपलें अंगारपर्ण—ज्याचें पर्ण-वाहन, अंगारा-इंगळाप्रमाणें प्रकाशमान व स्पर्श करण्यास अशक्य आहे असा.—हें नांव सोडून देतों. धर्मराजा! आतां ह्याच्यापुढें मी आपलें नांव आणि सामर्थ्य ह्यासंबंधानें लोकांत प्रतिष्ठा मिरविणार नाहीं. दिव्य अस्त्रें धारण करणाऱ्या अर्जुनास गन्धर्वांच्या मायेची प्राप्ति करून द्यावी अशी माझी इच्छा आहे. तेव्हां मजला हा आपल्या समागमाचा लाभ झाला हें फार चांगलें झालें. खरोखर अर्जुनाचीं अस्त्रें दिव्य आहेत यांत कांहीं शंका नाहीं. कारण, ह्याच्या अस्त्रजन्य अग्नीनें, आश्चर्यचकित करून सोडणारा माझा उत्तम प्रकारचा रथ भस्म करून टाकिला; व त्यामुळें, माझें नांव पूर्वी चित्ररथ (ज्याचा रथ आश्चर्यकारक आहे असा) असतांही, सांप्रत मी दग्धरथ (ज्याचा रथ जळून गेला आहे असा) होऊन बसलों आहें. धर्मराजा! मी जी विद्या आतां अर्जुनास शिकविणार आहें, तीही कांहीं सामान्य नाहीं. ही मीं पूर्वी तपश्चर्या करून संपादन केली आहे. ती मी आज मला प्राणदान करणाऱ्या ह्या महात्म्यास अर्पण करणार. कारण, स्वसामर्थ्यानें पराजित केलेला शत्रु शरण आला असतां, त्यास प्राणदान करणाऱ्या पुरुषास देतां यावयाचें नाहीं असें काय आहे? म्हणून मी अत्यंत महत्त्वाची अशी ही विद्या अर्जुनास अर्पण करितों. ह्या विद्येचें नांव चाक्षुषी असें असून ती पूर्वी मनूनें सोमास अर्पण केली होती; पुढें सोमानें विश्वावसूस व विश्वावसूनें ती मला दिली. ही

विद्या जरी गुरूनें दिली असली, तरी ती वाईट पुरुषाकडे गेली कीं नष्ट होते. ह्याप्रमाणें आपणांला मीं हिची गुरुपरंपरा सांगितली. आतां हिचा प्रभाव सांगतों. ह्या विद्येच्या योगानें स्वर्ग, मृत्यु आणि पाताळ ह्या तिन्ही लोकांत असणारें जें कांहीं नेत्रानें प्रत्यक्ष पाहण्याची इच्छा होईल तें पाहातां येईल; इतकेंच नव्हे, तर तें ज्या स्थितींत असलेलें पाहावें अशी इच्छा असेल त्या स्थितींत असलेलें पाहतां येईल. सहा महिनेपर्यंत एका पायावर उभें राहावें तेव्हां ही विद्या मिळते. तेव्हां आपण तें व्रत केलें म्हणजे नंतर मी स्वतः ती विद्या आपणांस मिळवून देईन. राजा, आम्हांमध्यें मनुष्यांपेक्षां जो कांहीं विशेष आहे तो ह्या विद्येमुळेंच होय, व ह्या विद्येच्या प्रभावामुळेंच आम्ही देवांच्या बरोबरीचे झालों आहों. असो. हे पुरुषश्रेष्ठ, मी आपणांला आणि आपल्या बंधूंना प्रत्येकीं गन्धर्व लोकांत उत्पन्न झालेले शंभर शंभर अश्व देणार आहें. ते अश्व देव आणि गन्धर्व ह्यांस वाहून नेणारे असून त्यांचा वर्ण दिव्य आणि वेग मनाप्रमाणें आहे. हे क्षीण झाले न झालेसे दिसतात, पण त्यांचा वेग मात्र कमी होत नाहीं. धर्मराजा, पूर्वीं इन्द्राचें वज्र वृत्रासुराच्या मस्तकावर पडतांच त्याचे एकशें दहा तुकडे झाले, व ते तुकडे जिकडे तिकडे पसरले. जेथें जेथें ते तुकडे पडले, त्याच्या त्याच्या सान्निध्यास देव असतात. आतां ते त्या वज्राचे विभाग कोठें व कोणत्या रूपानें आहेत तें सांगतों. राजा, लोकांमध्यें द्रव्याप्रमाणें स्पृहणीय असणारी कीर्ति ही वज्राची मूर्ति होय. ब्राह्मणांचा हात हेंच वज्र असून रथ हें क्षत्रियांचें वज्र आहे. वैश्यांचें वज्र दान हें असून कर्म हें शूद्रांचें वज्र होय. घोडे हे क्षत्रियांच्या रथरूपी वज्राचें एक अंग असल्यामुळें, ते त्याची केवळ सीमाच आहेत, असें म्हटलें आहे. घोडी ही ज्यास प्रसवते तें अश्वरूपी एक, व रथांत बसणारा शूर हें एक, अशीं रथाचीं दोन अंगें आहेत. सारांश, रथांत बसणाऱ्या वीराची जितकी योग्यता आहे, तितकीच रथास जोडलेल्या अश्वाचीही आहे. ह्यामुळें क्षत्रियास अश्व असणें हें अगदीं आवश्यक आहे. शिवाय, गंधर्वलोकांत निर्माण झालेल्या अश्वांची सर्व अश्वांमध्यें मान्यता असून, त्यांचा वर्ण धन्याची इच्छा असेल त्या प्रकारचा होतो. तसाच वेगही त्याची इच्छा असेल तितका होतो, व ते धन्यास इच्छा होईल त्या वेळीं त्याच्या पुढें येऊन उभे राहतात. ह्यामुळें, गंधर्वलोकांत जन्मलेले हे माझे अश्व आपली इच्छा पूर्ण करितील.

अर्जुन म्हणालाः—गंधर्वा, मला कोणी प्रीतीमुळें असो अथवा आपल्या जीवितास धोका येण्याचा संभव असल्यामुळें असो, जरी चाक्षुषीसारखी विद्या अथवा शास्त्रही अर्पण केलें, तरी तें कांहीं मी मान्य करावयाचा नाहीं. कारण, दुसऱ्यास कांहीं न देतां त्याजकडून आपण घेणें हें अयोग्य आहे

गंधर्व म्हणालाः—मोठ्या लोकांशीं जडलेला संबंध आनंददायक होतो असें दिसून येतें. तेव्हां आपल्याशीं संबंध जडावा म्हणून व आपण मला जीवदान दिल्यामुळें संतुष्ट होऊन मी आपणांस ही विद्या देत आहें. कारण, संबंध हा परस्परांस परस्परांचें निरंतर स्मरण झाल्यावांचून कायम टिकत नाहीं; व आपण जीवितदान दिल्यामुळें मला जसें आपलें स्मरण राहील, तसें मी विद्या दिली नाहीं तर आपणांस माझें स्मरण राहणार नाहीं; व तसें झाल्यास अर्थातच संबंध कायम टिकावयाचा नाहीं. आतां, ह्याबद्दल मोबदलाच दिला पाहिजे असें जर आपणांस वाटत असेल, तर, हे भरतकुलश्रेष्ठ अर्जुना, मीही त्या विद्येप्रमाणेंच चिरकाल टिकण्यास योग्य असें उत्तम प्रकारचें आग्नेय अस्त्र आपणांकडून घेईन म्हणजे झालें !

अर्जुन म्हणालाः—तुमचा आमचा संबंध कायमचा व्हावा म्हणून मी तुला आग्नेय अस्त्र देऊन तुजकडून अश्व घेतों म्हणजे झालें. असो; पण, मित्रा गंधर्वा, आम्हां लोकांस जें तुमच्यापासून भय आहे, तें कोणतें? व शत्रूंची खोड जिरविणारे वेदवेत्ते असे आम्ही सर्वजण मार्गानें जात असतां तूं आम्हांला दरडावलेंस त्याचें कारण काय? मित्रा, हें सर्व आम्हांला सांग.

गंधर्व म्हणालाः—महाराज, आपण अग्नि ठेविलेला नाहीं, त्यामुळें गृहस्थाश्रमी नव्हे; व संध्याकाळीं समिधाही दिली नाहीं, यामुळें ब्रह्मचारीही नव्हे. अर्थात् आपणांस कोणताही आश्रम नाहीं, व ब्राह्मणास तर आश्रय असलाच पाहिजे, यावरून तुम्ही ब्राह्मण नसाल असें मला वाटलें. त्याचप्रमाणें, तुमच्या पुढें तुमचा पुरोहितही नव्हता; यामुळें तुम्ही क्षत्रियही नसाल असें वाटलें. म्हणून, हे पांडुपुत्रहो, मी आपला अतिक्रम केला. ज्ञानसंपन्न असे यक्ष, राक्षस, गंधर्व, पिशाच, सर्प आणि दैत्य हे सर्व कौरवांच्या वंशाचा विस्तार सांगत असतात. हे वीर, तुमच्या ज्ञानसंपन्न पूर्वजांचे गुण नारदादिक देवर्षि गात असतां त्याजकडून मीं ऐकिले आहेत. तसेंच, ह्या सर्व समुद्रवलयांकित पृथ्वीवर फिरते वेळीं, तुमच्या उत्कृष्ट वंशाचा प्रभाव मीं स्वतांही अवलोकन केला आहे. तसेंच, अर्जुना, वेद व धनुर्विद्या ह्या दोहोंविषयीं तीन्हीं लोकांत प्रख्यात असणारे आपले गुरु कीर्तिमान द्रोणाचार्य ह्यांसही मी ओळखितों. हे कुन्तीपुत्रा, देवश्रेष्ठ यम, वायु, इंद्र आणि दोघे अश्विनीकुमार व नरश्रेष्ठ राजा पांडु हे सहा कुरुवंशाची अभिवृद्धि करणारे आपले जनक आहेत हेंही मला माहीत आहे. आपणही सर्व बंधु दिव्यस्वरूपी, महात्मे आणि योद्धयांमध्यें श्रेष्ठ असून आपलें आचरण व नियम हींही उत्तम प्रकारचीं आहेत; व अंतःकरण सुसंस्कृत असल्यामुळें आपले विचार व निश्चय हेही उत्कृष्ट प्रकारचे आहेत. हें मला माहीत असूनही मीं तुम्हांस दरडावलें. कारण, हे कुरुवंशजा, ज्याला बाहुबलाचा आश्रय आहे अशा पुरुषानें, दुसरा मनुष्य आपल्या स्त्रीच्या समक्ष आपला अतिक्रम करीत आहे असें दिसून आल्यानंतर तें सहन करीत राहणें हें योग्य नाहीं. शिवाय, रात्रीं आमचें सामर्थ्य अधिक वाढतें यामुळें, आणि बरोबर स्त्रियाही होत्या म्हणून, माझ्या शरिरांत क्रोधाचा संचार झाला. पुढें, हे तापत्यकुलवर्धना, आपल्या ज्या आचरणामुळें आपण युद्धांत माझा पराजय केला, तें आचरण कोणतें हेंही मी सांगतों, ऐका. ब्रह्मचर्य हा मुख्य प्रतीचा धर्म असून तो तुमच्या ठिकाणीं अगदीं नियमानें आहे, म्हणूनच तुम्हीं युद्धांत माझा पराभव केला. हे शत्रुतापकारका, जर कोणी क्षत्रिय विषयसुखाचा अनुभव घेणारा असेल, व तो जर रात्रीं रणांगणावर येऊन आमच्याशीं युद्ध करील, तर मात्र तो कोणत्याही प्रकारें जिवंत रहावयाचा नाहीं. पण, पार्था, विषयसुख अनुभवणारा असून जर पुढें ब्राह्मण असला, तर तो अग्रभागीं पुरोहित असणारा क्षत्रिय रात्रीं संचार करणाऱ्या सर्व गंधर्वादिकांचा पराजय करील. तेव्हां, हे तापत्या, क्षत्रियांस जें कांहीं श्रेय मिळावें अशी इच्छा असेल, त्याच्या प्राप्त्यर्थ त्यांनीं त्या कामीं मनोनिग्रही पुरोहिताची योजना करावी. राजाचे पुरोहित हे वेद व षडंगें[१] ह्यांमध्यें गढून गेलेले, पवित्र, सत्यवादी, धर्मात्मे आणि सुशिक्षित अंतःकरणाचे असे असावे. ज्याचा पुरोहित धर्मवेत्ता, उत्कृष्ट वक्ता, सदाचारसंपन्न आणि पवित्र असा असतो, त्या राजास प्रथम खातरीनें जयाची व मृत्यूनंतर स्वर्गाचीही प्राप्ति होते. मिळविण्याऱ्या वस्तु मिळविणें अथवा मिळविल्या असतील त्यांचें संरक्षण करणें ह्यासाठीं राजानें सद्गुणी असा

१ शिक्षा, कल्प, व्याकरण, छंद, ज्योतिष आणि निरुक्त.

पुरोहित करावा. ज्या राजास ऐश्वर्यप्राप्तीची इच्छा असेल, त्यानें ही समुद्रवलयांकित पृथ्वी मिळविण्यासाठींही पुरोहिताच्याच मतानें वागावें. हे तापत्य, ज्या राजापाशीं पुरोहित नसेल, त्यास केवळ शौर्यानें अथवा कुलीनपणानें केव्हांही पृथ्वी जिंकून घेतां यावयाची नाहीं. सारांश, हे कौरववंशाच्या अभिवृद्धीस कारणीभूत असणाऱ्या अर्जुना, ज्या राज्यामध्यें ब्राह्मण प्रमुख असतात, त्याच राज्याचें चिरकाल संरक्षण करितां येणें शक्य आहे हें लक्षांत असूं दे.

अध्याय एकशें एकाहत्तरावा.

—:०:—

तपत्याख्यान.

अर्जुन म्हणाला:—गन्धर्वा, तूं आपल्या भाषणांत 'तापत्य' असें विशेषण मला दिलेंस; तेव्हां 'तापत्य' ह्या शब्दाचा अर्थ काय, तो ऐकावा अशी माझी इच्छा आहे. हे साधो! जिच्या संबंधानें तूं आम्हांस तापत्य असें म्हटलेस, ती तपती म्हणजे कोण, ह्याविषयीं यथातथ्य वृत्त तूं आम्हांस कथन कर.

वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें अर्जुनानें प्रश्न केल्यानंतर, ह्यासंबंधाची त्रैलोक्यामध्यें प्रसिद्ध असणारी अशी एक कथा गंधर्वानें त्यास सांगितली.

गन्धर्व म्हणाला:—हे ज्ञानिश्रेष्ठ अर्जुना, मी तुला ती मनोरम कथा यथावत् व पूर्णपणे सांगतों. ज्या कारणानें मी तुला तापत्य हा शब्द लाविला, तें मी सांगतों; तूं अंतःकरण एकाग्र करून श्रवण कर.

हा जो आकाशामध्यें वास करीत असून आपल्या तेजाच्या योगानें गगनमंडलास व्याप्त करीत आहे, त्या श्रीसूर्यनारायणास तपती नांवाची एक अत्यंत तेजस्वी अशी कन्या होती. ही सावित्रीची धाकटी बहीण असून, तपश्चर्या करीत असल्यामुळें तपती ह्या नांवानें तीनही लोकांत प्रसिद्ध होती. देव, असुर, यक्ष, राक्षस आणि गंधर्व ह्यांच्या स्त्रिया आणि अप्सरा ह्यांपैकीं कोणीही स्वरूपानें हिच्या साम्यतेची नव्हती. तिचे अवयव अगदीं रेखल्यासारखे व निर्दोष असून नेत्र अत्यंत कृष्णवर्ण व विशाल होते. ही सुंदरी सदाचारी, साध्वी आणि उत्कृष्ट प्रकारचा वेष धारण करणारी अशी होती. ती कन्या तारुण्यांत आली असून विवाह करण्यास योग्य झाली आहे असें सूर्यास दिसून आलें; पण स्वरूप, गुण आणि शास्त्रज्ञान ह्यांनीं संपन्न असा तिच्या योग्य वर त्याला त्रिभुवनांत आढळेना. ह्यामुळें तिच्या विवाहाविषयींच्या चिंतेनें त्याला कांहीं सुचेनासें झालें. इकडे, अर्जुना, ऋक्ष राजाचा पुत्र कौरवश्रेष्ठ बलवान राजा संवरण हा ह्या वेळीं सूर्याचें आराधन करीत होता. हे पौरवनंदना, तो बाह्याभ्यंतर नियमनिष्ठ, अहंकारशून्य आणि भक्तिमान असा सेवा करणारा राजा, सूर्य उदय पावतांच अर्घ्य, माला, नैवेद्य, गंध इत्यादिकांच्या योगानें त्याची पूजा करी; व व्रतें, उपवास आणि अनेक प्रकारचीं तपें ह्यांच्या योगानें त्याचें आराधन करी. तेव्हां कृतज्ञ, धर्मवेत्ता आणि स्वरूपानेंही सर्व भूमंडलामध्ये अद्वितीय असा तो संवरण राजा तपतीला योग्य पति आहे, असें सूर्यास वाटलें; आणि त्यानें त्या राजश्रेष्ठ संवरणास आपली ती कन्या देण्याचें योजिलें. अर्जुना, ज्याप्रमाणें आकाशामध्यें सूर्य हा तेजानें प्रकाशमान असतो, त्याप्रमाणें राजा संवरण हाही भूमंडलावर आपल्या कांतीनें प्रकाशमान झालेला होता. ज्याप्रमाणें वेदपठन करणारे लोक उदयकालीं श्रीसूर्याचें अर्चन करितात, त्याप्रमाणें ब्राह्मणाहून खालच्या प्रतीचे सर्व लोक संवरण राजाचा बहुमान करीत असत. तो अत्यंत कांतिमान असल्यामुळें चंद्राचें, व अत्यंत तेजस्वी असल्यामुळें सूर्याचेंही अतिक्रमण करून राहिलेला होता. तसेंच, तो राजा

शत्रु व मित्र या उभयतांमध्येंही श्रीमान असा होता. हे कुरुकुलोत्पन्ना अर्जुना! तो राजा अशा प्रकारचा असल्यामुळं, आपली कन्या तपती ही त्यास द्यावी, असें स्वतः श्रीसूर्यानें मनांत आणिलें.

पुढें एके समयीं तो अद्वितीय पराक्रमी व श्रीमान संवरण राजा एका पर्वताजवळच्या अरण्यांत मृगया करण्याकरितां आला. तेव्हां तो मृगया करीत असतां त्या पर्वतावर त्याचा अप्रतिम अश्व क्षुधा आणि तृष्णा ह्यांनीं व्याकूळ होऊन मरण पावला. अशा प्रकारें त्याचा अश्व मरण पावल्यामुळें तो राजा त्या पर्वतावर पायींच फिरूं लागला, तों जिच्या तोडीची दुसरी स्त्रीच नाहीं अशी एक विशालनेत्रा कन्या त्याच्या दृष्टीस पडली. तेथें ती कन्या एकटीच असून तो शत्रुतापन नृपश्रेष्ठही एकटाच होता. ह्यामुळें तो तिजकडे एकसारखी टक लावून पाहूं लागला. तेव्हां तिच्या स्वरूपावरून, ही लक्ष्मी असावी, असा त्या राजाचा तर्क झाला; पण पुनः, ती अत्यंत तेजस्वी असल्यामुळें, ही सूर्याची प्रभाच खालीं पडली असावी, अशी त्याची कल्पना झाली. ती शरिरानें आणि तेजानें अग्नीची ज्वाळाच असून स्वच्छता आणि कांति ह्यांच्या योगानें जणू चंद्राची निर्मळ कलाच होती. तिचे डोळे काळेभोर असून, ज्या पर्वतपृष्ठभागावर ती होती, तेथें ती देदीप्यमान अशा सुवर्णमय पुतळीप्रमाणें शोभत होती. तिच्या त्या स्वरूपानें व तेजानें वृक्ष, लता आणि झुडुपें ह्यांसहवर्तमान तो पर्वत जणू सुवर्णमयच होऊन गेलेला होता. तिला पाहिल्यानंतर राजास सर्व लोकांतील स्त्रिया तुच्छ वाटूं लागून आपले नेत्र सफल झाले असें वाटलें. जन्मापासून जीं कांहीं म्हणून स्वरूपें त्या राजाच्या पाहण्यांत आलीं होतीं, त्यांमध्यें तिच्या तोडीचें एखादें तरी असेल असें त्यास वाटेना. त्या वेळीं तिच्या ह्या गुणरूपी रज्जूंनीं अंतःकरण आणि नेत्र हीं जखडून टाकिल्यामुळें तो राजा तेथून हालेना, व त्यास दुसरें कशाचेंही भान राहिलें नाहीं. विधात्यानें खरोखरच देव, दैत्य आणि मनुष्यें या सर्व लोकांचें मंथन करून त्यांतून सारभूत असें हें हिचें स्वरूप निर्माण केलें असावें असें त्यास वाटलें. ह्याप्रमाणें सौन्दर्यानें परिपूर्ण असल्यामुळें ती कन्या म्हणजे एक अद्वितीय रत्न आहे असा त्याचा निश्चय झाला. त्या सर्वांगसुंदरीस पाहतांच तो राजा मदनशरांनीं अगदीं पीडित होऊन गेला; आणि त्याच्या अंतःकरणास अगदीं तळमळ लागून राहिली. मदनरूपी प्रखर अग्नीचा दाह अशक्य होऊन तो प्रौढ राजा त्या अप्रौढ व मनोहर कन्येला म्हणाला, "हे सुंदरी, तूं कोण? कोणाची? येथें कोणच्या उद्देशानें उभी राहिली आहेस? हे मधुरहासिनी! तूं ह्या निर्जन अरण्यांत एकटीच कशी फिरत आहेस? तुझ्या अवयवांस नांवें ठेवण्यास यत्किंचितही जागा नसून तूं सर्व प्रकारच्या अलंकारांनीं विभूषित आहेस. मला वाटतें, तूंच या अलंकारांचें भूषण आहेस. तूं देव, असुर, यक्ष, राक्षस, सर्प, गंधर्व अथवा मनुष्यें ह्यांपैकीं कोणाची स्त्री असशील असें मला वाटत नाहीं. कारण, हे सुंदरी, मीं जेवढ्या म्हणून उत्कृष्ट प्रकारच्या स्त्रिया पाहिल्या किंवा ऐकिल्या, त्यांमध्यें तुझ्या साम्यतेची एकही नाहीं. हे चारुवदने, तुझें मुख माझ्या दृष्टीस पडतांच मदन माझी अगदीं दाणादाण उडवून देत आहे!"

अर्जुना, ह्याप्रमाणें त्या निर्जन अरण्यामध्यें तो राजा तिला बोलला. पण तो कामपीडित झाला असल्यामुळें तिनें मात्र त्यास कांहींएक उत्तर दिलें नाहीं. तेव्हां तो राजा पुनः पुनः भाषण करूं लागला असतां, वीज ज्याप्रमाणें मेघांमध्यें अंतर्धान पावते, त्याप्रमाणें ती विशाललोचनी तेथच्या तेथेंच एकदम गुप्त झाली. तेव्हां वेड लागल्यासारखें होऊन तो राजा त्या कमलपत्रा-

क्षीचा शोध करण्यासाठीं चोहोंकडे फिरला, पण ती त्यास कोठेंही दिसली नाहीं. तेव्हां त्यानें तिजबद्दल अतिशय विलाप केला; आणि अशा प्रकारें शोक करितां करितां थकून जाऊन शेवटीं तो मुहूर्तभर निश्चेष्ट पडला !

अध्याय एकशें बहात्तरावा.

—:०:—

तपतीसंवरणसंवाद.

गंधर्व म्हणाला:—अर्जुना, तो राजा जरी शत्रुसमूहास लोळविणारा होता, तरी ती स्त्री दिसेनाशी होतांच, मदनानें मोहित झाल्यामुळें तो आपणच भूमितलावर लोळूं लागला ! ह्याप्रमाणें तो भूमीवर पडला असतां त्या चारुहासिनी स्त्रीनें पुनः त्या राजास दर्शन दिलें; व मदनव्यथेनें जर्जर झालेल्या त्या राजास ती हसत हसत मधुर शब्दांनीं म्हणाली, "हे शत्रुमर्दना राजा ! ऊठ, ऊठ, तुझें कल्याण असो. हे नृपतिश्रेष्ठा ! तुजसारख्या लोकविख्यात पुरुषाला असा मोह उत्पन्न होणें योग्य नाहीं."

हे तिचे मधुर शब्द कानीं पडतांच राजानें डोळे उघडिले, आणि आपल्याला पाहिजे होती तीच वस्तु दृष्टीस पडल्यामुळें त्याला आनंद झाला. नंतर, मदनव्यथेनें विव्हळ झालेला तो राजा अडखळत अडखळत तिच्याशीं बोलूं लागला.

राजा म्हणाला:—हे कृष्णवर्णकटाक्षशालिनि, मी काममोहित होऊन तुजवर अनुरक्त झालों आहें. तेव्हां माझा तूं स्वीकार कर, नाहीं तर माझे हे पंचप्राण मला सोडून जातील. हे विशालनयने ! तुझी ही कमलगर्भाप्रमाणें कांति पाहून मदनशरांनीं माझ्या अंतःकरणाला छिद्रें पाडिलीं आहेत. अशा वेळीं तुझ्यावांचून माझें संरक्षण करणारा कोणीही नाहीं ! हे सुहास्यवदने, ह्या कामरूपी महासर्पानें मला दंश केला असून त्या योगानें मी अगदीं विव्हल होऊन गेलों आहें. हे मधुरभाषणि, ये, तूं आतां माझ्या जवळ ये. माझे हे प्राण केवळ तुझ्या अधीन आहेत. हे सर्वांगसुन्दरी, तुझ्यावांचून माझे प्राण आतां खरोखर रहात नाहींत. हे कमलाक्षि, हे चंद्रवदने ! हा काम माझ्या शरिराला कसा पोखरूं लागला आहे पहा ! तूं मजवर दया कर. मी तुझा भक्त असल्यामुळें माझा त्याग करणें तुला मुळींच योग्य नाहीं; तेव्हां प्रीतिसंबंध जोडून तूं माझें संरक्षण कर. तुझ्या अवलोकनानें प्रेमपरिपूरित झालेलें हे माझें मन अत्यंत चंचल होऊं लागलें आहे; व तुला अवलोकन केल्यामुळें आतां तें तुझ्यावरून मुळींच हालत नाहीं. इतर स्त्रियांकडे नुसतें बघणें सुद्धां आतां मला आवडणार नाहीं. ह्यास्तव, सुंदरी ! मजवर प्रसन्न हो, आणि या तुझ्या भक्ताचा अंगीकार कर. हे विशालनयने वरारोहे सुन्दरी, तुला पाहिल्याबरोबरच मदनानें माझ्या शरिराचा अंतर्भाग अगदीं पोखरून सोडला आहे. तेव्हां मदनरूपी अग्नीच्या योगानें माझ्या शरिराचा झालेला हा दाह प्रीतिसमागमाच्या योगानें उत्पन्न होणाऱ्या घर्मजलानें तूं शांत कर. सुंदरी ! तुझ्या दर्शनापासून उत्पन्न झालेला हा प्रचंड धनुर्धारी दुर्जय मदन शरप्रहार करून माझें शरीर छिद्रमय करून सोडीत आहे ! तेव्हां तूं आपलें शरीर अर्पण करून ह्याची शांति कर. हे प्रियभाषणि, सर्व विवाहांमध्यें गांधर्वविवाह हा श्रेष्ठ आहे, तेव्हां त्या विधीनेंच तू माझ्याशीं संबंध कर.

तपती म्हणाली:—राजा, तूं म्हणतोस तें सर्व खरें आहे. पण माझ्या देहावर कांहीं माझी सत्ता नाहीं;—त्याच्यावर माझ्या पित्याची सत्ता आहे. तव्हां माझ्यावर जर तुझी खरी प्रीति असेल, तर तूं त्याच्याकडे मागणी कर. हे नरनाथा ! ज्याप्रमाणें मीं आपले प्राण आकर्षण केले, त्याचप्रमाणें माझेही प्राण आपण आकर्षण केले आहेत.

१ पृष्ठ १६२ पहा.

तथापि, हे भूपतिश्रेष्ठ, माझ्या देहावर माझी सत्ता नसल्यामुळे मी आपणांजवळ येत नाहीं. कारण स्त्रिया ह्या स्वतंत्र नसतात. नाहीं तर आपल्यासारखा लोकविख्यात आणि ऐश्वर्यसंपन्न राजा आपला पति असावा अशी कोणत्या कन्येस इच्छा होणार नाहीं ? तर आतां आपण प्रणाम, तप आणि नियम हीं करून माझा पिता सूर्य ह्याजकडे मजविषयीं मागणी करा. मग मला आपणांस देण्याची जर तो इच्छा करील, तर मी निरंतर आपली होऊन राहीन. हे क्षत्रियश्रेष्ठ ! माझें नांव तपती असून मी लोकप्रदीप श्रीसूर्यनारायणाची कन्या, व सावित्रीची धाकटी बहीण आहे.

अध्याय एकशें त्र्याहात्तरावा.

—:०:—

तपतीसंवरणविवाह.

गन्धर्व म्हणाला:—अर्जुना, असें सांगून ती पवित्र स्त्री आकाशांत निघून गेली, तेव्हां तो राजा पुन: भूमीवर पडला ! इकडे त्याचा शोध करण्याकरितां त्याचा अमात्य बरोबर बरेंच सैन्य व बाजारबुणगें घेऊन हिंडत असतां त्या ठिकाणीं आला, तो, तपतीनें त्याग केलेला तो महाधनुर्धर राजा, भूमीवर पडलेल्या इंद्रध्वजाप्रमाणें पृथ्वीतलावर पडला आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. आपल्या राजाची ती स्थिति पाहून, शरिरास आग लागावी तशी त्या मंत्र्याची अवस्था झाली; आणि अंत:करणांत भीति उत्पन्न होऊन तो गडबडीनें त्याच्या जवळ गेला; व पडलेल्या मुलास ज्याप्रमाणें पिता उठवितो, त्याप्रमाणें त्या कामशरानें घायाळ होऊन पडलेल्या राजास त्यानें उठविलें. नंतर ज्ञानानें, वयानें आणि कीर्तीनेंही थोर असणाऱ्या त्या अमात्याचें अंत:करण स्वस्थ झालें, आणि त्यानें मोठ्या ममतेनें राजास म्हटलें, "हे नरश्रेष्ठा ! आपण भिऊं नका, आपलें कल्याण असो."

अर्जुना, हा शत्रूंत समरंगणांत लोळविणारा असल्यामुळें, ह्याला शत्रूकडून अपाय होऊन हा असा पडला असेल असें त्याच्या मंत्र्यास वाटलें नाहीं. भुकेनें व तहानेनें व्याकूळ होऊन तो असा पडला असावा, असा त्याच्या तर्क झाला; म्हणून त्यानें अगदीं थंड पाणी त्याच्या मस्तकावर शिंपिलें, व ताप शांत होण्यासाठीं कमळें आणि वाळा ह्यांचा किरीट त्याच्या मस्तकास घातला. नंतर तो राजा सावध झाल्यावर त्यानें सर्व सैन्यास परत जाण्याविषयीं आज्ञा दिली; आणि त्या अमात्याला मात्र आपल्याजवळ ठेवून घेऊन आपण तेथेंच त्या पर्वतशिखरावर राहिला. पुढें स्नान वगैरे करून शुद्ध झाल्यावर, सूर्याची आराधना करण्याच्या इच्छेनें त्यानें हात जोडले; आणि दृष्टि सूर्याकडे लावून तो तेथेंच उभा राहिला. त्या वेळीं त्यानें आपल्या शत्रुविध्वंसक ऋषिश्रेष्ठ वसिष्ठ पुरोहितांचें चिंतन केलें. ह्याप्रमाणें तो अहर्निश एकाच स्थळीं उभा राहिला असतां बाराव्या दिवशीं ब्रह्मर्षि वसिष्ठ मुनि तेथें आले. अर्जुना, वसिष्ठ मुनि महाज्ञानी असल्यामुळें, राजाचें अंत:करण तपतीनें हरण केलें आहे ही गोष्ट योगबलाच्या योगानें त्यांच्या ध्यानांत आली. तेव्हां त्या राजाचें कार्य करण्याच्या इच्छेनें त्या महात्म्या ऋषिश्रेष्ठांनीं, मनोनिग्रह करून राहिलेल्या त्या राजाशीं संभाषण केलें; आणि त्याच्या समक्ष ते सूर्याप्रमाणें तेजस्वी भगवान वसिष्ठ मुनि सूर्याची भेट घेण्याकरितां आकाशांत निघून गेले. पुढें ते ब्रह्मर्षि हात जोडून सूर्यापुढें जाऊन उभे राहिले, आणि 'मी वसिष्ठ आलों आहें.' असें त्यांनीं त्यास प्रेमानें कळविलें. त्यांना पाहून महातेजस्वी सूर्य म्हणाला, "हे महर्षे, आपलें स्वागत असो. ऋषे, आपण वक्त्यांमध्यें श्रेष्ठ आहां; हे महाभाग, आपली काय इच्छा आहे ती निवेदन करा, म्हणजे ती मी पूर्ण करीन." अर्जुना, सूर्यनारायणाचें हें भाषण ऐकून वसिष्ठ मुनींनीं त्यास प्रणाम करून उत्तर दिलें.

वसिष्ठ म्हणाले:—भगवन् सूर्यनारायणा, सावित्रीची कनिष्ठ भगिनी तपती या नांवाची जी आपली एक कन्या आहे, तिजविषयीं संवरण राजाकरितां मी आपल्याकडे मागणी करीत आहें. तो राजा मोठा कीर्तिसंपन्न असून, अंतःकरणाचा मोठा उदार आहे. त्याचप्रमाणें, धर्म आणि अर्थ ह्यांचेंही त्यास चांगलें ज्ञान असल्यामुळें, सर्व प्रकारें तो आपल्या कन्येस योग्य पति आहे.

श्रीसूर्य म्हणाला:—ब्रह्मर्षे! आपण असें सांगतां, तर मी आपली कन्या तपतीही संवरण राजाला देतों. ऋषिश्रेष्ठ! असा योग जुळून आला असतां आणखी तें काय पाहिजे? कारण, संवरण हा राजांमध्यें श्रेष्ठ, आपण ऋषींमध्यें श्रेष्ठ! आणि तपती ही स्त्रियांमध्यें श्रेष्ठ! तेव्हां आपणांसारखे योग्य पुरुष योग्य पुरुषाकरितां योग्य कन्येविषयीं मागणी करीत असल्यामुळें मुकाट्यानें कन्यादान करण्यावांचून अधिक योग्य तें काय आहे?

गन्धर्व म्हणाला:—अर्जुना, ह्याप्रमाणें सूर्यानें भाषण करून, संवरण राजास अर्पण करण्यासाठीं आपली ती सर्वांगसुंदर व सर्वगुणसंपन्न कन्या महात्म्या वसिष्ठ मुनींच्या स्वाधीन केली. तेव्हां वसिष्ठांनींही तिचा स्वीकार करून श्रीसूर्याचा निरोप घेतला; आणि जेथें संवरण राजा सूर्याराधना करीत बसला होता, तेथें ते सूर्यकन्या तपतीसह आले. जिच्याकडे आपलें अंतःकरण सर्वस्वीं लागून राहिलें आहे, त्या सुहास्यवदना तपतीला बरोबर घेऊन वसिष्ठ मुनि आपल्याचकडे येत आहेत, हें संवरण राजाच्या आधींच दृष्टीस पडलें होतें. त्यामुळें तो फारच आनंदित झाला होता, व त्याच्या मुखावर एक प्रकारची विशेष शोभा आली होती. ती सुंदरीही अत्यंत तेजस्वी व रूपसंपन्न असल्यामुळें, विद्युल्लता जशी आकाशांतून खालीं येतांना शोभत, त्याप्रमाणें ती सुशोभित दिसत होती.

असो. इतकें होईपर्यंत, संवरण राजानें जें व्रत आरंभिलें होतें, त्यास पूर्ण बारा दिवस होऊन एक व्रत समाप्त झालें होतें. त्या तपश्चर्येच्या योगानें, व महाप्रभावशाली वसिष्ठांच्या योगानें संवरण राजास इच्छित पत्नीची प्राप्ति झाली. नंतर देव आणि गंधर्व ह्यांची वस्ती असलेल्या त्या श्रेष्ठ पर्वतावरच भूपतिश्रेष्ठ संवरण राजानें त्या तपतीचें पाणिग्रहण केलें. पुढें वसिष्ठ मुनींनीं अनुज्ञा दिल्यावर भार्येसहवर्तमान त्या पर्वताचे ठिकाणीं विहार करण्याविषयीं त्या राजर्षीनें बेत केला; आणि पुर, राष्ट्र, वनें, उपवनें इत्यादि सर्व ठिकाणचा बंदोबस्त करण्याचें काम त्यानें आपल्या प्रधानावर सोंपविलें. असो; नंतर राजाचा निरोप घेऊन वसिष्ठ मुनि निघून गेले; आणि मग तो राजा त्या पर्वतावर देवाप्रमाणें क्रीडा करूं लागला. अशा प्रकारें त्या पर्वताच्या दरींतील घोर अरण्यांत आणि उपवनांत आपल्या भार्येसह क्रीडा करितां करितां बारा वर्षें निघून गेलीं.

इकडे, अर्जुना, राजा अशा प्रकारें कामासक्त झाल्यामुळें ज्योतिष्टोमादि क्रियांचा लोप झाला, आणि त्या योगानें त्याच्या राष्ट्रांत इंद्रानें बारा वर्षेंपर्यंत पर्जन्यवृष्टि केली नाहीं. इतकेंच नव्हे, तर नुसतें दंवही पडलें नाहीं! तेव्हां धान्य मुळींच पिकलें नाहीं, आणि त्या अवर्षणाच्या योगानें प्रजांचा भयंकर क्षय होऊं लागला. तेव्हां पोटाची खाच कशी भरेल ही काळजी लोकांच्या डोळ्यांपुढें रात्रंदिवस उभी राहिली, आणि घरांदारांचा त्याग करून ते चहूंकडे भटकत राहिले. शेवटीं तर इतका कहर उसळला कीं, पोटाची आग शांत करण्याकरितां ते भराभर स्त्रीपुत्रांचाही त्याग करूं लागले; आणि मर्यादा सोडून परस्परांचा वध करूं लागले! ह्याप्रमाणें त्या राष्ट्रांत आणि नगरांत एकच हलकल्लोळ माजून राहिला. कोणाच्याही पोटांत अन्नाचा लेशमात्र नसल्यामुळें सर्वांच्या तोंडावर प्रेतकळा आली; आणि

क्षुधेनें पीडित होऊन मृतसदृश झालेल्या प्रजांनीं व्याप्त झालेलें तें राष्ट्र आणि नगर, शवांनीं व्याप्त असलेल्या यमनगराप्रमाणें भयंकर दिसूं लागलें !

अर्जुना, हा सर्व प्रकार पाहून धर्मात्म्या वसिष्ठ मुनींना करुणा आली, आणि त्या मुनिश्रेष्ठांनीं पर्जन्यवृष्टि केली. अर्जुना, वसिष्ठ मुनींनीं पर्जन्यवृष्टि कशी केली म्हणून तुझ्या मनांत कदाचित् शंका येईल; तर, बाबारे, त्यांनीं पर्जन्यवृष्टि केली म्हणजे असें केलें कीं, अनावृष्टीचें मुख्य कारण जें शहरांत राजा नसणें, तें त्यांनीं राजाला नगरांत आणून नाहींसें केलें, आणि यामुळें राजा आपल्या नगरांत येऊन पूर्ववत् यज्ञयागादि सुरू झाल्यामुळें इंद्रानें फिरून पर्जन्यवृष्टि केली. अर्थात् धान्यें वगैरे पिकून चहूंकडे सुकाळ झाला ! तेव्हां त्या सुसंस्कृत नृपश्रेष्ठानें आपली काळजी वाहिली म्हणून त्या प्रजाजनांना फार आनंद झाला, आणि अशा प्रकारें तें राष्ट्र आणि नगर हीं आनंदित झालीं.

याप्रमाणें चहूंकडे आनंदीआनंद झाल्यावर, इंद्र इंद्राणीसह शोभतो, त्याप्रमाणें तपतीसह शोभणाऱ्या त्या संवरण राजानें बारा वर्षें यज्ञयागादि कर्मांमध्यें घालविलीं !

गंधर्व सांगतो:—अर्जुना, ती महाभाग्यवती सूर्यकन्या तपती तुमच्या वंशाची मूळ उत्पादक होय. कारण, त्या श्रेष्ठ संवरण राजापासून तपतीला जो कुरु म्हणून पुत्र झाला, तो तुमच्या वंशाचा मूळपुरुष होय. म्हणूनच तुम्ही तापत्य आहां; आणि यामुळेंच मीं तुम्हांस तापत्य म्हटलें.

अध्याय एकशें चौऱ्याहत्तरावा.

—:०:—

पांडवांस पुरोहित करण्याविषयीं उपदेश.

वैशंपायन सांगतात:—हे भरतकुलश्रेष्ठा, गंधर्वाचें तें भाषण एकतांच अत्यंत प्रेम उत्पन्न होऊन शरिरावर एक प्रकारची विशेष कांति दिसूं लागल्यामुळें अर्जुन हा पूर्णचंद्राप्रमाणें शोभूं लागला; आणि वसिष्ठांच्या तपोबलाविषयीं अत्यंत कौतुक वाटून तो महाधनुर्धर कौरवश्रेष्ठ त्या गंधर्वास म्हणाला, "तूं ज्या ऋषीचें वसिष्ठ असें जें नांव सांगितलेंस, त्याविषयींचा वृत्तांत ऐकावा अशी माझी इच्छा आहे. तेव्हां तें बरोबर रीतीनें मला सांग. हे गंधर्वराज, आमच्या पूर्वजांचा जो पुरोहित होता, तो हा भगवान ऋषि कोण हें मला सांग."

गंधर्व म्हणाला:—अर्जुना, देवांनीं देखील जिंकण्यास सर्वकाळ कठिण असे काम आणि क्रोध हे ज्यांनीं तपश्चर्या करून जिंकून सोडले, व ज्यामुळें ते ज्यांचे सेवक बनून पाय चुरीत राहिले होते, ते हे वसिष्ठ मुनि ब्रह्मदेवाचे मानसपुत्र होत. अरुंधती ही ह्यांची पत्नी होती. ह्यांनीं इंद्रियें वश करून सोडल्यामुळें यांस वसिष्ठ असें म्हणतात. विश्वामित्रानें त्या महात्म्याच्या शंभर पुत्रांचा वध केला, तरीही ह्या उदार अंत:करणाच्या मुनीनें अत्यंत क्रुद्ध होऊन कुशिकवंशाचा उच्छेद केला नाहीं. पुत्रशोकानें जरी त्याला संताप झाला होता, व अंगीं जरी सामर्थ्य होतें, तरीही तो एखाद्या असमर्थ मनुष्याप्रमाणें स्वस्थ राहिला; व त्यानें विश्वामित्राच्या नाशार्थ भयंकर असें कर्म केलें नाहीं. तसेंच, पुत्र मरण पावल्यानंतर त्यांस यमसदनांतून परत आणण्याची जरी शक्ति होती, तरी, समुद्र ज्याप्रमाणें मर्यादेचें उल्लंघन करीत नाहीं, त्याप्रमाणें ह्यानें यमाचा अतिक्रम केला नाहीं. जितेंद्रिय अशा ह्या महात्म्याचा लाभ झाल्यानंतरच सार्वभौम अशा इक्ष्वाकुवंशांतील राजांस पृथ्वीची प्राप्ति झाली; आणि, हे कुरुनंदन, हा ऋषिश्रेष्ठ वसिष्ठ पुरोहित मिळाल्यानंतर त्या राजांनीं पुष्कळ यज्ञही केले. कारण, हे पांडवश्रेष्ठ, ज्याप्रमाणें बृहस्पतीनें देवांकडून यज्ञ करविले, त्याचप्रमाणें त्यानें त्या सर्व भूपतिश्रेष्ठांकडून यज्ञ करविले. असो; ह्याप्रमाणें राजाचें कल्याण होण्यास पुरोहित

हा मुख्य कारण आहे. ह्यास्तव, धर्म हाच ज्याच्या अंतःकरणाचा मुख्य विषय आहे असा एखादा वेदवेत्ता, गुणवान आणि आपणांस इष्ट असेल तो ब्राह्मण आपण आपला पुरोहित करा. कारण, पार्था, पृथ्वी जिंकून घेऊं इच्छिणाऱ्या कुलीन अशा क्षत्रियानें आपल्या राज्याच्या अभिवृद्ध्यर्थ प्रथम पुरोहित केला पाहिजे. अर्जुना, पृथ्वी जिंकून घेण्याची इच्छा असेल तर राजानें ब्राह्मणास अग्रेसर केलें पाहिजे. तेव्हां गुणवान, जितेंद्रिय, ज्ञानसंपन्न आणि धर्म, अर्थ व काम ह्यांचीं रहस्यें जाणणारा असा एखादा ब्राह्मण आपला पुरोहित असू द्या.

अध्याय एकशें पंचाहत्तरावा.

—:०:—

धेनुहरणवृत्त.

अर्जुन विचारतोः—गंधर्वा, वसिष्ठ आणि विश्वामित्र हे केवळ आश्रमवासी ऋषि होत. असें असून ह्यांच्यामध्यें वैर उत्पन्न होण्याचें काय कारण झालें, तें मला सांग.

गंधर्व सांगतोः—पार्था, वसिष्ठांचें हें आख्यान फार प्राचीन आहे, असें लोक म्हणतात. तें मी तुला कथन करतों, ऐक. हे भरतकुलश्रेष्ठ! कान्यकुब्ज देशांत कुशिकपुत्र गाधि म्हणून एक लोकप्रसिद्ध राजा होता. त्यास विश्वामित्र नांवाचा एक मुलगा होता. तो मोठा धर्मनिष्ठ आणि पराक्रमी असून, त्याजवळ फार मोठा दळभार असल्यामुळें शत्रूस त्याचा फार दरारा असे. एके वेळीं तो आपल्या अमात्यांस बरोबर घेऊन मृगयेकरितां मरु नामक निर्जल प्रदेशांतील घोर अरण्यांत गेला. तें अरण्य मोठें रमणीय असून तेथें वन्य पशुही पुष्कळ होते. त्या ठिकाणीं तो मृगया करीत असतां त्यानें अनेक हरिण, डुकर इत्यादि वनपशु आपल्या बाणांनी जायां केले. याप्रमाणें शिकार करितां करितां तो अगदीं थकून गेला; आणि त्यास तृषाही फार लागली. तेव्हां जवळच वसिष्ठांचा आश्रम होता तिकडे तो गेला. अर्जुना, राजा विश्वामित्र आला आहे असें पाहून वसिष्ठ मुनि सामोरे आले, आणि त्याचा योग्य सत्कार करून व अर्घ्यपाद्यादिकांनीं त्याची पूजा करून त्यांनीं त्यास आश्रमांत नेलें. नंतर त्या ऋषींनीं राजाला म्हटलें, "आपण आलां हें फार चांगलें झालें. आज येथें वास्तव्य करावें, आणि या वनांत मिळणाऱ्या पदार्थांचा स्वीकार करावा."

अर्जुना, वसिष्ठ ऋषींचें हें निमंत्रण विश्वामित्रांनीं स्वीकारिलें, तेव्हां वसिष्ठांनीं इच्छित पदार्थ देण्याविषयीं कामधेनूला आज्ञा केली. तेव्हां त्या कामधेनुनें तांदूळ इत्यादि ग्राम्य आणि नीवार इत्यादि वन्य धान्यें, तशींच मधुर अशी षड्रस अन्नें, व्याधि व वार्धक्य यांचा नाश करणारीं दिव्य अशी रसायनें, आणि क्षीरादि पेय, अपूपादि भक्ष्य, पायसादि लेह्य, व इक्षुकांडादि चोष्य पदार्थ निर्माण करून दिले. त्याचप्रमाणें, महामूल्यवान रत्नें आणि वस्त्रेंही दिलीं. नंतर त्या सामुग्रीच्या योगानें त्या महर्षींनीं विश्वामित्राचें, त्याच्या सचिवांचें आणि त्या सर्व सैन्याचें आतिथ्य केलें असतां ती सर्व मंडळी संतुष्ट झाली. परंतु विश्वामित्राच्या मनांत असा विचार आला कीं, आमच्या येथें सुद्धां कधीं आम्ही असे तृप्त झालों नाहीं; आणि ही सामुग्री या अरण्यवासी व मुनीजवळ कशी आली? त्याला या गोष्टीचें मोठें आश्चर्य वाटलें, आणि पुढें त्यानें शोध केला, तों ती नंदिनी नामक धेनु त्याच्या दृष्टीस पडली. ती मस्तक, कंठ, जांघाड, गळ्याची पोळी, शेंपूट आणि स्तन ह्या सहा ठिकाणीं लांबट असून ललाट, कान आणि नेत्र ह्या ठिकाणीं पुष्ट होती. तिचे नेत्र बेडकाप्रमाणें उन्नत असून ती आकारानें उत्तम, मोठ्या कांसेची आणि दिसण्यांत सुंदर अशी होती.

तिचें शपूट लांब मडकं, कान शंकूच्या आकाराचे आणि शिंगें मनोहर होतीं. तिला पाहतांच गाधिपुत्र विश्वामित्र संतुष्ट होऊन त्याला तिचा लोभ उत्पन्न झाला, आणि तो लागलीच वसिष्ठ मुनींना म्हणाला, " मी तुम्हांस दहा कोटी गाइ अथवा राज्यही देतों,पण ही एवढी गाय मला द्या."

वसिष्ठ मुनींनी उत्तर दिलें:—राजा, मला तसें करितां यणार नाहीं; कारण देवता, अतिथि, पितर आणि याग ह्यांना लागणारें दूध ही गाय मला देत असते.

विश्वामित्र म्हणाला:—वसिष्ठ मुने, हें तुमचें म्हणणें बरोबर नाहीं. दहा कोटी गाई अथवा राज्यही मी देत असतां जर तुम्ही ही गाय मला देणार नाहीं, तर मी हिला बलात्कारानें घेऊन जाईन. कारण कसा झालों तरी मी क्षत्रिय आहे; व आपण ब्राह्मण आहां. आपलें सामर्थ्य काय ते अध्ययन आणि तपश्चर्या. अहो, ज्यांनीं इंद्रिय निग्रह करून शांतीचा स्वीकार केला आहे, त्या तुम्हां ब्राह्मणांमध्यें काय पराक्रम आहे ? शिवाय पराक्रम करून इष्ट वस्तु मिळवावी हा क्षत्रियांचा धर्मच आहे.

वसिष्ठ म्हणाले:—विश्वामित्रा, तूं स्वतः राजा असून पराक्रमी आहेस, आणि तशांतून तुझ्या बरोबर आतां सैन्यही आहे. तेव्हां तुला वाटेल तसें तूं कर. माझी कांहींएक हरकत नाहीं.

गंधर्व म्हणाला:—ह्याप्रमाणें वसिष्ठांनीं उत्तर दिल्याबरोबर विश्वामित्रानें आपल्या सेवकांस त्या गाईला हांकून नेण्याविषयीं आज्ञा केली. तेव्हां ते सैनिक तिला कोरड्यांनीं व दांडक्यांनीं मारीत मारीत नेऊं लागले. परंतु हंस अथवा चंद्र या सारखी ती शुभ्र वर्णाची गाय इकडून तिकडून धावत धावत वरचेवर वसिष्ठ मुनींपाशीं हंबरडा फोडीत जाई, व मान वर करून ती त्यांच्याकडे पाहूं लागे. अशा वेळीं तर विश्वामित्राचे लोक तिला अतिशय मारीत. परंतु ती त्या आश्रमांतून कांहीं केल्या बाहेर निघेना. त्या धेनूचें हें कृत्य पाहून वसिष्ठ मुनि म्हणाले:—हे कल्याणि ! तूं वारंवार हंबरडा फोडीत मजकडे येत आहेस तें मला समजतें. पण, भद्रे नंदिनि ! मी पडलों क्षमाशील ब्राह्मण ! तेव्हां विश्वामित्र तुला बलात्कारानें नेत आहे याला मी काय करणार बरें ?

गंधर्व म्हणतो:—अर्जुना, वसिष्ठांचें हें भाषण ऐकून, विश्वामित्र आणि त्याचें सैन्य ह्यांच्या भीतीनें घाबरी झालेली ती धेनु वसिष्ठ मुनींच्या जवळ येऊन त्यांस म्हणाली, "भगवन् ! विश्वामित्राच्या सैन्यांनीं दांडक्यानें मला अतिशय मारल्यामुळें मी आक्रोश करीत आपणांकडे येत आहें; पण आपणांस माझी कांहींच दया येत नाहीं. हें काय ? "

गंधर्व म्हणाला:—अर्जुना, ह्याप्रमाणें विश्वामित्राच्या सैन्यांनीं नंदिनीस त्रास दिल्यामुळें जरी ती सारखी आक्रोश करीत होती, तरी वसिष्ठ मुनि क्षुब्ध झाले नाहींत आणि त्यांचें धैर्यही ढळलें नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्या धेनूला वसिष्ठ मुनि म्हणाले, "नंदिनि, क्षत्रियांचें बल पराक्रम असून ब्राह्मणांचें बल क्षमा हेंच आहे. अर्थात् तुला जरी इतका त्रास होत आहे, तरी मला त्याचा प्रतिकार करतां येत नाहीं; तेव्हां तुला रुचत असेल तर तूं जा."

नंदिनीनें उत्तर केलें:—महाराज ! आपण असें बोलतां, तेव्हां आपण माझा त्याग केला कीं काय ? आणि जर आपण माझा त्याग करीत नसलां, तर बलात्कारानें मला नेणें कोणालाही शक्य नाहीं !

वसिष्ठ मुनि म्हणाले:—नंदिनि, मीं कांहीं तुझा त्याग केला नाहीं. शक्य असेल तर तूं रहा. पण हा पहा तुझा वत्स घट्ट दाव्यानें बांधून नेत आहेत !

गंधर्व सांगतो:—अर्जुना, ' शक्य असेल तर रहा ' हे वसिष्ठांच्या तोंडचे शब्द ऐकतांच त्या धेनूनें आपली मान व मस्तक हीं

ताठ उभीं केलीं; व क्रोधानें डोळे लाल करून भयंकर हंबरडा फोडण्यास आरंभ केला. तिच्या त्या स्वरूपाकडे कोणाच्यानेही बघवेना. तिची भयंकर मुद्रा पाहून विश्वामित्राचें सैन्य पळूं लागलें. पण पुनः त्यांनीं धीर धरून तिला चाबकांनीं व काठ्यांनीं मारण्यास सुरुवात केली. तेव्हां तर ती गाय अतिशयच खवळली व तिनें आपल्या शेपटींतून इंगळांचा वर्षाव करण्यास आरंभ केला. त्यामुळें ती मध्यान्हींच्या सूर्याप्रमाणें प्रखर दिसूं लागली. नंतर तिनें लागलीच आपल्या पच्छांतून पल्हव, कांसेमधून द्राविड आणि शक, जननेंद्रियापासून यवन, शेणापासून आणि मूत्रापासून शबर, कुशींतून पौण्ड्र, किरात, यवन, बर्बर, सिंहल व खस आणि फेंसापासून चिवुक, पुलिंद, चीन, हूण, केरळ ह्याप्रमाणें आपल्या अवयवांपासून अनेक प्रकारचे म्लेच्छ निर्माण केले. तें सर्व प्रचंड सैन्य सशस्त्र व सायुध असून उत्पन्न झाल्याबरोबर जिकडे तिकडे मोठ्या आवेशानें पसरलें; आणि विश्वामित्र पहात असतां त्याच्या प्रत्येक सैनिकास पांच पांचजणांनीं वेढून टाकिलें ! नंतर ते लोक अस्त्रांचा मोठा वर्षाव करूं लागले असतां मरणाच्या भीतीनें विश्वामित्राचें सैन्य त्याच्या देखत देखत सैरावैरा पळून गेलें. अर्जुना, इतकें झालें तरी त्या वसिष्ठाच्या सैनिकांनीं विश्वामित्राच्या सैन्यापैकीं एकाही मनुष्याचा प्राणघात केला नाहीं. त्यांनीं फक्त त्या सर्व लोकांस दूर हांकून लाविलें इतकेंच. अशा प्रकारें तें सैन्य तेथून बारा कोसपर्यंत लांब हांकून दिल्यावर, भीतीनें खिन्न होऊन ते सर्व लोक आक्रोश करूं लागले, तथापि त्यांना कोणी त्राता मिळाला नाहीं.

विश्वामित्राला ब्राह्मण्यप्राप्ति.

गंधर्व सांगतोः—हे कुरुकुलावतंसा, ह्याप्रमाणें ब्राह्मतेजाच्या योगानें घडून आलेला तो अद्भुत चमत्कार पाहून विश्वामित्रास आपल्या क्षत्रियत्वाचा कंटाळा आला; आणि तो म्हणाला, "धिक्कार असो या क्षत्रियांच्या सामर्थ्याला ! ब्राह्मतेजाच्या योगानें उत्पन्न होणारें सामर्थ्य हेंच खरें सामर्थ्य होय !"

अर्जुना, ह्याप्रमाणें बलाबलांचा विचार करून, तप हेंच उत्कृष्ट प्रतीचें बल आहे अशी विश्वामित्रानें आपल्या मनांत गांठ बांधिली. नंतर त्यानें आपलें तें विस्तीर्ण राज्य, जाज्वल्यमान राज्यलक्ष्मी आणि विषयोपभोगादि सुखें यांचा त्याग केला, व केवळ तपश्चर्येवरच आपलें अंतःकरण जडविलें. नंतर तपश्चर्येच्या योगानें त्यानें सिद्धि प्राप्त करून घेतली; व आपल्या तेजानें सर्व लोकांस व्याप्त करून सोडिलें. त्याचें तेज अत्यंत प्रखर असल्यामुळें त्यांपासून लोकांस फार ताप होऊं लागला. पुढें त्यास ब्राह्मणत्वाची प्राप्ति होऊन त्या कुशिककुलोत्पन्न विश्वामित्रानें स्वर्गाधिपति इंद्रासमवेत सोमपानही केलें.

अध्याय एकशें शहात्तरावा.

—:०:—

कल्माषपादोख्यान.

गंधर्व म्हणालाः—पार्था, पूर्वी या भूतलावर इक्ष्वाकुवंशांत कल्माषपाद या नांवाचा एक राजा होऊन गेला. या भुवनांत त्याच्यासारखा तेजस्वी कोणी नव्हता. एके वेळीं तो मृगयेकरितां आपल्या राजधानींतून निघून वनांत गेला, आणि तेथें हरिण, रानडुकरें वगैरे वनपशूंची शिकार करूं लागला. त्या भयंकर अरण्यांत त्यानें पुष्कळ पशु मारिले; व पुढें अनेक प्राण्यांचा वध केल्यानंतर तो थकून तेथून परत फिरला. अर्जुना, त्या राजाकडून आपण यज्ञ करवावा ! अशी प्रतापशाली विश्वामित्राची इच्छा होती. असो. क्षुधा व तृषा ह्यांनीं व्याप्त झालेला तो राजा आपल्या राजधानीकडे परत येत असतां, जेथून एकाच मनुष्यास जातां येईल अशा एका अडचणीच्या ठिकाणीं

आला, तों समोरून एक ब्राह्मण येतांना त्याच्या दृष्टीस पडला. हा वसिष्ठांच्या शंभर पुत्रांपैकीं ज्येष्ठ पुत्र असून महातपस्वी होता. त्याचें नांव 'शक्ति' असें होतें. त्यास पाहातांच कल्माषपाद राजा त्याला म्हणाला, "आमच्या मार्गावरून दूर हो." तेव्हां शक्तीनें शांतपणानें राजास सांगितलें, "महाराज! ब्राह्मण भेटला नाहीं तोंपर्यंत मार्गावर राजाचा हक्क आहे; परंतु ब्राह्मण भेटल्यानंतर मात्र मार्गावर ब्राह्मणाचाच हक्क असतो. ह्या मार्गावर माझा हक्क आहे. कारण, कोणतींही कर्मे चालली असलीं तरी राजानें ब्राह्मणास मार्ग दिलाच पाहिजे असा धर्म आहे." अर्जुना, ह्याप्रमाणें ते उभयतां आपल्याला मार्ग मिळण्यासाठीं 'तूं हो बाजूला' 'तूं हो बाजूला' असें अरे तुरे करून म्हणूं लागले. तथापि धर्मानें वर्तन करणारा तो ऋषि मार्गावरून बाजूस सरेना; आणि अभिमानामुळें व क्रोधामुळें राजाही बाजूस सरेना. शेवटीं राजास अतिशय संताप येऊन त्यानें राक्षसाप्रमाणें त्या ऋषीस चाबकाखालीं झोडिलें. तेव्हां क्रोधामुळें भान नाहींसें होऊन वसिष्ठपुत्रानें त्या नृपश्रेष्ठ कल्माषपादास शाप दिला.

शक्ति मुनि म्हणाले:—अरे नीचा! ज्या अर्थी तूं तपस्वी जनास राक्षसाप्रमाणें मारीत आहेस, त्या अर्थी तूं आजपासून नरभक्षक राक्षसच होशील; आणि मनुष्यमांसाची आसक्ति धरून पृथ्वीवर संचार करीत रहाशील! अधमा, निघ येथून!

गंधर्व म्हणाला:—अर्जुना, पुढें हाच राजा यज्ञ करण्यास तयार झाला असतां विश्वामित्रानें त्याचा अंगीकार केला; व त्याजकडून यज्ञ करविण्याचें ठरविलें. ह्यामुळें विश्वामित्र आणि वसिष्ठ ह्यांमध्यें वैर पडलें. असो. पार्था, पूर्वी सांगितल्याप्रमाणें तो शक्ति ऋषि आणि राजा कल्माषपाद हे एकमेकांशीं कलह करूं लागले असतां, उग्र तपस्वी व प्रतापशाली राजर्षि विश्वामित्र त्यांच्या जवळ गेला. व "राजा, तूं ज्याला मारिलेंस तो वसिष्ठांचा पुत्र आहे" असें तो कल्माषपादाला म्हणाला. तेव्हां हा वसिष्ठपुत्र त्यांच्याचप्रमाणें प्रभावशाली असेल असें राजाच्या लक्षांत येऊन त्यास फार वाईट वाटलें. इतक्या संधींत विश्वामित्रानें गुप्त रीतीनें त्याच ठिकाणीं राहून आपली इष्टसिद्धि करून घेण्याच्या इच्छेनें त्या उभयतांसही फसविलें. तें असें: शक्ति मुनींनीं शाप दिला होता, तेव्हां त्यांना प्रसन्न करून उश्शाप मागून घेण्याच्या इच्छेनें राजा शक्ति मुनींस शरण गेला, आणि आतां उश्शाप मागून घेणार, इतक्यांत विश्वामित्रानें एका राक्षसास राजाच्या शरिरांत प्रवेश करण्याविषयीं आज्ञा केली. तेव्हां शक्ति ऋषींचा शाप आणि विश्वामित्राची आज्ञा ह्या दोन गोष्टी जुळून आल्यामुळें राक्षसानेंही त्याच्या शरिरांत तात्काळ प्रवेश केला. पुढें राक्षसानें पछाडल्यामुळें, राजास कांहींच कळेनासें होऊन तो वनांत संचार करूं लागला; आणि विश्वामित्र व वसिष्ठपुत्र शक्ति हे दोघेही तेथून निघून गेले.

असो. पुढें तो राजा वनांत हिंडत असतां एका ब्राह्मणाच्या दृष्टीस पडला. तो ब्राह्मण अत्यंत क्षुधाक्रांत झालेला होता, म्हणून त्यानें राजापाशीं मांसयुक्त भोजन मागितलें. तेव्हां त्यास "आपण दोन घटका येथें बसा. मी परत आल्यानंतर आपणांस इष्ट असलेलें भोजन घालीन." असें म्हणून कल्माषपाद राजा निघून गेला, आणि त्यानें सांगितल्याप्रमाणें ब्राह्मण त्या ठिकाणीं त्याची वाट पहात बसला. इकडे, राजा कल्माषपाद हा त्या वनांतच पुष्कळ वेळ हिंडला, आणि सावकाश आपल्या नगराकडे आला. ब्राह्मणास कबूल केलेल्या गोष्टीचें त्यास स्मरणच राहिलें नाहीं. शेवटीं रात्र झाली, व तो अंतःपुरांत जाऊन स्वस्थ निजला. पुढें मध्यरात्रीं तो सहज जागा झाला. तों त्याला ब्राह्मणास दिलेल्या वचनाचें स्मरण झालें.

तेव्हां त्यानें लागलीच स्वयंपाक्यास बोलावून आणविलें आणि त्याला सांगितलें कीं, "अरण्यांत एक अन्नार्थी ब्राह्मण माझी वाट पहात बसलेला आहे; त्याला तूं आतांच्या आतां मांसयुक्त अन्न तयार करून नेऊन दे."

गंधर्व म्हणालाः—अर्जुना, ह्याप्रमाणें राजाची आज्ञा झाल्यावर तो स्वयंपाकी मांस बनविण्याकरितां गेला; परंतु तें त्याला कोठेंही मिळालें नाहीं. म्हणून तो कष्टी होऊन परत राजाकडे आला, आणि त्यानें ती हकीकत त्यास कळविली. पार्था, राजाच्या अंगांत राक्षसाचा संचार झाला असल्यामुळें त्याला त्याबद्दल कांहींच वाटलें नाहीं. त्यानें त्या स्वयंपाक्यास पुनः सांगितलें कीं, "दुसरें कसलें मांस मिळत नसलें तर मनुष्याचें कां होईना! कांहीं तरी त्याला एकदा नेऊन भोजन घाल म्हणजे झालें!" हें राजाचें भाषण ऐकून, वधाची शिक्षा झालेल्या लोकांस मारणारे लोक जेथें राहतात त्यांजकडे तो स्वयंपाकी गेला, आणि खुशाल नरमांस घेऊन आला. पुढें त्यानें तें रीतीप्रमाणें शिजवून तयार केलें; आणि अन्नांत मिसळून तें त्या क्षुधित झालेल्या तपस्वी ब्राह्मणास नेऊन दिलें! ब्राह्मणानें योगदृष्टीनें तें अन्न पाहिलें, तों तें अभोज्य आहे असें त्यास दिसून आलें. त्यामुळें तो अतिशय संतप्त होऊन गेला आणि म्हणाला, "ज्या अर्थी तो नराधम मला हें अभोज्य अन्न देत आहे, त्या अर्थी त्यालाच अशा प्रकारच्या अन्नाविषयीं आसक्ति उत्पन्न होईल; आणि शक्ति मुनींनीं शाप दिल्याप्रमाणें मनुष्यमांसावर आसक्त झाल्यामुळें सर्व प्राण्यांस हा कंटाळवाणा होऊन पृथ्वीवर इतस्ततः संचार करूं लागेल!"

गंधर्व म्हणालाः—पार्था, ह्याप्रमाणें पूर्वीं शक्ति मुनींनीं व ह्या वेळीं त्या ब्राह्मणानें मिळून दोन वेळां एकाच प्रकारच्या शापाचा उच्चार केल्यामुळें राजाच्या शरीरांत राक्षसबळाचा संचार होऊन तो बेशुद्ध होऊन गेला!

वसिष्ठपुत्रांचा मृत्यु.

हे भरतवंशजा! पुढें थोडक्याच काळानें, इंद्रियें राक्षसाधीन झालेल्या त्या राजाची आणि शक्ति मुनींची एके ठिकाणीं गांठ पडली. तेव्हां तो भूपश्रेष्ठ त्यांना म्हणाला, "ज्या अर्थी तूं मला अशा प्रकारचा अयोग्य शाप दिला आहेस, त्या अर्थी मनुष्यभक्षणाच्या कामास मी तुझ्यापासूनच प्रारंभ करतों!" अर्जुना, असें म्हणून त्यानें तात्काळ त्या शक्ति मुनींचा प्राण घेतला; आणि व्याघ्र ज्याप्रमाणें अभीष्ट पशु भक्षण करतो, त्याप्रमाणें त्यानें त्यांस भक्षण केलें!

शक्ति मुनि मरण पावला असें पाहून, त्या राजाच्या शरिरांत शिरलेल्या राक्षसास, वसिष्ठांचेच पुत्र खाण्याविषयीं विश्वामित्रानें वारंवार उपदेश केला. तेव्हां क्रुद्ध झालेला सिंह जसा क्षुद्र पशूंस भक्षण करून टाकितो, तसे त्या राक्षसानें शक्ति मुनींच्या पाठचे सर्व वसिष्ठपुत्र खाऊन टाकिले!

इकडे, अर्जुना, सर्व पुत्रांचा वध विश्वामित्रानें करविला हें ऐकून वसिष्ठ मुनींस फार शोक झाला. परंतु ज्याप्रमाणें महापर्वत मेरु हा पृथ्वीस आवरून धरितो, त्याप्रमाणें त्यांनीं आपला शोक आवरून धरिला. ह्या वेळीं त्या ऋषिश्रेष्ठानें आत्महत्या करण्याचें मनांत आणिलें; परंतु त्या महात्म्यानें विश्वामित्राचा उच्छेद करण्याचा विचार सुद्धां केला नाहीं! असो. पुढें त्या भगवान वसिष्ठ मुनींनीं मेरु पर्वताच्या शिखरावरून आपला देह खालीं सोडून दिला; तथापि मृत्यु न येतां, ज्याप्रमाणें कापसाच्या ढिगाऱ्यावर पडावें त्याप्रमाणें ते त्या पर्वताच्या शिळेवर पडले. पांडुपुत्रा! अशा प्रकारें तेथून पडल्यानंतरही जेव्हां मरण आलें नाहीं, तेव्हां त्या भगवान वसिष्ठ मुनींनीं त्या अरण्यामध्यें अग्नि प्रज्वलित करून त्यांत प्रवेश केला! ह्यावेळीं अग्नि जरी उत्कृष्ट प्रकारें पेटलेला होता, तरी देखील त्यानें त्यांस दग्ध केलें नाहीं! इत-

केंच नव्हे, तर प्रज्वलित अग्नि अगदीं थंडगार होऊन गेला ! तेव्हां तेथून निघून शोकाक्रांत झालेले ते वसिष्ठ महामुनि समुद्रासन्निध आले, व त्यांनीं त्याकडे अवलोकन करून आपल्या गळ्यांत एक मोठी शिळा बांधिली, आणि त्यांत उडी टाकिली. पण समुद्राच्या लाटांच्या वेगानें ते महामुनि तीरावर येऊन पडले. तेव्हां प्रशंसनीय नियम धारण करणारे ते वासिष्ठ ब्रह्मर्षि खिन्न होऊन पुनः आपल्या आश्रमाकडेच परत गेले !

अध्याय एकशें सत्याहत्तरावा.

—:०:—

कल्माषपादशापमोक्ष.

गंधर्व म्हणाला:—वसिष्ठ मुनि परत आल्यानंतर आपला तो शून्य आश्रम पाहून त्यांना फारच दुःख झालें, आणि लागलीच ते तेथून बाहेर पडले. नंतर त्यांना एक नदी आढळली. ती वर्षाकाळामुळें तुडुंब भरून चालली होती; आणि मोठमोठे वृक्ष तिच्यांतून वाहून जात होते. तेव्हां, अर्जुना, फिरून त्यांच्या मनांत आलें कीं, ह्या नदींत बुडून आपण देहत्याग करावा. नंतर त्यांनीं आपलें सर्व शरीर पाशांनीं घट्ट आवळून टाकिलें, आणि नदीमध्यें प्रवेश केला. परंतु त्या नदीनें त्यांचे सर्व पाश तोडून टाकून त्यांना जमिनीवर आणून सोडिलें. पाशमुक्त झाल्यानंतर ते महर्षि नदी उतरून पलीकडे गेले, आणि आपल्याला या नदीनें पाशमुक्त–विपाश–केलें, म्हणून त्यांनीं तिला 'विपाशा' हें नांव दिलें.

याप्रमाणें स्थिति झाल्यामुळें त्या मुनींच्या अंतःकरणास परमावधीचें दुःख होऊन पुढें ते एका ठिकाणीं राहिलेच नाहींत. सदांदीत पर्वत, नद्या, सरोवरें अशा ठिकाणीं ते संचार करूं लागले. याप्रमाण ते हिंडत असतां हिमालयांतून निघालेली 'भीमा' नदी लागली. तिचें पात्र मोठें असून तें प्रचंड मकरांनीं व्यापिलें होतें. तेव्हां वसिष्ठ मुनींनीं त्यांत उडी घातली. परंतु हा अग्नीप्रमाणें अत्यंत पवित्र ब्राह्मण असल्यामुळें,ह्याचा आपल्या उदकांत प्राणघात होणें हें योग्य नाहीं, असा विचार करून ती महानदी शंभर वाटांनीं पळून गेली. म्हणून तेव्हांपासून 'शतद्रु' या नांवानें ती प्रसिद्ध झाली. नंतर याही ठिकाणीं नदी नाहींशी होऊन आपण भूमीवरच आहों असें पाहून, आपणास मरण येणें अशक्य आहे असें म्हणून वसिष्ठ मुनि पुनः आश्रमाकडे परतले. ते अनेक पर्वत, देश वगैरे फिरून आश्रमास येऊन पोहोंचले. ते आश्रमाकडे चालले असतां त्यांची अदृश्यंती नामक स्नुषा त्यांच्या मागून येत होती. तेव्हां अर्थानें परिपूर्ण आणि सहा वेदांगांस अनुसरून असणारा वेदध्वनि त्या महर्षींना ऐकूं आल्यावरून "कोण बरें हा माझ्या मागून येत आहे?" असें ते म्हणाले. तें ऐकून, "हे महाभाग ! मी अदृश्यंती आहें." असें त्यांची तपःसामर्थ्यवती स्नुषा बोलली. अर्जुना, ही अदृश्यंती वसिष्ठ मुनींच्या शक्ति नामक पुत्राची भार्या होय. तिचें हें भाषण ऐकून वसिष्ठ मुनि म्हणाले, "मुली ! पूर्वीं शक्ति हा सांग वेदाध्ययन करीत असतां त्याचा ध्वनि मीं ऐकिला होता; तेव्हां त्यासारखा ऐकूं येत असलेला हा ध्वनि कोणाचा आहे बरें ?"

अदृश्यंतीनें उत्तर दिलें:–मुनिवर्य, आपला पुत्र शक्ति याजपासून माझ्या उदरीं गर्भ राहिला आहे, त्याचा हा ध्वनि आहे. त्याला वेदाध्ययन करूं लागल्यास बारा वर्षें होऊन गेलेलीं आहेत.

गन्धर्व म्हणाला:—पार्था, अदृश्यंतीचें हें भाषण ऐकून भगवान वसिष्ठ मुनींना आनंद झाला, व "संतति आहे तर एकूण !" असें म्हणून त्यांनीं आत्मघाताचा उद्योग सोडून दिला. पुढें वाटेंत एके ठिकाणीं निर्जन अरण्यामध्यें बसलेला कल्माषपाद राजा त्यांच्या दृष्टीस पडला. त्या वेळीं त्याच्या शरिरांत भयंकर राक्षसाचा संचार

झाल्यामुळें तो भ्रमहत झालेला राजा क्रुद्ध होऊन उठला; आणि त्या मुनीस भक्षण करण्यास उद्युक्त झाला! तें पाहतांच अदृश्यंती भयानें गोंधळून जाऊन वसिष्ठांस म्हणाली, "भगवन्! दंडधारी यमाप्रमाणें हातीं काष्ठ घेतलेला हा भयंकर राक्षस इकडे येत आहे; आणि, हे महाभाग! त्याचें निवारण करण्यास आज या भूमंडलावर आपल्यावांचून दुसरा कोणीही समर्थ नाहीं. तेव्हां या भयंकर राक्षसापासून आपण माझें संरक्षण करा. तो खचीत या ठिकाणीं आम्हां उभयतांसही भक्षण करूं इच्छीत आहे."

वसिष्ठ मुनि म्हणाले:—भिऊं नको. ज्याची तुला भीति वाटत आहे, तो हा राक्षस नसून भूलोकामध्यें प्रख्यात असलेला राजा कल्माषपाद आहे. त्याच्या शरिरांत राक्षसानें संचार केल्यामुळें तो या अरण्यांत वास करीत असतो.

गंधर्व म्हणाला:—याप्रमाणें वसिष्ठांनीं आपल्या सुनेस सांगून, आपल्याकडे येत असलेल्या त्या राजाचें केवळ हुंकारानेंच निवारण केलें; आणि नंतर, अभिमंत्रित केलेलें पवित्र जल त्याच्या अंगावर शिंपडून त्यास शापापासून मुक्त केलें. अर्जुना, अमावास्याचे दिवशीं ग्रहणकाळीं सूर्य जसा राहूनें ग्रस्त होतो; त्याप्रमाणें हा राजा वसिष्ठांच्या—वसिष्ठांशभूत शक्ति मुनींच्या—तेजानें बारा वर्षेपर्यंत ग्रस्त होऊन गेला होता. परंतु आतां वसिष्ठांच्याच प्रभावानें त्याची त्या राक्षसापासून मुक्तता होतांच तो राजा तेजस्वी दिसूं लागला; व ज्याप्रमाणें सायंकाळच्या मेघांत सूर्य आपल्या कांतीनें आरक्त वर्ण उत्पन्न करितो, त्याप्रमाणें आपल्या कांतीच्या योगानें त्या विशाल अरण्यास त्या राजानें एक प्रकारचा रंग आणून सोडला! शापमुक्त होतांक्षणींच त्यानें वसिष्ठ मुनींस साष्टांग नमस्कार घातला; आणि हात जोडून तो त्यांना म्हणाला, "हे महाभाग मुनिश्रेष्ठ! मी सुदासपुत्र कल्माषपाद[१] असून आपला यजमान आहें. ह्याकरितां, मीं आपलें कोणतें इष्ट कार्य करावें तें आपण मला सांगा."

वसिष्ठ म्हणाले:—राजा, योगायोगाप्रमाणें जें झालें तें झालें! त्याबद्दल तूं आतां शोक करूं नको. आतां तूं आपल्या राजधानीस जा, आणि प्रजेचें उत्तम प्रकारें पालन कर. मात्र तूं ब्राह्मणांचा केव्हांही अवमान करूं नको.

कल्माषपाद म्हणाला:—हे महाभाग! मी यापुढें ब्राह्मणांचा केव्हांही अवमान करणार नाहीं. मी आपल्या आज्ञेप्रमाणें वागून ब्राह्मणांचें उत्तम प्रकारें पूजन करीन. हे तपोधना! आतां, ज्याच्या योगानें मी इक्ष्वाकूच्या वंशांतील पुरुषांच्या ऋणांतून मुक्त होईन, असें एक अपत्य मला आपणापासून प्राप्त व्हावें अशी माझी इच्छा आहे; आणि, हे साधुश्रेष्ठ! शील, रूप आणि गुण ह्यांनीं युक्त असून इक्ष्वाकुवंशाच्या अभिवृद्धीस कारणीभूत असें माझ्या इच्छेनुरूप अपत्य मजला देण्याविषयीं आपण समर्थ आहां.

गंधर्व म्हणाला:—त्या राजाचें हें भाषण ऐकून सत्यप्रतिज्ञ ब्राह्मणश्रेष्ठ वसिष्ठ मुनींनीं त्या महाधनुर्धर राजास 'देईन' असें उत्तर दिलें. नंतर त्या राजासहवर्तमान ते वसिष्ठ मुनि प्रसिद्ध अयोध्या नगरीस गेले. अयोध्या ही कल्माषपादाची राजधानी होय. आपला राजा नगरांत परत येणार अशी वार्ता ऐकून सर्व प्रजाजनांस मोठा आनंद झाला; आणि इंद्रास जसे देव सामोरे जातात, तसे ते सर्व त्यास सामोरे गेले. आपल्याकरितां लोकांची अतिशय गर्दी झालेली पाहून राजा वसिष्ठ महर्षींसहवर्तमान सावकाश नगरींत गेला. त्या वेळीं, उदय पावलेला सूर्य जसा दिसतो, तसा तो त्या अयोध्यावासी जनांना दिसला. शरत्कालीं उदय पावलेला चंद्र ज्याप्रमाणें आकाशास सुशोभित करतो, त्याप्रमाणें

१ कल्माषपाद हा इक्ष्वाकुवंशांतील असून वसिष्ठ हे त्या वंशाचे पुरोहित होते.

राजानें आपल्या उद्यानें तें नगर शोभायमान करून सोडिलें. त्या वेळीं नगरांतील मार्ग उत्तम प्रकारें स्वच्छ केलेले असून त्यांजवर चंदनकुंकुमांचा सडा शिंपला होता; आणि जिकडे तिकडे पताका व ध्वज लावून तें सुशोभित केलेलें होतें. ह्यामुळें, आधींच उत्कृष्ट असलेलें तें नगर विशेषच आल्हादजनक दिसत होतें. अर्जुना, राजाच्या आगमनानें सर्व लोकांच्या मुखावर आनंदाची परिपूर्ण छाया आली असल्यामुळें, इंद्राच्या योगानें अमरावती शोभते तशी ती अयोध्या नगरी शोभूं लागली.

असो; ह्याप्रमाणें तो राजर्षि कल्माषपाद आपल्या नगरींत गेल्यानंतर आपल्या पट्टराणीस त्यानें वसिष्ठ मुनींकडे पाठविलें. तेव्हां त्या भाग्यसंपन्न वसिष्ठ मुनींनीं समाधि लाविला, व दिव्य विधीनें त्या राणीशीं समागम करून तिच्या ठिकाणीं उत्तम गर्भाची स्थापना केली. पुढें त्या राजानें वसिष्ठ मुनींचा उत्कृष्ट प्रकारें सत्कार केल्यानंतर वसिष्ठमुनि आपल्या आश्रमाकडे गेले. पुढें पुष्कळ काळ लोटला तरी कल्माषपाद राजाची राणी प्रसूत होईना. तेव्हां त्या कीर्तिसंपन्न राणीनें पाषाणानें आपलें उदर फोडलें. तरी देखील तिच्या गर्भांत असणारा तो राजर्षि 'अश्मक' बाहेर आला नाहीं. शेवटीं तो बाराव्या वर्षी जन्म पावला. ह्यानेंच पौदन्य नांवाचें नगर वसविलें.

अध्याय एकशें अठ्याहत्तरावा.

—:०:—

और्वोपाख्यान.

गन्धर्व म्हणाला:—अर्जुना, अयोध्या नगरीहून मुनिश्रेष्ठ वसिष्ठ आपल्या आश्रमांत आल्यानंतर त्यांची स्नुषा अदृश्यंती ही प्रसूत झाली; आणि शक्ति मुनींच्या वंशास आधारभूत—जणू दुसरा शक्ति मुनिच—असा एक पुत्र प्रसवली. पुढें भगवान वसिष्ठ मुनींनींच त्या आपल्या पौत्राचे जातकर्मादि संस्कार केले. ह्या पौत्रानें वसिष्ठ मुनि परासु (मरणोन्मुख) झाले असतां त्यांस स्थापित केलें, (स्वस्थ स्थितींत आणिलें,) म्हणून त्याचें नांव पराशर असें पडलें. तो धर्मात्मा पराशर वसिष्ठ मुनींसच आपला पिता असें समजत असे, व जन्मापासून त्यांच्याशीं त्यानें पित्याप्रमाणेंच वर्तन ठेविलें होतें. तो आपल्या आईच्या देखत सुद्धां वसिष्ठ मुनींना 'तात' असें म्हणत असे. त्याच्या तोंडचे ते गोड शब्द ऐकतांच अदृश्यंतीच्या नेत्रांस पाणी येई. शेवटीं तिनें आपल्या पुत्रास सांगितलें कीं, "बा पराशरा, वसिष्ठ मुनींना तूं 'तात, तात' असें म्हणत जाऊं नकोरे! कारण, तात असें पित्यास म्हणावयाचें असतें, व तुझा पिता तर अरण्यामध्यें पूर्वीच राक्षसानें खाऊन टाकिला आहे. आतां तूं ज्यांना पिता असें समजतोस, ते तुझ्या कीर्तिसंपन्न पित्याचे पिते होत.

अर्जुना, मातेच्या तोंडचें हें भाषण ऐकतांच तो सत्यवादी पराशर अत्यंत दुःखाकुल झाला; व लागलीच त्यानें सर्व लोकांचा नाश करण्याचें मनांत आणिलें. परंतु वसिष्ठ मुनींनीं त्याचा निषेध केला.

वसिष्ठ म्हणालेः—बा पराशरा, पूर्वी कृतवीर्य म्हणून एक प्रख्यात सार्वभौम राजा होऊन गेला. तो भृगुकुलांतील ब्राह्मणांचा यजमान होता. त्यानें एकदा सोमयाग केला, तेव्हां त्याच्या शेवटीं त्यानें भृगुकुलांतील सर्व ब्राह्मणांस विपुल द्रव्य व धान्य देऊन संतुष्ट केलें. पुढें तो स्वर्गवासी झाल्यानंतर त्याच्या कुलांतील राजांस द्रव्याची गरज लागली असतां, भृगुकुलांतील ब्राह्मणांकडे पुष्कळ द्रव्य आहे असें त्यांना कळलें. तेव्हां ते त्यांजकडे द्रव्य मागावयास आले. त्या वेळीं कांहीं ब्राह्मणांनीं आपलें द्रव्य जमिनींत पुरून ठेविलें. कित्येकांनीं,

आपल्यापाशीं द्रव्य ठेविलें तर त्याला क्षत्रियांचें भय आहे म्हणून, तें ब्राह्मणांस अर्पण करून टाकिलें; व कित्येकांनीं मात्र दुसऱ्या कांहीं कारणाकडे दृष्टि देऊन हवें होतें तितकें द्रव्य त्या क्षत्रियांना दिलें. पुढें त्यांतील एका क्षत्रियास एका भृगूच्या घरामध्यें साहजिक रीतीनें जमीन खणीत असतां कांहीं द्रव्य सांपडलें. तेव्हां तें त्या सर्व क्षत्रियांनीं एकत्र जमून पाहिलें व त्यामुळें ते अत्यंत क्रुद्ध झाले असतां भृगुकुलांतील ब्राह्मण त्यांस शरण आले. तथापि त्यांचा अवमान करून, त्या महाधनुर्धर क्षत्रियांनीं तीक्ष्ण बाणांनीं त्या सर्वांचा वध केला. इतकेंच करून ते राहिले नाहींत, तर गर्भांत असलेल्या भृगुवंशांतील ब्राह्मणांसही कापून काढीत काढीत ते सर्व पृथ्वीवर फिरूं लागले.

वसिष्ठ सांगतातः—वत्सा, ह्याप्रमाणें जेव्हां भृगुवंशाचा उच्छेद होऊं लागला, तेव्हां भयामुळें भृगुवंशांतील पुरुषांच्या स्त्रिया अत्यंत बिकट अशा हिमालय पर्वतावर निघून गेल्या. त्या जात असतां, त्यांच्यापैकीं एका स्त्रीनें आपल्या पतिकुळाच्या अभिवृद्ध्यर्थ आपला महातेजस्वी गर्भ गर्भाशयांतून हालवून आपल्या एका मांडीमध्यें आणून ठेविला. ती गोष्ट एका दुसऱ्या स्त्रीस कळली. तेव्हां क्षत्रियांच्या भीतीनें त्या ब्राह्मणस्त्रीनें त्वरेनें जाऊन ती गोष्ट क्षत्रियांस गुप्त रीतीनें कळविली. त्याबरोबर ते सर्व क्षत्रिय त्या गर्भाचा वध करण्याविषयीं उद्युक्त होऊन तेथें गेले; आणि त्या अत्यंत तेजस्वी ब्राह्मणस्त्रीकडे पहातात न पहातात तों तिचा गर्भ मांडी फोडून बाहेर आला ! त्याचें तेज प्रखर सूर्याप्रमाणें होतें, ह्यामुळें त्याच्याकडे पाहतांच क्षत्रियांच्या नेत्रांस दिसेनासें झालें, पुढें ते नेत्रहीन झालेले सर्व क्षत्रिय त्या पर्वतांतील दुर्गम प्रदेशांत अंधळ्याप्रमाणें भटकूं लागले, आणि शेवटीं ते तेजोहीन अग्नीप्रमाणें झालेले राजे, आपल्यास पुनः दृष्टि मिळावी म्हणून त्याच ब्राह्मणस्त्रीस शरण जाऊन म्हणाले, "हे भगवति ! तूं आम्हांवर दया कर आणि तुझ्या प्रसादानें आम्हां क्षत्रियांस पूर्णपणें दृष्टि प्राप्त होऊं दे, म्हणजे आम्ही या दुःखापासून मुक्त होऊन परत जाऊं. हे कल्याणि, आपल्या पुत्रासहवर्तमान तूं आम्हांवर अनुग्रह कर. आमचें संरक्षण करण्याविषयीं तूं समर्थ आहेस."

अध्याय एकशें एकुणऐशींवा.

—:०:—

और्वाला पितरांचा उपदेश.

ब्राह्मणस्त्री म्हणालीः—बाबांनो ! मी तुमच्यावर रागावलेंही नाहीं, आणि मीं तुमच्या दृष्टीचेंही हरण केलेलें नाहीं. परंतु माझ्या मांडींतून उत्पन्न झालेला हा भृगुकुलोत्पन्न पुत्र 'भार्गव' मात्र तुम्हांवर रागावलेला असून, तुम्हीं त्याच्या बांधवांचा वध केल्याचें त्याला स्मरण झाल्यामुळें त्या महात्म्यानें क्रुद्ध होऊन तुमचे नेत्र हरण केले आहेत. बाबांनो ! जेव्हां तुम्ही भृगूच्या वंशांतील गर्भांचा देखील वध करूं लागलां, तेव्हां मीं हा गर्भ शंभर वर्षेपर्यंत आपल्या मांडीमध्यें घालून ठेविला. हा गर्भांत असतांच भृगुवंशाचें पुनः प्रिय करण्याच्या इच्छेनें षडंगांसहवर्तमान वेदानें ह्याचे ठिकाणीं प्रवेश केला ! तेव्हां आतां, तुम्हीं याच्या पितरांचा वध केल्यामुळें हा क्रुद्ध झाला असून तुमचा वध करूं इच्छीत आहे, व त्याच्याच दिव्य तेजाच्या योगानें तुमची दृष्टि नष्ट होऊन गेली आहे. तेव्हां, बाबांनो, आतां तुम्ही माझ्या ह्या पुत्रश्रेष्ठ और्वाचीच प्रार्थना करा. म्हणजे त्याच्या योगानें संतुष्ट होऊन हा तुमची दृष्टि तुम्हांस परत देईल.

वसिष्ठ म्हणालेः—ह्याप्रमाणें तिनें भाषण केलें असतां ते सर्व राजे त्या और्वास 'प्रसन्न हो' असें म्हणाले; व त्यानेंही त्या वेळीं त्यांच्यावर अनुग्रह केला. हा ब्रह्मर्षि आपल्या मातेचा उरु

(मांडी) फोडून निर्माण झाला, ह्यामुळेंच त्या साधुश्रेष्ठाची लोकांमध्यें और्व (मांडीतून जन्मलेला) ह्या नांवानें प्रख्याति झाली. असो. नंतर, दृष्टि परत मिळाल्यामुळें ते राजे परत गेले; पण त्या भृगुकुलोत्पन्न और्वानें मात्र सर्व लोकांचा पराभव करण्याचा विचार केला; आणि, बा पराशरा, त्या उदार मनाच्या और्वानें सर्व लोकांचा पूर्णपणें वध करण्याकडे एकसारखें आपलें अंतःकरण लाविलें, व त्या भृगुनंदनानें भृगुवंशांतील आपल्या पूर्वजांचा सन्मान करण्याच्या इच्छेनें सर्व लोकांचा विनाश करण्यासाठीं आपलें तप वाढविलें; आणि कडक अशा मोठ्या तपश्चर्येच्या योगानें, आपल्या पूर्वजांस आनंदित करण्यासाठीं त्यानें देव, दैत्य व मनुष्य ह्यांनीं युक्त असणारे सर्व लोक संतप्त करून सोडिले! तेव्हां, पराशरा, तो आपल्या कुलास आनंदित करणारा आहे असें कळून आल्यानंतर, त्याचे पितर पितृलोकांतून त्याच्या जवळ आले, व त्यांनीं त्याला उपदेश केला.

पितर म्हणाले:—बाळा और्वा, तुझ्या उग्र तपश्चर्येचा प्रभाव आम्हांस दिसून आला आहे. तेव्हां आतां तू लोकांवर अनुग्रह करून आपल्या क्रोधाचें नियमन कर. बा और्वा, अंतःकरण सुसंस्कृत असणाऱ्या आम्हीं भृगूंनीं, क्षत्रिय आमची हिंसा करीत असतांही त्यांच्या वधाविषयीं जें औदासीन्य स्वीकारिलें, तें कांहीं आम्हांमध्यें सामर्थ्य नव्हतें म्हणून नव्हे; तर, बा और्वा, जेव्हां आमचें आयुष्य फार वृद्धिंगत झालें, तेव्हां खेद झाल्यामुळें आम्हीं आपली आपणच क्षत्रियांकडून वध करून घेण्याविषयींची इच्छा केली. त्या वेळीं भृगूंच्या गृहामध्यें जें कोणीं द्रव्य पुरून ठेविलें होतें, तेंही वैर उत्पन्न व्हावें या उद्देशानें क्षत्रियांस क्रुद्ध करण्यासाठींच होय. कारण, हे द्विजश्रेष्ठ, केवळ स्वर्गाचीच इच्छा करीत असणाऱ्या आम्हांस द्रव्याचें काय प्रयोजन बरें! जें होतें तें द्रव्य जरी दिलें असतें, तरी कांहीं आमची हानि झाली नसती. कारण, कुबेरानें आम्हांला पुष्कळ द्रव्य देऊन ठेवलेलें होतें. सारांश, त्या वेळीं आम्हीं केलेल्या कृत्यांत स्वसंरक्षणाविषयींचा कांहीं उद्देश नव्हता. तर जेव्हां आम्हां सर्वांस घेऊन जाण्यास मृत्यु समर्थ होईना, तेव्हां आम्हीं केवळ मृत्यूसाठीं हा उपाय योजिला. शिवाय, त्यांच्याचकडून आपला वध करविण्याचें दुसरें कारण असें आहे कीं, आत्महत्या करणाऱ्या मनुष्यास चांगल्या लोकांची प्राप्ति होत नाहीं. तेव्हां आत्महत्या करणें उपयोगी नाहीं, असा विचार करून आम्हीं स्वतांचा देहपात केला नाहीं. सारांश, आम्हीं स्वतांसाठींच ह्या क्षत्रियांकडून तें कर्म करविलें; ह्यामुळें, तूं जें हें करीत आहेस, तें कांहीं आम्हांस प्रिय नाहीं. तेव्हां पातकास कारणीभूत असा सर्व लोकांचा पराभव करण्याच्या विचारापासून तूं आपलें अंतःकरण परावृत्त कर. सारांश, क्षत्रियांचा नाश करूं नको; आणि, बाळा, सप्त लोकांचाही नाश करूं नको. तर तपाच्या तेजास दूषित करणाऱ्या ह्या वृद्धिंगत झालेल्या आपल्या क्रोधाचाच नाश कर!

अध्याय एकशें ऐशींवा.

—:०:—

और्वपितृसंवाद.

और्व म्हणतो:—पितरहो, त्या वेळीं जी मीं सर्व लोकांचा विनाश करण्याविषयींची प्रतिज्ञा केली, ती माझ्याकडून कधींही निष्फळ व्हावयाची नाहीं. माझा रोष आणि प्रतिज्ञा हीं व्यर्थ करण्याविषयीं मला उत्साह होत नाहीं. कारण, जर रोषाचें कार्य केलें नाहीं, तर अग्नि ज्याप्रमाणें अरणीला जाळतो, त्याप्रमाणें तो मला दग्ध करून सोडील. जो मनुष्य सकारण आलेला क्रोध सहन करण्यास तयार होतो, तो

धर्म, अर्थ आणि काम ह्या त्रिवर्गांचें संरक्षण करण्याविषयीं असमर्थ होय. दुर्जनांस शासन आणि सज्जनांचें रक्षण करणाऱ्या राजांनींही आपल्या रागाचा योग्य ठिकाणीं उपयोग करावा हें योग्य आहे. पण ह्या क्षत्रियांनीं जो पूर्वी रोषाचा उपयोग केला तो मात्र बरोबर नाहीं. मी आपल्या मातेच्या मांडीमध्यें गर्भाशयांत असतां क्षत्रियांनीं भृगुकुलांतील पुरुषांचा वध केल्यामुळें माझ्या मातृवर्गानें केलेला आक्रोश मीं ऐकिला आहे. त्या वेळीं जेव्हां ह्या क्षत्रियाधमांनीं गर्भांचा सुद्धां उच्छेद करण्यापर्यंत मजल पोहोंचवून भृगुकुलाचा संहार करण्याचें आरंभिलें, तेव्हांच माझ्या हृदयांत क्रोधाचा संचार झाला. ह्यामुळें ह्या अधम क्षत्रियांचा वध करणें हें माझें कर्तव्य आहे. तसेंच, त्या वेळीं माझ्या मातृवर्गाचे गर्भ पूर्णदशेस आले असतांही त्यांस व माझ्या पितरांसही सर्व लोकांत खरोखर आश्रय म्हणून मिळाला नाहीं. ह्याप्रमाणें जेव्हां भृगुकुलांतील स्त्रियांवर कोणींही अनुग्रह केला नाहीं, तेव्हां ह्या माझ्या कल्याणकारक मातेनें मला आपल्या मांडीमध्यें धरून ठेविलें. पितरहो! ज्या वेळीं लोकांत पापाचा निषेध करणारा कोणी असतो, त्या वेळीं सर्व लोकांमध्यें पाप करणारा म्हणून कोणी निपजत नाहीं; पण जेव्हां पाप करणाऱ्या पुरुषास त्याचा निषेध करणारा कोठेंही मिळत नाहींसा होतो, तेव्हां पुष्कळ लोक पापकर्में करीत राहतात. म्हणूनच, त्या वेळीं कोणी निषेध करणारा नसल्यामुळें क्षत्रियांनीं हें पातक केलें आहे, व पुढें देखील हे असेंच करूं लागतील. तेव्हां ह्यांचा निग्रह केलाच पाहिजे. कारण, अंगीं सामर्थ्य असून जो मनुष्य पाप कळून आलें असतांही त्याचा निग्रह करीत नाहीं, त्याला तेंच पातक लागतें. असो. ह्या लोकामध्यें असणारे राजे आणि ऐश्वर्यसंपन्न लोक ह्यांच्या अंगीं सामर्थ्य असतांही त्यांच्या हातून जेव्हां आमच्या पितरांचें संरक्षण करणें शक्य झालें नाहीं, तेव्हांच मी त्यांजवर क्रुद्ध झालों आहें. कारण मी लोकांचा नियंता आहें; व ह्याचमुळें आपल्या सांगण्यासही मान देण्याविषयीं असमर्थ आहें. कां कीं, माझ्या अंगीं सामर्थ्य असतांही आपल्या भाषणास मान देऊन जर मीं ह्यांची उपेक्षा केली, तर कदाचित् लोकांचें पातक मला लागण्याची भीति आहे. शिवाय, माझ्या क्रोधापासून निर्माण झालेला जो हा अग्नि सर्व लोकांस भक्षण करूं इच्छीत आहे, तो जर मीं दाबून ठेविला, तर आपल्या तेजानें तो मलाच दग्ध करून टाकील. ह्यामुळें त्याचा निग्रह करणें हेंही श्रेयस्कर नाहीं! बरें, तुमचीही लोकांचें कल्याण करण्याची इच्छा आहे हें मला माहीत आहे. तेव्हां, हे सामर्थ्यसंपन्नहो, आतां तुम्हीच लोकांचें आणि माझेंही कल्याण करा.

पितर म्हणाले:—और्वा, हा तुझ्या क्रोधापासून निर्माण झालेला जो अग्नि लोकांस भक्षण करूं इच्छीत आहे, त्याला जलामध्यें सोडून दे. म्हणजे लोकांस भक्षण करण्याची त्याची इच्छा सफल होईल. कारण, तो जलांत गेला म्हणजे जल भक्षण करूं लागेल, व जलामध्यें सर्व लोक वास करीत आहेत, त्यामुळें अर्थातच त्यानें लोकांस भक्षण केल्यासारखें होईल. सर्व रस हे जलमय असून सर्व जग हें देखील जलमयच आहे. तेव्हां, हे ब्राह्मणश्रेष्ठा, तूं आपल्या ह्या क्रोधजन्य अग्नीचा जलामध्येंच

---

१ आपो मूलं हि सर्वस्य सर्वमप्सु प्रतिष्ठितम् ॥
आपोऽमृतरसो ह्यापः शुक्रमापो बलं महः ॥
सर्वस्य बीजमापो वै सर्वमप्सु प्रतिष्ठितम् ॥
बृहत्पराशरस्मृति.

(जल हेंच सर्वांचें आदिकारण असून जलामध्येंच सर्व कांहीं वास करीत आहे. जल हें अमृतरस असून जल हेंच वीर्य आहे. तसेंच बल व तेजही आहे. जल हेंच सर्वांचें बीज असल्यामुळें जलामध्यें सर्व कांहीं आहे.)

त्याग कर, म्हणजे झालें. तसेंच, हे विप्र, जर तुझी इच्छा असली, तर हा तुझा क्रोधजन्य अग्नि जल दग्ध करीत महासागरामध्यें राहूं दे. म्हणजे त्यानें लोकांस भक्षण केल्यासारखें होईल. कारण, लोक हे जलस्वरूपीच आहेत. असें केलें म्हणजे तुझी प्रतिज्ञाही खरी होईल, आणि देवादिकांसहवर्तमान ह्या लोकांचाही संहार होणार नाहीं.

वसिष्ठ सांगतातः–बा पराशरा ! त्यांनीं असें सांगितल्यानंतर, और्वानें तो अग्नि समुद्रांत टाकिला. तो महासागरामध्यें अद्यापिही जल भक्षण करीत आहे. वेदवेत्ते लोक सांगतात तें मोठें अश्वाचें मुख हाच अग्नि झाला असून, मुखांतून त्या अग्नीचे उद्गार टाकीत टाकीत महासागरांतील जल प्राशन करीत असतो. असो; बा पराशरा ! तुझें कल्याण होवो. मुला, परलोकाची माहिती असल्यामुळें त्वां देखील लोकांचा संहार करणें योग्य नाहीं.

अध्याय एकशें एक्यायशींवा.

—:०:—

राक्षससत्राचा उपक्रम.

गन्धर्व सांगतोः—ह्याप्रमाणें वसिष्ठांनीं सांगितलें असतां, महात्म्या ब्रह्मर्षि पराशरानें सर्व लोकांचा उच्छेद करण्याविषयींचा आपला क्रोध आवरला; व नंतर त्या सर्ववेदज्ञ शक्तिपुत्र पराशरानें राक्षससत्र नामक यज्ञ केला, त्या यज्ञांत, त्या महर्षीनें 'राक्षसानें शक्तीचा वध केला' ही गोष्ट लक्षांत आणून सर्व आबालवृद्ध राक्षसांना दग्ध करून टाकण्याचा उपक्रम केला. ह्या वेळीं, त्याच्या दुसऱ्या प्रतिज्ञेचा भंग आपल्याकडून होऊं नये असा विचार करून वसिष्ठांनीं त्यास राक्षसांच्या नाशापासून परावृत्त केलें नाहीं. यज्ञसमारंभ चालू असतां, प्रदीप्त झालेल्या तीन अग्नींच्या पुढें महामुनि पराशर हा चौथा अग्निच कीं काय असा दिसत होता. आपल्या तेजानें मेघपटलाचा नाश करणारा सूर्य जसा आकाशांत प्रकाशमान दिसतो, तसा यज्ञाच्या योगानें राक्षसांचा नाश करणारा शक्तिपुत्र पराशर त्या यज्ञमंडपांत प्रकाशमान दिसत होता. त्याच्याकडे पाहून, हा प्रतिसूर्यच आहे कीं काय असें तेथें असलेल्या वसिष्ठादिकांना वाटलें.

असो; याप्रमाणें तो राक्षसांचा नाश करणारा असा अनर्थकारक यज्ञ चालू असतां, त्या महातपस्वी पराशरास त्या भयंकर कर्मापासून परावृत्त करून त्यास यज्ञ बंद करावयास लावणें हें साधारण मनुष्यास केवळ अशक्य होतें. तेव्हां राक्षसांना वांचवावें या इच्छेनें उदार मनाचे अत्रि, पुलस्त्य, पुलह, क्रतु, महाक्रतु इत्यादि मोठमोठे मुनि तेथें आले; आणि त्यांपैकीं पुलस्त्य महामुनींनीं पुढें होऊन त्या शत्रुघातक पराशराशीं बोलण्यास आरंभ केला.

पराशरांस पुलस्त्य मुनींचा उपदेश.

पुलस्त मुनि म्हणालेः—बा पराशरा, तूं जें चालविलें आहेस, त्यापासून तुझी बुद्धि परावृत्त करण्याचा कोणीच प्रयत्न करीत नाहीं का ? आणि तुलाही अज्ञान व निरपराधी राक्षसांचा प्राण घेण्यापासून आनंद का होतो ? बा पराशरा ! माझ्या संततीचा उच्छेद करणें हें तुला मुळींच योग्य नाहीं. कारण तूं तपोनिष्ठ ब्राह्मण आहेस ! बाबा ! तपोनिष्ठांनीं अशा प्रकारचीं कृत्यें करावीं असें कोणत्याही धर्मांत सांगितलेलें मला माहीत नाहीं. तपोनिष्ठांचा शांति हा मुख्य धर्म होय; व त्याप्रमाणें त्वां आपलें आचरण ठेवावें हेंच योग्य आहे. प्रस्तुत जें अधार्मिक कृत्य तूं करीत आहेस, तें तुझ्या मोठेपणाला मुळींच शोभत नाहीं. आतां, तुझ्या स्वतांसंबंधानें जरी तुला विचार करावयाचा नसला, तरी निदान तुझ्या पित्याकडे तरी पहा; तो मोठा धर्मज्ञ असल्यामुळें त्याच्या मुलानें असें धर्मविरुद्ध वर्तन करणें हे त्यास लांच्छनास्पद होय. शिवाय माझ्या ह्या प्रजेचा उच्छेद करणेंही न्याय्य

नाहीं; कारण, त्यांनीं जो तुझ्या पित्याचा वध केला, त्यास कारण तो स्वतांच आहे. त्यानें दुसऱ्यास शाप देऊन जो अपराध केला, तो अपराधच त्याच्या मृत्यूस कारण झाला. नाहींपेक्षां, हे मुनिवर्या! त्याला भक्षण करण्याचें राक्षसाचें काय सामर्थ्य होतें! त्यानें जर राजाला शाप दिला नसता, तर राजानेंही त्यास भक्षण केलें नसतें. तर, बाबा! त्यानें स्वतांच आपल्यावर मृत्यु ओढवून घेतला. वास्तविक पाहिलें तर विश्वामित्र हे सुद्धां निमित्तमात्र होत; व राजा कल्माषपादाचीही स्थिति तशीच आहे. बरें, इतकेंही असून, राक्षसानें खाऊन टाकल्यामुळें शक्ति अथवा त्याचे धाकटे बंधु ह्यांची कांहीं हानि झाली आहे असेंही नाहीं. ते सर्व स्वर्गलोका गेले असून, त्यांचा समागम सदोदीत देवांशीं होत असल्यामुळें ते आनंदांत आहेत. महामुने, वसिष्ठ ऋषि हें सर्व जाणत आहेत. तेव्हां, हे ज्ञानवान पराशर मुने, ह्या गरीब बिचाऱ्या राक्षसांचा विनाकारण उच्छेद होत असून ह्या यज्ञास मात्र तू कारण होत आहेस, हें बरें नाहीं. याकरितां तूं आपला हा यज्ञ समाप्त कर. तुझें कल्याण असो.

राक्षससत्राची समाप्ति.

गंधर्व सांगतो:—ह्याप्रमाणें पुलस्त्य मुनींनीं भाषण केल्यानंतर वसिष्ठांनींही त्या शक्तिपुत्र पराशरास पुलस्त्य मुनींप्रमाणेंच सांगितलं; तेव्हां त्यानें यज्ञाची समाप्ति केली; व सर्व राक्षसांचे सत्र करण्यासाठीं तयार केलेला अग्नि त्यानें हिमालयाच्या उत्तरेच्या बाजूस एका मोठ्या अरण्यांत नेऊन टाकून दिला. तेथें तो अग्नि पर्वदिवशीं अद्यापिही राक्षस, वृक्ष आणि पाषाण भक्षण करतांना दृष्टीस पडतो.

अध्याय एकशें ब्यायशींवा.

—:०:—

कल्माषपादशापकथन.

अर्जुन विचारतो:—मित्रा, राजा कल्माषपादानें आपली स्त्री उपभोगाकरितां गुरुवर्य ब्रह्मनिष्ठ वसिष्ठ यांजकडे कशी पाठविली, व त्या धर्मज्ञ ऋषिश्रेष्ठांनीं तरी असलें अधर्मभूत अगम्यगमन कसें केलें? मला तर या गोष्टीविषयीं संशय आहे; याकरितां त्यासंबंधी खरी खरी हकीकत काय आहे ती सांगून माझा संशय दूर कर.

गंधर्व सांगतो:—हे दुर्जया धनंजया, तूं जो मला प्रश्न केलास, तत्संबंधी सर्व वृत्तांत मी तुला सांगतों, ऐक. वसिष्ठ पुत्र महात्मा शक्ति ह्यानें कल्माषपाद राजास काय कारणानें शाप दिला, तें तुला मीं पूर्वीं सांगितलेंच आहे. त्याप्रमाणें शाप झाल्यानंतर, क्रोधांध झालेला तो कल्माषपाद राजा शापग्रस्त होऊन आपल्या स्त्रीसहवर्तमान नगरांतून बाहेर पडला, व तिच्यासह घोर अरण्यांत निघून गेला. तें अरण्य नानाप्रकारच्या लहानमोठ्या वृक्षवेलींनीं अगदीं झांकून गेलें असून, त्यांत हरिणांचे कळप व अनेक जातींचे क्रूर पशु संचार करीत असल्याकारणानें तेथें मनुष्याचें दर्शन होणेंही अशक्य होतें.

असो; अशा प्रकारच्या त्या अरण्यांत भयंकर गर्जना करीत संचार करीत असतां, एके वेळीं त्यास अत्यंत क्षुधा लागल्यामुळें तो भक्ष्य शोधूं लागला. परंतु भक्ष्य पहातां पहातां तो अगदीं थकून गेला तरी त्यास कोठें भक्ष्य मिळेना! इतक्यांत त्या अरण्यांत एक ब्राह्मण आणि त्याची स्त्री हीं उभयतां विषयसुखास प्रवृत्त झालेलीं त्याच्या दृष्टीस पडलीं. परंतु त्यांचीही दृष्टि ह्याच्याकडे गेल्यामुळें त्यांना याचें भय वाटून, इच्छा पूर्ण झाली नसतांही तीं पळूं लागलीं. तरी शेवटीं त्या राक्षसत्व पावलेल्या राजानें

त्या पळत असलेल्या जोडप्यापैकीं ब्राह्मणास धरलेंच ! तेव्हां ती ब्राह्मणस्त्री अतिशय काकळुतीस येऊन त्याला म्हणाली:–हे सदाचारसंपन्न राजा, माझें एक म्हणणें तूं ऐकून घे. तूं सूर्यवंशांत जन्मलेला असून लोकविख्यात आहेस. त्याच-प्रमाणें, तूं प्रमाद न होऊं देतां धर्मानें वागत असून, गुरुसेवेंत तत्पर होतास. तेव्हां आतां जरी तूं शापानें भ्रष्ट झाला आहेस, तरी असें पाप-कर्म करणें तुला योग्य नाहीं. माझा ऋतुकाल प्राप्त झाला असल्यामुळें गर्भधारणेसाठीं मीं आपल्या पतीची संगति केली असून माझी इच्छा तर तृप्त झाली नाहींच, व पतिही संकटांत पडला ! यामुळें मला अतिशय दुःख होत आहे. याकरितां, हे राजश्रेष्ठा ! तूं मजवर दया कर, आणि माझ्या पतीला सोडून दे.

अर्जुना, ह्याप्रमाणें त्या ब्राह्मणस्त्रीनें आक्रोश करून पुष्कळ प्रकारें त्या कल्माषपादाची प्रार्थना केली; परंतु तिचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. व्याघ्र ज्याप्रमाणें आपणास प्रिय असलेला हरिण भक्षण करितो, त्याप्रमाणें त्यानें तिच्या पतीस भक्षण केलें ! तें त्याचें दुष्ट व भयंकर कृत्य पाहून ब्राह्मणाच्या स्त्रीस त्याचा अत्यंत क्रोध आला; तिच्या तळपायाची आग मस्तकास गेली; व दुःखाश्रूंनीं तिचे नेत्र भरून वाहूं लागले. तिच्या नेत्रांतून जे अश्रु खालीं पडले, त्यांपा-सून प्रखर अग्नि उत्पन्न होऊन तेथील प्रदेश पेटला; आणि पुढें. शोकसंतप्त व पतिदुःखानें व्याकूळ होऊन गेलेल्या त्या ब्राह्मणस्त्रीनें क्रो-धानें त्या कल्माषपाद राजास शाप दिला !

ब्राह्मणस्त्री म्हणाली:—अरे दुष्टा ! ज्या अर्थी माझे मनोरथ पूर्ण झाले नसतां माझ्या समक्ष तूं माझ्या महायशस्वी प्रियपतीस घातक्याप्र-माणें भक्षण केलें आहेस, त्या अर्थी, हे दुर्बुद्धे ! मी तुला असा शाप देतें कीं, ज्या वेळीं तूं ऋतुकाली आपल्या स्त्रीच्याजवळ जा-शील, त्या वेळेस तत्काळ तुझा प्राण जाईल ! तसेंच, ज्या वसिष्ठ मुनींच्या पुत्रांचा तूं नाश केला आहेस, त्या वसिष्ठांशींच समागम केल्यानंतर तुझ्या स्त्रीला पुत्र होईल; आणि, हे नराधमा, तोच पुत्र तुझ्या वंशास कारणीभूत होईल !

अर्जुना, ह्याप्रमाणें त्या राजास शाप दिल्यानंतर, अंगिरस कुलांतील त्या साध्वीनें तेथें प्रदीप्त झालेल्या अग्नींत राजाच्या समक्ष प्रवेश केला ! अर्जुना, ज्ञा-नयोग आणि तपःसामर्थ्य यांच्या योगानें महाभाग वसिष्ठ मुनींना हें सर्व कळून आलें. असो. पुढें बराच काळ लोटल्यानंतर तो राजर्षि शापमुक्त झाला नंतर तो ऋतुकालीं आपल्या मदयंती नामक स्त्रीकडे गेला. ह्या वेळीं मदनानें तो वेडावून गेलेला असल्यामुळें त्याला शापाचें स्मरण रा-हिलें नाहीं. परंतु त्याच्या स्त्रीनें त्याला शापाचें स्मरण देऊन त्याचा निषेध केला. तेव्हां त्याला पूर्व गोष्टींचें स्मरण होऊन त्याचें अंतःकरण गडबडून गेलें व त्यास अतिशय ताप झाला !

हे नरश्रेष्ठा पार्था, ह्याप्रमाणें त्या राजास शाप झाल्यामुळें त्या दोषानें त्यानें आपली स्त्री वसिष्ठ ऋषींकडे उपभोगाकरितां पाठविली. अर्थात त्या शापामुळेंच वसिष्ठ मुनींनाही तिचा अंगीकार करावा लागला !

अध्याय एकशें च्यायशींवा.

—:०:—

पुरोहितवरण.

अर्जुन म्हणाला:—गन्धर्वा, तुझ्या सांगण्या-प्रमाणें आम्ही पुरोहित करण्यास तयार आहों; तेव्हां आमचा पुरोहित होण्यास योग्य असा जो कोणी वेदवेत्ता पुरुष असेल, त्याचें नांव सांग. कारण तुला सर्व कांहीं माहीत आहे.

गन्धर्व म्हणाला:—देवल मुनींचे धाकटे बंधु धौम्य मुनि हे उत्कोचक नामक तीर्थावर तपश्च-

र्या करीत आहेत. तेव्हां तुझी इच्छा असली तर तूं त्यांना पुरोहित कर.

वैशंपायन सांगतातः—असें त्यानें सांगितल्यानंतर अर्जुनानें त्या गन्धर्वास यथाविधि आग्नेय अस्त्र अर्पण केलें, व त्यानें त्याला सांगितलें कीं, "मला जे तूं अश्व देणार आहेस, ते सध्यां तुझ्यापाशींच राहूं दे. कारण पडेल त्या वेळेस मी ते तुझ्याकडून घेईन, तुझें कल्याण असो." याप्रमाणें सांगितल्यानंतर गन्धर्व आणि ते पांडव ह्यांनीं परस्परांचा बहुमान केला, व नंतर ते त्या रमणीय भागीरथीतीरावरून आपापल्या इष्ट दिशेला निघून गेले.

असो. पुढें ते पांडव उत्कोचक तीर्थावर गेले, व धौम्य मुनींच्या आश्रमांत जाऊन, त्यांनीं त्यांस आपलें पुरोहितत्व स्वीकारण्याविषयीं विनंती केली. तेव्हां धौम्य मुनींनींही वन्य फलमूलांनीं त्यांचा योग्य आदरसत्कार करून त्यांच्या पौरोहित्याचा स्वीकार केला. धौम्य मुनींनीं पुरोहितत्व स्वीकारल्यामुळें पांडवांनाही मोठा आनंद झाला; व आतां राज्यलक्ष्मी व द्रौपदीही आपणांस प्राप्त झालीच असें त्यांना वाटलें. इतकेंच नव्हे, तर धौम्य मुनींसारखे पुरोहित मिळाल्यामुळें आपणास एक संरक्षकच मिळाला असें त्यांना वाटलें. कारण, ते अंतःकरणाचे उदार असून वेदार्थाचें तत्त्व जाणणारे होते व त्या धर्मात्म्यानें धर्मनिष्ठ पांडवांस आपले शिष्य केलें होतें. धौम्य मुनि आपणांस उपाध्याय मिळाले म्हणून पांडवांच्या मनाला जसा उत्साह वाटूं लागला, तसेंच बुद्धि, वीर्य, बल आणि धर्मनिष्ठा अंगीं असणारे ते पांडव केवळ देवच आहेत असें वाटून त्यांना राज्यप्राप्ति झाल्यासारखीच आहे, असें त्या धौम्य मुनींनाही वाटलें. पुढें त्या धौम्य मुनींनीं पुण्याहवाचन केल्यानंतर, नरपतिश्रेष्ठ पांडवांनीं द्रौपदीच्या स्वयंवरास जाण्याचा विचार केला.



स्वयंवरपर्व.

अध्याय एकशें चौऱ्यायशींवा.

—:०:—

पांडवांचा मार्गामध्यें ब्राह्मणांशीं संवाद.

वैशंपायन सांगतातः—नंतर ते नरश्रेष्ठ पांडव, द्रुपद राजाचा महोत्सवसंपन्न प्रदेश आणि द्रौपदी हीं अवलोकन करण्याच्या उद्देशानें निघाले. कुंतीही त्यांजबरोबर होती. वाटेनें, द्रौपदीस्वयंवराकरितां निघालेल्या ब्राह्मणांचे अनेक समुदाय त्यांना भेटले. तेव्हां त्यांनीं "तुम्ही आलां कोठून? जाणार कोठें" असें त्या ब्रह्मचारी पांडवांस विचारिलें. तेव्हां युधिष्ठिर म्हणाला, "आम्ही सर्व बंधु आणि ही आमची माता असे एकचक्रा नगरींतून आलों!"

ब्राह्मण म्हणालेः—तर मग आतां तुम्ही आमच्याबरोबर पांचाल देशाला चला. तेथें द्रुपद राजाच्या घरीं स्वयंवराचा मोठा उत्सव होणार असून त्याकरितां द्रव्यही पुष्कळच खर्च होणार आहे. आम्ही सर्व त्याकरितांच जात आहों. तेथील समारंभ मोठा प्रेक्षणीय असून आश्चर्यकारक आहे! अहो, जिचें स्वयंवर व्हावयाचें आहे, ती राजा यज्ञसेनाची कन्या यज्ञवेदीपासून उत्पन्न झालेली असून अत्यंत लावण्यसंपन्न आहे. तिचे नेत्र कमलपत्रांप्रमाणें असून सर्व अवयव तर अगदीं दर्शनीय आहेत. त्यांत दोष म्हणून कसला तो नाहींच! ती सुकुमारी मोठी विचारशील आहे. कवच, खड्ग, बाण आणि धनुष्य यांसहवर्तमान, अत्यंत प्रज्वलित झालेल्या अग्नीमधून उत्पन्न झालेला जो महातेजस्वी व प्रतापशाली द्रोणशत्रु धृष्टद्युम्न, त्याची ही भगिनी होय. तिचें नांव द्रौपदी असें आहे. त्या सिंहकटी सुंदरीचे शरिरास नीलकमलांप्रमाणें सुगंध येत असून त्याचा घमघमाट एक कोशपर्यंत चाललेला असतो. तेव्हां स्वयंवराविषयीं उत्साहयुक्त असलेली ती याज्ञसेनी आणि तो अपूर्व महोत्सव हीं पाहण्याकरितांच आम्ही चाललों आहों. त्या ठिकाणीं यज्ञ करणारे, विपुल दक्षिणा देणारे, अध्ययनसंपन्न, पवित्र, महात्मे, स्वीकारलेलें व्रत नियमानें चालविणारे, तरुण आणि देखणे असे राजे व राजपुत्र अनेक देशांहून येणार असून, अस्त्रविद्याप्रवीण असे अनेक महारथी राजेही येणार आहेत. आपणांस त्या समारंभांत जय मिळावा म्हणून ते तेथें आलेले राजे विपुल दक्षिणांसह गाई व उत्तम भोजनें ब्राह्मणांस देऊन अनेक प्रकारच्या देणग्याही देतील. तें सर्व घेऊन व स्वयंवर आणि उत्सवसमारंभ पाहून मग आपण वाटेल तिकडे जाऊं. तेथें नट, वैतालिक[1], नर्तक[2], सूत[3], मागध[4], मल्ल वगैरे अनेक गुणीजन अनेक देशांहून येणार आहेत. तेव्हां, हे महात्म्यांनो! तुम्ही मोठ्या उल्हासानें तो अपूर्व उत्सव पाहण्याकरितां चला. उत्सव पाहून व तेथें मिळेल ती दक्षिणा वगैरे घेऊन, पाहिजे तर आमच्याच बरोबर तुम्ही परत या. शिवाय, तेथें तुम्ही आलां असतां तुमचा दुसराही एक मोठा फायदा होण्याचा संभव आहे. तो हा कीं, तुम्ही दिसण्यांत सुंदर आणि देवांप्रमाणें तेजस्वी असे आहां. तेव्हां तुम्हांला पाहून कदाचित् दैवयोगानें तुमच्यापैकीं एखाद्याला द्रौपदी माळही घालील! [अर्जुनाकडे बोट करून धर्मराजास ब्राह्मण म्हणतातः—] तसेंच, हे महात्म्या, हा जो तुझा कांतिमान, सुरूप आणि महाशूर बंधु आहे, त्याची शत्रुविजयाकडे योजना केली तर दैवयोगानें हा त्यांचा पराभव करून द्रव्यही मिळवील, व असें झालें तर खरोखरच तुम्हां सर्वांना आनंदीआनंद होईल.

युधिष्ठिर म्हणालाः—महाराज! इतक्या प्रेमानें व कळकळीनें आपण आम्हांस सांगतां, तर

१ मंगलकारक वचनें बोलणारे. २ नाचणारे. ३ पुराणिक. ४ राजवंश सूचित करणारे.

तो अपूर्व स्वयंवरसमारंभ पाहण्याकरितां आम्ही तुमच्याबरोबर येतों; चला.

अध्याय एकशें पंचायशींवा.

—:०:—

द्रुपदपुरप्रवेश.

वैशंपायन सांगतातः—जनमेजया, ह्याप्रमाणें बोलणीं झाल्यावर, द्रुपद राजा ज्याचें रक्षण करीत होता त्या दक्षिणपांचाल देशाकडे पांडव निघाले; तों तेथें त्यांना भगवान व्यासांचें दर्शन झालें. तेव्हां पांडवांनीं त्यांचा योग्य सत्कार केला असतां व्यासांनींही त्याचा प्रेमानें स्वीकार केला. नंतर पांडवांनीं झालेला आणि ठरविलेला सर्व वृत्तांत त्यांना सांगितला. तो सर्व ऐकून घेऊन त्यांनीं त्यांच्या विचारास अनुमोदन दिलें. पुढें ते पांडव मार्गांतील रम्य सरोवरें आणि वनप्रदेश पहात पहात व मुक्काम करीत करीत द्रुपदाच्या राजधानीकडे चालले; तों कांहीं दिवसांनीं ते अध्ययनसंपन्न, पवित्र, प्रिय भाषण करणारे व रूपसंपन्न पांडुपुत्र पांचाल देशास जाऊन पोहोंचले. तेव्हां प्रथम त्यांनीं सर्व नगर पाहिलें, आणि नंतर ते एका कुंभाराच्या घरीं वस्तीस राहिले. तेथें ते ब्राह्मणाच्या वृत्तीनें राहून भिक्षा मागून निर्वाह करीत असत, यामुळें त्यांचें खरें स्वरूप कोणासही कळलें नाहीं.

जनमेजया, राजा यज्ञसेनाची इच्छा द्रौपदी पांडुपुत्र अर्जुनालाच द्यावी अशी होती. पण त्याचा शोध नसल्यामुळें त्यानें आपला हेतु प्रकट केला नव्हता. तथापि त्यानें अर्जुनाचा शोध लावण्याच्या उद्देशानें एक युक्ति केली. ती अशीः त्यानें एक अतिशय बळकट व अर्जुनावांचून इतरांस वांकवितांच येऊं नये असें धनुष्य तयार करविलें, व आकाशांत फिरणारें एक कृत्रिम यंत्र तयार करून त्याला तसेंच एक लक्ष्य लाविलें; आणि असें प्रसिद्ध केलें कीं, " जो कोणी हें धनुष्य सज्ज करून व तयार असलेल्या बाणांनीं लक्ष्याचा भेद करून इतरांस मागें सारील, त्यास माझी कन्या द्रौपदी मिळेल. "

राजा, ह्याप्रमाणें द्रुपद राजानें द्रौपदीच्या स्वयंवराविषयींचा वृत्तांत प्रसिद्ध केला असतां, तो समारंभ पाहण्याच्या इच्छेनें पृथ्वीवरील सर्व राजे, कर्णासह दुर्योधनादिक कौरव, महात्मे ऋषि, आणि देशोदेशींचे मोठमोठे विद्वान ब्राह्मण तेथें आले होते. द्रुपद राजानेंही त्या सर्वांचा उत्तम प्रकारें सत्कार करून त्यांची उत्तम व्यवस्था ठेविली होती. राजा, हे राजे इतके होते कीं, स्वयंवर पाहण्याकरितां जेव्हां ते स्वयंवरमंडपांत आले, तेव्हां त्यांना बसण्याकरितां जे मंचक (कोचें) ठेविले होते, त्यांजवर त्यांना अगदीं एकमेकांना खेटून बसावें लागलें. ह्याप्रमाणें समारंभाची जिकडे तिकडे गर्दी उडाली असल्यामुळें समुद्रगर्जनेप्रमाणें ध्वनि होऊन एकच कलकलाट होऊन गेला होता!

मंडपाची रचना.

जनमेजया, ह्या स्वयंवरसमारंभाकरितां जो मंडप घातला होता, तो फारच अपूर्व होता. हा नगराच्या ईशान्य बाजूस असून, तो ज्या भूमीवर घातला होता ती जागा सपाट व शुद्ध होती. त्याच्या सभोंवतीं उत्तम उत्तम वाडे बांधिले असून मध्यें हा मंडप घातला होता. या सर्व जागेच्या बाहेर एक मोठा कोट बांधिला असून त्याच्या बाहेर खंदक होता. कोटास सर्व दिशांस भव्य दरवाजे असून त्याच्यासमोर खंदकावर उत्तम कारागिराच्या कामाचे पूल बांधिले होते. कोटाच्या या मोठमोठ्या दरवाजांच्या मधल्या भागांत लहान लहान दरवाजे सारख्या प्रमाणांत केलेले होते, ह्यामुळें तो फारच शोभायमान दिसत होता. एकंदर समारंभाच्या मानानें स्वयंवरमंडपही अप्रतिम केला होता. मंडपास दिलेलें छत चित्रविचित्र असून तो सर्व मंडप चोहोंकडून शृंगारिलेला होता.

तें सर्व स्थान उंची आगुरूच्या धूपानें सुगंधित केलेलें असून तेथें चंदनाचे सडे घातले होते. ठिकठिकाणीं मोठमोठ्या पुष्पमाळा लावून तें ठिकाण फारच सुशोभित केलेलें होतें. ह्या मंडपाच्या सभोंवतीं जीं मंदिरें होतीं, तीं इतकीं उंच होतीं कीं, जणू काय तीं गगनालाच घर्षण करीत आहेत ! ह्याप्रमाणें कैलासशिखरांसारख्या तेजस्वी व शुभ्र अशा ह्या वाड्यांच्या मध्यभागीं मंडप असल्यामुळें त्यास पूर्ण रमणीयत्व आलें होतें. तेथें वाजंत्र्यांचे ताफे तर शेकडों लाविल्यामुळें त्यांच्या सुस्वर ध्वनीनें आणि प्रचंड लोकसमुदाच्या गलबल्यानें तें स्थान दुमदुमून गेलें होतें. स्वयंवरमंडपाच्या सभोंवतीं जे वाडे होते, ते समारंभाकरितां येणाऱ्या राजांकरितांच बांधिलेले असल्यामुळें तेही उत्तमच होते. त्यांचीं द्वारें होतीं, तीं सुवर्णाचीं असून त्या वाड्याची जमीन रत्नशिळांच्या फरसबंदीची होती. त्या वाड्यांत जे जिने होते, तेही रत्नशिळांचेच असून त्यांवरून जाण्यायेण्यास अगदीं कष्ट पडूं नयेत इतके ते सुगम केलेले होते. आंत ठिकठिकाणीं उत्तम प्रकारच्या बैठकी घातल्या असून जागजागीं पुष्पमाळा लाविल्यामुळें तीं स्थळें फारच मनोरम आणि आनंदमय होतीं. प्रत्येक ठिकाणची व्यवस्था बरोबर रहावी म्हणून अनेक सेवकांची योजना केली होती. उंची आगुरूच्या धूपानें ते वाडे सुगंधित केलेले असल्यामुळें त्या वाड्यांच्या सभोंवतालचा चार चार कोशपर्यंतचा प्रदेश सुवासानें दरवळून गेला होता. त्या गगनचुंबित वाड्यांच्या खिडक्यांत बसून सृष्टिसौंदर्य पहावें असें कोणास वाटेल, तर तेथें बसण्याच्या सोई असाव्या म्हणून कोठें मूल्यवान मंचक तर कोठें सुखासनें सिद्ध ठेविलीं होतीं. ह्या वाड्यांचा रंग सूर्यकिरणांप्रमाणें असल्यामुळें, हीं अनेक प्रकारच्या धातूंनीं संपन्न असलेलीं हिमालयाचीं शिखरेंच आहेत कीं काय असें वाटे. असो; अशा प्रकारच्या त्या सातमजली वाड्यांत सर्व राजे आपआपल्या लवाजम्यासुद्धां राहिले होते.

असो; राजा जनमेजया, समारंभाचा दिवस जसजसा जवळ येत चालला, तसतसा हा समाज फारच वृद्धिंगत होत चालला. तेथें त्या वेळीं अनेक प्रकारचीं धर्मकृत्यें चाललीं असून नटनर्तकांचे गाननृत्यादि अनेक मनोरंजक प्रकारही चाललेले असल्यामुळें तें स्थल आनंदानें गजबजून गेलेलें होतें. असो. पुढें स्वयंवराचा दिवस आला, तेव्हां महाबलवान, पराक्रमी, ऐश्वर्यसंपन्न, सुरूप, दानशूर, ब्राह्मणांचे हितकर्ते, आपापल्या राज्याचें उत्तम प्रकारें संरक्षण करणारे आणि लोकप्रिय असे सर्व राजे व इतरही लोक आपआपल्या ठिकाणीं विराजमान झाले. त्यांच्या बरोबरच ते पांडवही आलेले होते. ते सर्व आणि इतरही ब्राह्मणमंडळी व नागरिकजन हे द्रुपद राजाचें तें ऐश्वर्य पहात पहात, द्रौपदीचें दर्शन व्हावें ह्या इच्छेनें समुदायांत बसले, नंतर, सोळावे दिवशीं स्नान करून उत्तम वस्त्र परिधान केलेली व बहुमोल अलंकारांनीं विभूषित असलेली द्रौपदी सभेमध्यें आली. तिच्या हातांत अत्यंत सुशोभित अशी सुमनमाळा होती. असो. सोमकवंशांतील राजाच्या पुरोहितानें अग्नीभोंवतीं दर्भांचें परिस्तरण घालून यथाविधि घृताचें हवन केलें; व त्या योगानें अग्नीला तृप्त केल्यानंतर ब्राह्मणांकडून पुण्याहवाचन करविलें. त्यावेळीं सर्व प्रकारचीं मंगल वाद्यें वाजूं लागलीं.

ह्याप्रमाणें यथाविधि सर्व कृत्यें झाल्यानंतर सर्व वाद्यें बंद केलीं; व द्रुपदपुत्र धृष्टद्युम्न हा आपल्या भगिनीस घेऊन पुढें आला; आणि त्यानें सर्व लोकांना ऐकूं जाईल अशा मेघाप्रमाणें गंभीरवाणीनें मधुर व अर्थयुक्त भाषण केलें: तो म्हणाला, "हे नृपहो ! मी आपणां सर्वांस कांहीं सांगत आहें, तें आपण लक्षपूर्वक श्रवण करा ! येथें हें धनुष्य आहे,

व त्याच्याजवळ अत्यंत तीक्ष्ण असे बाण आहेत; त्यांपैकीं पांच बाण एकदम गरगर फिरणाऱ्या यंत्राच्या छिद्रांतून वर सोडून ते लक्ष्यावर मारिले पाहिजेत. हा लक्ष्यभेद करणारा उत्तम कुळांतला असून रूपवान आणि बलवान असावा. जो कोणी हें महत्कृत्य करील, त्याची ही माझी भगिनी निश्चयानें भार्या होईल!"

राजा जनमेजया, याप्रमाणें सर्व राजांना सांगून तो द्रुपदपुत्र तेथें जमलेल्या सर्व राजांचीं नांवें, पराक्रम आणि गोत्रें हीं आपल्या भगिनीस सांगूं लागला.

अध्याय एकशें शायशींवा.

—:०:—

भूपालनामनिर्देश.

धृष्टद्युम्न सांगतोः—द्रौपदि, दुर्योधन, दुर्विषह, दुर्मुख, दुष्प्रधर्षण, विविंशति, विकर्ण, सह, दुःशासन, युयुत्सु, वायुवेग, भीमवेगरव, उग्रायुध, बलाकी, करकायु, विरोचन, कुंडक, चित्रसेन, सुवर्चा, कनकध्वज, नंदक, बाहुशाली तुहुंड, विकट व आणखीही महाबलवान वीर धृतराष्ट्रपुत्र हे कर्णास बरोबर घेऊन तुझ्याकरितां येथें आलेले आहेत. तसेंच क्षत्रियांमध्यें श्रेष्ठ असे असंख्य पृथ्वीपति येथें आलेले असून शकुनि सौबल, वृषक आणि बृहद्बल हे सर्व गांधार देशाच्या अधिपतीचे पुत्रही आलेले आहेत. अश्वत्थामा आणि भोज हे उभयतां सर्व योद्ध्यांमध्यें श्रेष्ठ असणारे महात्मे उत्कृष्ट प्रकारचे अलंकार धारण करून प्राप्त झालेले आहेत. त्याचप्रमाणें बृहंत, मणिमान्, पृथ्वीपति दंडधार, सहदेव, जयसेन, भूपति मेघसंधि, व शंख आणि उत्तर ह्या पुत्रांसहवर्तमान विराट, तसेंच वार्धक्षेमि, सुशर्मा, आणि महीपति सेनाबिंदु, सुनामा व सुवर्चा ह्या दोन पुत्रांसहवर्तमान सुकेतु, सुचित्र, सुकुमार, वृक, सत्यधृति, सूर्यध्वज, रोचमान, नील, चित्रायुध, अंशुमान्, चेकितान, महाबलिष्ठ श्रेणिमान्, समुद्रसेनाचा पुत्र प्रतापशाली चंद्रसेन, जलसंध, विदंड आणि दण्ड हे उभयतां पितापुत्र, पौण्ड्रक वासुदेव, वीर्यवान भगदत्त, कलिंग देशाचा अधिपति, ताम्रलिप्ताचा अधिपति, पत्तनाधिपति, वीर रुक्मांगद आणि रुक्मरथ ह्या पुत्रांसहवर्तमान मद्र देशाचा अधिपति महारथी शल्य, कुरुवंशज सोमदत्त आणि त्याचा पुत्र महारथ, एकत्र असलेले शूर सूरि, भूरिश्रवा आणि शल हे तिघे, कांबोजदेशाधिपति सुदक्षिण, पूरुवंशांतील दृढधन्वा, बृहद्बल, सुषेण, उशीनर राजाचा पुत्र शिबि आणि चोरांचा वध करणारा कारूष देशाचा अधिपति हेही आलेले आहेत. तसेंच बलराम, श्रीकृष्ण, रुक्मिणीपुत्र वीर्यसंपन्न सांब आणि चारुदेष्ण, श्रीकृष्णाचा बंधु गद ह्याच्यासहवर्तमान प्रद्युम्न, अक्रूर, सात्यकि, महाबुद्धिमान उद्धव, कृतवर्मा, हार्दिक्य, पृथु, विपृथु, विदूरथ, कंक, गवेषणासहवर्तमान शंकु, आशावह, अनिरुद्ध, समीक, सारिमेजय, वीर वातपति, झिल्ली, पिंडारक, आणि पराक्रमी उशीनर हेही वृष्णिकुलोत्पन्न क्षत्रिय आलेले तुजला निवेदन केले. त्याचप्रमाणें भगीरथ, बृहत्क्षत्र, सिन्धुदेशाधिपति जयद्रथ, बृहद्रथ, बाल्हीक, महारथी श्रुतायु, उलूक, राजा कैतव, चित्रांगद, शुभांगद, बुद्धिमान वत्सराज, कोसलदेशाधिपति, पराक्रमशाली शिशुपाल, आणि जरासंध हे व आणखी दुसरेही अनेक देशांचे अधिपति भूमंडलावर प्रसिद्ध असणारे क्षत्रिय तुझ्यासाठीं ह्या ठिकाणीं प्राप्त झालेले आहेत. आतां, हे कल्याणि, हे पराक्रमी लोक तुझ्यासाठीं ह्या उत्कृष्ट प्रकारच्या लक्ष्याचा भेद करितील. तेव्हां जो ह्या लक्ष्याचा भेद करील, त्याच्या गळ्यांत तूं आज माळ घाल.

अध्याय एकशें सत्यायशींवा.

—:०:—

राजपराङ्मुखता.

वैशंपायन सांगतातः--राजा, धृष्टद्युम्नाचें हे भाषण ऐकतांच, अलंकार धारण केलेले, कानांत कुंडलें घातलेले, तारुण्यसंपन्न, परस्परांशीं स्पर्धा करणारे व अस्त्रविद्या आणि सामर्थ्य हीं काय तीं आपल्याच ठिकाणी आहेत असें मानणारे ते सर्व राजे शस्त्रें उगारून रंगभूमीकडे उड्या घेऊं लागले. त्या वेळीं रूप, वीर्य, कुल, सदाचार, संपत्ति आणि तारुण्य ह्यांजविषयींचा त्यांचा गर्व अत्यंत वाढला असल्यामुळें, ते मदाच्या वेगामुळें गंडस्थलांतून दानोदक गळणाऱ्या हिमालयपर्वतावरील गजराजांप्रमाणें दिसत होते. असो. परस्परांकडे स्पर्धेनें निरीक्षण करणारे व सर्वांगांत मदनाचा संचार झालेले ते राजे 'द्रौपदी ही माझीच आहे' असें म्हणत म्हणत एकदम सिंहासनावरून उठले. द्रौपदीस जिंकून घेण्याच्या इच्छेनें रंगभूमीवर जमलेले ते क्षत्रिय, पर्वतराज हिमालयाची कन्या उमा हिला मिळविण्याच्या इच्छेनें एकत्र जमलेल्या देवसमूहाप्रमाणे शोभत होते. ह्या वेळीं, शरीर मदनाच्या बाणांनीं पीडित होऊन अंतःकरण केवळ द्रौपदीकडेच लागून राहिल्यामुळे, ते राजे रंगभूमीवर गेल्यानंतर द्रौपदीच्या प्राप्त्यर्थ त्या ठिकाणा मित्रांचा देखील द्वेष करूं लागले. असो. नंतर यम आणि कुबेर यांस पुढें करून रुद्र, आदित्य, वसु, अश्विनीकुमार, सर्व साध्य, मरुद्गण इत्यादिक देवगण विमानांत बसून त्या ठिकाणी आले. तसेच दैत्य, गरुड, महासर्प, देवर्षि, गुह्यक, चारण, अप्सरासहवर्तमान गंधर्वश्रेष्ठ विश्वावसु, नारद आणि पर्वत हेही त्या ठिकाणीं प्राप्त झाले. तसच यादवश्रेष्ठ वृष्णि आणि अंधक ह्यांच्या कुलांतील थोर पुरुष व बलराम आणि श्रीकृष्ण हेही तेथें आले होते. हे सर्व यादव कृष्णाच्या मतानें वागणारे होते. तेथें जमलेल्या मुख्य मुख्य लोकांकडे पाहात असतां, त्या ठिकाणीं, मदमत्त झालेल्या गजेंद्रांप्रमाणें व कमलाच्या समीप असलेल्या गजनायकाप्रमाणें, लक्ष्याच्या समीप असलेले व रूपांतर केल्यामुळें भस्माच्छादित असणाऱ्या अग्नीप्रमाणें दिसणारे ते पांचजण पांडव दृष्टीस पडतांच यदुवीरश्रेष्ठ श्रीकृष्णानें मनांत ताडलें; व धर्मराज, भीम, अर्जुन आणि वीर नकुल व सहदेव हे आले असल्याचें वर्तमान त्यानें बलरामास सांगितलें. तेव्हां हलकेच त्यांस पूर्णपणें निरखून पाहून बलरामाचें अंतःकरण आनंदित होऊन त्यानें श्रीकृष्णाकडे पाहिलें. दुसरे जे इतर राजांचे पुत्र, पौत्र इत्यादि वीर त्या ठिकाणीं येऊन एकमेकांवर दांतओठ खात व डोळे लाल करून बसलेले होते, त्यांचे नेत्र आणि अंतःकरण ह्यांची वृत्ति एकसारखी त्या द्रौपदीकडेच जडून गेली असल्यामुळें त्यांची दृष्टि पांडवांकडे गेली नाहीं. इकडे, विशालबाहु धर्म, भीम व अर्जुन हे कुंतीपुत्र व महापराक्रमी वीर नकुल व सहदेव ह्यांजवरही मदनानें आपला अंमल बसविला होता. ह्या वेळीं आकाश देखील देव, ऋषि आणि गंधर्व ह्यांनीं व्याप्त झालें असून गरुड, नाग, असुर आणि सिद्ध ह्यांनीं भरून गेलेलें होतें. तसेंच तें आकाश दिव्य सुगंधानें भरून गेलेलें असून, त्या ठिकाणीं एकसारखी दिव्य पुष्पांची वृष्टि चाललेली होती. शिवाय, दुंदुभीच्या घनघोर आवाजानें तें व्याप्त होऊन गेलें असून त्यामध्यें विमानांची गर्दी होऊन गेलेली होती. तसेंच त्या ठिकाणीं चोहोंकडे अलगुज, वीणा आणि पणव ह्यांचाही आवाज घुमून राहिलेला होता. असो.

पुढें कर्ण, दुर्योधन शाल्व, शल्य, अश्वत्थामा, क्राथ, सुनीथ, वक्र, कलिंग, वंग, पांड्य आणि

पौण्ड्र ह्या देशाचे अधिपति विदेह देशचा राजा, यवन देशाचा अधिपति व दुसरेही त्या त्या राष्ट्राचे अधिपति, कमळपत्रांप्रमाणें नेत्र असणारे अनेक राजपुत्र आणि राजपौत्र ह्या राजांच्या समूहानें द्रौपदीच्या प्राप्तीसाठीं क्रमाक्रमानें आपला पराक्रम प्रकट केला. त्यांनीं किरीट, हार, बाहुभूषणें इत्यादि अलंकार धारण केलेले होते. हे पराक्रम आणि शक्ति ह्यांनीं युक्त असून ह्यांचे बाहुही विशाळ होते. ते बलानें आणि वीर्यानें क्रमाक्रमानें गर्जना करूं लागले होते, पण तें अत्यंत काठिन्ययुक्त धनुष्य पाहतांच ते सज्ज करण्याचें सामर्थ्य कोणाच्या केवळ मनास देखील होईना. तथापि कौतिकासाठीं धनुष्या जवळ जाऊन जेव्हां ते नरपति आपला पराक्रम प्रकट करूं लागले, तेव्हां, जरी त्यांच्या अंगीं त्यांच्या शक्तीप्रमाणें धनुर्विद्याप्रवीणता व पराक्रम हीं होतीं, तरी तें धनुष्य फार बळकट असल्यामुळें वांकवितेवेळीं हलकावे खाऊं लागलें, व त्यामुळें ते राजे फेंकून दिल्याप्रमाणें भूमीवर पडून तडफडूं लागले! त्यांचें धैर्य खचून जाऊन कीरीट व हार स्थानभ्रष्ट होऊन पडले. ह्यामुळें ते धापा टाकीत निराश होऊन पडले. ह्याप्रमाणें तें बळकट धनुष्य वांकविण्याच्या कामीं अशी दुर्दशा झाल्यामुळें हार, बाहुभूषणें इत्यादिक अलंकार अस्ताव्यस्त होऊन गेलेलें तें राजमंडल द्रौपदीविषयींची इच्छा निवृत्त होऊन हाहाकार करीत व्याकूळ होऊन पडलें.

ह्याप्रमाणें त्या सर्व राजांची स्थिति झाली आहे असें पाहून, धनुर्धरांमध्यें श्रेष्ठ असा कर्ण त्या धनुष्यासमीप गेला, व त्यानें तें धनुष्य उचलून चटदिशीं वर धरिलें व तें सज्ज करून त्यास हां हां म्हणतां बाण जोडिले. चंद्र आणि सूर्य ह्यांहूनही अत्यंत तेजस्वी आणि प्रत्यक्ष सूर्याचा पुत्र अशा कर्णानें द्रौपदीविषयींच्या प्रेमानें लक्ष्यभेद करण्याची प्रतिज्ञा केली आहे असें पाहतांच, त्या धनुर्धर पांडुपुत्रांस, त्यानें तें लक्ष्य भिन्न करून भूमीवर पाडलेंच असें वाटलें. परंतु त्या कर्णास पाहतांच द्रौपदीनें 'मी सूत जातीच्या पुरुषास वरावयाची नाहीं' असें मोठ्यानें सांगितलें. तेव्हां, निकृष्ट प्रतीच्या कुलांत जन्म दिल्यामुळें क्रोधानें, व सूर्यासारख्याच्या हातूनही अशी चूक घडली ह्यामुळें हसून, कर्णानें आपला जनक सूर्य ह्याकडे अवलोकन केलें, व इतरांच्या हातून निसटून गेलेलें तें धनुष्य टाकून दिलें!

ह्याप्रमाणें आसमंताद्भागीं असणारे ते क्षत्रिय त्या कर्णापासून परावृत्त झाले असतां, चेदि देशाचा अधिपति बलवान, यमतुल्य, महाबुद्धिमान, धैर्यसंपन्न आणि वीर असा दमघोषाचा पुत्र शिशुपाल हा पुढें गेला, व धनुष्यास हात घालूं लागतांच गुडघे आपटून भूमीवर पडला. नंतर महाबलवान आणि महावीर्यसंपन्न राजा जरासंध हा धनुष्याच्या जवळ येऊन पर्वताप्रमाणें स्तब्ध उभा राहिला, व धनुष्य वांकवूं लागला असतां गुडघे आपटून भूमीवर पडला. ह्यामुळें तो राजा उठून लागलीच आपल्या देशाकडे निघून गेला. नंतर मद्र देशाचा अधिपति महाबलवान आणि महावीर शल्य हाही ते धनुष्य सज्ज करूं लागला असतां, त्याचीही तीच स्थिति झाली; ह्यामुळें त्या समाजांतील लोकांत गडबड उडून गेली; व राजे लोकांच्या बढायाही बंद झाल्यानंतर कुंतीपुत्र महावीर अर्जुन ह्यानें तें धनुष्य सज्ज करून त्यास बाण जोडण्याचें मनांत आणिलें.

अध्याय एकशें अठ्यायशींवा.

—:०:—

अर्जुनहस्तें लक्ष्यभेद.

वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें जेव्हां ते सर्व राजे धनुष्य सज्ज करण्याच्या खटपटीपासून

परावृत्त झाले, तेव्हां मग उदार अंतःकरणाचा अर्जुन ब्राह्मणांच्या मधून उठला आणि त्या धनुष्याकडे जाऊं लागला. तो इंद्रध्वजाप्रमाणें कांतिमान अर्जुन धनुष्याकडे जात आहे असें पाहून तेथील मुख्य मुख्य ब्राह्मण कृष्णाजीनें झाडीत झाडीत ओरडूं लागले. त्यांतील कित्येकांच्या अंतःकरणास वाईट वाटलें, व कित्येकांस आनंद झाला. कांहीं चतुर आणि कल्पक होते, ते परस्परांत म्हणू लागले कीं, "अहो! कर्णासारख्या व शल्यासारख्या धनुर्वेदांत पारंगत असलेल्या लोकविख्यात क्षत्रियांस जें वांकावितांही आलें नाहीं, तें धनुष्य, हे द्विजहो, अस्त्रांचा अभ्यास न केलेला आणि शक्तीच्या बाजूनेंही अत्यंत दुर्बल असा हा केवळ ब्रह्मचारी कसा सज्ज करूं शकणार? अहो, उतावीळपणामुळें विचार न करितां केलेलें हें कर्म जर सिद्धीस गेलें नाहीं, तर मग आम्ही ब्राह्मण सर्व राजेलोकांच्या उगीच उपहासास मात्र पात्र होऊं. म्हणून, आनंदानें असो, किंवा गर्वानें असो, अथवा ब्राह्मण जातीच्या गडबड्या स्वभावामुळें असो, जर हा धनुष्य सज्ज करावयाला जात असला, तर त्याचा निषेध करा. कारण त्यानें न जावें हें चांगलें."

कांहीं ब्राह्मण म्हणाले:—आम्ही उपहासास पात्र होणार नाहीं, आणि आमच्या पदरीं क्षुद्रपणाही यावयाचा नाहीं; त्याचप्रमाणें, राजे लोकांच्या द्वेषासही आम्ही पात्र होणार नाहीं.

दुसरे कित्येक म्हणाले:—हा तरुण पुरुष मोठा कांतिमान आणि हत्तीच्या सोंडेप्रमाणे गुटगुटीत दिसत आहे, व त्याचे स्कंध आणि बाहु हे पुष्ट असून हा धैर्याच्या बाजूनें केवळ हिमालयाप्रमाणें अढळ आहे. ह्या कांतिमान पुरुषाची चालण्याची शैली सिंहाच्या लीलागतीप्रमाणें असून त्याचीं पावलें मदोन्मत्त झालेल्या हत्तीप्रमाणें पडत आहेत. ह्यामुळें ह्याच्या ठिकाणी हें कर्म होण्याचा संभव दिसतो; आणि ह्याच्या उत्साहावरूनही असेंच अनुमान होतें. हा ह्याचा अत्यंत उत्साह त्याच्या शक्तीचाच द्योतक आहे; कारण असमर्थ असेल तो आपण होऊन धनुष्याकडे जाणारच नाहीं. शिवाय, शरीर धारण करून असणारे देवादिक जे कांहीं लोक आहेत, त्यांच्यामध्यें कोणत्याही लोकांत असें मुळीं कर्मच नाहीं, कीं जें ब्राह्मणांना असाध्य होणार नाहीं! ब्राह्मण हे जरी केवळ जल भक्षण करून असणारे, केवळ वायु खाऊन राहणारे, अथवा केवळ फलांवरच निर्वाह करणारे व म्हणूनच निर्बल असले, तरी त्यांचें व्रत दृढ असून ते स्वतांच्याच तेजानें अत्यंत बलिष्ठ असतात. ह्याचसाठीं, चांगलें किंवा वाईट कसलेंही आचरण करीत असला, तरी ब्राह्मणाचा अवमान करूं नये. अत्यंत दुःखदायक जरी कर्म असलें, तरी ब्राह्मणाला सुखदायकच होतें; व मोठें जरी कर्म असलें, तरी ब्राह्मणापाशीं क्षुद्र होऊन जातें. पहा—एकट्या जमदग्निपुत्र परशुरामानें पृथ्वीवरील सर्व क्षत्रिय जिंकून सोडिले, व अगस्तीनें आपल्या ब्राह्मतेजाच्या योगानें अगाध समुद्रही प्राशन केला. मग हा तरी हें धनुष्य सज्ज करणार नाहीं म्हणून कशावरून? तर "हा महापराक्रमी बटु सत्वर जाऊन धनुष्य सज्ज करो" असें तुम्ही सर्वजण म्हणा. राजा, नंतर सर्व ब्राह्मणांनीं 'तथास्तु' असें म्हटलें. ह्याप्रमाणें त्या ब्राह्मणांचीं आपआपसांत नानाप्रकारचीं भाषणें चाललीं आहेत तों अर्जुन धनुष्याच्या समीप जाऊन निश्चल अशा पर्वताप्रमाणें उभा राहिला. नंतर त्या धनुष्याच्या भोंवतीं फिरून त्यानें त्यास प्रदक्षिणा घातली; आणि वरप्रदान करणारा देव प्रभु श्रीशंकर ह्यास नम्रतापूर्वक प्रणाम करून व अंतःकरणांत श्रीकृष्णाचें स्मरण करून त्यानें त्या धनुष्यास हात घातला; आणि रुक्म, सुनीथ, वक्र, कर्ण, दुर्योधन, शल्य,

शास्त्र इत्यादि केवळ धनुर्वेदांत पारंगत अशा पुरुषश्रेष्ठ पृथ्वीपतींस मोठ्या प्रयासानेंही जें सज्ज करितां आलें नाहीं, तें धनुष्य त्या वेळीं श्रीविष्णूप्रमाणें प्रभावशाली व पराक्रमी लोकांत अभिमानी असणाऱ्या इंद्रपुत्र अर्जुनानें डोळ्याचें पातें लवतें न लवतें इतक्यांत सज्ज करून हातांत ते पांच बाण घेतले, व लक्ष्यभेद केला ! तेव्हां तें लक्ष्य छिन्नभिन्न होऊन एकदम खालीं पडलें असतां आकाशामध्यें ध्वनि होऊं लागला, व त्या समाजामध्येंही कल्होळ झाला ! ह्या वेळीं, शत्रूंचा वध करणाऱ्या अर्जुनाच्या मस्तकावर इंद्रानें पुष्पांचा वर्षाव केला; हजारों ब्राह्मणांनीं आनंदित होऊन आपल्या वस्त्रांचे ध्वज उभारले; व आपणास लक्ष्यभेद करितां आला नाहीं, पण तो एका ब्राह्मणाच्या पोरानें केला, यामुळें अपमान वाटून जे लोक खट्टू होऊन गेले होते ते चोहोंकडून हाहाकार करूं लागले. त्या वेळीं त्या ठिकाणीं आकाशांतून चोहोंकडे पुष्पवृष्टि झाली; वाजंत्री लोक शेंकडों प्रकारचीं वाद्यें वाजवूं लागले; व सूत आणि मागध ह्यांचे समुदाय मधुर स्वरानें स्तुति करूं लागले. तेव्हां त्या अर्जुनास अवलोकन करितांच राजा द्रुपदास आनंद झाला; व द्रौपदी मिळाली नाहीं म्हणून क्षुब्ध होऊन जर इतर राजे युद्ध करतील, तर आपल्या सैन्यानिशीं त्याला साहाय्य करावयाचें त्यानें मनांत आणिलें. असो. त्या ठिकाणीं जेव्हां तो कलकलाट अधिक अधिकच होऊं लागला, तेव्हां धार्मिकश्रेष्ठ युधिष्ठिर हा पुरुषश्रेष्ठ नकुल व सहदेव ह्या उभयतांसहवर्तमान आपल्या बिऱ्हाडाकडे निघून गेला.

इकडे, लक्ष्याचा भेद झाला असून लक्ष्यभेद करणारा अर्जुन हा केवळ इंद्राची प्रतिमाच आहे असें अवलोकन करून द्रौपदी ही श्वेतवर्ण वस्त्रें आणि पुष्पमाला घेऊन मंदहास्य करीत करीत कुंतीपुत्र अर्जुन ह्याच्या समीप गेली. तेव्हां, ज्याचें कर्म अंतःकरणास देखील अगोचर, असा तो अर्जुन तिला जिंकून घेऊन रंगस्थलावरून निघून गेला. त्या वेळीं ब्राह्मणांनीं त्याचा उत्तम प्रकारें बहुमान केला. असो. तो रंगस्थलावरून जाऊं लागला तेव्हां द्रौपदीही त्याच्या मागोमाग गेली.

अध्याय एकशें एकुणनव्वदावा.

—:०:—

नृपालकोप.

वैशंपायन सांगतातः—राजा, द्रुपद राजा त्या लक्ष्यवेध करणाऱ्या ब्राह्मणास कन्या देऊं इच्छीत असल्यामुळें ते सर्व राजे संतप्त झाले, आणि परस्परांकडे पाहून म्हणूं लागले, अहो, " आम्ही येथें जमलों असतां आम्हांला तृणतुच्छ मानून व मर्यादेचा अतिक्रम करून हा राजा ह्या स्त्रियांमध्यें अत्युत्कृष्ट असणाऱ्या द्रौपदीस एका ब्राह्मणास देऊं इच्छीत आहे. हें ह्याचें करणें म्हणजे एखाद्याला फळ मिळण्याच्या संधीस वृक्षावरून खालीं लोटून देण्यासारखें आहे. तेव्हां जो हा दुरात्मा आम्हांला जुमानीत नाहीं, त्याला ठार करून सोडूं म्हणजे झालें ! हा सन्मान करण्याला योग्य नाहीं; व ह्याच्या ह्या गुणांमुळें, वृद्ध लोकांशीं जसें वर्तन ठेवितात तसें ह्याच्याशीं आचरणही ठेवणें ठीक नाहीं. तेव्हां ह्या राजांच्या द्वेष्ट्याला त्याच्या पुत्रासह मारूनच टाकूं म्हणजे झालें. कारण, ह्यानें सर्व नरपतींस निमंत्रण करून आणिलें, त्यांचा प्रथम सत्कारही केला, त्यांना सुग्रास अन्नाचें भोजनही दिलें, आणि आतां शेवटीं मात्र हा त्यांना जुमानीत नाहींसा झाला आहे ! देवांच्या समुदायाप्रमाणें असणाऱ्या ह्या राजसमूहांत संबंधास योग्य असा कोणी राजा ह्याला दिसलाच नाहीं का ? शिवाय स्वयंवर कन्येला वरण्याचा अधिकार ब्राह्मणांला नाहीं. कारण, ' स्वयंवर करण्याचें काम क्षत्रियांचें आहे, ' असें सुप्रसिद्ध वेदवचन आहे. आतां, ही

कन्याच जर आम्हांपैकीं कोणाला वरीत नसेल, तर, हे नृपहो, हिला अग्नीमध्यें फेकून देऊन अपण आपल्या राष्ट्राकडे चालते होऊं. पण खोडकरपणामुळें असो, किंवा कन्या मिळण्याच्या आशेमुळें असो, ह्या ब्राह्मणानें जरी आम्हां पृथ्वीपतींचा अपराध केला असला, तरी त्याचा वध करणें मात्र कोणत्याही प्रकारें योग्य नाहीं! कारण आमचे राज्य, जीवित, द्रव्य, पुत्र, पौत्र आणि दुसरीही जी कांहीं संपत्ति आहे, ती सर्व ब्राह्मणांच्याचकरितां आहे. द्रुपदाला तरी शासन करण्याचें कारण इतकेंच कीं, दुसऱ्याचा अपमान करण्याची लोकांस भीति वाटूं लागावी, व त्यांनीं स्वधर्माचें संरक्षण करावें. व त्यामुळें पुनः दुसऱ्याही स्वयंवराची अशीच स्थिति होऊं नये.

भीमार्जुनांची युद्धाविषयीं तयारी.

ह्याप्रमाणें भाषण केल्यानंतर ते सर्व महापराक्रमी राजे, आपआपलीं शस्त्रें सरसावून द्रुपदाला मारण्याच्या इच्छेनें त्याच्या अंगावर चालून गेले. तेव्हां पुष्कळ लोक आपणावर धनुष्यें घेऊन चाल करून येत आहेत असें पाहतांच, आतां ब्राह्मण क्रुद्ध होऊन सर्वच क्षत्रियांस भस्म करून टाकितील अशी द्रुपद राजास अत्यंत भीति वाटूं लागली, व त्यामुळें तो ब्राह्मणांसच शरण गेला. नंतर, शत्रूंची खोड जिरविणारे महाधनुर्धर अर्जुन आणि भीमसेन ह्या उभयतांनीं जाऊन, मदोन्मत्त झालेल्या हत्तीप्रमाणें वेगानें धावून येणाऱ्या त्या राजांस तोंड दिलें. तेव्हां गोधा आणि अंगुलित्राण हातांस बांधलेले ते राजेलोक शस्त्रें उगारून त्या कुरुवंशज अर्जुन आणि भीमसेन ह्या उभयतांवर उड्या घालूं लागले. तेव्हां वज्राप्रमाणें बळकट आणि अद्भुत व भयंकर कर्मे करणाऱ्या व एखाद्या गजराजाप्रमाणें असणाऱ्या महाबलवान वीर भीमसेनानें एक वृक्ष उपटला, व त्याचीं पानें काढून टाकिलीं. नंतर तो हातांत घेऊन, तो पुष्ट आणि विशाल बाहु असणारा व शत्रूंची दाणादाण उडवून देणारा कुंतीपुत्र भीमसेन, हातांत भयंकर दंड घेऊन उभा राहणाऱ्या पितृराज यमाप्रमाणें त्या पुरुषश्रेष्ठ अर्जुनाच्या समीप जाऊन उभा राहिला. हें आपल्या बंधूचें कर्म पाहून, कल्पनेसही अगोचर अशीं कर्में करणाऱ्या, मानवी बुद्धीस अतिक्रमण करून असणाऱ्या, व देवेंद्रासारखीं कृत्यें करणाऱ्या अर्जुनास अत्यंत विस्मय वाटला; आणि नंतर धनुष्य घेऊन तो भीति सोडून देऊन तेथें उभा राहिला.

श्रीकृष्णांचें बलरामाशीं भाषण.

जनमेजया, इकडे अर्जुन आणि त्याचा बंधु भीमसेन ह्यांचें हें कृत्य पाहतांच, मनुष्यांच्या बुद्धीस अतिक्रम करून असणारे व अचिंत्य कर्में करणारे श्रीकृष्ण हे भयंकर पराक्रमशाली बंधु बलराम ह्यास म्हणाले, "हा जो श्रेष्ठ सिंहाप्रमाणें लीलेनें गमन करीत असून ताल वृक्षाच्या प्रमाणाचें मोठें धनुष्य वांकवीत आहे, तो खास अर्जुनच आहे. हे बलराम, मी जर नांवाचा खरा कृष्ण आहें, तर ह्या गोष्टीविषयीं मुळीं विचारच करावयास नको. तसेंच, हा जो वेगानें वृक्ष मोडून घेऊन ह्या राजसमूहाचा पराभव करण्याविषयीं प्रवृत्त झाला आहे, तो भीमसेनच असला पाहिजे. कारण, भीमसेनावांचून ह्या युद्धामध्यें असलें कृत्य करण्याविषयीं पृथ्वीमध्यें दुसरा कोणीही समर्थ नाहीं. हे स्थैर्यसंपन्न बलराम, कमलांप्रमाणें विशाल नेत्र, महासिंहाप्रमाणें गति, व लांबट, सोज्ज्वल आणि सुंदर नासिका असणारा व गौरवर्ण, बांध्यानें सडपातळ आणि विनयशील असा जो पुढें निघून गेला, तो धर्मराज

१ धनुष्याच्या दोरीचा आघात होऊं नये म्हणून मनगटास जी चामड्याची पट्टी बांधलेली असते, तिला गोधा व बोटांस बांधलेल्या तसल्याच पट्टीस अंगुलित्राण असें म्हणतात.

आहे; आणि दुसरे जे दोघे जणू कृत्तिकापुत्र कार्तिकस्वामी ह्याची जोडीच असे त्याजबरोबर गेले आहेत, ते नकुलसहदेव असावे अशी माझी कल्पना आहे. शिवाय, कुंतीसह पांडव लाक्षागृहाच्या दाहांतून सुटून गेलेले आहेत असें मीं ऐकिलें आहे, तेव्हां हेच ते असावे अशी कल्पना करण्यास जागा आहे."

श्रीकृष्णाचें हें भाषण ऐकून बलराम पांडवांकडे निरखून पाहूं लागला, तों तात्काळ त्यानें त्यांस ओळखिलें. तेव्हां कांतीनें निर्जल मेघाप्रमाणें असणारे बलराम श्रीकृष्णास म्हणाले, "ह्या कुरुकुलश्रेष्ठ पांडवांसह आमच्या आत्याबाई लाक्षागृह दाहरूपी संकटांतून मुक्त झाल्या, हे पाहून मजला फार आनंद होत आहे!"

अध्याय एकशें नव्वदावा.

—:०:—

राजांशीं युद्ध व त्यांचा पराजय.

वैशंपायन सांगतातः—जनमेजय राजा, ह्याप्रमाणें पुढें जेव्हां युद्धाचा प्रसंग आला, तेव्हा तेथील ते ब्राह्मण मोठ्या आवेशानें कृष्णाजिनें झाडीत-झाडीत व कमंडलु हालवीत हालवीत म्हणाले, "अहो, भिऊं नका! भिऊं नका! आम्ही शत्रूंशीं लढाई करतों." राजा, त्या ब्राह्मणांचें हें भाषण ऐकून अर्जुन हसल्यासारखें करून त्यांना म्हणाला, "ब्राह्मणश्रेष्ठहो! आपण स्वस्थ असा, आणि काय होतें तें पहा म्हणजे झालें! मंत्री ज्याप्रमाणें फणफणून अंगावर चालून आलेल्या सर्पास मंत्रानें घालवून देतात, त्याप्रमाणें, अत्यंत क्रुद्ध होऊन आलेल्या या शत्रूंस मी आपल्या शरवृष्टीनें घालवून देतों!"

राजा, ह्याप्रमाणें ब्राह्मणांना सांगून महाबलवान अर्जुनानें तें पणामध्यें मिळविलेलें प्रचंड धनुष्य हातीं घेतलें; व तें सज्ज करून तो एखाद्या पर्वताप्रमाणें निश्चल उभा राहिला. तेव्हां त्याचा ज्येष्ठ बंधु भीमसेनही त्याच्या साह्यार्थ तेथें गेला. नंतर त्यांनीं चोहोंकडे अवलोकन केलें, तों युद्धज्ञानाविषयींच्या अभिमानानें ताठलेले कर्णप्रभृति क्षत्रिय त्यांच्या दृष्टीस पडले. तेव्हां हत्ती ज्याप्रमाणें आपणाशीं टक्कर देणाऱ्या दुसऱ्या हत्तीवर चालून जातो, त्याप्रमाणें ते उभयतां त्यांजवर तुटून पडले. त्या वेळीं ते युद्धास सिद्ध झालेले राजे कठोर भाषणें बोलूं लागले: ते म्हणाले, "अहो! युद्ध करण्याच्या इच्छेनें ब्राह्मण जरी आला, तरी संग्रामामध्यें त्याचा वध करितां येतो हें आम्हांला माहीत आहे. तेव्हां आमच्याशीं युद्ध करणारे हे ब्राह्मण असले तरी त्यांस ठार मारण्यास कोणत्याही प्रकारचा प्रत्यवाय नाहीं!"

राजा, ह्याप्रमाणें भाषण करून ते सर्व राजे त्या ब्राह्मणांवर एकदम चाल करून गेले. हत्तीण मिळविण्यासाठीं ज्याप्रमाणें एक हत्ती दुसऱ्या हत्तीवर चढाई करून जातो, त्याप्रमाणें, द्रौपदी मिळविण्यासाठीं महातेजस्वी कर्ण त्या संग्रामामध्यें अर्जुनावर चालून गेला; मद्र देशाचा अधिपति बलवान शल्य हा भीमसेनावर चालून गेला; आणि दुर्योधनप्रभृति क्षत्रिय हेही त्या ब्राह्मणांशीं लढूं लागले. जनमेजया, सूर्यपुत्र कर्ण आपणावर चाल करून येत आहे असें पाहून कांतिमान अर्जुनानें त्याच्या शरिरावर नेम धरून तीक्ष्ण बाण सोडिले. तेव्हां त्या प्रखर तेजस्वी तीक्ष्ण बाणांच्या तडाख्यानं मूर्छा येऊं लागल्यामुळें कर्णास अर्जुनवर धावून जाण्याविषयीं प्रयास पडूं लागले! ह्या वेळीं त्या उभयतांमध्यें परस्परांचा पराजय करण्याची उत्कट इच्छा होती; व शरिरांत युद्धाचा आवेशही पूर्णपणें भरलेला होता; ह्यामुळें ते एकमेकांशीं इतक्या निकरानें व चपलतेनें लढत होते कीं, हा अर्जुन आणि हा कर्ण असें दाखवितां येणेंही शक्य नव्हतें. याप्रमाणें ते उभयतां युद्ध करीत असतां 'ही पहा तुझ्या

कृत्याची फेड !' 'आतां पहा माझ्या बाहूंचें सामर्थ्य !' अशीं शौर्यसूचक भाषणें परस्परांस बोलत होते. पुढें अर्जुनाचें बाहुवीर्य या भूतलावर अगदीं अप्रतिम आहे असें जेव्हां कर्णाच्या अनुभवास आलें, तेव्हां त्याला जिंकण्याच्या ईर्षेनें तो सूर्यपुत्र अत्यंत आवेशानें युद्ध करूं लागला. त्या वेळीं अर्जुनानें अत्यंत वेगानें सोडिलेले बाण त्या महापराक्रमी कर्णानें कुंठित करून टाकिले. तेव्हां त्याच्या कृत्याबद्दल सर्व क्षत्रियांनीं फार वाहवा केली. ह्यामुळें कर्णालाही जास्त उत्साह वाटून तो अर्जुनाशीं बोलूं लागला.

कर्ण म्हणाला:—हे ब्राह्मणश्रेष्ठा ! तुझें बाहुवीर्य, तुझा उत्साह आणि शस्त्र व अस्त्र ह्यांमध्यें त्वां मिळविलेला विजय पाहून मला संतोष होत आहे. हे अत्यंत श्रेष्ठ ब्राह्मणा ! तूं काय साक्षात् धनुर्वेद आहेस ? का परशुराम अथवा इंद्र आहेस ? का तूं मूर्तिमंत विष्णुच आहेस? आहेस तरी कोण? मला वाटतें, तूं असाच कोणी तरी असून आपलें स्वरूप गुप्त ठेवण्यासाठीं हें ब्राह्मणाचें रूप घेऊन माझ्याशीं युद्ध करीत आहेस ! नाहीं तर मी युद्धामध्यें क्रुद्ध होऊन गेलों असतां एक साक्षात् शचीपति इंद्र किंवा पांडुपुत्र अर्जुन ह्यांवाचून इतर कोणाही पुरुषाचें मजबरोबर युद्ध करण्याचें सामर्थ्य नाहीं !

अर्जुन म्हणाला:–कर्णा, मी धनुर्वेदही नव्हे, आणि महापराक्रमी असा परशुरामही नव्हे; तर सर्व शस्त्रधाऱ्यांमध्यें श्रेष्ठ व सर्व योद्ध्यांमध्यें वरिष्ठ असा एक ब्राह्मण आहें; आणि गुरूनें दिलेल्या शिक्षणामुळें ब्रह्मास्त्र व ऐंद्रास्त्र यांमध्यें माझी चांगली तयारी असून, आज तुला या युद्धांत पराजित करण्यासाठीं तुझ्यापुढें येऊन उभा राहिलों आहें. तेव्हां, हे वीरा ! धीर धर ! गडबडूं नको.

वैशंपायन सांगतात:—हें त्याचें भाषण ऐकून, ब्राह्मतेज अजिंक्य आहे असें महारथी राधापुत्र कर्णास वाटलें; आणि त्यानें युद्ध करण्याचें बंद केलें. इकडे दुसऱ्या बाजूस, विद्या, सामर्थ्य व युद्धक्रिया यांनीं संपन्न असा बलवान वीर भीमसेन आणि शल्य हे मदोन्मत्त महागजांप्रमाणें परस्परांस युद्धास आव्हान करीत होते; व परस्परांशीं भिडून गुडघ्यांचे व मुष्टींचे प्रहार करीत करीत एकमेकांना जेर करण्यासाठीं अनेक प्रकारचे पेंच घालीत होते. त्यांच्या त्या मुष्टिप्रहारांचा दाण्दाण असा भयंकर आवाज होत होता. ज्याप्रमाणें एखादी मोठी शिळा एकानें दुसऱ्याच्या अंगावर टाकावी, त्याप्रमाणें ते एकमेकांच्या प्राणाचा विचार न करतां परस्परांवर प्रहार करीत होते. ह्याप्रमाणें दोन घटकांपर्यंत त्या उभय वीरांमध्यें युद्ध झाल्यानंतर कुरुकुलश्रेष्ठ भीमानें आपल्या दोन्ही हातांनीं शल्यास उचलून जमिनीवर आपटलें ! तें पाहून ब्राह्मण खदखदां हसूं लागले. शल्याला भूमीवर आटपल्यानंतर त्याचा वध करण्याचें भीमास कांहीं कठिण नव्हतें; तरी त्यानें त्याचा वध केला नाहीं !

असो; ह्याप्रमाणें भीमसेनानें शल्याला पाडलें, आणि कर्णालाही जेव्हां जय मिळण्याचा संशय वाटूं लागला, तेव्हां इतर सर्व राजे भयभीत होऊन भीमसेनाच्या भोंवतीं जमले; आणि आपापसांत म्हणूं लागले, " धन्य आहे बुवा ह्या दोघां ब्राह्मणांची ! अहो, ह्यांची जन्मभूमि कोणती आणि हे राहतात कोठें, हें तरी समजून घ्या. कारण परशुराम, द्रोण किंवा पांडुपुत्र अर्जुन ह्यांवांचून राधापुत्र कर्णाशीं रणांत युद्ध करण्याचें सामर्थ्य दुसऱ्याहो कोणाच्या अंगीं आहे ? त्याचप्रमाणें, समरभूमीवर दुर्योधनाशीं तोंड देऊन लढाई करण्याचें सामर्थ्य देवकीपुत्र श्रीकृष्ण अथवा शरद्वताचा पुत्र कृपाचार्य ह्यांच्यावांचून कोणामध्यें आहे ? आणि श्रेष्ठ प्रतीचा बलवान असा मद्रदेशाधिपति शल्य ह्याला तरी समरभूमीवर पाडण्याची शक्ति बलराम, पांडुपुत्र वीर

भीमसेन किंवा शूर दुर्योधन ह्यांवांचून दुसऱ्या कोणाच्या ठिकाणीं आहे ? असो. हे क्षत्रियहो ! आतां, ब्राह्मणांनीं व्याप्त होऊन गेलेल्या ह्या युद्धांतून आपण आपलें अंग काढून घ्या. कारण, ब्राह्मण जरी सदोदीत अपराध करीत असले, तरी आपण नेहमीं त्यांचें रक्षणच करणें योग्य आहे. पुढें हे जेव्हां ह्या ठिकाणीं नसतील, तेव्हां आपण पुनः युद्ध करूं म्हणजे झालें."

वैशंपायन सांगतातः—राजा, ह्याप्रमाणें त्या सर्व क्षत्रियांचें आपापसांतील भाषण ऐकून भीमसेन आणि अर्जुन या उभयतांनींही युद्ध करण्याचें सोडून देऊन ते स्वस्थ उभे राहिले. असो.त्या ब्राह्मणांचा तो पराक्रम पाहून ते उभयतां कुंतीपुत्रच असावे अशी श्रीकृष्णांची खातरी झाली, व ती गोष्ट व्यक्त न करितां, त्यानें सर्व राजांची समजूत घातली कीं, " द्रौपदी ही त्यांना न्यायानेंच मिळालेली आहे. तेव्हां त्यांच्याशीं युद्ध करणें हें अनीतीचें होय. " नंतर ते सर्व युद्धकलानिपुण भूपतिश्रेष्ठ युद्धांतून परावृत्त होऊन आपापल्या बसतिस्थानाकडे निघून गेले. त्याचप्रमाणें, तो समारंभ पहाण्याकरितां इतर जे दुसरे लोक जमले होते, ते " रंगभूमीवर ब्राह्मणांचीच सरशी झाली ! ब्राह्मणांनीं द्रौपदीला वरिलें ! " असें म्हणत म्हणत तेथून निघून गेले. इकडे, आपल्या जातीचा जय झाल्यामुळें आनंदित झालेल्या व रुरुसंज्ञक मृगचर्म परिधान करणाऱ्या ब्राह्मणांनीं भीमार्जुनांच्या भोंवतीं गर्दी करून सोडिली होती, त्या गर्दींतून ते मोठ्या कष्टानें बाहेर पडले. तेव्हां द्रौपदीही त्यांच्या मागून जाऊं लागली. त्या वेळीं, मेघमंडलांतून मुक्त झालेले चंद्रसूर्य जसे पौर्णिमेच्या योगानें विशेष शोभायमान दिसतात, तसे ते भीमार्जुन द्रौपदीच्या योगानें विशेष शोभायमान दिसूं लागले!

प्रत्यागमन.

इकडे, भिक्षा मागण्याचा काल टळून गेला तरी आपले पुत्र येत नाहींत असें पाहून त्यांच्या आईच्या मनांत नानाप्रकारचे वाईट वाईट विचार येऊं लागले. प्रेमाच्या ठिकाणीं अमंगल कल्पना येत असतात असा साधारण नियम आहे. त्या नियमानुसार कुंतीला वाटूं लागलें कीं, माझ्या मुलांना धृतराष्ट्रपुत्रांनीं ओळखून मारून तर टाकलें नसेल ना ! अथवा दीर्घद्वेषी मायावी राक्षसांनीं तर त्यांचे प्राण घेतले नसतीलना! महात्म्या व्यासै मुनींचें सांगणें देखील उलट झालें कां !

ह्याप्रमाणें तिच्या अंतःकरणांत अनेक प्रकारच्या विचारांनीं काहूर उडवून दिलें. त्या वेळीं भर दोन प्रहर टळून गेले असल्यामुळें जिकडे तिकडे सामसूम झालेलें होतें; व आकाश मेघांनीं व्याप्त होऊन गेलें होतें; अशा वेळीं अर्जुन घरीं येऊन पोहोंचला. अर्जुन घरीं आला त्या वेळीं त्याच्या भोंवतीं ब्राह्मणांचा मोठा समुदाय असल्यामुळें, मेघांनीं व्याप्त झालेला सूर्य ऐन दोन प्रहरीं ज्याप्रमाणें दिसतो, त्याप्रमाणें तो दिसत होता !

अध्याय एकशें एक्याण्णवावा.

—:०:—

धर्मार्जुनसंवाद.

वैशंपायन सांगतातः—त्या कुंभकाराच्या कामकरण्याच्या जागीं गेल्यानंतर, ते महाप्रभावशाली भीम आणि अर्जुन हे उभयतां कुंतीपाशीं गेले, आणि त्या अत्यंत आनंदित झालेल्या नरश्रेष्ठांनीं भिक्षा म्हणून ती द्रौपदीच कुंतीस निवेदन केली. ह्या वेळीं कुंती झोंपडींत असल्यामुळें तिची दृष्टि पुत्रांवर गेली नाहीं; व त्यामुळेंच, ते द्रौपदीस भिक्षा म्हणत आहेत असें तिला कळून आलें नाहीं. म्हणून ती नेहमींप्रमाणें " बाळांनो, सर्वजण मिळून सेवन करा " असें म्हणाली; पण मागाहून जेव्हां तिनें द्रौपदीस पाहिलें, तेव्हां ' मीं फार अनर्थकारक भाषण केलें !' असें ती बोलली;व आपल्या भाषणानें अधर्म

होईल अशी भीति वाटून ती विचार करीत करीत त्या अत्यंत आनंदित झालेल्या द्रुपदकन्येस हातीं धरून धर्मराजाकडे गेली व असें म्हणाली, "बाळा, ही द्रुपद राजाची कन्या तुझ्या धाकट्या भावानीं आणून माझ्या स्वाधीन केली. पण, हे राजा, त्यांनीं भिक्षा आणिली आहे असें सांगितल्यामुळें प्रमादानें मीही 'सर्वजण मिळून सेवन करा' असें बोललें. तेव्हां आतां, हे कुरुकुलश्रेष्ठा, आज जें मी बोललें, तेंही खोटें होणार नाहीं, व ह्या द्रुपद राजाच्या कन्येसही अधर्म लागून त्यामुळें तिर्यग्योनीमध्यें घिरट्या घालीत बसावें लागणार नाहीं, असा उपाय कोणता हें सांग."

वैशंपायन सांगतातः–मातेचें हें भाषण ऐकून त्या नरवीर राजानें क्षणभर विचार करून कुंतीस धीर दिला, आणि नंतर तो वीर अर्जुनास म्हणाला, "अर्जुना, द्रौपदीला तूंच जिंकून घेतलेलें आहेस, ह्यामुळें ह्या राजकन्येला तुझ्याच योगानें विशेष शोभा येईल. तेव्हां, हे शत्रूंचा पराभव करणाऱ्या अर्जुना, अग्नि प्रदीप्त करून तूंच हिचें यथाविधि पाणिग्रहण कर."

अर्जुनानें उत्तर दिलें:—हे नरेंद्रा, आपण मजला अधर्मांत पाडूं नका. हा धर्म कांहीं शिष्ट लोकांच्या ठिकाणीं दृग्गोचर होत नाहीं. आपला विवाह प्रथम झाला पाहिजे; नंतर, कल्पनातीत कर्में करणाऱ्या ह्या महाबाहु भीमसेनाचा, तदनंतर माझा, माझ्यामागून नकुलाचा व त्यानंतर ह्या वेगवान सहदेवाचा झाला पाहिजे. राजा, भीमसेन, मी आणि हे उभयतां नकुल-सहदेव हे आम्ही आपल्या आज्ञेचें पालन करणारे दास आहों. अशी स्थिति असल्यामुळें, जें धर्मास अनुसरून व कीर्तीस कारणीभूत असें असेल, व पांचालाधिपति द्रुपद ह्यासही हितकारक होईल, तें आतां आपण करा; व आम्हांला आज्ञा करा. आम्ही आपल्याच अधीन आहों.

वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें, भक्ति आणि प्रेम ह्यांनीं परिपूर्ण असें तें अर्जुनाचें भाषण लक्ष्यांत घेतल्यानंतर, त्या पांडुपुत्रांनीं द्रौपदीकडे नजर फेंकिली. आपणांकडे पाहणाऱ्या त्या द्रौपदीस अवलोकन केल्यानंतर त्यांनीं परस्परांकडे निरखून पाहिलें व द्रौपदीची प्रतिमा आपल्या अंतःकरणांत सांठवून ठेविली. द्रौपदीस अवलोकन करितांच सर्वांच्या ठिकाणीं मदनाचा प्रादुर्भाव होऊन त्यानें त्यांच्या इंद्रियसमुदायाची अगदीं दाणादाण उडवून दिली. कारण, विधात्यानें स्वतः निर्माण केलेलें तें द्रौपदीचें स्वरूप सर्व प्राण्यांचें अंतःकरण आकर्षक करणारें असून इतर स्त्रियांपेक्षां श्रेष्ठतेचें असल्यामुळें मनांत भरण्यासारखेंच होतें. असो. त्या वेळीं त्यांच्या चर्येवरून त्यांचा भाव लक्षांत आल्यामुळें, 'द्रौपदी ही पांच पांडवांची स्त्री होणार' ह्या श्रीव्यास मुनींच्या सर्व भाषणाचें धर्मराजास स्मरण झालें, व द्रौपदीशीं एकानेंच विवाह केल्यास इतर कष्टी होऊन त्यामुळें आपापसांत फाटाफूट होईल ह्या भीतीनें त्या राजानें आपल्या सर्व बंधूंस सांगितलें कीं, ही कल्याणी द्रौपदी आपणां सर्वांचीच भार्या होईल!

वैशंपायन सांगतातः—जनमेजया, आपला ज्येष्ठ बंधु धर्मराज ह्याचें तें भाषण श्रवण करून, ते सर्व सत्त्वसंपन्न पांडुपुत्र सारखें त्याच गोष्टीचें मनांत चिंतन करीत राहिले.

श्रीकृष्णाचें धर्माशीं भाषण.

इकडे, बलरामासह यादवश्रेष्ठ श्रीकृष्ण त्या कुरुकुलवीर पांडवांची भेट घेण्याच्या इच्छेनें, ज्या ठिकाणीं ते पुरुषश्रेष्ठ पांडव रहात होते त्या कुंभाराच्या काम करण्याच्या घरांत आले, तेव्हां त्या ठिकाणीं बसलेला पुष्ट व विशाल बाहु असलेला धर्मराज, व त्याच्या भोंवतीं जवळच बसलेले अग्निप्रमाणें तेजस्वी असे इतर पांडवही त्यांच्या दृष्टीस पडले. नंतर जवळ जाऊन श्रीकृष्णांनीं

धर्माचरण करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ कुंतीपुत्र आजमीढ धर्म ह्याचे पाय घट्ट धरले, व ' मी कृष्ण आहें' असें सांगितलें. त्यांच्या मागून बलरामानेंही तसेंच केलें. तेव्हां त्या कुरुकुलोत्पन्न पांडवांस त्यांच्या भेटीमुळें आनंद झाला, व त्यांनीं त्या उभयतांचें अभिनंदन केलें.

नंतर, राजा, त्या यादवश्रेष्ठांनीं आपल्या पित्याची भगिनी कुंती हिचेही पाय धरिले. नंतर धर्मराजानें श्रीकृष्णांकडे पाहून त्यांस कुशलप्रश्न विचारिले; आणि तो म्हणाला, 'श्रीकृष्णा, आम्ही सर्वजण येथें गुप्त रीतीनें राहात असतां आमची माहिती आपणांस कशी लागली?"

युधिष्ठिराचें हें भाषण ऐकून श्रीकृष्ण त्यास हसत हसत म्हणाले, "राजा, अग्नि जरी झांकलेला असला, तरी तो समजतोच. रंगस्थलादिकांवर केलेला तो पराक्रम करणारा पांडवांवांचून मनुष्यांमध्यें दुसरा आहे कोण? शत्रूंचा पराजय करणारे आपण सर्व पांडव त्या लाक्षागृहांतील भयंकर अग्नींतून सुटलां, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे; व आपण तेथून बाहेर पडल्यामुळें धृतराष्ट्राच्या पुत्रांचा तुम्हांस दग्ध करून टाकण्याविषयींचा मनोरथ पूर्ण झाला नाहीं हीही आनंदाची गोष्ट होय. आतां माझ्या मनांत आहे त्याप्रमाणें आपलें कल्याण होवो. प्रज्वलित होत असणाऱ्या अग्नीप्रमाणें आपली भरभराट होवो. हे पार्थहो, कोणाही राजांस आपली माहिती लागणें बरोबर नाहीं, व आम्ही येथेंच फार वेळ राहिलों तर न जाणो कदाचित् ती बातमी त्यांस लागेलही. तेव्हां आतां आम्ही अगोदर आपल्या शिबिराकडेच निघून जातों."

ह्याप्रमाणें भाषण केल्यानंतर, अविनाशी अशा कांतीनें युक्त असणाऱ्या त्या श्रीकृष्णास धर्मराजानें अनुमोदन दिलें असतां बलरामासह ते तेथून निघून गेले.

अध्याय एकशें ब्याण्णवावा.

—:०:—

नवोढा द्रौपदीची सासरीं वागणूक.

वैशंपायन सांगतात:--राजा, भीमार्जुन कुंभारशाळेकडे परत जात असतां पांचालपुत्र धृष्टद्युम्न ह्यांच्या पाठोपाठ चालला, आणि कोणाच्याही लक्षांत न येऊं देतां मोठ्या सावधगिरीनें घरांत शिरून पांडवांच्या शेजारींच छपून बसला. सायंकाळ झाल्यावर शत्रुमर्दक भीम, अर्जुन आणि पराक्रमी नकुल-सहदेव यांनीं भिक्षा मागून आणून युधिष्ठिराच्या स्वाधीन केली. नंतर भोजनकाल प्राप्त झाला असें पाहून ती उदारबुद्धि कुंती द्रौपदीला म्हणाली, "हे कल्याणि, तूं हें अन्न घे. यांतून आधीं देवतांप्रीत्यर्थ बलि काढून ठेव, आणि ब्राह्मणांना भिक्षा घाल. नंतर, जे अन्नार्थी लोक आसपास जमले असतील त्यांना अन्न दे. एवढें करून जें शेष उरेल त्याचे सारखे दोन वांटे कर. पैकीं एका वांट्यांतून तुझ्या स्वतांकरितां आणि मजकरितां अन्न काढून ठेवून उरलेल्याचे चार भाग कर; व ते भीमाखेरीज चौघांना दे; आणि दुसरा भाग सर्वच एकटया भीमाला दे. कारण, तो माझा भीम रूपसंपन्न, तरुण, पराक्रमी, अगलोटाचा, पिळदार व शरिरानें महागजाप्रमाणें धिप्पाड असून त्याची भूक नेहमीं फार असते!"

ह्याप्रमाणें कुंतीनें सांगितलें असतां, सासूचें बोलणें आपल्या हिताचें आहे असें मानून त्या साध्वी राजकन्या द्रौपदीनें मोठ्या आनंदानें तिच्या आज्ञेप्रमाणें अन्नाची वांटणी केली; आणि त्या सर्वांनीं तें अन्न भक्षण केलें. भोजनोत्तर, वेगवान माद्रीपुत्र सहदेवानें भूमीवर शय्येसाठीं दर्भ अंथरले. मग ते सर्व वीर आपआपलीं कृष्णाजिनें त्या दर्भांवर टाकून [पर्यंकादिकांची अपेक्षा न ठेवितां] भूमीवरच निजले. त्या कुरुवीरांनीं दक्षिण दिशेकडे आपलीं डोकीं

केलीं होतीं. कुंती त्यांच्या उशाकडे आडवी निजली, व द्रौपदी त्यांच्या पायगतीं निजली. राजा, मृदुशय्येवर लोळण्याची जिला संवय, ती कोमलांगी पांडवांच्या पायांशीं नुसत्या दर्भांवर आपल्या पतींच्या पायांखालच्या उशी-प्रमाणें पडून राहिली. याबद्दल तिच्या मनाला यत्किंचितही वाईट वाटलें नाहीं, किंवा आपण असल्या निर्धनांच्या पदरीं पडलों असें पाहूनही तिनें त्या पांडवांचा अवमान केला नाहीं. शय्ये-वर पडल्या पडल्या ते शूर पांडव सेनाधिपतींना योग्य अशा दिव्यास्त्रें, रथ, गज, खड्ग, गदा, परशु इत्यादिसंबंधी नानाप्रकारच्या गोष्टी बोलूं लागले. त्या वेळीं त्यांच्या त्या कथा पांचालपुत्र धृष्टद्युम्नानें छपून ऐकल्या; व द्रौपदी त्यांच्या पायांशीं पडून आहे असें त्यानें व इतर सर्व मनुष्यांनींही पाहिलें. नंतर तो द्रुपदपुत्र धृष्टद्युम्न तेथील सर्व वृत्तांत आपल्या पित्याला सांगण्याकरितां तेथून सत्वर निघून गेला. आप-ल्या मुलीला घेऊन जाणारे पांडवच आहेत अशी ओळख पटली नसल्यामुळें, द्रुपद मोठा खिन्न होऊन बसला होता, त्यानें धृष्टद्युम्नाला विचारिलें.

द्रुपदाचे धृष्टद्युम्नास प्रश्न.

द्रुपद म्हणाला:—अरे! ती कृष्णा कोठें गेली? व तिला घेऊन जाणारे ते कोण? एखा-द्या हीनवर्ण शूद्राच्या हातीं पडून स्मशानांत पडलेल्या कोमल पुष्पमालेप्रमाणें तिची पायमल्ली तर झाली नाहींना? किंवा तिला एखाद्या परतंत्र वैश्यानें जिंकून घेऊन माझ्या मस्तकावर चिख-लांत भरलेला पाय तर दिला नाहींना! अरे! तिला नेणारा पुरुष क्षत्रिय आहे किंवा कोणी श्रेष्ठवर्ण ब्राह्मण आहे अथवा निवळ शौर्यानें माझ्या कृष्णेला बळकावून एखाद्या हीनजाती-यानें माझ्या डोक्यावर बुद्ध्या डावा पाय तर दिला नाहींना? व या संबंधापायीं मला हाय हाय करण्याची वेळ तर आली नाहींना? अरे, पण तूं आनंदित दिसतोस, त्यावरून नरश्रेष्ठ अर्जुनाशीं संबंध घडला असावा असाही मला संशय येतो. तेव्हां खरा प्रकार काय आहे, आणि माझ्या क-न्येला जिंकून नेणारा पुरुष कोण आहे, तें तूं स्पष्टपणें सांग. अरे, विचित्रवीर्याचा पुत्र जो कुरु-श्रेष्ठ पांडु, त्याचे मुलगे जिवंत आहेतना? व आज धनुष्य सज्ज करून यंत्रभेद करणारा तो वीर कुंतीचा कनिष्ठ तर पुत्र नव्हेना?

वैवाहिकपर्व.

अध्याय एकशें त्र्याण्णवावा.

—:०:—

धृष्टद्युम्नाचें द्रुपदास उत्तर.

वैशंपायन सांगतातः—राजा, ह्याप्रमाणें पित्याचे प्रश्न ऐकून तो सोमकश्रेष्ठ धृष्टद्युम्न प्रसन्न मुद्रेनें, द्रौपदी कोणीं नेली व पुढें काय काय प्रकार झाला, तो सर्व वृत्तांत आपल्या पित्यास सांगूं लागला.

धृष्टद्युम्न म्हणालाः—स्वयंवरार्थ जमलेल्या त्या मंडळींत रूपानें देवांसमान असून ज्याचे नेत्र विशाल व आरक्त होते, व ज्यानें कृष्णाजिन परिधान केलें होतें, त्या तरुण पुरुषानें तें श्रेष्ठ धनुष्य सज्ज केलें, व यंत्रभेद करून लक्ष्य खालें पाडिलें. हें पाहतांच ब्राह्मणांनीं राजकन्या जिंकिली हें सहन न होऊन मंडपांतील सर्व भूपतींनीं रागावून त्याच्या भोंवतीं गराडा दिला असतां, तो यत्किंचितही अडकून न पडतां, दैत्यसमुदायांतून देव आणि ऋषि यांसह इंद्र ज्याप्रमाणें निर्धास्तपणें निघून जातो, त्याप्रमाणें ब्राह्मणश्रेष्ठ प्रशंसा करीत असतां त्यांसह तो वेगवान वीर त्या राजांची कोंडी फोडून चालता झाला; व त्याचें कृष्णाजिन घेऊन हत्तीमागें जाणाऱ्या हत्तिणीप्रमाणें द्रौपदीही मोठ्या आनंदानें त्याच्या पाठोपाठ गेली. इतक्यांत त्या गर्दींत दुसरा एक वीर एक मोठा वृक्ष मोडून घेऊन क्रुद्ध कृतांताप्रमाणें त्या राजमंडळाचा विध्वंस करीत करीत त्याच्या मागोमाग निघून गेला. ह्याप्रमाणें, चंद्रसूर्यांसारखे तेजस्वी ते दोघे तरुण पुरुष सर्व राजांच्या डोळ्यांदेखत आपल्या कृष्णेला घेऊन कुलालशाळेकडे गेले. तेथें अग्नीच्या ज्वाळेप्रमाणें तेजस्वी अशी एक स्त्री बसली होती. ती बहुधा त्यांची आई असावी असा तर्क आहे. तिच्या शेजारीं तिजप्रमाणेंच तेजस्वी असे तीन पुरुष बसले होते. मंडपांतून गेलेल्या या दोन तरुणांनीं त्या स्त्रीचें प्रथम अभिवंदन केलें, आणि कृष्णेलाही तशीच आज्ञा केली. मग कृष्णेला तिच्या स्वाधीन करून ते भिक्षेसाठीं निघून गेले. भिक्षेहून परत आल्यावर द्रौपदीनें ती भिक्षा घेऊन त्यांतून देवतांना बलि व ब्राह्मणांना कांहीं भाग देऊन, नंतर त्या वृद्ध स्त्रीला व त्या नरवीरांना वाढून शेवटीं आपण भोजन केलें. भोजनोत्तर, पृथ्वीवर दर्भ आंथरून व त्यांवर कृष्णाजिनें पसरून ते सर्व निजले, आणि कृष्णाही त्यांच्या पायांशीं निजली. पडल्या पडल्या, प्रलयमेघाप्रमाणें गंभीर स्वरानें ते वीर एकमेकांत अद्भुत गोष्टी सांगूं लागले. त्या गोष्टी शूद्र, वैश्य किंवा ब्राह्मण यांच्या तोंडून निघण्यासारख्या नव्हत्या! कारण, त्या सर्व युद्धसंबंधी होत्या. यावरून ते नरश्रेष्ठ नामांकित क्षत्रिय असावे यांत शंका नाहीं. पांडव लाक्षागृहांतून मुक्त झाल्याचें आम्हीं ऐकलेंच आहे. त्या अर्थीं, पांडुपुत्राला कृष्णा अर्पण करावी ही जी आपली इच्छा, ती बहुधा सफल झाली असावी असें मला वाटतें. इतक्या आवेशानें धनुष्य सज्ज करून तडाख्यासरशीं अचुक रीतीनें लक्ष्य हाणून पाडणें व घरीं आल्यावरही परस्परांत शौर्याच्याच गोष्टी सांगणें, यावरून मला तर असें खास वाटतें कीं, ते गुप्तरूपानें संचार करणारे पांडवच असावे.

द्रुपदपुरोहिताचें कुलालगृहीं गमन.

जनमेजया, हें ऐकून राजा द्रुपदाला फार आनंद झाला. त्यानें तात्काळ आपल्या पुरोहितास बोलावून आणून, व "तुम्ही कोण? पांडव कीं काय?" असें त्या कुलालशाळेंतील पुरुषांस विचारून ये म्हणून निरोप सांगून त्यास त्यांजकडे पाठविलें. राजाचा निरोप घेऊन पुरोहित

गेला, व त्या पुरुषांची प्रशंसा करून राजाच्या निरोपाप्रमाणें त्यानें त्यांस नीट खुलासेवार विचारिलें.

पुरोहित म्हणाला:—आपणांपैकीं ज्या पुरुषानें मंडपांत लक्ष्यवेध केला, त्याला पाहिल्यापासून पांचाल राजाला पराकाष्ठेचा आनंद झाला आहे; व आपण मागाल तें देऊन आपणांस संतुष्ट करावें अशी त्याला उत्कंठा झाली असल्यामुळें, आपण कोण हें समजून घेण्यासाठीं त्यानें मला आपल्याकडे पाठविलें आहे. तस्मात् आपण कृपा करून आपल्या ज्ञातीची व कुलाची परंपरा सांगावी. म्हणजे 'ब्राह्मणांनीं राजकन्या नेली' म्हणून दोष देणाऱ्या दुष्टांचीं नाकें खालीं होऊन मला, आमच्या राजाला, आणि त्याच्या सर्व परिवाराला आनंद होईल. हे नरश्रेष्ठहो, प्रतिआत्माच कीं काय असा पांडु नामक राजा आमच्या द्रुपदाचा अत्यंत प्रिय मित्र होता. आपली कन्या पांडु राजाची सून व्हावी हा हेतु द्रुपद राजाच्या मनांत फार होता. त्याला वाटे कीं, विशाल व दीर्घ बाहूंनीं युक्त असा पांडुपुत्र अर्जुन जर क्षात्रधर्माप्रमाणें ही माझी कन्या प्राप्त करून घेईल, तर त्यांत माझें मोठें कल्याण होऊन लौकिक होईल व उभय पक्षांचेंही हित होईल.

ह्याप्रमाणें राजाचा निरोप कळवून द्रुपदपुरोहित नम्रपणानें उभा राहिला असतां धर्मराजानें त्याला उत्तर दिलें.

धर्मराजाचें पुरोहिताशीं भाषण.

धर्मराज म्हणाला, "हा द्रुपदपुरोहित राजाला मान्य असल्या कारणानें याचा सत्कार विशेष केला पाहिजे. तस्मात् पाद्यपूर्वक याचें पूजन करा." राजा, समीप असलेल्या भीमानें ही आज्ञा ऐकतांच सांगितल्याप्रमाणें पुरोहिताची पूजा केली. त्या पूजेचा आनंदानें स्वीकार करून पुरोहित स्वस्थ बसल्यावर युधिष्ठिर त्याला म्हणाला, "हे ब्राह्मणश्रेष्ठा, पांचाल राजानें क्षात्रधर्माला योग्य अशा रीतीनें पणास लावूनच स्वयंवरार्थ कन्या पुढें आणिली होती. केवळ मन मानेल अशा रीतीनें आणिली नव्हती, व त्याची रीति त्याच्या कन्येलाही मान्य होती. धनुष्य सज्ज करून लक्ष्यवेध करणें एवढ्याच अटीवर त्यानें आपल्या कन्येला देऊं केली होती. मग जिंकणाराचें कुल, शील, जाति, गोत्र कोणतेंही असो. त्याच्या पणाप्रमाणें आमच्या या महात्म्यानें ही कन्या सर्व राजांसमक्ष जिंकली. असें असतां द्रुपदाला त्या लक्ष्यभेद करणाऱ्याच्या कुलगोत्रांविषयीं हुरहूर लागून राहण्याचें कारण दिसत नाहीं. शिवाय, मी आपणांस असें सांगतों कीं, द्रुपद राजाचा दुसरा जो हेतु आहे, तोही सिद्धीस जाईल. कारण, हे ब्राह्मणश्रेष्ठा, माझ्या मतें ही त्याची रूपवती कन्या अस्थानीं पडली नाहीं. असलें प्रचंड धनुष्य कोणी दुबळा, नीचकुलोत्पन्न किंवा अस्त्रज्ञानशून्य पुरुष सज्ज करून लक्ष्यवेध करूं शकेल असें कधींही होणार नाहीं. तस्मात् कन्येसंबंधानें द्रुपद राजाला वाईट वाटण्याचें मुळींच कारण नाहीं; व लक्ष्यभेद करून जिंकून आणिलेली ही कन्या, आम्ही भिक्षेकरी दिसलों तरी आमच्या हातून हिरावून नेईल असा मनुष्य पृथ्वींतही कोणी नाहीं!"

ह्याप्रमाणें युधिष्ठिर पुरोहिताशीं बोलत आहे, इतक्यांत द्रुपद राजाकडून दुसरा एक दूत 'भोजनाची तयारी झाली आहे' म्हणून कळविण्यासाठीं तेथें आला.

अध्याय एकशें चौऱ्याण्णवावा.

—:०:—

पांडवांचें द्रुपदगृहीं गमन.

दूत म्हणतो:—द्रुपद राजानें विवाहनिमित्त वराकडील मंडळीसाठीं मेजवानीची तयारी केली आहे. तेव्हां आपण सर्व नित्य कर्में आटोपून कृष्णेसह भोजनास चलावें; विलंब करूं नये. राजे लोकांना योग्य, सुवर्णाच्या कमलांनीं सुशो-

भित असलेले, व ज्यांचे अश्व फारच उत्तम आहेत असे हे रथ आपणांकरितां आणिले आहेत. आपण सर्वांनीं यांत बसून द्रुपद राजाच्या घरीं चलावें.

वैशंपायन सांगतात:--नंतर पुरोहिताला पुढें पाठवून ते सर्व पुरुषश्रेष्ठ त्या भव्य व दिव्य अशा रथांत बसून निघाले. कुंती व कृष्णा या दोघी एकाच रथांत बसल्या. पुरोहित पुढें गेला होता त्याच्या तोंडून धर्मराजाचें भाषण ऐकून घेऊन, हे कोण आहेत ह्याची परीक्षा पाहण्याकरितां द्रुपद राजानें नानाप्रकारच्या वस्तु तेथें गोळा केल्या. फळें, फुलें, चिलखतें, ढाली, गाई, धनुष्यें, दोऱ्या, शेतकीचीं सर्व धान्यें व अवजारें, तशींच इतर शिल्पकामांचीं हत्यारें व नानाप्रकारचीं क्रीडासाधनें, मोठमोठ्या तरवारी, उंची उंची घोडे, विचित्र रथ, उत्कृष्ट धनुष्यें, अद्‌भुत बाण, सुवर्णयुक्त शक्ति, भाले, पट्टे, भृशुंडी, परशु, व इतर सर्व युद्धसामुग्री, त्याचप्रमाणें उत्तम प्रकारें शृंगारिलेल्या शय्या व आसनें व नानाप्रकारचीं वस्त्रें हीं सर्व तेथें ठेविलीं होतीं.

असो. राजा, नंतर कुंती ही साध्वी द्रौपदीला घेऊन अंतःपुरांत शिरली. तेव्हां तेथील स्त्रियांनीं मोठ्या उल्हासानें त्या पांडुपत्नीचें स्वागत केलें. इकडे, ज्यांची सिंहाप्रमाणें गति, वृषभाप्रमाणें विशाल नेत्र, भुजंगाप्रमाणें दीर्घ बाहु व पुष्ट स्कंध असून, ज्यांनीं कृष्णाजिनें परिधान केलीं आहेत, अशा त्या पांडवांना अवलोकन करून राजा, राजसचिव, राजपुत्र, राजमित्र व सर्व राजसेवक यांना अत्यानंद झाला. नंतर ते वीर पादपीठांनीं युक्त अशा मोठमोठ्या रत्नखचित सिंहासनांवर निःशंकपणें आपापल्या नात्याप्रमाणें अनुक्रमानें जाऊन बसले. त्यांना त्या ऐश्वर्याचे यत्किंचितही विस्मय वाटला नाहीं. इतक्यांत झळक पोषाख केलेले दास, दासी व वाढपी यांनीं सोन्याच्या व रुप्याच्या ताटांत राजेलोकांना योग्य असे सर्व प्रकारचे पदार्थ आणून वाढिले. नंतर ते पुरुषश्रेष्ठ यथेच्छ भोजन करून अत्यंत संतुष्ट झाले, व तेथें मांडिलेल्या वस्तूंपैकीं इतर सर्व सोडून युद्धसंबंधी वस्तु जेथें मांडिल्या होत्या तिकडे गेले. तेव्हां तें त्यांचें लक्षण पाहून राजा द्रुपद व त्याचे अमात्य यांस अत्यानंद झाला, व हे राजकुमारच आहेत अशी त्यांनीं आपल्या मनांत गांठ बांधिली.

अध्याय एकशें पंचाणववावा.

—:०:—

द्रुपदाचे धर्मराजास प्रश्न.

वैशंपायन सांगतातः-राजा, नंतर द्रुपदानें राजकुमार युधिष्ठिराला जवळ बोलाविलें, व ब्राह्मणोचित रीतीनें त्याचा सत्कार करून त्या तेजस्वी कुंतीपुत्राला विचारिलें, "आपण कोण आहां ? क्षत्रिय किंवा ब्राह्मण ? किंवा गुणसंपन्न वैश्य अथवा शूद्र आहां ? किंवा कृष्णेचा स्वयंवरसमारंभ पहावा या हेतूनें कपटानें ब्राह्मणवेष धारण करणारे तुम्ही देव आहां ? यांपैकीं खरें काय तें कृपा करून आम्हांस सांगा. कारण, आम्हांला हें मोठें गूढ पडलें आहे. याचा जेव्हां नीट उलगडा होईल, तेव्हांच आम्हांस संतोष वाटेल, व आमचा भाग्योदयही उत्तम प्रकारें होईल. याकरितां मन मोकळें करून सत्य असेल तें सांगा. राजासमोर खरें बोलणें हेंच योग्य आहे. अनृताच्या योगानें, केलेले यज्ञयाग व बांधिलेलीं तळीं, विहिरी इत्यादि सर्व सत्कृत्यांचें श्रेय नाश पावतें. यासाठीं असत्य भाषण करूं नये. हे शत्रुदमना, तुझें देवतुल्य भाषण ऐकून नंतर मी यथाविधि लग्नसमारंभ करण्याचा निश्चय केला आहे."

धर्मराजाचें द्रुपदास उत्तर.

युधिष्ठिर म्हणतोः—हे पांचालपते, तूं प्रसन्न रहा. खिन्न होऊं नको. तुझा इष्ट हेतु निःसंशय पार पडला असें समज. कारण, आम्ही जातीचे

क्षत्रिय असून महात्मा पांडु राजाचे पुत्र आहों! कुंतीच्या पुत्रांपैकीं मी ज्येष्ठ आहें; आणि राजसभेंत ज्यांनीं तुझी कन्या जिंकिली, ते दोघे भीमार्जुन आहेत. तसेच, हे आवळेजावळे नकुलसहदेव आहेत; आणि कृष्णेजवळ बसलेली ती आमची माता कुंती आहे. यासाठीं, राजा, तुझी कन्या आमचे पदरीं पडली याबद्दल तुला तिळभरही दुःख होऊं देऊं नको. कारण, आम्ही क्षत्रिय आहों; व कमलिनी जशी एका सरोवरांतून दुसऱ्या सरोवरांत जावी, त्याप्रमाणें ही तुझी कन्या एका क्षत्रियकुळांतून दुसऱ्या क्षत्रियकुळांतच आली आहे, यामुळें हें स्थित्यंतर शोचनीय होण्याचें कारण नाहीं. हे महाराजा, मीं ही सर्व खरी खरी हकीकत तुला सांगितली आहे; आम्हांला वडील तूंच असून आमचा सर्वस्वीं आधारही तूंच आहेस.

वैशंपायन सांगतात:–हें ऐकतांच द्रुपदाचे नेत्र आनंदाश्रूंनीं भरून आले; व त्या आनंदाच्या भरांत, युधिष्ठिराला काय उत्तर द्यावें हें त्याला सुचेना. नंतर कांहीं वेळानें, मोठ्या यत्नानें आपला हर्ष आवरून त्यानें योग्य असें प्रत्युत्तर दिलें, व ते हस्तिनापुरांतून कसकसे बाहेर पडले तें सर्व वृत्त त्यानें धर्मास विचारिलें. तेव्हां, धर्मराजानेंही सर्व हकीकत त्यास संगतवार सांगितली. नंतर युधिष्ठिरानें सांगितलेला तो वृत्तांत ऐकून द्रुपदानें राजा धृतराष्ट्राची फार निर्भर्त्सना केली, व कुंतीपुत्र युधिष्ठिराला आश्वासन देऊन पुनः राज्यप्राप्ति करून देण्याविषयींची त्या वक्त्या द्रुपदानें प्रतिज्ञा केली. नंतर कुंती, द्रौपदी, भीमसेन, अर्जुन, नकुल व सहदेव हीं सर्व राजानें दाखविलेल्या भव्य मंदिरांत शिरलीं. जनमेजया, तेथें यज्ञसेन द्रुपदानें स्वतः त्यांचा सत्कार केला; व पांडव जांवई मिळाले असें पाहून मनाला धीर आल्यामुळें पुत्रांसह त्यांस म्हणाला, "या महाबाहु अर्जुनानें कृष्णेचें यथाविधि पाणिग्रहण करावें. आजच दिवस चांगला आहे, त्या अर्थीं त्यानें आजच कुलधर्म वगैरे करावे."

विवाहाविषयीं वादविवाद.

द्रुपदाचें हें भाषण ऐकून धर्मात्मा युधिष्ठिर त्याला म्हणाला:—हे लोकनाथा, मलाही दारसंग्रह कर्तव्य आहे.

यावर द्रुपद म्हणाला:—तसें असेल तर तें माझ्या कन्येचें यथाविधि पाणिग्रहण कर; किंवा, हे वीरा, तुला वाटत असेल तर तुझ्या भावांपैकीं दुसऱ्याही कोणाच्या हातांत कृष्णेचा हात देण्यास सांग.

युधिष्ठिर म्हणाला:—राजा, ही द्रौपदी आम्हां सर्वांचीच सहपत्नी झाली पाहिजे. कारण, एक तर आमच्या मातेचे मुखांतून पूर्वींच अशी आज्ञा निघून गेली आहे; दुसरें, मी व भीमसेन ह्या वडील बंधूंचा विवाह झाला नसतां अर्जुनानें हें तुझें कन्यारत्न जिंकून आणिलें आहे; आणि, राजा, आम्हां बंधूंचा असा करार ठरलेला आहे कीं, कसलेंही रत्न हातीं आलें असतां तें सर्वांनीं उपभोगावें. हा करार मोडण्याची आमची इच्छा नाहीं. तस्मात् धर्माला बाध न येतां ही तुझी कन्या कृष्णा आम्हां सर्वांची राणी होईल. मात्र हिनें आम्हां बंधूंचें यथाक्रम अग्निसमक्ष करग्रहण करावें.

द्रुपद म्हणाला:–हे कुरुपुत्रा, एका पुरुषानें बहुत स्त्रिया करणें हा प्रकार शास्त्रविहित आहे; परंतु एका स्त्रीला अनेक पति हें मात्र कोठें ऐकलें नाहीं. तूं धर्मज्ञ व सदाचरणी म्हणवितोस, आणि लोकरूढीला व वेदाज्ञेला विरुद्ध असा हा अधर्माचार कसा सांगतोस? अशी बुद्धि तुला कोणत्या कारणानें सुचली?

युधिष्ठिर म्हणाला:–राजा, धर्म फार सूक्ष्म आहे. त्याची गति जाणण्यास आम्ही समर्थ नाहीं. आम्ही केवळ पूर्वकालीन लोक ज्या मार्गानें

गेले त्या मार्गानें जाणार. माझे वाणींतून अनृत भाषण निघालेलें नाहीं; व अनाचाराची मला आवड नाहीं. परंतु असें करण्याविषयीं आमच्या मातेची आज्ञा आहे, व माझीही मनोदेवता तेंच सांगत आहे. राजा, माझें सांगणें हें सनातन धर्माला धरूनच आहे. याकरितां मनामध्यें कोणताही किंतु न आणितां तूं मी सांगतों याप्रमाणें कर.

द्रुपद म्हणतोः—धर्मा, तूं, कुंती व माझा पुत्र धृष्टद्युम्न हीं तिघें मिळून जो निकाल ठरवाल, तो मला मान्य आहे; व त्याप्रमाणें उद्यां योग्य समय पाहून करणें तें करीन.

वैशंपायन सांगतातः—राजा, ह्याप्रमाणें ते सर्व मिळून विचार करीत बसले असतां सहजगत्या व्यास मुनि तेथें आले.

अध्याय एकशें शहाणवावा.

—:०:—

व्यासांचें भाषण.

वैशंपायन सांगतातः—व्यास मुनि आलेसें पाहून द्रुपद व सर्व पांडव उभे राहिले, व त्यांचें स्वागत करून सर्वांनीं त्यांना अभिवंदन केलें. महात्म्या व्यासांनीं त्या सन्मानाचा आनंदानें स्वीकार करून द्रुपदपांडवांस शेवटीं कुशलप्रश्न करून शुद्धसुवर्णमय आसनावर ते बसले, व त्यांनीं इतरांनाही बसण्याविषयीं सांगितलें. तेव्हां ते सर्व नरश्रेष्ठ बहुमोल आसनांवर बसले. राजा, पुढें थोडा वेळ गेल्यावर, द्रुपद राजानें मधुरवाणीनें द्रौपदीसंबंधी महात्म्या व्यासांस प्रश्न केला कीं, "भगवन्, एकच स्त्री अनेकांची धर्मपत्नी झाल्यानें संकर कसा होणार नाहीं, हें मला योग्य रीतीनें आपण समजवावें."

व्यास म्हणतातः—बाबारे, हा बहुपतित्वाचा धर्म लोकरूढीला व वेदांलाही विरुद्धसा आहे; व याचा निर्वाह करून दाखविण्यांत शास्त्राला देखील एक तऱ्हेनें ठकबाजीच करावी लागते आहे, असला हा गूढ आहे. याकरितां, यासंबंधीं कोणाचें काय मत आहे तें ऐकण्याची माझी इच्छा आहे.

द्रुपद म्हणालाः—हे द्विजश्रेष्ठा, अनेक पुरुषांना एक पत्नी कोठें असत नाहीं. हा प्रकार जनरूढीला व वेदांलाही विरुद्ध आहे. मी तर केवळ हा अधर्म समजतों. आजपर्यंत मोठमोठे महात्मे होऊन गेले; परंतु ह्याचा अवलंब त्यांनीं केला नाहीं. कांहीं झालें तरी ज्ञात्यांनीं अधर्माचरण करूं नये असा माझा अभिप्राय आहे; व ज्या अर्थी या धर्माबद्दल माझें मत संदिग्धच रहाणार, त्या अर्थीं धर्मराजाचे सांगण्याप्रमाणें चालण्यास, मी उद्युक्त होत नाहीं.

धृष्टद्युम्न म्हणालाः—महामुने, आपणच सांगा कीं, अशा संबंधांत कनिष्ठ भ्रात्यानें जिला एकवार स्वपत्नी म्हणून अंगीकारलें, त्या स्त्रीशीं स्वपत्नीचे नात्यानें सदाचरणी ज्येष्ठ भ्राता कसें आचरण करील ? मला तर हा प्रकार अप्रशस्त वाटतो ! बाकी धर्म सूक्ष्म असल्यामुळें त्याची गति आम्हांस समजत नाहीं. अमुक एक गोष्ट धर्माला धरून आहे किंवा सोडून आहे, हें छातीला हात लावून सांगण्याचा आम्हांसारख्यांचा अधिकार नव्हे; व म्हणूनच, ही कृष्णा पांचजणांची राणी व्हावी कीं नाहीं या कामीं निर्णय देण्याचें धाडस आम्ही करीत नाहीं !

युधिष्ठिर म्हणतोः—माझ्या वाणींतून कधींही अनृत आलेलें नाहीं आणि अप्रशस्त गोष्टीकडे माझा स्वभावतः कल नाहीं. असें असतां सांप्रत प्रसंगीं या कामाला माझे मनाचा रुकार पडतो आहे, त्या अर्थीं ही गोष्ट धर्मविरुद्ध असणार नाहीं हें खास. पुराणकालीं जटिला गौतमी नामक एक सदाचरणी स्त्री सात ऋषींशीं रत झाली असा इतिहास उपलब्ध आहे. त्याचप्रमाणें 'वार्क्षी' नामक

मुनिकन्याही तपानें शुद्धचित्त झालेल्या प्रचेतस नांवाच्या दहा भ्रात्यांशीं संगत झाली असाही दुसरा पुरावा सांपडतो. हे धर्मश्रेष्ठा, 'गुरूचें वचन तोच धर्म समजावा' असें ज्ञाते सांगतात; व माता ही सर्व गुरूंत श्रेष्ठ होय असें शास्त्र म्हणतें. अर्थात् मातेचें वचन तोच धर्म हें निर्विवाद सिद्ध झालें; आणि हेंच खरें, तर आमचे मातेनें 'नेहमीं भिक्षा वांटून घेतां याच न्यायानें सर्व मिळून उपभोगा' अशी आज्ञा आम्हांस केली. तस्मात्, हे द्विजश्रेष्ठा, मात्राज्ञेप्रमाणें हिला पांचांनीं स्वीकारणें हाच आमचा श्रेष्ठ धर्म असें मी मानितों.

कुंती म्हणाली:—धर्मपरायण युधिष्ठिर बोलला तें अक्षरशः खरें आहे. मीं असें म्हटलें खरें. अधर्माचें तर मला फार भय वाटतें; आणि तुमच्या मतें माझें हें सांगणें जर अधर्मरूप झालें असेल, तर या पापांतून आतां माझी सुटका कशी व्हावी?

व्यास म्हणाले:—हे कल्याणि, तूं चिंता करूं नको. अधर्मदोषापासून तूं मुक्त होशील. कारण, तूं सांगितलेंस तें सनातन धर्माला अनुसरूनच आहे. द्रुपदा, युधिष्ठिराचें म्हणण्याप्रमाणें हा निःसंशय धर्म आहे. परंतु हा धर्म विहित कसा आहे, व सनातनही कसा आहे, हें सर्वांसमक्ष सांगण्यास मी तयार नाहीं; याला एकांत पाहिजे.

वैशंपायन सांगतात:—असें बोलून भगवान व्यास मुनि उठले, व द्रुपद राजाचा हात धरून त्याच्या राजवाड्यांत गेले. मग कुंती, पांडव व धृष्टद्युम्न हीं इकडे तिकडे गेलीं, व व्यास मुनि आणि द्रुपद हे परत केव्हां येतात म्हणून वाट पहात राहिलीं. इकडे एकांतांत गेल्यावर, अनेकांनीं एक पत्नी करणें ही गोष्ट धर्मविहित कशी हें व्यासांनीं द्रुपदास समजावून सांगितलें.

अध्याय एकशें सत्याण्णवावा.

—:०:—

पंचेंद्रोपाख्यान.

व्यास सांगतात:—द्रुपदा, पुरातनकाळीं देवांनीं नैमिषारण्यांत सत्र आरंभिलें त्यांत सूर्यपुत्र यम यानें शामित्राचें (पशुघातकाचें) काम पतकरून त्यानें तत्संबंधीं दीक्षा घेतली; व दीक्षा घेतल्याकारणानें तो प्रजेला मारीनासा झाला. तेव्हां मृत्युच नाहींसा झाल्यानें कांहीं काल लोटतांच लोकसंख्या अतोनात वाढली. हें पाहून देवांना चिंता उत्पन्न झाली. तेव्हां इंद्र, चंद्र, वरुण, कुबेर, साध्य, रुद्र, वसु, अश्विनीकुमार व इतर बरेच देव हे एकत्र होऊन प्रजापति ब्रह्मदेवाकडे जाऊन त्याला म्हणाले, "हे प्रजापते, मृत्युलोकीं मनुष्यांचा फार सुळसुळाट माजल्यामुळें आम्हांला भय उत्पन्न झालें व परित्राणार्थ आम्ही आपणांकडे आलों, आहों! तरी आमचें भय दूर करून आम्हांस सुखी करावें."

पितामह म्हणाला:—अरे, तुम्ही अमर असतांना मरणधर्मी मनुष्यांपासून तुम्हांला भय कां वाटावें? मला तर कांहीं कारण दिसत नाहीं.

देवांनीं उत्तर केलें:—आपलें म्हणणें आजपर्यंत खरें होतें. परंतु सांप्रत यम मनुष्यांना हा मारीनासा झाल्यामुळें, मनुष्य हेही मरणरहित म्हणजे आम्हांसारखे अमरच झाले आहेत,—आम्हांत व त्यांत कांहीं भेदच उरला नाहीं; आणि म्हणूनच आमचें धाबें दणाणलें आहे, व पूर्वीचा भेद आपण कायम राखावा ही विनंती करण्याकरितांच आम्ही आपणांकडे आलों आहों."

पितामह म्हणाला:—यम हा सत्रांत गुंतला आहे तोंपर्यंतच ही स्थिति आहे. तो त्यांतून मोकळा होतांच मनुष्यांचा सप्पा उडवील. सत्रांतीं, तुमच्याच वीर्यानें यमाचें रूप विभक्त व वृद्धिंगत होऊन मनुष्यांचा फडशा उडवील, व ह्याचे

तडाख्यापुढें मनुष्यें अगदीं हतवीर्य होऊन जातील. याकरितां तुम्ही मुळींच चिंता करूं नका.

व्यास सांगतातः—याप्रमाणें ब्रह्मदेवाचें भाषण श्रवण करून, ते इंद्रचंद्रादि अमर इतर देव जेथें सत्र करीत होते तेथें गेले. तेथें जाऊन एकत्र बसले असतां भागीरथीमध्यें एक कमल त्यांचे दृष्टीस पडलें. तें कमल पाहून सर्वांना मोठें आश्चर्य वाटलें. मग त्यांपैकीं शूर जो इंद्र, तो उठून त्या कमलापाशीं गेला. पुढें जातो तों गंगा नदीचा अखंड प्रवाह चालला असून तेथें अग्निज्वालेप्रमाणें देदीप्यमान, व केवळ लावण्याची ज्योत अशी एक तरुणी त्याचे दृष्टीस पडली. ती तरुणी जलार्थ गंगेंत उतरून अश्रु ढाळीत होती, व तिचा अश्रुबिंदु गंगोदकांत पडला कीं लागलीच त्या ठिकाणीं सुवर्णकमल उत्पन्न होत होतें. हा अद्भुत चमत्कार पाहून तो वज्रधर इंद्र त्या स्त्रीजवळ गेला, व तिला म्हणाला, "हे कल्याणि, तूं कोण आहेस, व अशी रडतेस कां, याचें खरें खरें उत्तर तुझे मुखांतून ऐकण्याची माझी इच्छा आहे."

त्या तरुणीनें उत्तर दिलें:—हे देवराज, तूं माझे मागोमाग चल; म्हणजे मी मंदभाग्या कोण आहें, व येथें कां रडत उभी आहें हें तुला सर्व ठीक समजून येईल.

व्यास म्हणतातः—असें बोलून ती स्त्री तेथून निघाली असता इंद्रही तिजमागून चालला. कांहीं अंतर चालून गेल्यावर हिमालयाचे मस्तकावर सिंहासन घालून तरुण स्त्रीसमवेत द्यूत खेळत बसलेला एक सुंदर तरुण पुरुष त्याचे दृष्टीस पडला. आपण देवेंद्र सन्निध आलों असून या तरुणानें आपला सत्कार केला नाहीं असें पाहून इंद्र त्याला म्हणाला, "हे विद्वन्, हें भुवन माझे सत्तेखालीं आहे, हें तुला ठाऊक नाहीं काय?" इंद्र असें बोलला तरी तो तरुण द्यूतांत इतका निमग्न होऊन गेला होता कीं, त्यानें त्याचे बोलण्याकडे कसें तें लक्ष दिलें नाहीं. तें पाहतांच इंद्र क्रुद्ध होऊन त्याला म्हणाला, "हे तरुणा, या स्थलाच्या मी स्वामी आहें हें तूं जाणीत नाहींस काय?"

द्रुपदा, याप्रमाणें इंद्र क्रोधवश झालासें पाहून देवाधिदेव शंकरांला अगोदर हसूं आलें; आणि नंतर सावकाशपणें ते इंद्राकडे न्याहाळून पाहूं लागले. त्यांची आणि इंद्राची दृष्टादृष्ट होताच देवराज इंद्र स्तंभित होऊन खांबासारखा जागचे जागीं निश्चल उभा राहिला, आणि त्यानें उचललेलें वज्र हातचे हातींच राहिलें! नंतर खेळ पुरेसा झाल्यावर शंकर त्या रोदन करीत असलेल्या स्त्रीला म्हणाले, "त्या इंद्राला असा माझ्याजवळ घऊन ये, म्हणजे पुनः कधीं त्याला गर्व होणार नाहीं असें करून टाकितों.!"

द्रुपदा, शंकराच्या ह्या आज्ञेप्रमाणें ती तरुणी इंद्राला घेऊन येणार, तों तिचा हस्तस्पर्श होतांच इंद्राचे हातपाय भेंडुळले, आणि तो भुईवर कोसळला! तें पाहून, उग्रतेजस्वी शंकर त्यास म्हणाले, "इंद्रा, इतउत्तर असा उद्धटपणा करूं नको. तुझें बल व वीर्य अतर्क्य आहे, त्या अर्थीं एवढा हिमालय एकीकडे सार, आणि याचे तळाशीं विवर आहे त्यांत तूं शिर; त्या विवरांत तुझ्यासारखेच सूर्यसम तेजस्वी दुसरेही पुरुष आहेत!"

द्रुपद राजा, मग शिवाज्ञेप्रमाणें इंद्रानें त्या विवराचें मुख मोकळें केलें असतां, तेथें आत्मप्रतिम असे दुसरे चार पुरुष त्याला आढळले. त्यांना पाहतांच, यांसारखीच आपली दशा होणार कीं काय अशी भीति पडून तो इंद्र फार दुःखित झाला, व विवरांत पाऊल घालीना. तें पाहून शंकर कोपायमान होऊन त्यावर डोळे वटारून त्याला म्हणाले, "इंद्रा, तूं मूर्खपणानें

माझा प्रथम अवमान केला आहेस. यास्तव कांकूं न करितां निमूटपणें या दरींत शीर."

शंकरांनीं याप्रमाणें दरडावून सांगतांच भयानें इंद्राची अगदीं गाळण उडून गेली; व उंच पर्वताच्या माथ्यावरील वाऱ्याच्या सोसाट्यांत सांपडलेल्या गलित अश्वत्थपर्णाप्रमाणें त्याची दशा उडाली ! मग तसाच थरथरत दीनवदन होऊन व शंकरांपुढें हात जोडून तो उभा राहिला असतां, वृषभवाहन शंकर त्यावर घसरून म्हणाले, "चल, आंत हो, थांबलास काय ?" असे जरबीचे शब्द त्या बहुरूपी उग्र शंकरांचे मुखांतून ऐकतांच इंद्र त्यांला म्हणाला, "शंकरा, ठीक आहे. माझी हिकमत फसली, त्या अर्थीं आज या अखिल जगताचा तूंच अधिपति आहेस. तूं काय म्हणशील तें प्रमाण !" तें ऐकून ते उग्ररूपी शंकर हसून म्हणाले, "बरें बरें, ऐकिलें, असल्या उन्मत्तांची येथें कींव केली जात नसते ! हे बघ दुसरे चौघे—हेही तुजप्रमाणेंच गुर्मींत होते. तेव्हां त्यांची गत तीच तुझी ! याकरितां बऱ्या बोलानें या विवरांत जाऊन पडून रहा. अशाशिवाय तुझी गुर्मी उतरणार नाहीं. आतां तूं गयावयां येतो आहेस, त्या अर्थीं तुला इतकेंच सांगतों कीं तुम्हां सर्वांना मनुष्ययोनि प्राप्त होईल. तेथें तुम्ही इतरांना असह्य असा उग्र पराक्रम करून हजारों लोकांना यमसदनीं पाठवाल; आणि इतकें केल्यावर स्वकर्मार्जित अशा महापुरुषोचित इंद्रलोकाप्रत पुनः प्राप्त व्हाल. यांत संशय नाहीं. मी जें सांगतों आहें, यांत माझे अनेक हेतु आहेत. याकरितां, मीं सांगितल्याप्रमाणेंच तुम्ही वागा."

पूर्वेंद्र म्हणाले:—शंकरा, एकदा मनुष्ययोनींत गेल्यावर तींतून सुटका होणें मोठें कठिण आहे तथापि तुमची आज्ञा शिरसा मान्य करून आम्ही देवयोनींतून मनुष्ययोनींत जातों. परंतु तेथें यम-धर्म, वायु, इंद्र व अश्विनीकुमार या पांच देवांनीं आमचे गर्भ मानुषी जननीचे उदरांत स्थापित केले पाहिजेत. त्याचप्रमाणें, आम्हांस पुढें दिव्यास्त्रें मिळालीं पाहिजेत; म्हणजे आम्ही मनुष्यांचा निःपात करून पुनरपि इंद्रलोकाप्रत परत येऊं.

व्यास म्हणतातः—त्या पूर्वेंद्रांचें या प्रकारचें भाषण ऐकून, तो अधिकारारूढ पांचवा इंद्र शंकराला म्हणाला, "ठीक आहे; हे चौघे जर मनुष्ययोनीला जात असतील, तर माझे बदलीं माझे वीर्यापासून उत्पन्न झालेला असा एक माझा अंशभूत पुरुष यांचे साह्यार्थ मी देतों." राजा द्रुपदा, विश्वभुक्, भूतधामा, शिबि व शांति असे ते चार पूर्वेंद्र व अंशरूपी तो पांचवा. त्या पांचही इंद्रांची मागणी त्या भोळ्या शंकरानें कबूल करून, ती रोदन करणारी त्रिभुवनसुंदरी लक्ष्मी त्यांची मृत्युलोकीं पत्नी होईल म्हणून नियम केला. नंतर त्या सहाजणांना घेऊन तो शंकर अतर्क्य, अनंत, अनादि, अव्यक्त, पुराण, सनातन व विश्वरूप अशा नारायणाकडे गेला. तेव्हां नारायणानेंही ती गोष्ट मान्य केली; व तीं साहीजणें मनुष्यलोकीं अवतीर्ण झालीं. इकडे ह्या नारायणानें एक शुभ्रवर्ण व एक कृष्णवर्ण असे दोन केश किंवा केशरूपी शक्ति बाहेर काढिल्या व त्या यादवकुलांतील स्त्रिया देवकी आणि रोहिणी यांचे ठिकाणीं प्रविष्ट केल्या. त्यांतील शुभ्रवर्ण शक्तीपासून बलराम जन्मला, व कृष्णवर्ण शक्तीपासून श्रीकृष्ण उत्पन्न झाला. पूर्वी त्या विवरांत कोंडून ठेविलेले जे चौघे इंद्र होते, ते चार पांडव, व सव्यसाची अर्जुन हा पांचव्या इंद्राचा अंशावतार. सारांश, हे जे आपण पांडव म्हणून पहातों, हे पूर्वजन्मींचे इंद्र आहेत; आणि शंकरांनीं पूर्वी सांगून ठेविल्याप्रमाणें यांची भार्या होण्याकरितां द्रौपदीरूपानें ही स्वर्गलक्ष्मी अवतरली आहे. बा द्रुपदा,

मी म्हणतों असा पूर्वीचा देवसंकेत नसेल, तर या मृत्युलोकीं केवळ तुझ्या अनुष्ठानानें असली चंद्रसूर्यांप्रमाणें तेजस्वी व कोसोंगणती अंगाचा सुगंध पसरणारी दिव्य कन्या निर्माण झाली असती असें तुला वाटतें काय? यावरूनच तूं माझें म्हणण्याची सत्यता मनांत आण. शिवाय, मी प्रसन्न होऊन तुला ही दिव्यदृष्टि देतों. हिच्या साह्यानें तुला हे कुंतीपुत्र त्यांच्या पूर्व जन्मींच्या दिव्य इंद्ररूपानें दिसतील.

वैशंपायन सांगतात:—राजा, असें म्हणून त्या तपःपूत व उदारबुद्धि व्यास मुनींनीं त्या द्रुपदाला दिव्य दृष्टि दिली. तिच्या योगानें द्रुपदाला ते सर्व पांडुपुत्र पूर्वीच्या दिव्यरूपानें दिसले. त्यांच्या रूपाचें वर्णन काय सांगावें? ते तारुण्याच्या ऐन भरांत असून, त्यांचीं वक्षस्थळें रुंद व भरदार होतीं, आणि त्यांचा बांधा फार उंच असून, मस्तकीं सुवर्णमुकुट घातलेले ते इंद्रोपम तेजस्वी अग्नि किंवा सूर्य यांप्रमाणें तेज टाकीत होते. त्यांच्या केशांचे बुचडे बांधले असून ते फार मनोवेधक दिसत होते. अंगावर दिव्य वस्त्रें असून गळ्यांत अति सुवासिक व ताज्या अशा पुष्पमाळा घातल्यानें, त्यांचें रूप फारच उज्ज्वल दिसत होतें. सारांश, ते सर्वगुणोपेत दिव्य पांडव त्रिनयन शंकर, वसु, रुद्र किंवा आदित्य यांसारखे दिसत होते. याप्रमाणें त्यांपैकीं चौघे पूर्वेंद्र व पांचवा इंद्रपुत्र असें पाहून द्रुपद राजा विस्मित व हर्षित होऊन त्या विस्मयकारक कन्येकडे पाहूं लागला, तों तीही रूपानें सर्व स्त्रियांत श्रेष्ठ—केवळ अनुपम—व चंद्राग्नितुल्य चमकणारी आणि रूप, तेज व कीर्ति यांच्या योगानें असलेल्या दिव्य पुरुषांची पत्नी होण्यास सर्वांशीं अनुरूप अशी पाहून, त्या राजश्रेष्ठाला फारच आनंद झाला; आणि हा एकंदर अद्भुत चमत्कार पाहून त्या द्रुपदानें सत्यवतीसुत व्यासांचे घट्ट पाय धरिले, व मोठ्या प्रसन्न मनानें त्यांस म्हटलें, "हे महर्षे, असला चमत्कार दाखविणें हें आपणांसारख्या समर्थाला सहज साध्य आहे!"

व्यास म्हणतात:—पूर्वी एका तपोवनांत कोणाएका महर्षीची अत्यंत सुंदर व सदाचरणसंपन्न अशी एक कन्या होती. परंतु तिला पति प्राप्त होईना. म्हणून तिनें अति उग्र तपश्चर्या करून श्रीशंकराला संतुष्ट केलें. तेव्हां शंकर प्रसन्न होऊन 'वर माग' म्हणून तिला म्हणाले असतां "मला सर्वगुणसंपन्न पति मिळावा" असें ती पुनःपुनः पांच वेळ त्या वरदात्या शंकराला म्हणाली. तेव्हां 'तुला पांच पति मिळोत' असें शंकर म्हणाले. तें ऐकून तिनें पुनरपि शंकराची कृपा संपादून 'मला एकच पति आपल्या कृपेनें मिळावा' असें म्हटलें. तें ऐकून तो देवाधिदेव प्रसन्न मनानें तिला म्हणाला, "हे कल्याणि, 'मला पति दे' असें तूं पुनःपुनः पांच वेळ म्हणालीस, त्या अर्थी तुला पांचच पति मिळतील. तथापि तूं याबद्दल खेद करूं नको. यांत तुझें कल्याण आहे, व हा माझा वर तुला जन्मांतरीं सफल होईल."

व्यास सांगतात:—हे द्रुपदा, ती ही ऋषिकन्या द्रौपदीच्या दिव्य रूपानें या जन्मीं अवतीर्ण झाली आहे; व अर्थातच ती या पांच बंधूंची धर्मपत्नी होणें विहित आहे. यांत कोठेंही नांव ठेवण्याला जागा नाहीं. बाबारे! ही स्वर्गीतील लक्ष्मी पांडवप्राप्त्यर्थ दुर्धर तप करून तुझ्या कन्येच्या रूपानें यज्ञामध्यें प्रकट झाली. सारांश, ही देवपूज्य सुंदरी स्वकर्मानेंच या पांचांची पत्नी होण्यासाठीं प्रत्यक्ष ब्रह्मदेवानें निर्माण केली आहे. तस्मात्, राजा, हा इतिहास समजून घेऊन आतां तुला जें इष्ट वाटेल तें कर.

अध्याय एकशें अठ्याण्णवावा.


—:०:—

द्रौपदीविवाह.

द्रुपद म्हणाला:—महानुभाव मुने, आपलें हें परमयोग्य भाषण श्रवण केल्यानें माझा सर्व संशय दूर झाला. यापूर्वी आपलें भाषण माझे ऐकण्यांत आलें नसल्यामुळें, आपल्या कन्येला स्वयंवरानें एक पति मिळवून देण्याची तजवीज मीं केली होती. परंतु दैवानें योजिलेली गोष्ट अन्यथा होत नाहीं म्हणून जें म्हणतात, त्याचा हा पूर्ण प्रत्यय आला! कारण, मीं आपलेकडून एक पति मिळविण्याविषयीं पण मांडिला असतां तोच पण पांच पति मिळण्यास कारणीभूत झाला! सारांश, प्रारब्धानें पूर्वी मारून ठेविलेल्यां गांठीं इहजन्मीं केलेल्या कर्मांच्या योगानें चुकत नाहींत. शिवाय, कृष्णेच्या तोंडूनही पतिप्राप्तीविषयीं पांच वेळ प्रार्थना झाली, व त्या परमेश्वरानेंही 'तुला पांच पति मिळोत' असाच तिला वर दिला. मग असें करण्याचें कारण काय असेल तें शंकरच पूर्णपणें जाणत असतील. तें कांहीं असलें तरी ज्या अर्थी ही गोष्ट स्वतः शंकरांनीं निश्चित केली आहे, त्या अर्थी ती पत्करण्यांत धर्म घडो किंवा अधर्म घडो, मजकडे त्याचा कांहीं दोष नाहीं असें समजून या पांचांना त्यांच्या इच्छेप्रमाणें कृष्णेचें पाणिग्रहण करण्याची मी मोकळीक देतों. कारण, ही यांची पत्नी म्हणून देवानेंच ठरविलें आहे असें आपल्या सांगण्यावरून निभ्रांत ठरतें. मग उगीच आडवळणांत जाण्यांत अर्थ काय?

वैशंपायन सांगतात:—हें ऐकून भगवान व्यास मुनि धर्मराजाला म्हणाले, "बा युधिष्ठिरा, आजच फार चांगला दिवस आहे. कारण आज चंद्राचा संततिदायक नक्षत्राशीं योग आहे. तेव्हां तूं प्रथम कृष्णेचें पाणिग्रहण कर.

धर्मराजास झालेली ही व्यासाज्ञा ऐकतांच द्रुपद राजानें वराकडील मंडळीला देण्यासाठीं ठरवून ठेविलेल्या अनेक उंची उंची वस्तु व रत्नें यांसहवर्तमान रत्नभूषणांनीं अलंकृत केलेली आपली कन्या तेथें आणिली. नंतर, आनंदित झालेले द्रुपदाचे सर्व इष्टमित्र, अमात्य, प्रजाजन व ब्राह्मण हे विवाहसमारंभ पाहण्यासाठीं तेथें जुळले असतां, नानाप्रकारच्या कृत्रिम कमलांनीं ज्यांतील चौक अलंकृत केले आहेत, ज्यांत रंगीबेरंगी पोषाख घालून सैनिक उभे आहेत, तसेंच ज्यांत उंची वस्त्रें परिधान करून मोठमोठे श्रीमान लोक बसले आहेत, व जागजागीं रत्नांचीं कोंदणें केलीं आहेत असें तें राजमंदिर नक्षत्रयुक्त आकाशाप्रमाणें शोभूं लागलें. नंतर, राजा, ते तरुण पांडुपुत्र मंगलस्नान करून, बहुमोल वस्त्रें परिधान करून, अंगास चंदनाची उटी लावून, व कुंडलादि अलंकार धारण करून आणि पुण्याहवाचनादि मंगलकृत्यें उरकून, सोरटी बैल ज्याप्रमाणें गोठ्यांत शिरतात, त्याप्रमाणें मोठ्या आनंदाच्या भरांत अग्नितुल्य तेजस्वी अशा आपल्या धौम्य नामक पुरोहिताबरोबर लग्नमंडपांत एकामागून एक शिरले. नंतर त्या वेदपारंगत मंत्रवेत्त्या धौम्य मुनींनीं शांत चित्तानें हवन केलें, व युधिष्ठिराला जवळ आणून त्याची द्रौपदीशीं गांठ मारली, व वधूवरांकडून अग्नीला प्रदक्षिणा करवून त्यांचा त्यानें विवाह लाविला. नंतर, त्या रणनिपुण युधिष्ठिराला जाण्याविषयीं आज्ञा देऊन धौम्य मुनि राजगृहांतून चालते झाले. पुढें त्या महारूपसंपन्न महारथी कौरववंशवर्धन पांडुपुत्रांनीं क्रमानें एकेक दिवशीं एकेकानें याप्रमाणें त्या सुंदर राजकन्येचें पाणिग्रहण केलें. त्या प्रसंगीं महर्षि व्यास मुनींच्या वचनावरून एक मात्र अलौकिक चमत्कार घडून आला. तो असा कीं, ती महानुभावा द्रौपदी प्रतिदिवशीं कुमारीच होत असे!



असो; विवाह झाल्यानंतर द्रुपदानें महारथी पांचही पांडवांना ज्यांना सोनेरी लगाम घातलेले असून चार चार घोडे जुंपलेले आहेत असे व सुवर्णमालांनीं अलंकृत केलेले—शंभर रथ, सुवर्णशिखरांनीं युक्त अशा पर्वतांप्रमाणें प्रचंड असे उत्तम जातीचे शंभर गज, त्याचप्रमाणें मूल्यवान अलंकार, वस्त्रें, माला व पोषाख धारण केलेल्या अशा शंभर तरुण दासी इत्यादि नानाप्रकारच्या बहुमोल देणग्या अग्नीसमक्ष पृथक् पृथक् दिल्या. शिवाय, विशिष्टगुणयुक्त अशीं कांहीं वस्त्रें व भूषणेंही त्या महानुभावानें त्यांस दिलीं. याप्रमाणें विवाहविधि आटोपल्यानंतर अनेक रत्नराशींसहित ती लक्ष्मीरूपिणी द्रौपदी बरोबर घेऊन ते इंद्रतुल्य बलाढ्य पांडव द्रुपद राजाच्या नगरांत कांहीं दिवस आनंदांत राहिले.

अध्याय एकशें नव्याण्णवावा.

—:०:—

द्रौपदीला कुंतीचा आशीर्वाद.

वैशंपायन सांगतात:—याप्रमाणें द्रुपदाचा पांडवांशीं संबंध जडल्यानें त्याला इतकें सामर्थ्य आलें कीं, देवांपासूनही त्याला भय कसलें तें उरलें नाहीं. त्या द्रुपदाच्या स्त्रियांनीं कुंतीजवळ येऊन आपआपलें नांव सांगून तिच्या पायांवर डोकीं ठेविलीं. नंतर, रत्नकंकण व मंगलसूत्र घातलेली आणि महावस्त्र नेसलेली कृष्णा सासूच्या बोलावण्यावरून पुढें येऊन तिच्या पायां पडली, व हात जोडून नम्रपणें जवळ उभी राहिली. त्या वेळीं त्या रूपलक्षणसंपन्न, सच्छील व सदाचरणी अशा आपल्या सुनेकडे पाहून कुंती फार प्रसन्न झाली, व तिनें तिला प्रेमपूर्वक आशीर्वाद दिला कीं, "इंद्राला जशी इंद्राणी, अग्नीला जशी स्वाहा, चंद्राला जशी रोहिणी, नलाला जशी दमयंती, कुबेराला जशी भद्रा, वसिष्ठाला जशी अरुंधती, आणि विष्णूला जशी लक्ष्मी, तशी तूं आपल्या भर्त्यांना आनंददायिनी हो. हे कल्याणि, तुला दीर्घायु व पराक्रमी अशी संतति होवो. तूं नेहमीं अनेक सुखांनीं युक्त होऊन सौभाग्यभोगसंपन्न हो. तूं पतिव्रता आणि यज्ञपत्नी हो; व अतिथि, अभ्यागत, साधु, वृद्ध, बाल व गुरु यांचा यथायोग्य परामर्ष घेण्यांत तुझें दीर्घायुष्य वेचो. हे धर्मवत्सले, तूं युधिष्ठिरासमागमें कुरुजांगलादि राष्ट्रें व इतर नगरें यांची अभिषिक्त राणी हो, व तुझ्या महापराक्रमी पतींनीं स्वबलानें जिंकिलेली सर्व पृथ्वी अश्वमेध नामक महाक्रतूंत तूं ब्राह्मणांना अर्पण कर. हे गुणवति, पृथ्वीमध्यें ज्या ज्या उत्कृष्ट वस्तु असतील, त्या तुला प्राप्त होऊन तूं शंभर वर्षें पूर्ण सुखांत नांद; आणि, हे स्नुषे, लग्नसाडा नेसलेल्या तुला आज ज्याप्रमाणें मी आशीर्वाद देत आहें, त्याचप्रमाणें तुझ्या मांडीवर पुत्र खेळतांना पाहून तुला आशीर्वाद देण्याची मला लवकरच वेळ येवो!"

कृष्णाकडील अहेर.

वैशंपायन सांगतात:—नंतर, पांडवांनीं स्त्रीपरिग्रह केला हें ऐकून लक्ष्मीपति कृष्णानें त्यांकडे अहेर पाठविला. त्या अहेरांत वैदूर्य रत्नजडित सुवर्णाचे अलंकार, नानादेशांतील बहुमोल वस्त्रें, मृदु व उंची शाली आणि कृष्णाजिनें, नानातऱ्हेच्या शय्या, आसनें, भेणें, पालख्या वगैरे महायानें, रत्नखचित शेंकडों पात्रें, सुंदर, तरुण व चतुर अशा नानादेशांतील अलंकार घातलेल्या हजारों दासी, चांगले शिकवलेले जातिवंत हत्ती, शृंगारलेले उंची उंची घोडे, किनखाबानें मढविलेले हस्तिदंती रथ, व सोन्याच्या कोट्यवधि विटा होत्या! याप्रमाणें श्रीकृष्णानें पाठविलेला तो अहेर कृष्णप्रीतीस्तव युधिष्ठिरानें मोठ्या आनंदानें स्वीकारिला!

राज्यलंभपर्व.

अध्याय दोनशेंवा.

—:०:—

दुःखित दुर्योधनादिकांचें स्वगृहीं गमन.

वैशंपायन सांगतातः—राजा, नंतर, शुभलक्षणसंपन्न द्रौपदी पांडवांची पत्नी झाली, हें वर्तमान ठिकठिकाणच्या राजांना त्यांच्या विश्वासू हेरांकडून कळलें: हेरांनीं सांगितलें, " स्वयंवरमंडपांत ज्या महात्म्यानें तें धनुष्य वाकवून लक्ष्यवेध केला, तो महाधनुर्धर अर्जुन होय; व ज्यानें क्रुद्ध होऊन वृक्ष उपटून रणांत सर्व वीरांना झोडून काढिलें, व मद्राधिपति शल्याला उचलून भूमीवर आपटलें, आणि इतकें करूनही ज्याची कांहीं घाटक उडाली नाहीं, तो दुःस्पर्श व शत्रुसेनाविध्वंसक भीमसेन होय ! "

जनमेजया, लाक्षागृहामध्यें पांडव दग्ध झाले असतां ब्राह्मणरूपानें ते स्वयंवरमंडपांत आले होते, हें ऐकून सर्व राजांना फार विस्मय वाटला! पुत्रांसह कुंती दग्ध झाली म्हणून पूर्वीं ऐकिलें असल्यानें, आज पांडवांचा पुनर्जन्मच झाला असें त्यांना वाटलें; आणि पुरोचनाच्या त्या अति नीच कृत्याला संमति दिल्याबद्दल त्यांनीं धृतराष्ट्राची व भीष्माचीही निंदा केली. स्वयंवर आटोपल्यावर, द्रौपदीनें पांडवांस माळ घातली हें कानीं येतांच तेथें जमलेले राजे आल्या वाटेनें परत गेले.

इकडे, द्रौपदीनें अर्जुनाला वरिल्याचें ऐकून दुर्योधनाला फार खेद झाला; व अश्वत्थामा, शकुनि, कर्ण, कृप आणि आपले भ्राते यांसह तो परत फिरला. त्याला पाहून तो निर्लज्ज दुःशासन पुटपुटूं लागला कीं, "राजा, काय सांगूं रे! अर्जुन ब्राह्मणरूपानें न येता तर त्याला द्रौपदी खास मिळाली नसती ! राजा, त्याला अर्जुन म्हणून कोणींच ओळखिलें नाहीं ! एकंदरींत आपण आजपर्यंत एवढाले प्रयत्न करूनही जर पांडव जिवंत आहेत, तर मला वाटतें कीं, दैव हेंच बलवत्तर असून पुरुषप्रयत्न त्यापुढें व्यर्थ आहेत. दुर्योधना, पांडव ज्या अर्थीं जिवंत आहेत, त्या अर्थीं आपल्या पौरुषाला खचीत धिक्कार असो ! " ह्याप्रमाणें बोलून व पुरोचनाची निंदा करून ते कौरव दीन व हिरमुष्टी होऊन हस्तिनापुरांत शिरले. महातेजस्वी पांडव अग्नींतून मुक्त होऊन द्रुपदाचे संबंधी झाले असें पाहून, व धृष्टद्युम्न, शिखंडी आणि द्रुपदाचे संग्रामनिपुण सर्व पुत्र यांचें पांडवांस सहाय मिळालें हा विचार मनांत येऊन तर ते अतिशयच खिन्न झाले, आणि त्यांच्या उड्या जागच्या जागींच राहिल्या !

इकडे, पांडवांनीं द्रौपदी वरिली व धृतराष्ट्रपुत्र हतगर्व व लज्जित झाले हें ऐकून विदुर प्रसन्न अंतःकरणानें धृतराष्ट्रास म्हणाला, "हे प्रजानाथा, कुरूंचा उत्कर्ष झाला ही गोष्ट फार चांगली झाली ! " हे विदुराचे शब्द ऐकतांच धृतराष्ट्रास अत्यानंद होऊन " वाहवा, फार चांगलें ! फार चांगलें !" असें तो म्हणाला. कारण, विदुराच्या या भाषणावरून, द्रुपदकन्येनें आपल्या ज्येष्ठ पुत्र दुर्योधनाला माळ घातली असा अर्थ त्या प्रज्ञाचक्षूनें केला; आणि खरा प्रकार लक्षांत न आल्यामुळें, द्रौपदीला पूर्ण अलंकार घालून मजकडे घेऊन ये म्हणून त्यानें दुर्योधनाला आज्ञा केली. हें ऐकतांच विदुरानें त्यास सांगितलें कीं, " द्रौपदीनें पांडवांनाच वरिलें; ते सर्व कुशल आहेत. द्रुपदानें त्यांचा मोठा आदरसत्कार केला, व स्वयंवरमंडपांत, बलाढ्य असे पांडवांचे अनेक संबंधी त्यांस येऊन मिळाले आहेत. "

धृतराष्ट्र म्हणालाः—विदुरा, पांडव हे पांडूला जसे प्रिय होते, तसेच किंबहुना त्याहूनही मला अधिक प्रिय आहेत. अधिक प्रिय असण्याचें कारण असें आहे कीं, पांडव हुषार व शूर अ-

सून त्यांना मित्रसहाय आहे; तसेंच त्यांचे संबंधी अनेक असून ते सर्व महाबलाढ्य आहेत. विदुरा, बांधवांसहवर्तमान द्रुपद राजासारख्याचें सहाय मिळालें असतां भ्रष्टराज्य असला तरी कोणता राजा पुनः राज्यप्राप्ति करून घेण्याची उमेद बाळगणार नाहीं ?

वैशंपायन सांगतातः—याप्रमाणें धृतराष्ट्राचें भाषण ऐकून विदुर त्याला म्हणाला, " राजा, पांडवांविषयीं तुझी हीच बुद्धि मरेपर्यंत सदा कायम असो. " असें म्हणून विदुर आपल्या घरीं गेला. नंतर दुर्योधन व कर्ण हे धृतराष्ट्राजवळ येऊन म्हणूं लागले कीं, " विदुराच्या समक्ष आपणांला आमच्यानें दोष देववेना. परंतु आतां येथें एकांत आहे, म्हणून आम्ही आपणांस असें स्पष्ट विचारतों कीं, हें आपण मनांत काय आणिलें आहे ? ताता, शत्रूंच्या उत्कर्षाला आपण आत्मोत्कर्ष समजतां, व विदुरासमक्ष शत्रूंची इतकी स्तुति करितां, या प्रकाराला काय म्हणावें ? महाराज, आज आपण करावयाला पाहिजे आहे निराळेंच, आणि आपण योजिलें आहे निराळेंच! हे तात, जेणेंकरून शत्रूंचें बल क्षीण होईल अशी तजवीज आपण सदा केली पाहिजे; व म्हणून, जेणेंकरून आमचे शत्रु हे आमचे पुत्र, बल व बांधव यांसह आमचा नाश करूं शकणार नाहींत, अशी कांहीं तरी प्रसंगानुरूप तोड काढण्याच्या आम्ही विचारांत आहों ! "

अध्याय दोनशें एकावा.

—:०:—

पांडवनाशार्थ दुर्योधनाचे उपाय.

धृतराष्ट्र म्हणतोः—बाबांनो ! तुमच्याप्रमाणेंच माझ्याही मनांत आहे. परंतु आपलें खरें स्वरूप विदुराला प्रकट करून दाखविण्याची माझी इच्छा नसल्यामुळें, आपला अभिप्राय गुप्त राखण्यास्तव मी विदुरासमक्ष सर्वदा पांडवांचे गोडवेच गात असतों, त्यावर तुम्ही जाऊं नका. बा सुयोधना, प्रस्तुत जें समयोचित कर्तव्य दिसेल तें तूं मला सांग. तसेंच, राधेया, तूंही तुला वाटत असेल तें सत्वर कथन कर.

दुर्योधन म्हणतोः—तात, गुप्त राहून आपण सांगितलेली कामगिरी खातरीनें बजावतील असल्या विश्वासू व चतुर ब्राह्मणांकडून कुंतीपुत्र व माद्रीपुत्र यांत भेद उत्पन्न करावा. अथवा, अपार संपत्ति देऊन पुत्रअमात्यांसह द्रुपद राजाला अशा रीतीनें आपलासा करावा कीं, तो कुंतीपुत्र युधिष्ठिराचा पक्ष सोडून देईल. नाहीं तर, पांडव आहेत त्या जागींच राहणें त्यांना गोड वाटेल असें करवावें. असें करण्याकरितां, इकडे येण्यानें त्यांची फार हानि आहे म्हणून निरनिराळ्या प्रकारांनीं ब्राह्मणांनीं वर्णन करावें; किंवा कोणीं हिकमती पुरुषांनीं त्या पांडवांचें परस्परांत बितुष्ट येईल अशी कांहीं शक्कल लढवावी. अथवा, यांहूनही सरस युक्ति म्हणजे द्रौपदीलाच फितवावी, आणि तिला अनेक पति असल्यामुळें ही मसलत सहज साधणारी आहे. किंवा तिच्यावरून पांडवांतच परस्पर द्वेष उत्पन्न करावा; किंवा, हे पांडव त्या भीमाच्या जिवावर आम्हांला कसपटाप्रमाणें समजतात; कारण, सर्वांत तोच मोठा तिखट, शूर व बलाढ्य असून त्यावरच सर्वांची भिस्त आहे; याकरितां कोणी तरी उपायनिपुण पुरुषांकडून गुप्तरूपानें भीमाची प्राणहानि करवावी. तोच त्यांचा मुख्य मेढा असल्यामुळें तो नष्ट होतांच पांडव निरुत्साह व निस्तेज होतील; आणि राज्य मिळविण्याच्या खटपटींत पडणार नाहींत. भीम पाठीराखा असला तर अर्जुन युद्धांत अजिंक्य आहे. परंतु तोच भीमाचा आधार नाहीसा झाला म्हणजे मग एकटा अर्जुन कर्णाच्या चौथाईला सुद्धां पुरणार नाहीं. भीम मरतांच आपण दुबळे झालों, व आपले शत्रु

धार्तराष्ट्र बलाढ्य आहेत हें ओळखून राज्य मिळविण्याच्या भानगडींत ते पांडव पडणार नाहींत. याकरितां भीमाला ठार करावा, किंवा त्यांना फुसलावून येथें आणावें, आणि येथें आल्यावर ते आमच्या आज्ञेंत वागूं लागले म्हणजे कांहीं तरी शास्त्रीय युक्तीनें आम्ही त्यांस नाहींतसे करूं. किंवा सुरूप आणि तरुण अशा स्त्रिया पाठवून एकएकाला त्यांच्या नादीं लावावें, म्हणजे त्यांजविषयीं द्रौपदीचें मन आपोआपच विटेल. अथवा त्यांना आणण्याकरितां कर्णास तिकडे पाठवावें, आणि ते येथें आल्यावर आपलें हित साधणाऱ्या विश्वासू पुरुषांनीं त्यांच्याशीं मिळून मिसळून राहून वेळेस साधतील तशा उपायांनीं त्यांचा घात करावा!

राजा, मी आपल्याकडून इतके उपाय सुचविले आहेत. त्यांपैकीं जो बिनचूक तडीस जाईल असें तुला वाटत असेल, त्याचा तूं वेळेवरच प्रयोग कर. जोंपर्यंत पार्थिवश्रेष्ठ द्रुपदावर त्यांनीं सर्वांशीं भिस्त टाकिली नाहीं, तोंपर्यंतच ते आपल्या तावडींत सांपडूं शकतील; मग सांपडणार नाहींत. सारांश, हे तात, साधेल तिकडून पांडवांचा नाश करावा अशी माझी मति वाहते. मग तिला तूं बरी म्हण किंवा वाईट म्हण. का कर्णा, तुझें मत कसें काय आहे?

अध्याय दोनशें दुसरा.

—:०:—

कर्णाचें भाषण.

कर्ण म्हणालाः—दुर्योधना, तुझी ही बुद्धि मला पसंत नाहीं. कारण, हे कुरुवर्धना, असल्या उपायांनीं पांडवांचा नाश होणें शक्य नाहीं. आजपर्यंत असल्या खटपटी तूं थोडया का केल्यास? असें असून, हे वीरा, ते जिवंत आहेतच ना? अरे, पोरपणीं त्यांना कोणी साथी मिळाला नसून तुझ्या अगदीं घरांत ते नांदत होते, पण अशा वेळीं देखील तुझ्यानें त्यांचा नाश झाला नाहीं; मग आतां तर ते मोठे बलाढ्य झाले असून त्यांना पुष्कळ साह्यकर्ते मिळाले आहेत, व ते तुझ्या सीमेच्या बाहेर रहात आहेत. अशा स्थितींत तुझे असले पेंच त्यांवर कसे चालणार? कधींही चालणार नाहींत, असें माझें तर ठाम मत आहे. बरें, त्यांना व्यसनांत पाडणेंही शक्य नाहीं. कारण, आपण इतके त्यांच्या नाशाचे उपाय योजीत आहों, तरी त्यांचें कांहींच कमी न होतां उलट ते इतके सामर्थ्यवान झाले. त्या अर्थीं त्यांना दैव अनुकूल आहे हें स्पष्ट होतें; आणि आतां ते अर्थातच आपल्या बापआजांच्या गादीवर हक्क सांगण्याला पुढें सरसावत आहेत. त्यांच्यांत आपसांत फूट पाडतां येणें शक्य नाहीं; कारण, एकाचेच ठिकाणीं रमणारे जे अनेक पुरुष, ते बहुधा एकविचाराचे असतात; त्यांच्यांत भेद उत्पन्न करितां येत नाहीं. बरें, तूं म्हणशील, द्रौपदीलाच फितवूं, तर तेंही साध्य नाहीं. कारण, ते कोरान्न मागत होते अशा हीनस्थितींत देखील जर तिला आवडले, तर आतां तर ते गबर होऊन; दिव्यवस्त्रालंकारयुक्त आहेत; अशांना ती कशी सोडील? शिवाय, तुला एक खुबी सांगतों कीं, एकीला अनेक भोक्ते असावे हें स्त्रियांना मनांतून इष्टच असतें; आणि द्रौपदीला जर आयतेच राजरोस रीतीनें मनाजोगे पांच भोक्ते मिळाले आहेत, तर त्यांचा त्याग करण्याचें तिच्या मनांत कधींही येणार नाहीं. द्रुपदाला लांच द्यावा म्हणतोस, पण तो मोठा सभ्य आहे, तो धनलोभी नाहीं. तूं त्याला एक सोडून दहा राज्यें दिलींस तरी तो पांडवांना हातचे सोडणार नाहीं. बरें, त्याचा पुत्र धृष्टद्युम्न, तोही मोठा गुणवान असून पांडवांवर त्याचा फार जीव आहे. सारांश, हे नरश्रेष्ठा, असल्या कोणत्याही उपायांनीं पांडवांचा घात होणें शक्य नाहीं. माझे मतें म्हणशील तर एकच गोष्ट आज

करितां येण्याजोगी आहे. ती ही कीं, द्रुपदादिकांचें पूर्ण साहाय्य मिळून त्यांची मुळें जोंपर्यंत खोल रोवलीं गेलीं नाहींत, तोंच ते उपटून टाकितां येतील. तेव्हां जोंपर्यंत आपला पक्ष जोरांत आहे व पांडवांचा दुर्बल आहे, तोंपर्यंतच त्यांना हाणून पाड, उगाच सतरा पंधरा बेत करीत बसूं नको. हे गांधारीपुत्रा, पांडवांना जों बरींचशीं राजकुळें, स्नेही व वाहनें मिळालीं नाहींत, तोंच त्यांच्यावर समशेर फिरव. आपल्या पराक्रमी पुत्रांसह पांडवांचे बाजूनें उभें राहण्याचें त्या बलाढ्य द्रुपदानें जोंपर्यंत मनांत आणिलें नाहीं, तोंपर्यंत आपला डाव साधून घे. पांडवांकरितां अपार संपत्ति, दिव्य भोग किंवा समृद्ध राज्यही सोडण्यास कृष्ण मागेंपुढें पाहणार नाहीं असें त्याचें पांडवांवर उत्कट प्रेम आहे. तस्मात् तो कृष्ण अपार यादवसेना बरोबर घेऊन पांडवकार्यार्थ द्रुपदाला येऊन मिळाला नाहीं, तों काय तो पराक्रम गाजव.

पराक्रमप्रशंसा.

अरे, महात्म्या भरतानें स्वपराक्रमानेंच पृथ्वीचें राज्य मिळविलें; आणि देवेंद्रानें स्वपराक्रमानेंच त्रैलोक्याचें आधिपत्य प्राप्त करून घेतलें. हे प्रजानाथा, क्षत्रिय म्हटला कीं त्याला पराक्रमाचेंच भूषण आहे. पराक्रम हा या शूर जातीचा स्वधर्मच होय. आज आपलेपाशीं प्रचंड चतुरंग बल जय्यत आहे, याकरितां आपण असेच चाल करून जाऊन द्रुपदाला चिरडून पांडवांना तावडतोब मुसक्या बांधून येथें घेऊन येऊं. अरे, साम, दान, भेद असल्या उपायांनीं पांडव आपले कह्यांत येणें शक्य नाहीं. याकरितां तरवारीनेंच त्यांना नाहींतसे कर. स्वपराक्रमानें तूं त्यांना एकदा मातीस मिळव, आणि मग खुशाल अखंड पृथ्वीचें राज्य भोगीत बैस. सारांश, पराक्रमाव्यतिरिक्त दुसरा कार्यसिद्धीचा उपाय मला तरी सुचत नाहीं.

वैशंपायन सांगतातः—प्रतापी धृतराष्ट्रानें हें कर्णाचें भाषण ऐकून त्याला फार शाबासकी देऊन म्हटलें, "बा सूतपुत्रा, तुझ्यासारख्या बुद्धिमान व अस्त्रनिपुण वीराला हें मर्दुमकीचें भाषण ठीकच शोभतें आहे. तथापि भीष्म, द्रोण व विदुर यांसह तुम्ही दोघे या गोष्टीचा पुनः एकवार विचार करून, जेणेंकरून आम्हांस सुखलाभ होईल अशी मसलत ठरवा." जनमेजया, इतकें बोलून त्या यशस्वी धृतराष्ट्रानें भीष्मादि मंत्र्यांना आणवून त्यांशीं मसलत केली.

अध्याय दोनशें तिसरा.

—:०:—

भीष्मांचें भाषण.

भीष्म म्हणाले:—कसेंही म्हटलें तरी पांडवांशीं युद्ध करणें मला रुचत नाहीं. मला जसा धृतराष्ट्र तसाच पांडु, व जसे गांधारीचे पुत्र तसेच कुंतीचे. हे धृतराष्ट्रा, मजप्रमाणेंच तुलाही त्यांचें संरक्षणच केलें पाहिजे. बरें, दुर्योधन झाला किंवा इतर कोणीही कुरुवंशज झाला, तरी त्याला ते मजप्रमाणेंच दूरचे नाहींत. याकरितां, त्यांशीं युद्ध करणें मला संमत नाहीं. माझे मतें खरा मार्ग म्हटला म्हणजे तुम्हीं त्यांशीं स्नेह करून त्यांना अर्धे राज्य द्यावें. कारण, त्या कुरुश्रेष्ठांचें देखील हें वडिलार्जितच राज्य आहे. अर्थात्, दुर्योधना, या राज्यावर 'आपलें वडिलार्जित' म्हणून जसा तुझा डोळा आहे, त्याच अर्थानें यांचाही आहे. अरे, त्या यशस्वी पांडुसुतांना जर त्यांचें वडिलार्जित राज्य मिळूं नये, तर तुला तरी तें का मिळावें? किंवा दुसऱ्या कोणत्याही भरतवंशजाला कोणत्या न्यायानें मिळावें? दुर्योधना, अन्यायानें तूं हें राज्य लाटलेंस ही गोष्ट निराळी. परंतु न्यायाप्रमाणें पाहतां तुझ्याही पूर्वी ते राज्याचे अधिकारी आहेत. सारांश, हे पुरुषव्याघ्रा, गोडीनें तूं पांडवांस त्यांचें

अर्धराज्य द्यावें यांत तुझें व सर्वांचेंच हित आहे. यापलीकडे जर तूं वागशील, तर आपले पक्षाचें कल्याण न होतां जगभर तुझी अपकीर्ति मात्र होईल, हें पक्कें समज. बाबारे, मनुष्यानें

कीर्तिरक्षण

अवश्य केलें पाहिजे, तेव्हां तूं कीर्तीला जप; कारण, कीर्ति हेंच मोठें बळ आहे. कीर्तिहीन मनुष्य जिवंत असून मेलाच समजावा. हे गांधारीपुत्रा, मनुष्याची जोंपर्यंत कीर्ति उभी आहे, तोंपर्यंत तो मेला तरी जिवंतच आहे; आणि कीर्ति नष्ट झाली असतां तो जिवंत असूनही मृततुल्य आहे. याकरितां, आपल्या ह्या कुरुकुलाला शोभेल अशी न्यायबुद्धि धरून पांडवांना राज्यार्ध दे. असें करण्यांत तुला व तुझे पूर्वजांनाही भूषण आहे. अरे, पापी पुरोचन बेत फसून ठार झाला, व पांडव जिवंत राहून कुंतीही वांचली, हें तुझें मोठें सुदैवच समज. बा दुर्योधना, पांडव व कुंती दग्ध झाल्याची वार्ता पसरल्या दिवसापासून लज्जेमुळें कोणाही मनुष्याला तोंड दाखवावेंसें मला वाटेना. या कामीं लोक तुला जसा दोष देतात, तसा पुरोचनाला देत नाहींत. तेव्हां ते जिवंत उरले हें तुझें सुदैव; यामुळें तूं आयता दोषमुक्त झालास! याकरितां आतां पांडवांची स्नेहबुद्धीनें भेट घेण्याचें ठरवा, आणि त्यांचें राज्यार्ध त्यांना द्या. कारण, पांडव जिवंत असतां त्यांचें वडिलार्जित राज्य साक्षात् वज्रधर इंद्र देखील त्यांपासून हिरावूं शकणार नाहीं. मग तुझ्यासारख्याला तें कोठून पचेल? आणि हें उघडच आहे. ते सारे पराक्रमी असून धर्माप्रमाणें चालतात, व एकमतानें वागतात. शिवाय, तूं जरी अन्यायानें त्यांना हुसकून दिलेंस, तरी या राज्यावर तुझ्या बरोबरीनें त्यांचा हक्क आहे; त्या अर्थी ते चिकाटी कधीं ती सोडणार नाहींत. सारांश, तुला जर न्याय करणें कबूल असेल, तसेंच माझें प्रिय व स्वतांचें कल्याण करून घेणें असेल, तर त्यांचें अर्ध राज्य त्यांना दे.

अध्याय दोनशें चौथा.

—:०:—

द्रोणाचार्यांचें भाषण.

द्रोणाचार्य म्हणाले:—राजा आम्ही असें ऐकत आलों कीं, खऱ्या हितेच्छु मंत्र्यांनीं धर्म, अर्थ व यश यांना साधक असेंच सांगणें तें सांगावें. यावरून मलाही भीष्मांचेंच सांगणें मान्य आहे. तुम्हीं कुंतीपुत्रांना त्यांचा भाग देऊन टाकणें हाच सनातन धर्म आहे. म्हणून पांडवांना देण्याकरितां बहुविध रत्नें बरोबर देऊन एखादा मधुरभाषणी मनुष्य द्रुपदाकडे त्वरित पाठवा. तेथें गेल्यावर, वधूवरांना अहेर म्हणून तीं रत्नादि देऊन, "आपल्याशीं शरीरसंबंध झाल्यामुळें कुरुकुलाचा मोठा उत्कर्ष झाला असें वाटून राजा धृतराष्ट्र व दुर्योधन यांस फार आनंद झाला. हा योग घडून आला हें फार योग्य व इष्ट झालें!" असें द्रुपद व धृष्टद्युम्न यांसमक्ष त्या पुरुषानें वारंवार बोलावें. त्याचप्रमाणें कुंतीपुत्र व माद्रीपुत्र यांचीही त्यानें पुनःपुनः मनधरणी करावी. राजा, तुझे आज्ञेनें म्हणून त्यानें द्रौपदीला स्वर्णमय व रत्नमय अनेक अलंकार द्यावे. ह्याप्रमाणेंच सर्व द्रुपदपुत्र, पांडव व कुंती यांनाही शोभतशीं वस्त्रें आणि भूषणें देऊन संतुष्ट करावें. या प्रकारें पांडवांसह द्रुपदाशीं सामोपचारानें वागून नंतर पांडवांनीं इकडे येण्याविषयींची गोष्ट द्रुपदाजवळ काढावी. द्रुपदाची त्या कामीं अनुज्ञा मिळाली म्हणजे पांडवांना आणण्याकरितां इकडून निवडक सैन्य बरोबर घेऊन दुःशासन व विकर्ण यांनीं जावें. ते श्रेष्ठ पांडव येथें आल्यावरही तूं त्यांचा मान राखीत जा, म्हणजे सर्व प्रजाजनही त्यांवर संतुष्ट राहून ते वडिलार्जित राज्याचा सुखानें उपभोग घेतील.

हे महाराजा, या प्रकारें तूं पांडवाशीं व आपले पुत्रांशीं वागणें योग्य आहे, असें भीष्मांचें व माझेंही मत आहे.

कर्ण म्हणाला:—हः ! या भीष्मद्रोणांचा द्रव्यानें व सन्मानानें इतपत संतोष करीत असतां, व कोणत्याही कामांत यांशीं बिलकूल पडदा न ठेवून आपण वागत असतां आपल्या कल्याणाची मसलत हे आपणांस सांगत नाहींत, तेव्हां, हे महाराजा, याहून दुसरें आश्चर्य तें कोणतें ? जो दुष्टवृत्ति मनुष्य आपला खरा भाव छपवून ठेवून कल्याणाची कांहीं तरी गोष्ट सांगतो, त्याची कृति सज्जनांना कशी मान्य व्हावी ! हितेच्छु म्हणविणारानें निष्कपट सल्ला दिली पाहिजे. बाकी, तसाच दुर्धर प्रसंग आला असतां तो मित्रांच्यानें म्हणजे टाळवतो असें नाहीं. कारण, कोणालाही दैवानें पूर्वी ठरविलें असेल त्याप्रमाणेंच सुख किंवा दुःख प्राप्त होत असतें. दैव अनुकूल असलें म्हणजे मग मनुष्य सुशिक्षित असो, अशिक्षित असो, पोर असो, थोर असो, साह्यसंपन्न असो, साह्यहीन असो, कसाही असो, त्याला लागेल तें लागेल तेथें मिळतें!

अंबुवीच राजाची कथा.

असें ऐकिवांत आहे कीं, पूर्वकाळीं मगध देशांत राजगृह नामक नगरांत अंबुवीच नांवाचा कोणीएक राजा होता. तो सर्व प्रकारें पंगु झाल्यानें सर्व कामांत अमात्याचे अधीन झाला. तेव्हां त्याचा महाकार्णि नामक अमात्य सर्वसत्ताधीश बनला, व त्या सत्तेचे जोरावर तो राजाला सुद्धां तुच्छ मानूं लागला. पुढें तो ऐश्वर्यानें इतका मत्त झाला कीं, प्रत्यक्ष राजाच्या उपयोगाकरितां नेमलेल्या स्त्रिया, रत्नें व इतर वस्तु राजाला न देतां आपणच भोगूं लागला. लोभानें लोभ वाढत जातो असा न्याय आहे. त्याप्रमाणें त्याचा लोभ शेखेर इतका वाढला कीं, राजाला च्युत करून त्याची गादीच आपण बळकवावी असें त्यास वाटूं लागलें. परंतु त्या राजाचे दैवाचा जोर असा कांहीं विलक्षण होता कीं, तो जरी सर्वथा पंगु होऊन केवळ पडून होता, तरी त्याचें राज्य अमात्याच्यानें घेववलें नाहीं! सारांश काय कीं, त्या अंबुवीचाच्या दैवांतच राज्य असल्यानें अमात्याचे प्रयत्न व्यर्थ गेले.

याचप्रमाणें, राजा, तुझ्या दैवांतच जर राज्य असेल, तर कोणी किती टपून बसले तरी सर्वांचे देखत तें तुजकडे राहीलच राहील; आणि तेंच दैवाचे मनांत नसेल, तर तूं कितीही तडफड केलीस तरी तें तुला जिरणार नाहीं. हा सिद्धांत समजून, कोण कुलांगार भला आणि कोण बाईट तें ओळख. बाकी बरा बाईट कसाही असो, तू दोघांचेंही ऐकून घे, त्याबद्दल माझें कांहीं म्हणणें नाहीं.

द्रोण म्हणाले:—अरे दुष्टा, तुझी पोटदुखी आम्ही ओळखून आहों. पांडवांशीं तुझा द्वेष आहे, तो आमच्या युक्तीनें साधत नाहीं म्हणून आमचे बोलण्याला नांवें ठेवितोस नाहीं का ? ठीक आहे. तूं कांहीं म्हण, आम्ही जी गोष्ट सांगत आहों तींत कुरुकुलाचें परम हित आहे. तथापि, ही दुष्टपणाची आहे असें ज्या पक्षीं तू म्हणतोस, त्या पक्षीं खऱ्या हिताची कोणती ती तूं तरी रड. बाकी तुला हें सांगून ठेवितों कीं, आमच्या उपदेशाविरुद्ध वागाल तर लवकरच कौरवांचें वाटोळें होईल, ही चिऱ्यावर रेघ ओढून ठेव !

अध्याय दोनशें पांचवा.

विदुराचें भाषण.

विदुर म्हणतोः—हे धृतराष्ट्रा, तुझे बांधवांनीं तुला निःसंशय कल्याणाची गोष्ट असेल तीच सांगावी हें त्यांचें कर्तव्य आहे. परंतु जो सांगि-

तली गोष्ट ऐकावयास तयार नसेल, अशा ठिकाणीं उपदेश ठसत नाहीं. शांतनव भीष्मानें तुला हितावह व प्रिय अशी गोष्ट सांगितली असूनही तूं ती पतकरीत नाहींस. त्याचप्रमाणें, परोपरीनें द्रोणानेंही तुझे हिताचीच गोष्ट तुला समजावून सांगितली असतां ती तुझ्या हिताची आहे असें हा राधेय कर्ण कबूल करीत नाहीं. राजा, मीं आपल्या मनाशीं पुष्कळ विचार करून पाहिला; पण भीष्म व द्रोण या दोन पुरुषसिंहांहून अधिक शहाणा व इतका जीव तोडून तुला हिताची गोष्ट सांगणारा दुसरा कोणी दिसत नाहीं. हे दोघेही वयानें, विद्येनें व ज्ञानानें वृद्ध असून तुला आणि पांडवांना सारखेच पहाणारे आहेत. राजा, धर्म आणि खरेपणा या दोन गोष्टींत दाशरथि राम किंवा गय यांपेक्षां हे यत्किंचितही कमी नाहींत. आजपर्यंत यांनीं तुला केव्हांही अहिताची गोष्ट सांगितली नाहीं. बरें, तुला भलतीच गोष्ट सांगण्याला, तूंही यांचा अपकार केलेला आमचे पाहण्यांत नाहीं. असें असतां, राजा, असले अमोघविक्रम थोर पुरुष तुला बऱ्याची गोष्ट सांगणार नाहींत असें घडेल तरी कसें ? धृतराष्ट्रा, हे दोघे या लोकांत ज्ञानानें श्रेष्ठ आहेत; यास्तव तुझ्याप्रीत्यर्थही हे कुटिल भाषण करणार नाहींत, अशी माझी पक्की पक्की खातरी आहे. हे कुरुनंदना, द्रव्यलोभानें हे धर्मज्ञ पक्षपाती बोलणें बोलणार नाहींत. यास्तव, हे जें तुला सांगत आहेत, त्यांतच तुझें परम कल्याण आहे असें मला वाटतें. कारण तूंच पहा कीं, त्यांचें बोलणें न्यायाचें नव्हे काय ? दुर्योधनादि जसे तुझे पुत्र आहेत, तसेच पांडवही निःसंशय तुझेच आहेत. असें असतां तुला जर कोणी मूर्ख मंत्री पांडवांचे अकल्याणाचा मार्ग सांगत असतील, तर त्यांना खरें कल्याण कळत नाहीं असें तूं समज. कदाचित् स्वपुत्रांविषयीं पक्षपात तुझ्याच मनांत असला, तरीही तो प्रकट करून दाखविण्यानें हे मंत्री तुझें शाश्वत हित तर साधीत नाहींतच, पण तुझें खोटेंपण मात्र जगाला जाहीर करीत आहेत ! यास्तव, राजा, हे महातेजस्वी भीष्मद्रोण तुला कोणत्याही प्रकारें भलती गोष्ट सांगत नाहींत, असें मला वाटतें. पण फळ काय ? त्यांचे उपदेशाप्रमाणें वागण्याचा तुझा संकल्प दिसत नाहीं ! नरश्रेष्ठ भीष्मद्रोणांनीं पांडव अजिंक्य आहेत म्हणून जें सांगितलें, तें सर्वथा खरें आहे. देव करो आणि पांडवांचे हातून तुझा नाश न होवो ! बाबा, समरामध्यें त्या सव्यसाची धनंजयाचा पराभव साक्षात् इंद्र तरी कसा करील ? आणि तो नवनागसहस्रबळी भीम संग्रामांत देवांना देखील अजिंक्यच नव्हे तर काय ? याचप्रमाणें ते आवळे जावळे बंधु शूर आहेत. जिवाची परवा असेल अशा पुरुषानें त्यांशीं तोंड देण्याची सोय नाहीं. बरें, उरला ज्येष्ठ बंधु युधिष्ठिर. तो तर धैर्य, दया, क्षमा, सत्य व पराक्रम यांचा केवळ पुतळाच आहे! त्याचा रणांत पराजय कसा होणार ? बा धृतराष्ट्रा, बलराम ज्यांचा पक्षपाती, श्रीकृष्ण ज्यांचा मंत्री, आणि सात्यकि ज्यांचा अनुयायी, अशांचा युद्धांत मोड कोणीं करावा ? द्रुपद ज्यांचा सासरा व धृष्टद्युम्नासारखे अतुलप्रभावी द्रुपदपुत्र ज्यांचे मेहुणे, त्यांचा पराभव होणें अशक्य आहे हें समजून, व शिवाय अर्ध राज्यावर त्यांचा सशास्त्र हक्क आहे हें ध्यानांत घेऊन, आधींपासूनच त्यांशीं तूं न्यायानें वाग. राजा, पुरोचनाचे कृतीनें मागें सांगितल्याप्रमाणें तुजवर जो मोठा दोष आला आहे, त्याचें परिमार्जन आज तूं पांडवांना राज्य देऊन कर. तूं पांडवांवर अनुग्रह केलास कीं तो आमच्या कुलांतील सर्वांवर केल्यासारखा होऊन, तुझ्या जीविताचें सार्थक होईल, व क्षत्रकुलाचा उत्कर्ष होईल. ह्याखेरीज, द्रुपद राजाही मोठा बलाढ्य असून तुमच्याशीं त्याचें पूर्वींचें वैर आहे; त्याला

या उपायानें आपल्लासा केल्यानें आयती तुमचे पक्षाला बळकटी येणारी आहे. वरें, यादवांची संख्या फार मोठी असून, ते सर्व कृष्णाचे साथी अर्थात् पांडवांना साहाय्य असणार, आणि श्रीकृष्ण जिकडे असेल तिकडेच जय असणार हें निर्विवादच आहे. हे पृथ्वीपते, सामोपचारानें कार्यसिद्धि होत असतां जो युद्धावर गोष्ट आणूं पहातो, त्याचें नशीब फुटलें असेंच समजावें. अरे, पांडव जिवंत आहेत हें ऐकून सर्व शहर व ग्रामवासी जन त्यांचे दर्शनाविषयीं उत्कंठित झाले आहेत. याकरितां, पांडवांना येथें घेऊन येऊन लोकांचा हेतु पूर्ण कर. बाबा, दुर्योधन, कर्ण व सुबलपुत्र शकुनि हे तिघेही धर्मनष्ट, दुर्बुद्धि व मूर्ख आहेत; त्यांचें सांगणें तूं मानूं नको. हे गुणवंता, मीं केव्हांच तुला सांगून ठेविलें आहे कीं, या दुर्योधनाचे मूर्खपणामुळें या प्रजाजनांचा विध्वंस होईल,आणि तो समय येऊं पहात आहे, म्हणून तुला पुन: सावध करितों; जप.

अध्याय दोनशें सहावा.

—:०:—

. विदुराचें द्रुपदपुरीं गमन.

धृतराष्ट्र म्हणाला:—बा विदुरा, ज्ञानी शांतनव भीष्म, ऋषि भगवान द्रोण व तूं हे तिघेही खरें व हिताचें असेंच सांगणें मला सांगत आहां यांत संशय नाहीं. ते महारथ वीर कौंतेय ज्याप्रमाणें पांडूचे पुत्र आहेत, त्याचप्रमाणें ते सर्व माझेही धर्मदृष्ट्या पुत्रच आहेत; व ज्याप्रमाणें हें राज्य माझे पुत्रांना न्यायप्राप्त आहे, त्याचप्रमाणें तें पांडवांनाही आहे, हेंही खरेंच आहे. यास्तव, बा विदुरा, तूं जाऊन त्या पांडवांना सत्कारपूर्वक माता कुंती व देवी द्रौपदी यांसह मजकडे घेऊन ये. धन्य भाग्य माझें कीं पांडव अजून जिवंत आहेत, कुंतीही आहे, आणि द्रुपदासारख्याची कन्या त्या महारथांना भार्या मिळाली आहे! नशीब आपलें कीं पुरोचन नष्ट झाला, व माझें पराकाष्ठेचें दु:ख दूर झालें! खरोखर आपणांसर्वांचेंही दैव उघडलें असें मी समजतों.

वैशंपायन सांगतात:—हे जनमेजया, याप्रमाणें धृतराष्ट्राची आज्ञा होतांच विदुर द्रुपद व पांडव यांजकडे गेला. त्यानें द्रुपद, द्रौपदी व पांडव यांजकरितां बरोबर बहुविध रत्नें व द्रव्यें नेलीं होतीं. राजा, तो सर्वशास्त्रनिपुण व धर्मज्ञ विदुर तेथें पोहोंचतांच प्रथम द्रुपदाकडे गेला. द्रुपदही न्यायकुशल होता. त्यानें रीतीप्रमाणें विदुराचें स्वागत केलें. मग संप्रदायाप्रमाणें उभयतांनीं परस्पर कुशलप्रश्न केले. नंतर, तेथेंच पांडव व केशवही त्याच्या दृष्टीस पडले. त्यांना प्रेमानें कडकडून आलिंगन देऊन त्यानें आरोग्य विचारिलें. नंतर त्या पांडवांनीं यथाक्रम त्या विदुराचें पूजन केल्यावर 'धृतराष्ट्रानें तुम्हांस प्रेमपूर्वक क्षेम विचारिलें आहे' म्हणून त्या बुद्धिमान विदुरानें त्यांस पुन:पुन: सांगून, कौरवांनीं दिल्याप्रमाणें पांडव, कुंती, द्रुपद व द्रुपदपुत्र यांना बहुविध रत्नें व द्रव्यें दिलीं. इतकें झाल्यावर तो चतुर व विनयशील विदुर पांडव व श्रीकृष्ण यांसमक्ष द्रुपदाला मोठ्या मर्यादेनें म्हणाला, "हे राजा, मी काय म्हणतों इकडे आपले पुत्र व अमात्य यांसह तूं लक्ष दे. द्रुपदा, तुझ्याशीं संबंध झाल्यामुळें राजा धृतराष्ट्र फारच संतुष्ट झाला असून त्यानें आपल्या अमात्यपुत्रबांधवांसह तुला पुन:पुन: कुशल विचारिलें आहे. त्याप्रमाणेंच, हे बुद्धिमंता, सर्व कौरवांसह शांतनव भीष्मानेंही तुला कुशल विचारलें आहे. तुझा जिवलग मित्र आचार्य द्रोण यानें तर तुला प्रेमालिंगनपूर्वक कुशल विचारलें आहे. हे पांचालराजा, तुझ्याशीं संबंध जडल्यामुळें धृतराष्ट्र व इतर कौरव हे, आपण कृतार्थ झालों, असें समजत आहेत. हे यज्ञसेना, फार काय सांगूं? तुझ्या या संबंधानें त्यांना जसा आनंद होत आहे, तसा प्रत्यक्ष

राज्यलाभानेंही होत नाहीं. असो; हें माझें बोलणें लक्षांत घेऊन तूं कृपा करून पांडवांना तिकडे पाठीव. पांडव केव्हां दृष्टीस पडतील असें त्या कौरवांना झालें आहे. बरें, बिचारे पांडवही आज कित्येक वर्षें बाहेर फिरत असल्यामुळें, आपले राजधानींत केव्हां एकदा जाऊं म्हणून त्यांना व त्यांच्या मातेलाही उत्कंठा झाली असेल. त्याप्रमाणेंच तुझी ही सुलक्षणी कन्या दृष्टीस पडावी म्हणून कौरवांकडील स्त्रिया, तशा-च शहरांतील व ग्रामांतील स्त्रिया अगदीं वाटे-कडे डोळे लावून बसल्या आहेत. यासाठीं कृपा करून विलंब न लावितां, पांडवांना पत्नी द्रौपदीसह तिकडे जाण्याची अनुज्ञा त्वां द्यावी असें मला वाटतें. तूं त्यांना अनुज्ञा दिलीस म्हणजे मग मी धृतराष्ट्राकडे सांडणीस्वार पाठवून कुंती व द्रौपदी यांसह पांडव येत आहेत असा त्याला निरोप पाठवीन."

अध्याय दोनशें सातवा.

—:०:—

पांडवांचें हस्तिनापुरीं आगमन.

द्रुपद म्हणाला:—हे प्राज्ञ विदुर, आपलें म्हणणें मला पटलें. या संबंधामुळें मलाही परम हर्ष झाला आहे. महात्म्या पांडवांनीं तिकडे जावें हेंही रीतीचेंच आहे; परंतु माझें नातें नाजुक पडल्यामुळें, मी होऊन आपल्या तोंडानें त्यांना 'जा' म्हणून सांगणें नीट दिसत नाहीं. याकरितां कुंतीपुत्र युधिष्ठिर, भीमार्जुन, नकुलसहदेव व पांडवांचे हितकर्ते धर्मज्ञ बलराम आणि कृष्ण यांस रुचेल तेव्हां पांडवांनीं तिकडे जावें, मजकडून मोकळीक आहे.

युधिष्ठिर म्हणाला:—महाराजा द्रुपदा, अनुयायांसह आम्ही बंधु सर्वथा तुजवर अवलंबून आहों. याकरितां तूं जशी स्वसंतोषानें आम्हांस आज्ञा देशील, तसें आम्ही करूं.

वैशंपायन सांगतात:—यावर श्रीकृष्ण म्हणाले, "पांडवांनीं तिकडे जावें हें मला बरें दिसतें. तथापि द्रुपद अखिलधर्मज्ञ आहे, तो म्हणेल तें खरें."

द्रुपद म्हणाला:—महाबाहु पुरुषोत्तमाला जें करणें या वेळीं उचित दिसेल, तेंच निःसंशय मलाही मान्य होईल. कारण महाभाग पांडवांचे कल्याणाविषयीं माझे इतकाच वासुदेवही निःसंशय तत्पर आहे. तोंडावर काय बोलावें? पण पांडवांचे हिताविषयीं वासुदेव जशी अहर्निश चिंता बाळगितो, तशी प्रत्यक्ष स्वतः युधिष्ठिर देखील बाळगीत नसेल!

वैशंपायन सांगतात:—असें बोलून द्रुपदानें अनुज्ञा दिली, तेव्हां ते विदुर कृष्ण व पांडव हे यशस्विनी कुंती व द्रौपदी या दोघींस बरोबर घेऊन वाटेंत रमत गमत हस्तिनापुरास गेले. पांडव आलेसें ऐकतांच राजा धृतराष्ट्रानें विकर्ण, चित्रसेन, द्रोण, गौतमकुलोद्भव कृपाचार्य व कौरव यांस पांडवांना सामोरे पाठविलें. मग त्या कौरवपरिवारानें शोभणारे ते बलाढ्य पांडुपुत्र हळू हळू नगरांत आले. पांडवांनीं नगरांत प्रवेश करितांच सर्व नागरिकांचें दुःख व शोक दूर होऊन सर्वांचीं मुखें आनंदानें व कौतुकानें विकसित झाल्यानें, जणू काय तें नगर उज्ज्वल दिसूं लागलें!

नंतर, पांडवांचा संतोष व्हावा म्हणून त्या नागरिकांनीं केलेलीं नानातऱ्हेचीं मनोवेधक भाषणें पांडवांचे कानीं पडलीं: ते म्हणाले, "पोटच्या पोरांप्रमाणें आमचें धर्मानें पालन करणारा तो धर्मज्ञ युधिष्ठिर परत आलासें पाहून आमचा हितकर्ता पांडु राजाच वनांतून परत आला असें आम्हांस निःसंशय वाटत आहे. शूर कुंतीपुत्र आज परत आपले नगरांत आले, तेव्हां आतां आमचे सर्व हेतु पूर्ण झालेच असें आम्ही समजतों. आम्हीं जर आजपर्यंत कांहीं होमहवन, दानधर्म किंवा तप केलें असेल, तर त्या सर्व पुण्याचे

बळानें हे पांडुपुत्र शंभर वर्षें या आमच्याच नगरांत राहोत !"

तदनंतर पांडवांनीं धृतराष्ट्र, भीष्म व इतर पूज्य गुरुजन यांस अभिवंदन केलें. मग सर्व लोकांस कुशलप्रश्न विचारून धृतराष्ट्राचे आज्ञेप्रमाणें नेमून दिलेल्या घरामध्यें ते गेले. तेथें कांहीं दिवसपर्यंत त्यांनीं विश्रांति घेतल्यावर, त्या महाबळांना धृतराष्ट्र व भीष्म यांनीं बोलवून आणलें.

नंतर धृतराष्ट्र म्हणालाः—युधिष्ठिरा, भ्रावांसह माझ्या बोलण्याकडे नीट लक्ष दे. आपणांमध्यें पुनश्च कलह होऊं नये याकरितां तुम्ही आपलें खांडवप्रस्थांत वास्तव्य करा. देवांना इंद्र तसा तुम्हांला अर्जुन राखण असतां खांडवप्रस्थांत तुम्हांला कोणीही त्रास देऊं शकणार नाहीं. तुम्हांला राज्याचा अर्धभाग मी देतों, तो घ्या आणि खांडवप्रस्थांत रहा.

इंद्रप्रस्थनगरनिर्माण.

वैशंपायन सांगतातः—राजा, सर्व पांडवांनीं धृतराष्ट्राचें तें वचन मान्य करून त्याला अभिवंदन केलें, आणि नंतर ते पुरुषश्रेष्ठ घोर अरण्यांत चालते झाले. राज्याचें अर्धं घेऊन ते पांडव कृष्णेसह खांडवप्रस्थांत शिरल्यानें विष्णूच्या अंशांनीं स्वर्गभुवनाला शोभा यावी त्याप्रमाणें त्या भूमीला शोभा आली.नंतर त्यांनीं शुद्ध व कल्याणकारक असा प्रदेश पाहून तेथें प्रथम अरिष्टनिवारणार्थ शांति वगैरे करून मग व्यास मुनींना पुढाकार देऊन आपल्या नगराची आंखणी केली. त्या नगराभोंवतीं त्यांनीं समुद्रप्राय खंदक खणिले, व गगनचुंबित अशी तटबंदी केली चंद्रकिरणांप्रमाणें शुभ्र अभ्रप्रकाशानें तें नगर नागांच्या योगानें भोगावती नगरी शोभते तसें शोभूं लागलें. त्या नगराच्या वेशींचीं द्वारें द्विपक्ष गरुडाप्रमाणें दिसत होतीं. नगरांत अनेक मोठमोठ्या इमारती असून मेघसमूहाप्रमाणें भासणाऱ्या उच्च गोपुरांनीं त्याचें रक्षण केलें होतें. त्या गोपुरांवर मोठ्या बंदोबस्तानें मोठमोठाल्या शक्ति व अनेक शस्त्रास्त्रें नगराच्या बंदोबस्ताकरितां ठेविलीं असल्यामुळें, तें नगर द्विजिव्ह सर्पांनीं वेढिल्यासारखें दिसत होतें. ठिकठिकाणीं अनुभवीक व लढाऊ लोकांच्या चौक्या रक्षणार्थ ठेविल्या असून, तीक्ष्ण अंकुश, तोफा, दुसरीं युद्धोपयोगी यंत्रें व मोठमोठालीं लोहमय चक्रें ठिकठिकाणीं ठेविलीं असल्यामुळें त्या नगराला फारच शोभा आली होती. सर्व शहरभर मोठमोठे रस्ते राखले असून ते सारख्या प्रमाणांत होते. त्या रस्त्यांवर कोणत्याही प्रकारची दैविक पीडा नव्हती. अशा प्रकारचें तें इंद्रप्रस्थ नगर मोठमोठाल्या टुमदार हवेल्यांनीं गजबजून गेल्यामुळें स्वर्गाप्रमाणें झळकत होतें. त्या नगरांतील एका रम्य व शुभकारक अशा भागांत युधिष्ठिराचें राजमंदिर असून, तें मेघसमुदायावर चमकून राहणाऱ्या विजेप्रमाणें शहरांतील इतर सर्व इमारतींवर झळकून राहिलें होतें, व धनाच्या राशींनीं भरून गेलें असल्यामुळें त्याला कुबेरमंदिराचीच उपमा साजत होती.

या प्रकारचें तें उत्कृष्ट नगर व युधिष्ठिरासारखा न्यायी राजा पाहून तेथें मोठमोठाले वेदवेत्ते ब्राह्मण आवडीनें राहावयास आले. त्याचप्रमाणें छप्पन्न देशांतल्या भाषा जाणणारे अनेक भाषाकोविद, व अलोट संपत्ति मिळवूं पाहणारे दूरदूरचे व्यापारीही तेथें येऊन राहिले. नानातऱ्हेच्या शिल्पांत निपुण अशा कारागिरांनीही तेथें वसति केली. त्या नगराच्या भोंवतीं मोठमोठाले रमणीय बगीचे असून त्यांत आम्र, आम्रातक, कदंब, अशोक, चंपक, पुन्नाग, नागचाफा, ओट व फणस, उत्तम पुष्पांनीं व फलभारांनीं नम्र झालेले मनोहर बकुल, केतक, ताल, तमाल, शाल, आमलक, लोध्र, अंकोल, जांबूळ, पाटल, कुब्जक, कस्तुरी, मोगरा, कण्हेर, पारिजात, व सदा पुष्प-

फलांनीं भरून गेलेले, अनेक प्रकारच्या पक्षिसमुदायांनीं गजबजलेले, व विशेषतः मत्त मयूर व कोकिल यांच्या रवानें घुमून राहिलेले असे अनेक वृक्ष ओळीनें लाविले होते. ठिकठिकाणीं आरशाप्रमाणें स्वच्छ हवाशीर बंगले बांधिले असून मध्यें मध्यें विहारार्थ कुंज बांधिले होते. कांहीं ठिकाणीं क्रीडार्थ कृत्रिम पर्वत केले असून गमती गमतीचीं पदार्थसंग्रहालयें बांधिलीं होतीं. चौकोनी, बदामी, वर्तुळ, अष्टपैलू वगैरे नानाआकृतींच्या मधुर आणि स्वच्छ उदकानें तुडुंब भरलेल्या विहिरी व कमलपुष्पांच्या वासांनीं भरून गेलेलीं आणि हंस, कारंडव, चक्रवाक इत्यादि पक्ष्यांच्या पंक्तींनीं अलंकृत अशीं विस्तीर्ण सरोवरें यांनीं त्या उद्यानांना फारच शोभा आली होती. याशिवाय, सभोंवार वृक्षांची गर्दी असून मध्यें रमणीय अशा पुष्करिणी बहुत होत्या; व ठिकठिकाणीं अति मनोहर व मोठमोठीं टांकी होतीं. राजा जनमेजया, याप्रमाणें अत्यंत रमणीय व पुण्यशील लोकांनीं युक्त अशा त्या राजधानींत राहिल्यानें पांडवांचा आनंद अखंड वाढत चालला. त्या ठिकाणीं देवव्रत भीष्म व धृतराष्ट्र यांनी युधिष्ठिराला पाठविल्यापासून पांडव खांडवप्रस्थाचे कायमचेच रहिवाशी झाले. ते इंद्रतुल्य पराक्रमी महाधनुर्धर पांचही पांडव तेथें राहूं लागल्या दिवसापासून तें नगर नागांच्या भोगावती नगरीप्रमाणें शोभूं लागलें. असो. राजा, याप्रमाणें पांडवांना त्या राजधानीमध्यें स्थापून त्यांच्या अनुमतीनें बलरामासह श्रीकृष्ण द्वारकेस गेले.

अध्याय दोनशें आठवा.

—:०:—

खांडवप्रस्थीं नारदांचें आगमन.

जनमेजय विचारतोः—हे तपोनिधे, याप्रमाणें पांडवांनीं इंद्रप्रस्थ नांवाची राजधानी स्थापिल्यानंतर पुढें काय केलें, तें सविस्तर ऐकण्याची मला फार इच्छा आहे. कारण, ते माझे पूर्वज पांडव मोठे मानी होते. तेव्हां अशांची मनधरणी एकट्या द्रौपदीनें कशी केली, व ते पांचहीजण महाभाग एकाच द्रौपदीचे ठिकाणीं रत असतां त्या परस्परांत फूट कशी पडली नाहीं, व द्रौपदीसह वर्तत असतां त्यांची एकमेकांशीं वागणूक कशी होती, हा सर्व इतिहास मोठा मनोरंजक व बोधप्रद होईल. याकरितां, ब्रह्मन्, आपण मला तो निवेदन करा.

वैशंपायन सांगतातः—राजा, धृतराष्ट्राची आज्ञा घेऊन पांडव खांडवप्रस्थास गेल्यावर अर्धे राज्य त्यांच्या ताब्यांत मिळालें. नंतर द्रौपदीसह ते मोठ्या सुखांत काळ क्रमूं लागले. भ्रात्यांच्या सहायानें त्या महातेजस्वी व सत्यप्रतिज्ञ युधिष्ठिरानें यथान्याय पृथ्वीचें पालन केलें; आणि ते सद्धर्मानें वागणारे महाबुद्धिवान पांचही बंधु सर्व शत्रूंना जिंकून मोठ्या आनंदांत आपल्या त्या राजधानींत राहिले. मोठमोठ्या उच्च सिंहासनांवर बसून ते प्रजाजनांचीं गाऱ्हाणीं ऐकून घेऊन त्यांना न्याय देत असत. याप्रमाणें ते बंधु आसनांवर बसले असतां एके दिवशीं सहजगत्या देवर्षि नारद तेथें आले. नारदांस पाहून युधिष्ठिरानें स्वतः, त्यांस आपलें स्वतांचें सुंदर आसन दिलें; व त्या महर्षींनीं त्याचा स्वीकार केल्यावर युधिष्ठिरानें अर्घ्यादिकांनीं त्यांचें स्वतः पूजन करून आपलें सर्व राज्य त्यांच्या पायावर वाहिलें! नारदांनीं त्याची ती पूजा मोठ्या प्रसन्न मनानें स्वीकारून त्याला उत्कर्षकारक असे अनेक अशीर्वाद दिले; व नंतर त्यास खालीं बसण्यास सांगितलें. नारदाज्ञेनें खालीं बसल्यावर, भगवान नारद आल्याचें युधिष्ठिरानें द्रौपदीस कळविलें. तें ऐकतांच द्रौपदी शुचिर्भूत होऊन शांत चित्तानें पांडवांसह नारद बसले होते तेथें आली. ती धर्मनिष्ठ सती त्या देवर्षींचे चरण वंदून व वस्त्र वगैरे नीट सांवरून व हात जोडून त्या महर्षींपुढें नम्रभावानें उभी राहिली. मग

तिलाही त्या सत्यवाक् ऋषिश्रेष्ठानें अनेक तऱ्हेचे आशीर्वाद देऊन "हे निष्पापे, आतां तूं जा" म्हणून सांगितलें.

द्रौपदी गेल्यावर युधिष्ठिरप्रभृति पांचही पांडवांना भगवान् नारद म्हणाले, "ही कीर्तिमती पांचालकन्या तुम्हां पांचांची एकच धर्मपत्नी आहे. याकरितां, जेणेंकरून तिजमुळें तुमच्यांत भेदभाव उत्पन्न होणार नाहीं असेंच आचरण तुम्ही परस्परांशीं ठेवा. नाहीं तर तुमची गति सुंदोपसुंद बंधूंसारखी होईल. हे सुंदोपसुंद त्रैलोक्यांत कोणाकाही अवध्य असून त्यांचें निजणें-उठणें, खाणेंपिणें वगैरे सर्व कांहीं एकत्रच होत होतें. फार तर काय ? ते एकाच घरांत रहात असून सभास्थानीं एकाच गादीवर बसत असत, अशी त्यांची प्रीति असतांही तिलोत्तमेप्रीत्यर्थ त्यांनीं एकमेकांचा घात केला. म्हणून मी तुम्हांला बजावून सांगतों कीं, जेणेंकरून तुम्हांत फूट पडणार नाहीं, व परस्परांचीं मनें परस्परांविषयीं शुद्ध राहतील, असाच वर्तनक्रम तुम्हीं ठेवावा."

युधिष्ठिर म्हणाला:—महर्षे, सुंदोपसुंद असुर हे कोणाचे पुत्र होते, त्यांच्यांत बेबनाव कसा झाला, त्यांनीं एकमेकांस कसें मारिलें, व जिच्या लोभासाठीं त्यांनीं परस्परांचा वध केला, ती अप्सरा तिलोत्तमा कोणा देवाची कन्या होती, हें सर्व यथावत् व सविस्तर ऐकण्याची मला फार उत्कंठा झाली आहे. याकरितां, हे तपोनिधे, आपण कृपा करून तो सर्व इतिहास मला कथन करा.

अध्याय दोनशें नववा.

—:०:—

सुंदोपसुंदांची कथा.

नारद सांगतात:—बा युधिष्ठिरा, हा पुरातन इतिहास मी तुला जसाच्या तसाच सांगतों, तो तूं भ्रात्यांसह ऐक. हिरण्यकशिपु नामक महादैत्याच्या वंशांत निकुंभ नांवाचा एक मोठा तपस्वी व बलाढ्य दैत्य निपजला. त्याला मोठे क्रूर, पराक्रमी, क्रूरबुद्धि, महाबली व दारुण असे सुंदोपसुंद नांवाचे दोन पुत्र झाले. ह्या उभयतांचा एकच निर्धार असून सर्व कामांत त्यांचा एक विचार असे. एकाचा आनंद तो दुसऱ्याचा आनंद, एकाला दुःख तें दुसऱ्याला दुःख, असे ते सर्वदा वागत. भोजन करणें झालें किंवा बाहेर जाणें झालें तरी एकाला टाकून एक नसे. ते सर्वदा एकमेकांशीं गोड बोलत असून एकमेकांचें हित करण्यास झटत असत. त्यांचा स्वभाव एक, आचार एक, जणू काय एकाच वस्तूचे ते दोन भाग होते. ते मोठे समंजस व बलाढ्य असून, कोणतेंही कार्य एकनिश्चयानें करीत असत. असें असतां, आपण सर्व त्रैलोक्य जिंकावें असा एकत्र संकेत करून तत्सिद्ध्यर्थ तप करण्यासाठीं दीक्षा घेऊन ते विंध्य पर्वतावर गेले. तेथें दीर्घकालपर्यंत जटावल्कलें धारण करून क्षुधेनें व तृषेनें जरी व्याकूळ झाले, तरी केवळ वायुभक्षण करून त्यांनीं उग्र तपश्चर्या केली. पायाच्या अंगठ्यावर उभें राहून व वर हात करून, डोळ्यांची पापणीही न भिटतां सूर्याकडे एकसारखी टक लावून ते कित्येक वर्षें होते. शेवटीं त्यांनीं आपल्या अंगाचें मांस तोडून त्याचा होम चालविला ! त्या वेळीं त्यांच्या अंगावर बोटबोट मळ चढला होता ! ह्याप्रमाणें बहुत वर्षेंपर्यंत व्रतस्थ राहून त्यांनीं खडतर तप केलें असतां, त्यांच्या त्या तपःप्रभावानें असा कांहीं अद्भुत चमत्कार झाला कीं, त्या पर्वतामधून धुराचे लोळ उठूं लागले. असें तें त्यांचें भयंकर तप पाहून देवांची घाबरगुंडी उडाली; व ते त्यांच्या तपाला विघ्न आणण्याच्या प्रयत्नास लागले. त्यांनीं अनेक वेळां रत्नें व स्त्रिया यांच्या योगानें त्यांस भलविण्याचा यत्न केला. परंतु ते दृढनिश्चयी बंधु व्रतापासून ढळले नाहींत. असें पाहून देवांनीं सुंदोपसुंदाच्या दृष्टीपुढें एक

अद्भुत माया पसरली. ती अशी कीं, त्यांत असुरांच्या आया, बहिणी, बायका व इतर आप्त यांच्या पाठीमागें हातांत शूल घेऊन राक्षस लागल्यामुळें त्या भिऊन जाऊन ठिकठिकाणीं अडखळून पडत आहेत, त्यांचे केश विस्कळित झाले आहेत, व त्यांचे वस्त्रालंकार अस्ताव्यस्त पडले आहेत, आणि अशा स्थितींत " हे सुंदोपसुंदहो! आमचें रक्षण करा! आमचें रक्षण करा!" याप्रमाणें मोठमोठ्यानें त्या आक्रोश करीत आहेत असें त्यांच्या दृष्टीस पडलें. इतकें झालें तरी त्या निश्चयी वीरांचा तपोभंग झाला नाहीं. नंतर, हा प्रकार पाहून दोघांतून एकालाही क्रोध येत नाहीं किंवा दुःखही होत नाहीं, असें पाहतांच त्या सर्व स्त्रिया व तो एकंदर देखावा त्यांच्या दृष्टीसमोरून नाहींसा झाला. मग सर्व लोकांचा हितकर्ता प्रभु ब्रह्मदेव समक्ष तेथें येऊन त्यांस " वर मागा " म्हणून म्हणाला. त्या वेळी ते दृढपराक्रमी सुंदोपसुंद बंधु ब्रह्मदेव आलासे पाहून त्यापुढें हात जोडून उभे राहिले; व त्याला म्हणाले, " हे प्रभो पितामह, आपण जर आमचे तपानें संतुष्ट झालां असाल, तर आम्हां दोघांस माया, अस्त्रविद्या, अतुल बल, वाटेल तें रूप घेण्याचें सामर्थ्य, व अमरत्व या पांच गोष्टी द्याव्या!"

ब्रह्मदेव म्हणाले:—असुरहो, अमरत्व खेरीज करून तुम्हीं मागितलेल्या बाकी सर्व गोष्टी तुम्हांस प्राप्त होतील. तुम्हांस साक्षात् अमरत्व देतां येत नाहीं. तथापि त्याचे ऐवजीं, तुम्हांस बहुतेक अमरतुल्यत्व प्राप्त होईल अशा कांहीं मृत्युप्रतिबंधक गोष्टी तुम्ही मागून घ्या. तुम्हांला अमरत्वही देण्यास मी समर्थ आहें; परंतु केवळ लोकांवर अधिकार गाजविण्याच्याच हेतूनें तुम्हीं हें उग्र तप केलें असल्यामुळें तुम्हांला तें देतां येत नाहीं. हे दैत्येंद्रहो, त्रैलोक्याला पादाक्रांत करण्याच्याच हेतूनें हें तप तुम्हीं केलें असल्यामुळें, अमरत्वाविषयींचा तुमचा हेतु मला पूर्ण करवत नाहीं.

सुंदोपसुंद म्हणाले:—ठीक आहे. मग आम्ही इतकेंच मागतों कीं, एकमेकांवांचून आम्हांला या त्रैलोक्यांतील कोणत्याही स्थावर किंवा जंगम भूतांपासून मृत्यु नसावा.

ब्रह्मदेव म्हणाले:—दैत्यहो, तुम्हीं जें व जसें मागितलें आहे, तें सर्व तुमच्या इच्छेनुरूप मी तुम्हास देतों; व मृत्युसंबंधीही तुम्हीं ज्या अटी घातल्या, त्याही मला मान्य आहेत. तुमचा मृत्यु होणें तर तुमच्या म्हणण्याप्रमाणेंच होईल!

नारद सांगतात:—याप्रमाणें वरदानानें त्या उभय बंधूंस तपापासून निवृत्त करून ब्रह्मदेव सत्यलोकीं परत गेले. इकडे ते बंधु ब्रह्मदेवापासून वर मिळवून सर्व लोकांना अवध्य होऊन आपल्या घरीं गेले. ते मनस्वी वर मिळवून कृतार्थ झाले असें पाहून त्यांच्या सुहृज्जनांना परमानंद झाला. नंतर त्यांनीं जटा वगैरे काढून मुकुट धारण केले; आणि बहुमोल अलंकार व निर्मल वस्त्रें परिधान केलीं. मग त्यांनीं सदासर्वकाळ आपल्या राज्यांत कौमुदीमहोत्सव चालविला. त्यांचे आप्तमित्र सदासर्वदा आनंदांत असून सर्व नगरभर ज्या त्या घरीं " खा, प्या, द्या, उपभोग घ्या, गा, मजा करा " याप्रमाणें शब्द ऐकूं येत असत; व जिकडे तिकडे उत्कृष्ट व मंजुळ वाद्यांचे मनोहर ध्वनि ऐकूं येत असत. सारांश, त्या दैत्यांच्या नगरांत सर्वत्र आनंदीआनंद माजून राहिला होता. त्या दैत्यांना वाटेल तें रूप घेतां येत असल्यामुळें, नानाप्रकारचीं रूपें घेऊन नित्य नव्या क्रीडा करण्यांत त्यांचीं अनेक वर्षें एका दिवसाप्रमाणें निघून गेलीं!

अध्याय दोनशें दहावा.

—:०:—

सुंदोपसुंदांचा धुमाकूळ!

नारद सांगतात:—याप्रमाणें बरींच वर्षें आनंदांत घालविल्यावर, त्रैलोक्य पादाक्रांत करण्या-

च्या इच्छेनें त्या उभय बंधूंनीं एकत्र मसलत करून सैन्याला बाहेर पडण्याविषयीं आज्ञा दिली; आणि इष्ट मित्र व वृद्ध वृद्ध दैत्य मंत्री यांची अनुमति घेऊन, प्रस्थानाविधि करून प्रयाणप्रस निषिद्ध अशा मघा नक्षत्रावर रात्रीचेच स्वतां–ही बाहेर पडले. त्यांजबरोबर गदा, पट्टे, शूल, मुद्गर वगैरे आयुधांनीं युक्त व चिलखतें वगैरे चढविलेली प्रचंड दैत्यसेना होती, व भाट, बंदिजन हे त्यांचीं मंगलगीतें गात होते; आणि ते विजयी होवोत अशा अर्थाचे प्रोत्साहक स्तुतिपाठ करीत होते. अशा थाटांत मोठ्या आनंदानें ते विजयार्थ चालले. त्यांच्या अंगीं मनास मानेल तेथें अव्याहत संचार करण्याचें सामर्थ्य असल्यामुळें, युद्धासाठीं खुमखुमलेले ते उन्मत्त दैत्य अंतरिक्षांत उडून थेट स्वर्गांतच जाऊन भिडले. ते आलेसें पाहून व त्यांना असलेल्या ब्रह्मदेवाच्या वरदानाचा विचार करून स्वर्गवासी देव आपलें ठिकाण ओस टाकून ब्रह्मलोकीं चालते झाले. तेव्हां ते तीव्रपराक्रमी बंधु इंद्रलोकास गेले, व तो लोकही जिंकून यक्ष, रक्षोगण व सर्व आकाशगामी प्राणी यांस त्यांनीं पटापट ठार केलें. इतकें करूनही तृप्त न होतां ते पाताळांत गेले. तेथें सर्व नागांचा सप्पा उडवून ते महारथी समुद्रांत शिरले. मग समुद्राचे आश्रयानें रहाणाऱ्या सर्व म्लेच्छ जाति निर्दाळून त्यांनीं जमिनीवर पाय ठेविला, आणि पृथ्वीविजयास आरंभ केला! या वेळीं त्यांनीं आपल्या सैनिकांस एकत्र बोलावून मोठ्या सक्तीनें खरमरीत ताकीद दिली कीं, "या भूतलावरील राजर्षि व ब्राह्मण हे मोठमोठे यज्ञ व हव्यकव्यें यांच्या योगानें देवांचें तेज, बल व वैभव वाढवीत असतात. याकरितां असल्या कामांत पडणाऱ्या सर्व दैत्यशत्रूंचा आपण एकजुटीनें खरपूस समाचार घेतला पाहिजे हें लक्षांत ठेवा!" याप्रमाणें सर्व सैनिकांस खडखडीत ताकीद देऊन, व सर्वतोमुख अशीं रूपें धारण करून अत्यंत क्रूर कर्म करण्याच्या निश्चयानें ते महासागराच्या पूर्वतीराकडे वळले. तेथें जे कोणी द्विजाति यजन किंवा याजन करितांना आढळले, त्या सर्वांना जबरीनें ठार करून ते दांडगे तेथून पुढें चालले. त्यांचे सैनिकांनीं जितेंद्रिय मुनींच्या आश्रमांत घुसून त्यांच्या अग्निहोत्रादिकांचीं उपकरणें उचलून निर्धास्तपणें पाण्यांत फेकून दिलीं. यज्ञादिक क्रियांचा उच्छेद होतोसें पाहून त्या ऋषींनीं क्रुद्ध होऊन त्या दैत्यांना तडातड शिव्याशाप दिले; परंतु ब्रह्मदेवाचे वरबलामुळें त्या शापांचा त्यांवर कांहींएक परिणाम न होतां, पाषाणावर आदळणाऱ्या शरधारेप्रमाणें ते शाप बोथट झाले! मग या दैत्यांपुढें आपली कांहींच मात्रा चालत नाहीं असें जेव्हां द्विजांनीं पाहिलें, तेव्हां आपले नियमधर्म टाकून ते वाट फुटली तिकडे पळाले! या भूतलावर जेवढे मिळून जितेंद्रिय, शांत व तपोनिष्ठ होते, तेवढे सारे, गरुडाला पाहून सर्प पळतात त्याप्रमाणें आपापलीं स्थानें सोडून भयानें सैरावैरा पळूं लागले. तपोवनांत जिकडे पहावें तिकडे ऋषींच्या झोंपड्या मोडून तोडून जमीनदोस्त केलेल्या, त्यांचीं भांडींकुंडीं फोडून टाकिलेलीं, स्रुवादि यज्ञोपकरणांचे तुकडे तुकडे करून टाकिलेले, असा प्रकार दृष्टीस पडूं लागला. सारांश, प्रलयसमयीं काळाचा हात फिरल्याप्रमाणें सर्व जगत् भयाण व ओस दिसूं लागलें; तरी त्या दुष्टांचें समाधान झालें नाहीं. त्यांनीं असें पाहिलें कीं, बरेच ऋषि आपले भयानें अदृश्य होऊन आपले तावडींतून सुटले आहेत. पण त्यांनाही गांठून ठार केलेंच पाहिजे. याकरितां आपण आतां हीं रूपें सोडून भलतीं सलतीं रूपें घ्यावीं, म्हणजे आपण नाहीं असें पाहून ते ऋषि पुनः प्रकट होतील, आणि तसें झालें म्हणजे सहजच आपले तडाख्यांत सांपडतील!

धर्मराजा, या संकेताप्रमाणें एकवार त्यांनीं मत्त

गजांचीं रूपें घेतलीं, आणि घोर अरण्यांत कडे कुहरादि दुर्गम स्थळीं जे कोणी दडून राहिले होते, अशांना हुडकून आपल्या शुंडांनीं बाहेर ओढून ओढून ठार मारिलें! कधीं त्यांनीं सिंह व्हावें, कधीं व्याघ्र व्हावें, कांहीं वेळ मध्येंच एकाएकीं अदृश्य व्हावें, अशा रीतीनें नानाप्रकारच्या हुलकावण्या दाखवून व वेळ पडेल तसतसे निरनिराळे डावपेंच करून त्या दुष्टांनीं यच्चयावत् ऋषींचा संहार केला! एवंच, उभ्या पृथ्वीतळावर कोणी क्षत्रिय किंवा ब्राह्मण उरला नाहीं! यज्ञयाग, वेदाध्ययन यांचें नांवही लोपलें; कोठें उत्सव नाहीं, सोहाळा नाहीं, कांहीं नाहीं; जिकडे तिकडे एकच हाहाकार माजून राहिला; भयानें सर्वांची गाळण उडून गेली; कामकाजाला कोणाचा हातपाय उठेना; बाजारांतील देवघेव बंद पडली; कोणी कसलें देवकार्य करीना; कोठें मंगलकार्यें किंवा विवाह वगैरे विधि दृष्टीस पडतना; कृषीवल नांगर टाकटाकून पळाले; गोपाळ गोधनें सोडून चालते झाले; कोणत्याही शहरांत जा, तपोवनांत जा, एक वाडा किंवा एक आश्रम अभग्न उभा असेल तर शपथ! सर्वत्र घरेंदारेंही मोडून तोडून कोसळून पडलीं होतीं; जिकडे पहावें तिकडे हाडांचे व सांगाड्यांचे ढिगारेचे ढिगारे पडलेले; असें वाटे कीं, डोळे उघडूं नये व असला भयंकर प्रकार पाहूं नये! सारांश, कोठें देवकार्य नाहीं, पितृकार्य नाहीं, न स्वाहा, न स्वधा, न वषट्कार! याप्रमाणें सर्व जगताची उध्वस्त स्थिति झाल्यामुळें त्याकडे नुसतें पाहण्याला देखील भय वाटे. फार काय सांगावें? त्या सुंदोपसुंदांचें तें घोर कृत्य पाहून आकाशांतील ग्रह, नक्षत्रें, चंद्र, सूर्य व देवता यांच्याही तोंडचें पाणी पळालें. तीं सर्व निस्तेज पडलीं! राजा, याप्रमाणें क्रूर कर्मानें दशदिशा पादाक्रांत करून, आतां आपणांस कोठें कोणी शत्रु उरला नाहीं असें पाहून ते दोघे दैत्य बंधु कुरुक्षेत्रांत येऊन राहिले.

अध्याय दोनशें अकरावा.

—:०:—

सुंदोपसुंदवधोपाय.

नारद सांगतातः—याप्रमाणें सर्वत्र भयंकर प्रळय उडालेला पाहून जितेंद्रिय, जितक्रोध, जितात्म असे देवर्षि, महर्षि व सिद्धही व्यथित होऊन जगतावर कृपा करण्याचे हेतूनें ब्रह्मलोकीं गेले. तेथें देवर्षि, ब्रह्मर्षि व देवगण यांचे परिवारांत पितामह त्यांच्या दृष्टीस पडले. त्याच ठिकाणीं तेजस्वी महादेव, वायुसहित अग्नि, चंद्र, सूर्य, इंद्र व ब्रह्मोपासक ऋषि असून वैखानस, वालखिल्य, वानप्रस्थ, मरीचिप नामक देवता, अज, विमूढ व तेजोगर्भसंज्ञक तपस्वीही तेथें बसले होते. असो. हे सर्व ऋषि दीन होऊन ब्रह्मदेवापुढें उभे राहिले, व त्या सुंदोपसुंदांनीं लोकांना कसकसें नागविलें, कसकसें छळिलें, तो इत्थंभूत वृत्तांत यथाक्रम त्यांनीं पितामहास कथन केला. त्यांचें गाऱ्हाणें कानीं पडतांच तेथें बसलेल्या देवांनीं व ऋषींनींही त्यांचाच पक्ष उचलून सुंदोपसुंदांच्या नाशाविषयीं उपाय योजण्याचे कामीं ब्रह्मदेवाला भीड घातली. नंतर पितामहानें त्या सर्वांचें बोलणें मनांत घेऊन, दैत्यवधोपायाचा क्षणभर आपल्याशीं विचार करून, त्या कामीं साह्यार्थ विश्वकर्म्याला बोलाविलें; आणि तो येतांच, 'ज्याला त्याला कामुक करून सोडील अशी एक सुंदर स्त्री निर्माण कर' म्हणून त्याला त्या तपोधनानें आज्ञा दिली. विश्वकर्म्यानें ब्रह्मदेवाचे बोलण्याला मान डोलवून त्याला अभिवंदन केलें; व आपल्याशीं फिरफिरून विचार करून एक दिव्य स्त्री निर्माण केली. ती निर्माण करण्यासाठीं त्यानें प्रथम त्रैलोक्यांतील स्थावरजंगम वस्तूंपैकीं जेथें